| ६ | गुरूवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.१५ ते दुपारी १२.२६ | ०२ - | ११ |
| | | दुपारी १२.४० ते दुपारी ०३-१४ | ०२ - | ३४ |
| | | दुपारी ०४.०० ते रात्री ०९.३४ | ०५ - | ३४ |
| ७ | शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.१५ ते सकाळी १०.४१ | ०० - | २६ |
| | | सकाळी ११.०० ते दुपारी १२.१२ | ०१ - | १२ |
| | | दुपारी १२.२० ते दुपारी ०२.०८ | ०१ - | ४८ |
| | | दुपारी ०२.४५ ते सायं. ०६.०३ | ०३ - | १८ |
| ८ | सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ | दुपारी १२.०० ते दुपारी ०१.४४ | ०१ - | ४४ |
| | | दुपारी ०१.५४ ते दुपारी ०२.४० | ०० - | ४६ |
| | | दुपारी ०३.२० ते सायं. ०५.०६ | ०१ - | ४६ |
| ९ | मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.१५ ते सकाळी ११.१७ | ०१ - | ०२ |
| | | दुपारी १२.३० ते दुपारी ०३.०५ | ०२ - | ३५ |
| | | दुपारी ०४.०० ते सायं. ०७.४१ | ०३ - | ४१ |
| | | सायं. ०७.५१ ते रात्री ०८.४७ | ०० - | ५६ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १० | बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ | सकाळी ०९.०० ते सकाळी ११.४५ | ०२ - ४५ |
| | | दुपारी १२.०० ते दुपारी ०२.२६ | ०२ - २६ |
| | | दुपारी ०३.०० ते रात्री ०७.१४ | ०४ - १४ |
| **एकूण : त्रेसष्ट तास एकतीस मिनिटे फक्त** | | | **६३ - ३१** |

## मत विभाजन

| दिनांक व प्रभारी सदस्य | प्रस्ताव/ सुधारणा | प्रस्तावाला/ सुधारणेला अनुकूल मत | प्रस्तावाला/ सुधारणेला प्रतिकूल मत | तटस्थ | प्रस्ताव/ सुधारणा संमत की असंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| -- | -- | निरंक | -- | -- | -- |

# विवरण क्रमांक २

(अ) नवनिर्वाचित सदस्यांची शपथ / प्रतिज्ञा ग्रहण करणारे सदस्य

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | शपथ घेतल्याचा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | निरंक | |

(ब) सभागृह नेता संदर्भातील घोषणा - म.वि.प. २ (जे-१)

| अ.क्र. | नेत्यांचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | निरंक | |

(क) नवनिर्वाचित सदस्यांचा परिचय

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | परिचयाचा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | निरंक | |

(ड) मंत्री / राज्यमंत्री यांचा परिचय

| अ.क्र. | सदस्यांचे नांव | परिचयाचा दिनांक |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **मंत्री** | |
| | निरंक | |
| | **राज्यमंत्री** | |
| | निरंक | |

# विवरण क्रमांक - ३

## विधानपरिषदेचे ०७ ते २० डिसेंबर, २०२३

## महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा.उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या — १०

| अ. क्र. | वार व दिनांक | एकूण सदस्य संख्या | उपस्थिती संख्या | अनुपस्थितीची संख्या | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | गुरुवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ | ५५ | ३३ | २२ | ६०.००% |
| २ | शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ | ५५ | ३८ | १७ | ६९.०९% |
| ३ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ | ५५ | ५१ | ४ | ९२.७३% |
| ४ | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ | ५५ | ५० | ५ | ९०.९१ |
| ५ | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ | ५५ | ५२ | ३ | ९४.५५% |
| ६ | गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ | ५५ | ५० | ५ | ९०.९१% |
| ७ | शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ | ५५ | ४५ | १० | ८१.८२% |
| ८ | सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ | ५५ | ५० | ५ | ९०.९१% |
| ९ | मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ | ५५ | ४९ | ६ | ८९.०९% |
| १० | बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ | ५५ | ३५ | २० | ६३.६४% |

# विवरण क्रमांक — ४

## विधानपरिषदेचे हिवाळी अधिवेशन २०२३
## दिनांक ७ ते २० डिसेंबर, २०२३
## महाराष्ट्र विधानपरिषद सदस्यांच्या उपस्थितीचे दिवस व बैठकीच्या एकंदर दिवसांची टक्केवारी

(मा.उप सभापती, विरोधी पक्षनेता व्यतिरिक्त)

एकूण बैठकांची संख्या — १०

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | असगावकर, श्री.जयंत दिनकर | ०६ | ०४ | ६०% |
| २ | अडबाले, श्री.सुधाकर गोविंदराव | १० | -- | १००% |
| ३ | अहिर, श्री.सचिन मोहन | १० | -- | १००% |
| ४ | आंबटकर, डॉ.रामदास भगवानजी | १० | -- | १००% |
| ५ | कराड, श्री.रमेश काशिराम | ०९ | ०१ | ९०% |
| ६ | कायंदे, डॉ.मनीषा शामसुंदर | १० | -- | १००% |
| ७ | काळे, श्री.विक्रम वसंतराव | १० | -- | १००% |
| ८ | खडसे, श्री.एकनाथराव गणपतराव | ०८ | ०२ | ८०% |
| ९ | खापरे, श्रीमती उमा गिरीष | १० | -- | १००% |
| १० | खंडेलवाल, श्री.वसंत मदनलाल | १० | -- | १००% |
| ११ | गिरकर, श्री.विजय ऊर्फ भाई विठ्ठल | -- | १० | ०% |
| १२ | चव्हाण, श्री.सतीश भानुदासराव | १० | -- | १००% |
| १३ | जगताप, श्री.अशोक अर्जुनराव ऊर्फ भाई | ०७ | ०३ | ७०% |
| १४ | जानकर, श्री.महादेव जगन्नाथ | ०९ | ०१ | ९०% |
| १५ | ठाकरे, श्री.उध्दव बाळासाहेब | ०३ | ०७ | ३०% |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १६ | डावखरे, श्री.निरंजन वसंत | १० | -- | १००% |
| १७ | तटकरे, श्री.अनिकेत सुनिल | १० | -- | १००% |
| १८ | तांबे, श्री.सत्यजीत सुधीर | १० | -- | १००% |
| १९ | दटके, श्री.प्रविण प्रभाकरराव | १० | -- | १००% |
| २० | दराडे, श्री.किशोर भिकाजी | ०९ | ०१ | ९०% |
| २१ | दराडे, श्री.नरेंद्र भिकाजी | १० | -- | १००% |
| २२ | दरेकर, श्री.प्रविण यशवंत | ०९ | ०१ | ९०% |
| २३ | दुर्राणी, श्री.अब्दुल्ला खान ए.लतिफ खान | ०७ | ०३ | ७०% |
| २४ | धस, श्री.सुरेश रामचंद्र | ०९ | ०१ | ९०% |
| २५ | नाईक, श्री.नीलय मधुकर | ०८ | ०२ | ८०% |
| २६ | नाईक-निंबाळकर, श्री.रामराजे प्रतापसिंह | ०५ | ०५ | ५०% |
| २७ | पटेल, श्री.अमरिशभाई रसिकलाल | ०१ | ०९ | १०% |
| २८ | पडळकर, श्री.गोपीचंद कुंडलिक | ०७ | ०३ | ७०% |
| २९ | परब, ॲड.अनिल दत्तात्रय | ०८ | ०२ | ८०% |
| ३० | पाडवी, श्री.आमश्या फुलजी | १० | -- | १००% |
| ३१ | पाटील, श्री.कपिल हरिश्चंद्र | १० | -- | १००% |
| ३२ | पाटील, श्री.जयंत प्रभाकर | ०७ | ०३ | ७०% |
| ३३ | पाटील, श्री.रमेशदादा | ०८ | ०२ | ८०% |
| ३४ | पाटील, श्री.रामराव बालाजीराव | १० | -- | १००% |
| ३५ | पाटील, श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. | ०८ | ०२ | ८०% |
| ३६ | पोटे-पाटील, श्री.प्रविण रामचंद्रजी | ०९ | ०१ | ९०% |
| ३७ | पोतनिस, श्री.विलास विनायक | ०८ | ०२ | ८०% |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ३८ | बाजोरीया, श्री.विप्लव गोपीकिसन | ०८ | ०२ | ८०% |
| ३९ | बावनकुळे, श्री.चंद्रशेखर कृष्णरावजी | ०७ | ०३ | ७०% |
| ४० | भारतीय, श्री.श्रीकांत पंडीतराव | ०९ | ०१ | ९०% |
| ४१ | मिर्झा, डॉ.वजाहत मिर्झा अथर | १० | -- | १००% |
| ४२ | मिटकरी, श्री.अमोल रामकृष्ण | ०९ | ०१ | ९०% |
| ४३ | मोहिते-पाटील, श्री.रणजितसिंह विजयसिंह | ०७ | ०३ | ७०% |
| ४४ | म्हात्रे, श्री.ज्ञानेश्वर बारकू | १० | -- | १००% |
| ४५ | राठोड, श्री.राजेश धोंडीराम | १० | - | १००% |
| ४६ | लाड, श्री.अरुण गणपती | ०७ | ०३ | ७०% |
| ४७ | लाड, श्री.प्रसाद मिनेश | १० | -- | १००% |
| ४८ | लिंगाडे, श्री.धिरज रामभाऊ | ०७ | ०३ | ७०% |
| ४९ | वंजारी, श्री.अभिजीत गोविंदराव | ०९ | ०१ | ९०% |
| ५० | शिंदे, प्रा.राम शंकर | ०९ | ०१ | ९०% |
| ५१ | शिंदे, श्री.शशिकांत जयवंतराव | ०६ | ०४ | ६०% |
| ५२ | शिंदे, श्री.सुनिल गोविंद | १० | -- | १००% |
| ५३ | सरनाईक, श्री.किरण रामराव | ०९ | ०१ | ९०% |
| ५४ | सातव, डॉ.प्रज्ञा राजीव | १० | -- | १००% |
| ५५ | सिंह, श्री.राजहंस | १० | -- | १००% |
| ५६ | रिक्त | | | |
| ५७ | रिक्त | | | |
| ५८ | रिक्त | | | |
| ५९ | रिक्त | | | |
| ६० | रिक्त | | | |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | उपस्थिती | अनुपस्थिती | उपस्थितीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| ६१ | रिक्त | | | |
| ६२ | रिक्त | | | |
| ६३ | रिक्त | | | |
| ६४ | रिक्त | | | |
| ६५ | रिक्त | | | |
| ६६ | रिक्त | | | |
| ६७ | रिक्त | | | |
| ६८ | रिक्त | | | |
| ६९ | रिक्त | | | |
| ७० | रिक्त | | | |
| ७१ | रिक्त | | | |
| ७२ | रिक्त | | | |
| ७३ | रिक्त | | | |
| ७४ | रिक्त | | | |
| ७५ | रिक्त | | | |
| ७६ | रिक्त | | | |

# विवरण क्रमांक – ५

## महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२३ (डिसेंबर) च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनातील दैनंदिन कार्यवाहीचा संक्षिप्त अहवाल

## गुरूवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३

विधान परिषदेची बैठक नागपूर येथील विधान परिषदेच्या सभागृहात दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**शुभारंभ –**

अधिवेशनाचा शुभारंभ "वंदे मातरम्" या गीताच्या समूह गायनाने झाला.

त्यानंतर राज्य गीताचे समूह गायन झाले.

**१.** (अ) (१) उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ७ - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहाच्या पटलावर ठेवला.

(२) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ८ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहाच्या पटलावर ठेवला.

(३) गृहनिर्माण मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक ९ - महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) अध्यादेश, २०२३ सभागृहाच्या पटलावर ठेवला.

(ब) सहकार मंत्र्यांनी, सन २०२३ चा अध्यादेश क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) अध्यादेश, २०२३ मागे घेतल्याबाबतचे माननीय राज्यपालांचे आदेश सभागृहाच्या पटलावर ठेवले.

**२.** उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्र्यानी, सन २०२३-२०२४ करिता खर्चाचे पुरवणी विवरणपत्र सभागृहाला सादर केले व भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २०५ व २०३ (३) खाली मिळालेल्या अधिकारानुसार महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्याकरिता सभागृहाला शिफारस केली असल्याचे सांगितले.

सन २०२३-२०२४ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सभागृहाला सादर करण्यात आलेल्या आहेत. सदरहू पुरवणी मागण्यांच्या विवरणपत्रांच्या प्रती सदस्यांसाठी राखून ठेवण्यात आलेल्या

टपालखणाद्वारे वितरित करण्यात येत आहेत. सदर प्रकाशन विधानमंडळाच्या *www.mls.org.in* या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल, असे उप सभापतींनी सांगितले.

**३.** सचिव-२ (कार्यभार), माननीय राष्ट्रपतींची अधिसंमती मिळालेले एक विधानसभा विधेयक व माननीय राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या १० विधानसभा विधेयकांच्या नावांची यादी सभागृहास वाचून दाखविली.

**४.** श्री.नरेंद्र दराडे, समिती सदस्य यांनी, शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास वेळ नेमून देण्यासंबंधीचे अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत सभागृहाला सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**५.** माननीय उप सभापतींनी महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८ (१) अन्वये खालील सन्माननीय सदस्यांना सभापती तालिकेवर नामनिर्देशित केले –

(१) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२) श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स.

(३) श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स.

(४) श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.

सदर सभापती तालिकेवर नामनिर्देशित करण्यासाठी अजून एक नाव आले असून या संदर्भात उद्या निर्णय जाहीर करण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

माननीय उप सभापतींनी महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सव कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत खालील घोषणा केली –

"महाराष्ट्र विधानपरिषदेच्या शतक महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रमांचे आयोजन विधानमंडळाच्या माध्यमातून करण्यात येत आहे. याच मालिकेत उद्या शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९.०० ते ११.०० या वेळेत विधानपरिषद सभागृहात विधानपरिषदेचे विद्यमान सदस्य तसेच नागपूर विधिमंडळ अधिवेशनाचे प्रदीर्घ काळ वार्तांकन केलेले ज्येष्ठ पत्रकार यांच्या उपस्थितीत महाराष्ट्र विधिमंडळ संसदीय वाटचालीत हिवाळी अधिवेशनाचे महत्त्वपूर्ण योगदान" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री.एकनाथजी शिंदे,

सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.देवेंद्रजी फडणवीस, सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार, सन्माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.चंद्रकांतदादा पाटील, दोन्ही सभागृहांचे माननीय विरोधी पक्ष नेते, विधानपरिषदेतील सर्व गट नेते व सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, उद्या आपण सर्वांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहावे. ज्या ज्या पत्रकार बंधू-भगिनींनी विधानपरिषद सभागृहात समालोचन केलेले आहे, त्याखेरिज आज जे नाहीत, परंतु जे ज्येष्ठ आहेत त्यांनाही उद्याच्या कार्यक्रमाचे निमंत्रण दिलेले आहे. आपण सर्वांनी उद्या सकाळी ९.०० वाजता या सभागृहात कार्यक्रमासाठी उपस्थित रहावे, अशी माझी विनंती आहे. माझ्याकडून आपणास आवाहन करण्यात येते की, आपण या कार्यक्रमास जरुर उपस्थित राहावे."

श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांनी, "विधानपरिषद सभागृहाच्या माध्यमातून त्यांना Y+ सुरक्षा देण्याचे आश्वासन देण्यात येऊन सुद्धा त्यांना अद्यापपर्यंत संरक्षण देण्यात न येणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या संदर्भात सूचना देण्यात येतील असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, "राज्यात मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस आणि गारपीट झाल्यामुळे झालेल्या शेत पिकांचे व पशुधन यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

या संदर्भात सूचना देण्यात येतील असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, "बोरिवलीतील प्रसिद्ध अभिनेते श्री. प्रसाद खांडेकर यांच्या "एकदा येऊन तर बघा" या मराठी सिनेमाला सिनेमागृह मिळत नसणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

मराठी सिनेमाला सिनेमागृह मिळत नसेल तर आवश्यकतेनुसार कायदेशीर कारवाई देखील केली जाईल व सिनेमाला सिनेमागृह उपलब्ध करून देण्यात येईल असे उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**६.** उप सभापतींनी, श्री. बबनराव दादाबा ढाकणे, माजी उपाध्यक्ष, माजी मंत्री, माजी विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानसभा व माजी वि.प.स. व श्री. किसनराव मक्काजी राठोड, व श्री. स. प. माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली व शोक प्रस्ताव संमत करण्यात आला. शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतीपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

## शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३

श्री.जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, विधान परिषदेला शंभर वर्षे पूर्ण झाल्याबद्दल कार्यक्रम आयोजित करून नागपूरच्या पत्रकारांना बोलावून त्यांचा गौरव केला त्याबद्दल माननीय उप सभापती यांचे आभार मानले.

ॲड.अनिल परब, वि.प.स. यांनी, 'सन्माननीय सदस्य श्री.राजेश राठोड यांना पोलीस संरक्षण उपलब्ध करून देण्याची आवश्यकता,' इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

संसदीय कार्यमंत्र्यांनी याबाबत नोंद घेतली असल्याचे सांगितले.

पोलीस महासंचालक किंवा माननीय गृहमंत्री यांच्याशी चर्चा करून सरकारने या संदर्भात लवकर निर्णय घ्यावा असे निदेश माननीय उप सभापतींनी सांगितले.

१. (क) (१) पाच तारांकित प्रश्नांची यांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** महिला व बालविकास मंत्री यांनी, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ मर्यादित, नवी मुंबई यांचा सन २०२१ -२०२२ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी, "इगतपुरी येथील कातकरी कुटुंबाला वेठबिगार मजुरीसाठी अहमदनगर जिल्हयातील नेवासा येथे नेण्यात येऊन त्यांचे शोषण करण्यात येणे" इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

ॲड. निरंजन डावखरे व डॉ. मनिषा कायंदे वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेबाबत आपले मत मांडले.

शासनाने याबाबत नोंद घेतली असल्याचे उद्योग मंत्र्यांनी सांगितले.

वेठबिगारांच्या प्रश्नांवरील माहिती सभागृहामध्ये नियम २८९ च्या सूचनेतून आणि माहितीच्या मुद्यातून मांडलेली अतिशय महत्त्वाची असून वेठबिगारांच्या प्रश्नांवरील अनेक मुद्दे हे अनिर्णित असल्याने नियम २८९ अन्वये मांडलेली सूचना आणि माहितीचे मुद्दे एकत्रित करून या विषयाचे नियम ९७ मध्ये परिवर्तन करावे त्यावर चर्चा घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, "अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीसंदर्भात" आपले म्हणणे मांडले.

शासनाने यावर निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सचिन अहिर वि.प.स. यांनी उपरोक्त विषयासंदर्भात आपले मत मांडले.

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांनी याबाबत खुलासा केला.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून २८ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३८ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी नियम २८९ अन्वये सूचना दिली असून विषय गंभीर असल्यामुळे त्यांना थोडक्यात विषय मांडण्याची अनुमती देण्यात येत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी, "महाराष्ट्र राज्यातील एमआयडीसीमध्ये आश्वासित केलेले प्रकल्प" इ. बाबत नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंदर्भात आपले मत व्यक्त केले.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीतून गत ४८ तासांत ८ मुलांचे अपहरण होणे" इ. बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेस दालनात अनुमती नाकारली असून या विषयाबाबत शासनाने निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**३.** आज शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वयेच्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे नागपूर येथे हिवाळी अधिवेशन कालावधीत राज्यातील विद्यापीठांमधील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संसदीय अभ्यास वर्गाचे आयोजन करण्यासंबंधी घोषणा केली.

**४.** (१) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये इमारतींचे मालक-भोगवटादार, गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या इमारतींचे फायर ऑडीट परवानाधारक अग्निशमन यंत्रणेमार्फत करून घेणे आणि त्याचा अहवाल संबंधित महानगरपालिकेला सादर करणे बंधनकारक असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, किती संस्थांनी अहवाल सादर केले आहेत व किती संस्थांनी ऑडीट अहवाल सादर केले नाहीत, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली याबाबत कोणतीही माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, उत्तुंग इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी त्यांची अग्निसुरक्षा कशी तपासली

जाते, आजतागायत किती इमारतींची तपासणी केली, या विषयी तपशीलवार प्रमाणपत्र देण्याचे आदेश सन २०१५ साली मा.उच्च न्यायालयाने एका प्रकरणात महानगरपालिका व अग्निशमन दलाला दिले असणे, परंतु आजपर्यंत ही माहिती देण्यात आली नसल्याचे समोर येणे, मुंबईत मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात घडत असलेल्या भीषण आगीच्या घटना रोखण्याकरिता मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचे फायर ऑडीट पारदर्शकपणे करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री यांनी ( मुख्यमंत्री यांच्याकरिता ) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री.अनिकेत तटकरे वि.प.स. यांनी, "रायगड जिल्हा आणि नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणात अंमली पदार्थांचा साठा सापडणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दा उपस्थित केला.

गृह मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

आजच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमातील श्री.अभिजीत वंजारी वि.प.स. यांचा, "विदर्भातील वीजनिर्मिती प्रकल्पाबाबतचा" अशासकीय ठराव क्रमांक २९ पुढे ढकलण्यात आला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

( २ ) सर्वश्री अमोल मिटकरी, विक्रम काळे, अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, अंबादास दानवे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.अमोल मिटकरी वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"जांबरगाव (ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) टोलनाक्याजवळ मध्यरात्री समृध्दी महामार्गावर भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर ओव्हर लोडेड ट्रकला धडकल्याने भीषण अपघात होऊन १२ भाविकांचा जागीच मृत्यू व २३ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच नाशिक जिल्ह्यातील इंदिरानगर परिसरातील कुटुंबीय बुलढाणा जिल्ह्यातील सैलानीबाबा दर्ग्याच्या दर्शनासाठी गेले असताना तेथून परत येत असताना भीषण अपघात झाल्याचे निदर्शनास येणे, सदरहू अपघात प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे ( आरटीओ ) वेगवान वाहन तपासणी कार्यवाही दरम्यान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येणे, संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध निलंबनाची कारवाई करून सदर अपघात नेमका कशामुळे झाला याची चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याबाबत तसेच मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात येईल असे मा.मुख्यमंत्र्यांनी आदेशित करणे, तद्नुषंगाने उपरोक्त

प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून मृतांच्या कुटुंबीयांना तसेच अपघातात जबर जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच समृध्दी महामार्गावर यापूर्वीसुध्दा बऱ्याचदा अपघात झाले असून या अपघातात शेकडो प्रवाशांचा मृत्यू झालेला असणे, हे अपघात रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री यांनी (मुख्यमंत्री यांच्याकरीता) निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सिन्नर औद्योगिक क्षेत्रामध्ये केंद्र सरकार सेझ अधिनियम, २००५ अन्वये इंडिया बुल्स एसइझेड या प्रकल्पासाठी शासनाने १०४७ हेक्टर ८२ आर म्हणजेच २६०० एकर क्षेत्र वाटप केलेले असणे, हा प्रकल्प सध्या बंद पडलेला असणे, दिलेल्या जमिनीपैकी फक्त सुमारे ४३३.०५ हेक्टर जमिनीवर इंडिया बुल्सने औष्णिक प्रकल्पाचे अर्धवट स्वरूपाचे काम केलेले असणे व उर्वरित जमीन विनावापर पडून असणे, इंडिया बुल्स प्रकल्पाची शिल्लक जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ताब्यात घेणे गरजेचे असणे, शासन कोणत्याही प्रकल्पाला जागा देताना तो प्रकल्प ठराविक वेळेत सुरु करण्याच्या अटीसह जागा देत असणे, त्यामुळे या प्रकरणात शर्तभंग देखील झालेला असणे, हा प्रकल्प करीत असताना स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न होणे, सद्यस्थितीत सिन्नर, नाशिक, अहमदनगर व उत्तर महाराष्ट्रातील विद्यमान व नव्याने येऊ पाहणाऱ्या उद्योगांसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे इंडियाबुल्स प्रकल्पाची जागा तातडीने एम.आय.डी.सी. ने ताब्यात घेऊन राखीव ठेवण्याची आवश्यकता असणे, या प्रकल्पाजवळच समृद्धी, सुरत-चेन्नई महामार्ग, पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वे असे प्रकल्प निर्माणाधीन असल्यामुळे या जागेचे मोठे महत्त्व असणे, त्यामुळे अपूर्ण असलेल्या इंडिया बुल्स प्रकल्पाची जागा ताब्यात घेऊन पुनर्वाटप करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**५.** (१) श्री. अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी, "नागपूरमध्ये विस्तारित नागपूर म्हणून उल्लेख असलेल्या मेट्रो रिजनमध्ये विविध विकास योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले असणे" इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(२) श्री. किरण सरनाईक वि.प.स. यांनी, “राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळा संच मान्यता दुरुस्ती प्रस्ताव निकाली काढणे” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(३) श्री. जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी, “मौजे चाळमळा-थळ (ता.अलिबाग, जि.रायगड) येथील चाळमळा-थळ येथील स.नं. ३४५/२ मधील गुरचरण जागेमधून ये-जा करण्यासाठी बागयतदार व स्थानिक रहिवाशांचा पूर्वापार असलेला वहिवाटीचा रस्ता बंद करण्यात आलेला असणे” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

याबाबत चौकशी करण्यात यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

शासनाने याबाबत नोंद घेतली असल्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी सांगितले.

(४) श्रीमती उमा खापरे वि.प.स. यांनी, “राज्यातील आशा वर्कर्स गट प्रवर्तकांनी आपल्या विविध मागण्यांसाठी माहे ऑक्टोबर, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास राज्यभरातील विविध जिल्ह्यांमध्ये मोर्चे काढून आपल्या मागण्या मांडलेल्या असणे” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(५) श्री. सुनील शिंदे वि.प.स. यांनी, “सन २०१९ मधील पहिल्या जागतिक मल्लखांब स्पर्धेत भारताचे नेतृत्व करीत वैयक्तिक ४ सुवर्ण व २ कांस्य पदके पटकावून महाराष्ट्रासह देशाचे नाव उज्ज्वल करणाऱ्या आणि सन २०२१ च्या अर्जुन पुरस्कार विजेत्या कु. हिमानी उत्तम परब यांना शासकीय सेवेत थेट नियुक्ती मिळण्यापासून वंचित राहावे लागणे” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(६) श्री. सत्यजीत तांबे वि.प.स. यांनी, “राज्यातील सर्व खाजगी प्रयोगशाळा राज्य शासनच्या नियंत्रणात येण्यासाठी कायद्याचे प्रारूप तात्काळ करण्यात यावे तसेच राज्य शासनातर्फे लॅबोरेटरीजची वैधता किंवा अवैधता ठरविण्यासाठी जोपर्यंत कोणतीही नियमावली, मार्गदर्शक तत्त्वे किंवा कायदा अंमलात आणला जात नाही, तोपर्यंत अशा अवैध लॅबोरेटरी चालकांवर बोगस वैद्यकीय व्यवसायिक म्हणून कोणतीही कारवाई करण्यात येऊ नये” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(७) ॲड. निरंजन डावखरे वि.प.स. यांनी, “इतर राज्यांमध्ये केवळ साडेपाच वर्षांचे पदवी शिक्षण घेतल्यामुळे महाराष्ट्राचे मूळ रहिवासी असलेल्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय कोट्यातून आयुर्वेद पदव्युत्तर पदवी (एमडी, एमएस) अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी अर्ज करण्यासही अपात्र ठरविले जात असणे” इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

माननीय उप सभापतींनी पुढील विधेयकाच्या मराठी व इंग्रजी प्रती माहितीकरीता त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या टपाल खणाद्वारे वितरित करण्यात आल्या असल्याचे सांगितले.

(१) क्रमांक २०२३ चे विधानसभा विधेयक क्र. ४५ – महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक २०२३.

(२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक २०२३.

(३) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ - महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक २०२३.

(४) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक क्र ४८ – महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३.

(५) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९- चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०२३.

**६.** (१) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, "राज्यातील आरोग्य विभागांर्तगत गट 'क' आणि गट 'ड' या प्रवर्गासाठीची २०२१ मध्ये रद्द झालेली परीक्षा अद्याप घेण्यात आलेली नसणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी, "राज्यातील वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना ही अत्यंत क्लिष्ट व त्रासदायक असल्याच्या तक्रारी शिक्षकांकडून करण्यात येत असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(३) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, "दिनांक १४ मार्च, २०२३ रोजी पासून महाराष्ट्रातील जवळपास १७ लाख शासकीय-निम शासकीय कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन संदर्भात पुकारलेला संप" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(४) श्री.नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनी, "नाशिक जिल्ह्यातील अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(५) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, १० एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयांमध्ये महाराष्ट्राच्या अनेक खेळांचा समावेश नसल्याचे निदर्शनास येणे, इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(६) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांनी, "जास्त व्याजाचे आमिष दाखवून राज्यातील ३० जिल्ह्यातील लाखो गुंतवणूकदारांची अब्जावधी रुपयांची फसवणूक मैत्रेय प्रायव्हेट कंपनीकडून करण्यात आली असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(७) श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांनी, "वसई-विरार महानगरपालिकेत समाविष्ट असलेल्या ६९ गावांना पालिकेकडून पाणीपुरवठा होत नसल्यामुळे या गावांमधील हजारो लोकांना कुपनलिकांचे क्षारयुक्त पाणी प्यावे लागत असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, "नागपूर येथील अधिवेशन काळात येणाऱ्या दर सोमवारी विधानपरिषद सदनाच्या कामकाजाची वेळ दुपारी १२.०० ऐवजी दुपारी १.०० वाजता करण्यात यावी" इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा मांडला.

माननीय उप सभापतींनी याबाबत सविस्तर माहिती दिली.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, रायगड जिल्हयातील जलसंपदा विभाग हेटवणे मध्यम प्रकल्पाच्या प्रस्तावाची अद्याप अंमलबजावणी न झाल्यामुळे पेण खारेपाट विकास संकल्प संघटनेचे पदाधिकारी उपोषणास बसलेले असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

## सोमवार, दिनांक ११ डिसेंबर २०२३

**१.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चार प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चव्वेचाळीस वरील प्रश्न हे वेळेअभावी झाले.

**२.** (१) श्री. देवेंद्र फडणवीस (उप मुख्यमंत्री तथा विधि व न्याय मंत्री) यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले -

(क) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(ख) श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांचा सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील अनुपालन अहवाल

(२) पशुसंवर्धन मंत्र्यांनी, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(३) पणन मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा पासष्टावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(१) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "देवगड (जि.सिंधुदुर्ग) समुद्रकिनारी पर्यटनासाठी आलेले पुणे येथील खासगी सैनिक अकॅडमीचे सहा विद्यार्थी बुडणे" या विषयाच्या संदर्भात नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून यासंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील (मेडिकल) एमबीबीएस निवासी डॉक्टरांच्या वाढत्या आत्महत्या रोखणे" या विषयाच्या संदर्भात नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून यासंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(३) श्री.अभिजीत वंजारी, वि.प.स. व श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी, " राज्यातील कांद्याची निर्यात होणे" या विषयाच्या संदर्भात नियम २८९ अन्वये सूचना दिलेली असून यासंदर्भात विरोधी पक्ष नेत्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उक्त विषयावर आपले म्हणणे मांडले.

श्री.देवेंद्र फडणवीस (उप मुख्यमंत्री तथा विधि व न्याय मंत्री) व श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स. यांनीही याबाबत आपापले म्हणणे मांडले.

**३.** (१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स.यांनी, " राज्यात पुणे जिल्ह्यातील पिंपरी-चिंचवड येथे स्पार्कल कँडल्स तयार करणाऱ्या कंपनीत स्फोट होऊन ८ महिलांचा जागीच मृत्यू होणे " इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

(२) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स.यांनी, " दारूबंदी असलेल्या गडचिरोली जिल्ह्यात मोहफुलांपासून दारू निर्मिती करण्याच्या कारखान्याचे भूमिपूजन होणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा मांडला.

उपमुख्यमंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

**४.** आज सोमवार, दिनांक ११ डिसेंबर २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ४३ मिनिटांनी मध्यंतरासाठी स्थगित झाली.**

**मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक ०३ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरु झाली.**

**५.** "राज्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे साडेचार लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे झालेले नुकसान " या विषयावर सर्वश्री अंबादास दानवे, अभिजीत वंजारी, सचिन अहिर, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास

पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

तसेच

"अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्याची व राज्य 'सुजलाम् सुफलाम्' करण्याची शासनाची भूमिका" या विषयावर श्री.प्रवीण दरेकर, प्रा.राम शिंदे, श्री.सुरेश धस, विजय उर्फ भाई गिरकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, प्रवीण पोटे-पाटील, निरंजन डावखरे, निलय नाईक, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, वसंत खंडेलवाल, श्रीकांत भारतीय, उमा खापरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, महादेव जानकर, वि.प.स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेल्या विरोधी आणि सत्ताधारी पक्षाची अल्पकालीन चर्चा एकत्रितरित्या चर्चेला घेण्यात येत असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी म.वि.प.नियम ९७ अन्वये पुढील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले-

"राज्यात माहे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे २२ जिल्ह्यातील सुमारे साडेचार लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे झालेले नुकसान, सद्यःस्थितीत पंचनामे काम संथगतीने सुरु असल्याने नुकसानीचा आकडा वाढण्याची शक्यता असणे, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामात काढून ठेवण्यात आलेल्या पिकांचेही नुकसान झाले असल्याने पंचनामा करताना उक्त नुकसानीचा समावेश करण्याची आवश्यकता असणे, अवकाळी पावसामुळे १० जणांचा मृत्यू झाला असून शेकडो पशुधनही शेतकऱ्यांनी गमावले असणे, पावसामुळे ऊसाची तोड थांबल्याने गळीत हंगामावरही विपरित परिणाम होण्याची शक्यता असणे, मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील पर्यावरणीय वातावरणात प्रचंड बदल झाला असून पाऊस व वातावरणातील बदलामुळे पुन्हा राज्यातील उरलेली पिके नुकसानीच्या उंबरठ्यावर आली असणे, अवकाळी पावसामुळे नुकसान न झालेल्या पिकांवर पांढरी बुरशी, करपा व अन्य बुरशीजन्य रोगाची तसेच कीड रोगाची लागण होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, अवकाळी पाऊस व मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील संपूर्ण मच्छीमारी ७ ते १० दिवस बंद राहिल्यामुळे मच्छीमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले असणे, तथापि, शासनाने अद्याप या नुकसानीचे पंचनामे केले नसणे, राज्यात

झालेली अतिवृष्टी, त्यानंतर पडलेल्या दुष्काळाची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणामुळे शेतकरी पीक विम्यापासूनही वंचित राहिले असणे, एकाच वर्षात अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळीमुळे राज्यातील शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त झाला असल्यामुळे पीक कर्ज फेडण्यासही असमर्थ असणे, राज्यसरकारने शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, तसेच सोयाबीन, कापूस व संत्री उत्पादन खर्च प्रचंड वाढले असून बाजारात मिळणारा भाव अत्यल्प असणे, त्यातच येलो मोझँक, बोंडअळी व पेरणी केल्यानंतर पाऊस न पडल्याने सोयाबीन-कापसाचे झालेले प्रचंड नुकसान, त्यामुळे उत्पादनात झालेली प्रचंड घट, काढणी खर्चही परवडत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडल्या असणे, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा असणे, तसेच पोखरा योजनेतून शेडनेट उभारण्यासाठी बँक व कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मदत दिली जात असणे, तथापि, वादळी वाऱ्यात सदरहू शेडनेट वाहून गेल्यावर नुकसान भरपाई मिळण्यासाठी कोणताही विमा नसणे, त्याचप्रकारे पशुधन नुकसानग्रस्तांना विमा नसणे, याबाबत शासनाकडून आश्वासनांचा पाऊस पाडणे, परंतु त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली शासनाप्रती असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. सुरेश धस (२) श्री. जयंत प्र. पाटील

(भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**६.** (क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे-विधेयक विचारात घेणे-

(१) श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री) यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक-४८- महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (दुसरी सुधारणा) विधेयक , २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. सचिन अहिर (२)अभिजीत वंजारी

श्री.अजित पवार ,उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

ज्या अर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री) यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक-४९- चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री, अभिजीत वंजारी, सचिन अहिर यांचा प्रस्ताव असून आहे त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते) यांनी पुढील प्रस्ताव मांडला-

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४९- चिट फंड (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०२३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. सचिन अहिर

श्री. अजित पवार, उप मुख्यमंत्री यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहाच्या अनुमतीने मागे घेण्यात आला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ ते ६ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक- ४९ संमत झाले.

(३) श्री.देवेंद्र फडणवीस (उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री ) यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक-४५- महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३ मांडले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, ॲड.अनिल परब, सर्वश्री. अभिजीत वंजारी व सचिन अहिर यांचा प्रस्ताव असून आहे त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते) यांनी पुढील प्रस्ताव मांडला-

“ सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक-४५- महाराष्ट्र कॅसिनो (नियंत्रण आणि कर) (निरसन) विधेयक, २०२३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे.”

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. सचिन अहिर (२) श्री. विक्रम काळे

(३) श्री. एकनाथराव खडसे

श्री.देवेंद्र फडणवीस (उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्री) यांनी उपरोक्त विधेयकावरील चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठवण्याबाबतचा प्रस्ताव सभागृहाच्या अनुमतीने मागे घेण्यात आला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंड २ विधेयकाचा भाग झाला.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

सन २०२३ चे वि.स.वि.क्रमांक -४५ संमत झाले.

७. माननीय उप सभापतींनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली,

खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार) यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक बी-१, बी-४, बी-५, बी-१०, आय-३, जे-१, जे-२, जे-४, के-६, के-११

(२) उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक जी-१, जी-५, जी-८, जी-१०, ओ-१, ओ-७, ओ-१०,ओ-१४, ओ-१६, ओ-१८ , ओ-२०, ओ-२२, ओ-२४, ओ-२६, ओ-२८, ओ-३०, ओ-३२, ओ-३४, ओ-३६, ओ-३८, ओ-४०, ओ-४२, ओ-४४, ओ-४६, ओ-४८, ओ-५०, ओ-५२, ओ-५४, ओ-५६, ओ-५८, ओ-६०, ओ-६२, ओ-६४, ओ-६६, ओ-६८, ओ-७०, ओ-७२, ओ-७४, ओ-७६, ओ-७८, ओ-८०, ओ-८२, ओ-८४

(३) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक एम-२, एम-३

(४) सहकार मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक – व्ही-२

(५) आदिवासी विकास मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक टी-५, टी-६

(६) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक- वाय-२

(७) कृषी मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक डी-३

(८) कामगार मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक के-४,के-८

(९) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक ओ-३

(१०) उद्योग मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक के-३, के-७, के-९, के-१०

(११) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक व्ही-२, झेडई-१, झेडई-२

(१२) अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक एस-१

(१३) महिला व बालविकास मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक एक्स-१, एक्स-२

(१४) क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक बी-८, ई-३

(१५) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक झेडए-१, झेडए-२

(चर्चा अपूर्ण)

श्री. गोपीचंद पाडळकर, वि.प.स. यांनी, 'महाराष्ट्रातील धनगर समाजाच्यावतीने धनगर समाज आरक्षणाबाबत विधान भवनावर इशारा मोर्चाचे आयोजन करण्यात येणे ' इ. मुद्याबाबत आपले म्हणणे मांडले

पुरवणी मागण्यांवर चर्चा.(पहिला दिवस) (पुढे सुरु)—

उपरोक्त सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला—

(१) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता

(२) श्री. प्रवीण दरेकर (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

## मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३

१) श्री. अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा (पुढे सुरू)

"राज्यात माहे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे २२ जिल्ह्यातील सुमारे साडेचार लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे झालेले नुकसान, सद्य:स्थितीत पंचनामे काम संथगतीने सुरु असल्याने नुकसानीचा आकडा वाढण्याची शक्यता असणे, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामात काढून ठेवण्यात आलेल्या पिकांचेही नुकसान झाले असल्याने पंचनामा करताना उक्त नुकसानीचा समावेश करण्याची आवश्यकता असणे,

अवकाळी पावसामुळे १० जणांचा मृत्यू झाला असून शेकडो पशुधनही शेतकऱ्यांनी गमावले असणे, पावसामुळे ऊसाची तोड थांबल्याने गळीत हंगामावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता असणे, मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील पर्यावरणीय वातावरणात प्रचंड बदल झाला असून पाऊस व वातावरणातील बदलामुळे पुन्हा राज्यातील उरलेली पिके नुकसानीच्या उंबरठ्यावर आली असणे, अवकाळी पावसामुळे नुकसान न झालेल्या पिकांवर पांढरी बुरशी, करपा व अन्य बुरशीजन्य रोगाची तसेच कीड रोगाची लागण होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, अवकाळी पाऊस व मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील संपूर्ण मच्छीमारी ७ ते १० दिवस बंद राहिल्यामुळे मच्छीमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले असणे, तथापि, शासनाने अद्याप या नुकसानीचे पंचनामे केले नसणे, राज्यात झालेली अतिवृष्टी, त्यानंतर पडलेल्या दुष्काळाची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणामुळे शेतकरी पीक विम्यापासूनही वंचित राहिले असणे, एकाच वर्षात अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळीमुळे राज्यातील शेतकरी पूर्णतः उद्ध्वस्त झाला असल्यामुळे पीक कर्ज फेडण्यासही असमर्थ असणे, राज्यसरकारने शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, तसेच सोयाबीन, कापूस व संत्री उत्पादन खर्च प्रचंड वाढले असून बाजारात मिळणारा भाव अत्यल्प असणे, त्यातच येलो मोझँक, बोंडअळी व पेरणी केल्यानंतर पाऊस न पडल्याने सोयाबीन-कापसाचे झालेले प्रचंड नुकसान, त्यामुळे उत्पादनात झालेली प्रचंड घट, काढणी खर्चही परवडत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडल्या असणे, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा असणे, तसेच पोखरा योजनेतून शेडनेट उभारण्यासाठी बँक व कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मदत दिली जात असणे, तथापि, वादळी वाऱ्यात सदरहू शेडनेट वाहून गेल्यावर नुकसान भरपाई मिळण्यासाठी कोणताही विमा नसणे, त्याचप्रकारे पशुधन नुकसानग्रस्तांना विमा नसणे, याबाबत शासनाकडून आश्वासनांचा पाऊस पाडणे, परंतु त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली शासनाप्रती असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

२) श्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांची म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा

"राज्यात ज्या शेतकऱ्यांनी सन २०१९ नंतर शेतीचे नवीन खाते उघडले आहे त्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचा लाभ मिळत नसणे, राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पेरण्यांची चिंता सतावत असताना काढणी झालेल्या खरिपांच्या पिकांना योग्य भाव मिळेल की नाही अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावत असणे, राज्यात कापूस, सोयाबीन, तूर, धान, कांदा, केळी, संत्रा या पिकांचे नासाडी झाली असणे, सोयाबीनचे दर हमी भावापेक्षा खाली गेल्याचे निदर्शनास येणे, कमी व अवकाळी पावसामुळे दाटलेली दुष्काळी छाया

आणि कीडरोगाच्या प्रकोपामुळे कापूस व सोयाबीनच्या उत्पादनात खूपच घट झाली असणे, केंद्र सरकारने कांद्याची किमान निर्यातमूल्य (एमईपी) थेट ८०० डॉलर प्रतिटन करण्याचा निर्णय घेतल्याने कांदा निर्यातीला खिळ बसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासनाने शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत केली असणे, एनडीआरएफ निकषाप्रमाणे केंद्र सरकारने ४० तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून उर्वरित सर्व तालुक्यांची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असणे, जे नुकसान झाले आहे त्यासह शेतकऱ्यांच्या यापुर्वीच्या देखील सर्व नुकसानीची भरपाई देण्यास सरकार कटिबध्द असणे, पैनगंगा ते वैनगंगा जोडणी प्रकल्पास मान्यता देण्यात येणे, शासनाने केंद्राच्या निकषात न बसणाऱ्या १२०० मंडळांना दुष्काळसदृश जाहीर केले असणे, तसेच २० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात २५ टक्के अग्रीम राशी जमा केली असणे, शेतकऱ्यांना विविध प्रकारचे लाभ डीबीटीच्या माध्यमातून देण्यात येणे, राज्यात हळद उत्पादनात वाढ होत असल्याने हळद निर्यातीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, आदर्श गाव योजनेत निवड झालेल्या गावांना दिल्या जाणाऱ्या निधीत हेक्टरी १० हजार रुपयांची वाढ झाली असणे, लोकसहभाग आणि जलसंधारणाच्या कामातून राज्यात व देशात ओळख निर्माण करणाऱ्या आदर्श गाव राळेगणसिध्दी व हिवरे बाजार या गावांच्या धर्तीवर राज्यातील अन्य गावांचा विकास व्हावा याकरिता शासनाने आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती गठीत केली असणे, दुष्काळी भागातील गावे, गावकऱ्यांचा एकोपा व लोकसहभाग अधिक असलेल्या गावात जलसंधारण ग्रामविकासाची कामे करताना सप्तसूत्रीनुसार अंमलबजावणी करण्याचे शासनाचे धोरण असणे, रब्बी हंगामासंबंधी फळ पिक विमा योजनेत सहभागाबाबत कार्यवाही सुरु असणे, केळी पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेतून शेतकरी विमा संरक्षण देण्यात येणे, पीक विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांकडून सातबारा उताऱ्यावर २०२३-२४ संबंधी केळी पिकांची नोंद नसल्यास स्वयंघोषणापत्रावर केळी लागवड केली आहे अशी घोषणा केल्यास त्याला पिक विमा योजनेत सहभागी करून घ्यावे म्हणून शासनाकडून बँकांना निदेश दिले असणे, विदर्भातील कृषी क्षेत्राचा फायदा व्हावा याकरिता कृषी महाविद्यालयाच्या जागेवर शासनाकडून कृषी तज्ज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्याचा शासनाचा मानस असणे, राज्यातील शेतकरी केंद्रबिंदू मानून अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची व राज्य सुजलाम् सुफलाम् करण्याची शासनाची भूमिका, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. जयंत प्र. पाटील (भाषण पूर्ण) (२) डॉ. प्रज्ञा सातव

(३) श्री. प्रवीण दटके (४) श्री. नरेंद्र दराडे

(५) श्री. प्रवीण दरेकर (६) श्री. अरुण लाड

(७) श्री. अनिकेत तटकरे (८) श्री. अभिजित वंजारी

(९) श्री. अमोल मिटकरी (१०) ॲड. अनिल परब (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४९ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) तीन तारांकित प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठेचाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** (१) संसदीय कार्यमंत्र्यांनी, विधानपरिषदेच्या सन २०२३ च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात दिनांक १७ जुलै, २०२३ ते दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ या कालावधीत मा.मंत्री महोदयांनी विधानपरिषद सभागृहात दिलेल्या एकूण २९७ आश्वासनांची यादी तसेच, सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन संस्थगित झाल्यानंतर, पूर्तता करण्यात आलेल्या एकूण १०६ आश्वासनांच्या पूर्ततेची विवरणपत्रे यादीसह" सभागृहाच्या पटलावर ठेवली.

(२) उप मुख्यमंत्र्यांनी,

(अ) डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकावन्नावा वार्षिक अहवाल आणि

(ब) डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा चौपन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, "दहशतवाद विरोधी पथकाने राज्यात तसेच कर्नाटकात ४८ ठिकाणी टाकलेले छापे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्र्यांनी (देवेंद्र फडणवीस) उचित कारवाई केली जाईल, असे सांगितले.

(२) श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी, "जुनी निवृत्ती वेतन लागू करण्याच्या मागणीसाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी दिलेला आंदोलनाचा इशारा" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्याबाबत आपले मत मांडले.

उप मुख्यमंत्र्यांनी (देवेंद्र फडणवीस) याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट केली.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, "पिंपरी चिंचवड येथील मौजे चिकले, गट क्रमांक – ७२(१) मध्ये १५६६ चौरस मीटरचे क्षेत्र हॉर्स रायडिंगला देणे" इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

श्री. सुनील शिंदे वि.प.स. यांनी, "विदर्भात आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांचे कुटुंबीय शासकीय मदतीपासून वंचित असणे" या विषयाबाबत म.वि.प. २८९ अन्वये सूचना दिली असून त्याची दखल घेतली आहे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "गडचिरोली जिल्हयात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेनंतर एका महिलेचा झालेला दुर्दैवी मृत्यू" इ. बाबत दिलेल्या म.वि.प. २८९ अन्वये सूचनेबाबत शासनाने याबाबत निवेदन करावे, असे निदेश मा. उपसभापतींनी दिले.

तसेच श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, "राज्यातील आरोग्य यंत्रणा सक्षम करणे" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यांनी या संदर्भात आपले म्हणणे थोडक्यात मांडावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी उपरोक्त मुद्यावर आपले मत मांडले.

शासनाने यासंबंधी निवेदन करावे, असे निदेश माननीय उपसभापतींनी दिले.

**३.** आज मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उपसभापतींनी घोषित केले.

मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ३७ मिनिटांनी स्थगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून १० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**४.** माननीय तालिका सभापतींनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेची कार्यपद्धती विशद केली व खालील मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्यांवर चर्चा होईल, असे सांगितले.

(१) मुख्यमंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - ए-१, ए-२, ए-४, बी-३, बी-१०, एफ-२, एफ-३, एफ-४, एफ-५, आय-५, एन-३, एन-४

(२) उप मुख्यमंत्री (गृह, विधि व न्याय, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, ऊर्जा, राजशिष्टाचार) यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - बी-१, बी-४, बी-५, बी-१०, आय-३, जे-१, जे-२, जे-४, के-६, के-११

(३) उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - जी-१, जी-५, जी-८, जी-१०, ओ-१, ओ-७, ओ-१०, ओ-१४, ओ-१६, ओ-१८ , ओ-२०, ओ-२२, ओ-२४, ओ-२६, ओ-२८, ओ-३०, ओ-३२, ओ-३४, ओ-३६, ओ-३८, ओ-४०, ओ-४२, ओ-४४, ओ-४६, ओ-४८, ओ-५०, ओ-५२, ओ-५४, ओ-५६, ओ-५८, ओ-६०, ओ-६२, ओ-६४, ओ-६६, ओ-६८, ओ-७०, ओ-७२, ओ-७४, ओ-७६, ओ-७८, ओ-८०, ओ-८२, ओ-८४

(४) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एम-२, एम-३

(५) सहकार मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - व्ही-२

(६) महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - सी-१, सी-४, डी-४

(७) वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - सी-७, डी-६, झेडडी-२

(८) वैद्यकीय शिक्षण, विशेष सहाय्य मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एन-३, एस-१, एस-४

(९) उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग आणि संसदीय कार्य मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - व्ही-२, डब्ल्यू-२, डब्ल्यू-३, डब्ल्यू-४, डब्ल्यू-८, डब्ल्यू-९

(१०) आदिवासी विकास मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - टी-५, टी-६

(११) ग्रामविकास व पंचायत राज, पर्यटन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एल-२, एल-३, एल-४, एल-५, एल-७

(१२) पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - वाय-२

(१३) सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम) मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एच-७

(१४) मृद् व जलसंधारण मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - झेडएच-३, झेडएच-५

(१५) कृषी मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - डी-३

(१६) कामगार मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - के-४, के-८

(१७) रोजगार हमी योजना, फलोत्पादन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - ओ-३

(१८) उद्योग मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - के-३, के-७, के-९, के-१०

(१९) सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - आर-१, आर-२, आर-३

(२०) सार्वजनिक बांधकाम (सार्व. उपक्रम वगळून) मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एच-३, एच-४, एच-५, एच-६, एच-७, एच-८, एच-९

(२१) अल्पसंख्याक विकास व औकाफ, पणन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - व्ही-२, झेडई-१, झेडई-२

(२२) शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - इ-२

(२३) अन्न व औषध प्रशासन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एस-१

(२४) गृहनिर्माण, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - क्यू-३, झेडजी-३, झेडजी-४

(२५) राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - बी-२

(२६) महिला व बालविकास मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - एक्स-१, एक्स-२

(२७) क्रीडा युवक कल्याण, बंदरे मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - बी-८, ई-३

(२८) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - झेडए-१, झेडए-२

(२९) मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन मंत्री यांच्या विभागांच्या पुरवणी मागण्या क्रमांक - सी-६, सी-९

उपरोक्त मागण्यांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. नरेंद्र दराडे
(२) श्री. प्रवीण दरेकर
(३) डॉ. प्रज्ञा सातव
(४) श्री. अमोल मिटकरी
(५) श्री. सुनील शिंदे
(६) श्री. प्रवीण दटके

(७) श्री. अनिकेत तटकरे
(८) श्री. सचिन अहिर
(९) ॲड. निरंजन डावखरे
(१०) श्री. आमश्या पाडवी
(११) श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील
(१२) श्री. अभिजित वंजारी
(१३) श्री. रमेश पाटील
(१४) श्री. विलास पोतनीस
(१५) श्री. किशोर दराडे
(१६) श्री. सुधाकर अडबाले
(१७) श्री. कपिल पाटील
(१८) श्री. प्रसाद लाड
(१९) श्री. जयंत आसगावकर
(२०) श्रीमती उमा खापरे

उप मुख्यमंत्री (अजित पवार) यांनी पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर दिले.

सभागृहाने सन २०२३-२०२४ च्या पुरवणी मागण्यांवर विचार केला असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

**५. (अ) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे –**

(१) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ – महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी उपरोक्त विधेयक मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, शशिकांत शिंदे, ॲड. अनिल परब, सर्वश्री अभिजीत वंजारी, सचिन अहिर, वि.प.स. यांचा प्रस्ताव असून त्यापैकी एकाने तो मांडावा, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी पुढील प्रस्ताव मांडला.

"सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४६ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी भाग घेतला.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी सभागृहाच्या अनुमतीने प्रस्ताव मागे घेतला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४७ – महाराष्ट्र वेश्म मालकी (सुधारणा) विधेयक, २०२३.

गृहनिर्माण मंत्र्यांनी उपरोक्त विधेयक मांडले व ते विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे (२) श्री. भाई जगताप

(३) श्री. सुनील शिंदे (४) श्री. अभिजित वंजारी

गृहनिर्माण मंत्र्यांनी विधेयकावरील चर्चेला उत्तर दिले.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

**(ब) विधानसभेने संमत केल्यास – विधेयक विचारात घेणे –**

वित्त मंत्र्यांनी, सन २०२३ चे वि.स.वि. क्रमांक ५१ - महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२३ विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

याबाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

**६.** (१) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, "पेपरफुटीला आळा घालण्यासाठी उत्तराखंड व झारखंड या राज्यांच्या धर्तीवर कायदा पारित करणे," तसेच "राज्यातील सरकारी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत डीसीपीएस किंवा जुनी निवृत्ती योजना याबाबतचा संभ्रम दूर करणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(२) श्री. अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, "छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत शेतकऱ्यांना देय असलेली देणी मिळण्याची आवश्यकता तसेच अकोला शहरातील सांस्कृतिक भवनाच्या नाट्यगृहाचे प्रलंबित काम पूर्ण करण्यासाठी निधी उपलब्ध क रून देणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(३) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, "पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरासाठी स्थापन करण्यात आलेल्या पीएमआरडीएमध्ये लोकांची कामे वेळेवर न होण," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, "राज्यात विविध स्पर्धा परीक्षांकरिता सर्वसामान्य विद्यार्थ्यांना परवडेल अशा स्वरुपाची परीक्षा फी आकारण्याची आवश्यकता," तसेच, "डिपफेक संदर्भात माहिती तंत्रज्ञान कायद्यात आवश्यक ते बदल करण्याची आवश्यकता," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(५) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "अनेक वर्षे प्रलंबित असलेला निवासी डॉक्टरांच्या वसतिगृहाचा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची आवश्यकता," तसेच "शासकीय सेवेतील विविध पद भरतीबाबत सेवा प्रवेश नियमात सुधारणा करून सर्व भरती परीक्षा एमपीएससीच्या कक्षेत आणणे," इ. बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(६) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, "नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना १७ मे २००६ रोजीचे परिपत्रक पूर्वलक्षी प्रभावाने लागू करून त्यातील भूखंड देण्याच्या तरतुदी लागू करणे," तसेच, "मुंबईतील कोळीवाडा गावठाण भागात अतिक्रमण होऊ नये यासाठी ठरविण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करणे," व "रायगड जिल्ह्यात प्रदूषित पाण्यामुळे आरोग्यावर परिणाम होणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(७) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी, "विविध योजनांमध्ये सर्व प्रवर्गांच्या दिव्यांगांना लाभ मिळण्याची गरज असणे," तसेच, "नागपूरमधील नारा, उप्पलवाडी या भागातील झोपडपट्टी विकास प्राधिकरणाने पूर्ण केलेल्या अनेक योजनांमध्ये स्थानिकांच्या पायाभूत सुविधांचा विकास न होणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(८) श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी, "जळगाव व अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षक व शिक्षकेतील कर्मचाऱ्यांचे वेतन जिल्हा बँकेत न करता राष्ट्रीयकृत बँकेत करण्याची आवश्यकता," तसेच "आदिवासी विकास विभागामार्फत चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळांची बदललेली वेळ पूर्ववत करण्याची आवश्यकता, इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(९) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी, "राज्यातील महावितरण, महापारेषण कंपन्यांमधील कंत्राटी कामगारांच्या दुरवस्थेकडे लक्ष देणे," तसेच "कांदा निर्यातबंदीच्या फेरविचार करण्याची शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारला करणे," इ.बाबत विशेष उल्लेखाच्या सूचना मांडल्या व आपले मत व्यक्त केले.

(१०) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, "राज्यातील तृतीयपंथीयांच्या मागण्या तातडीने पूर्ण करणे," तसेच "शहरातील पाणी समस्या सोडविण्यासाठी सरकारने मंजूर केलेल्या नवीन पाणी पुरवठा योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करणे," इ.बाबत विशेष उल्लेखाच्या सूचना मांडल्या व आपले मत व्यक्त केले.

(११) श्री. प्रवीण दटके, वि.प.स. यांनी, "संजय गांधी निराधार योजना व श्रावण बाळ निवृत्ती वेतन योजनेतील सर्व लाभार्थ्यांकरिता उत्पन्नाची अट वाढविणे,"इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(१२) श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स. यांनी, "नागपूर जिल्ह्यातील कन्हान नगर पंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी सतीश गावंडे यांनी विविध पदांवर केलेल्या गैरव्यवहारांची चौकशी करणे,"इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(१३) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, "राज्यातील खाजगी शाळांना आरटीई अंतर्गत दर तीन वर्षांनी स्वमान्यता घेण्याची अट रद्द करण्याची आवश्यकता,"इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(१४) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, "राज्यातील अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना वाढीव अनुदान टप्पा देण्याची आवश्यकता,"इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(१५) डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांनी, "सेनगाव (जि. हिंगोली) या तालुक्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देणे,"इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(१६) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "सीएसएमटी येथील भुयारी मार्गाचे नूतनीकरण करणे," तसेच "मुंबईतील विविध नाट्यगृहांमध्ये सोयी सुविधा उपलब्ध करून देणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(१) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग दक्षिण विभागातील शंभर वर्षे जुनी तानसा जलवाहिनी तातडीने बदलण्याची आवश्कता," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१७) श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, "पुणे महानगरपालिकेमधील सुमारे दहा हजार कंत्राटी कामगारांच्या विविध समस्या," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

(२) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, "मौजे भोसरी, तालुका माढा, जि. सोलापूर येथील भू. क्र. उपविभाग ३९, ४, ५० अ या बिनशेती क्षेत्राच्या खरेदीच्या व्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

सरकारने गांभीर्याने दखल घ्यावी, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(३) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "पदव्युत्तर शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडाची आकारणी न करणे तसेच त्यांच्या विद्यावेतनात भरीव वाढ करणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांनी, "उत्तर नागपूरमधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेन्शन सेंटरचे लोकार्पण होऊनही तिथे अनेक सुविधा पूर्ण नसणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी, "राज्यातील अर्धवेळ ग्रंथपालांचे पूर्णवेळ ग्रंथपालपदी उन्नयन करण्याच्या अटींमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्री. जयंत आसगावकर, वि.प.स. यांनी, "सारथी पीएचडी संशोधक विद्यार्थ्यांची १७ डिसेंबर रोजी होणार परीक्षा रद्द करणे अथवा पुढे ढकलण्याची आवश्यकता," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. धीरड लिंगाडे, वि.प.स. यांनी, "आरोग्य विद्यापीठ महाविद्यालयातील ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल व संचालक शारीरिक शिक्षण या पदांवरील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना न्याय देणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, "पुणे महानगर प्रदेश प्राधिकरणामधील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या समस्या सोडविणे," इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी, "राज्यात विविध पदाकरिता घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षाचे निकाल विहित कालमर्यादेत लावणे," तसेच "उच्च शिक्षण संचालयासयाच्या पुणे विभागातील पारंपरिक व मुक्त विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांमधील विविध विद्यार्थ्यांचे अर्ज प्रलंबित असणे व त्यामुळे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळण्यास येणाऱ्या अडचणी," इ.बाबत औचित्याचे मुद्दे उपस्थित केले.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, "राज्यात महानंद दूध डेअरीमधील कर्मचाऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्याची आवश्यकता," इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

सोमवारी कामगार मंत्र्यांनी बैठक बोलावून मार्ग काढावा, असे निदेश माननीय उप सभापतींनी दिले.

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, "तारांकित प्रश्नांच्या यादीमध्ये सदस्यांच्या सहमतीशिवाय नावाचा समावेश होणे," इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

ही बाब तपासून घेऊन आपल्याला विदित करण्यात येईल, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

## बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील सकाळच्या सत्रात दर्शविण्यात आलेली पहिल्या क्रमांकाची लक्षवेधी सूचना उद्या चर्चेला घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(१) श्री प्रवीण दटके, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले -

"नागपूर शहरात असणाऱ्या महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि नझूल जमिनीवर सुमारे ४२४ अतिक्रमित झोपडपट्टी अस्तित्वात असणे, शहरातील साधारणतः ८ लाख जनसंख्या यामुळे प्रभावित असणे, सन २००२ साली शहरातील झोपडपट्टी आणि अतिक्रमण निर्मूलनाच्या

अनुषंगाने गरजू नागरिकांना पट्टे वाटप करण्याचा शासन निर्णय झाला असणे, सन २००७ साली शहरातील कामगार कॉलनी, तुकडोजी नगर येथून पट्टे वाटप प्रक्रियेची सुरुवात करताना आलेल्या अडचणीच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थेच्या मार्फत पट्टे वाटप करण्याऐवजी वैयक्तिक पातळीवर करण्याबाबत बदल सुचविण्यात आले असणे, सन २०१६ च्या नागपूर सुधार प्रन्यासच्या परिपत्रकानुसार अधिकृत झोपडपट्टीवर पट्टे नियमानुकूल करण्यास सुरुवात झाली असणे, आजतागायत १० हजार पट्टे वाटप प्रक्रिया पूर्ण झाली असणे, परंतु खाजगी मालमत्ता आणि झुडपी जंगले व्याख्येत येणाऱ्या जागेवर पट्टे वाटप करण्यास शासन स्तरावर अडचणी येत असणे, झुडपी पट्ट्यांचा संदर्भ वन विभाग, केंद्र शासनाशी येत असल्याने शासनाने केंद्र शासनाशी पत्रव्यवहार आणि बैठकीतून सदर प्रश्नी सकारात्मकरित्या धोरण आखण्याची असणारी गरज, खाजगी मालमत्तेवरील आणि झुडपी पट्टे वाटप धोरण प्रभावीपणे राबवणेकामी जनतेचे प्रश्न आणि लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री सुनील शिंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

“गत काही वर्षांत बेस्टच्या परिवहन सेवेला तोटा झालेला असणे, तसेच अनेक आंदोलनांनी घेरलेले असणे, बेस्टच्या ताफ्यात प्रवाशांच्या सोयीसाठी दाखल झालेल्या वातानुकूलित सिंगल/ डबल डेकर बस, त्यामुळे बेस्टची प्रवासी संख्या वाढून उत्पन्न मिळण्याऐवजी तोटा वाढलेला असणे, खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने भाडेतत्वावरील बसगाड्या आणून स्वमालकीपेक्षा भाड्याच्या गाड्यांची संख्या वाढवण्यावर दिलेला भर, सहा बस पुरवठादारांकडून कंत्राटी पद्धतीवर चालक, वाहक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे घेतलेले मनुष्यबळ, विविध प्रयोग करूनही बेस्टचे उत्पन्न वाढून तोटा कमी करण्यात आलेले अपयश, सन २०१९ मध्ये बेस्ट उपक्रम, मुंबई महानगरपालिका आणि कामगार संघटनांमध्ये बेस्टला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी झालेला सामंजस्य करार, बेस्टला सन २०१९ ते २०२३ या काळात मुंबई महानगरपालिकेने प्रदान केलेली ६०३३ कोटी ८५ लाख रुपयांची रक्कम, तरीही बेस्टची फारशी समाधानकारक न झालेली प्रगती, त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या, बेस्टच्या ताफ्यात सद्यःस्थितीत स्वमालकीच्या असलेल्या केवळ १६८६ बस, सन २०२५ नंतर त्यांचे आयुर्मान संपणार असल्याने ताफ्यात एकही बस शिल्लक न राहण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे कर्मचारी आणि प्रवाशांमध्ये शासनाबद्दल

पसरलेली नाराजीची भावना, यास्तव बेस्टच्या मालकीचा ३३३७ बसचा ताफा कायम ठेवण्यासह बेस्ट कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"अंबरनाथ (पश्चिम) मौजे जांभीवली तालुका अंबरनाथ येथील सर्वे नं. ३/१अ, ब, क, ड (४० एकर) १७/ १ अ ब (१८ एकर) अशी एकूण ५८ एकर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन केलेली असणे, सदर जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी जमीन मालकांनी महामंडळाकडे अर्ज करणे, नमूद जमीन विशेष भूसंपादन अधिकारी, उल्हास खोरे प्रकल्प, ठाणे यांनी सन १९७४ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादित केलेली असणे, संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला आजतागायत देण्यात आलेला नसणे, मोबदला मिळावा याकरिता भूसंपादन कायदा सन २०१३ नुसार जमीन मालकांनी शासनाच्या संबंधित विभागाकडे अर्ज करणे, जमिनीच्या मोबदल्याकरिता प्रादेशिक अधिकारी २, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ठाणे व उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी मिळकतीबाबतचा निवाडा, कब्जे पावती, संयुक्त मोजणी पत्रक यांचा अहवाल देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री विक्रम काळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"राज्यातील शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास शासनाने मनाई आदेश लागू करण्यात येणे, तथापि, मुंबईतील अनेक शाळांजवळ, शहरांच्या अनेक भागात राजरोसपणे तंबाखूजन्य पदार्थ व बंदी असलेला गुटखा देखील विकला जात असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, वास्तविक शासनाच्या एकूण १२ यंत्रणांना तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्री विरोधात कारवाई करण्याचे अधिकार असणे, मात्र

बहुतांश सर्वच यंत्रणांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील पायोनियर पब्लिक स्कूल, क्रांतीनगर, आकुर्ली तसेच चांदिवली येथील संघर्ष नगर वसाहतीतील पालिका शाळेसमोर व अन्य शाळांच्या परिसरात आणि घाटकोपर परिसरात सुगंधी सुपारीच्या नावाखाली पदार्थांची सर्रास विक्री होत असल्याचे निदर्शनास येत असणे, परंतु अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या वर्षभरात या पदार्थांची विक्री करणाऱ्या टपऱ्यांविरोधात एकही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शाळांमधील विद्यार्थी नकळत व्यसनाकडे ओढला जाणे, परिणामी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षण संस्थांचे मुख्याध्यापक, शाळा कृती समितीचे पदाधिकारी यांचेमध्ये पसरलेला असंतोष, अलिकडेच अशाच प्रकरणातून अहमदनगर येथील सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचेवर टपरीवाल्याकडून जीवघेणा हल्ला झाल्याची घटना लक्षात घेता संबंधित १२ यंत्रणांकडून कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.''

अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४१ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली पुन्हा सुरू झाली.

**१.** (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील सहा तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठेचाळीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** माननीय उप सभापतींनी, श्रीमती वीणा प्रेमकुमार शर्मा. माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला व आपल्या भावना व्यक्त केल्या.

सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली व शोक प्रस्ताव संमत करण्यात आला. शोक प्रस्तावाची एक प्रत व विधानमंडळाचे स्मृतिपत्र शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून ०४ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी ०१ वाजून १४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**३.** (१) क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघ मर्यादित, मुंबई (महानंद दुग्धशाळा) यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वैधानिक लेखा परीक्षण अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(२) वने मंत्र्यांनी, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे अनुक्रमे अठ्ठेचाळीसावा व एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(३) संसदीय कार्य मंत्र्यांनी खालील अहवाल सभागृहासमोर ठेवले –

(क) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(ख) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(ग) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(घ) संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे सन २०२२-२०२३ या वर्षाचे वार्षिक लेखे.

(ङ) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचे सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक लेखे.

(च) कविकुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय, रामटेक यांचे सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक लेखे.

(छ) महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ, औरंगाबाद यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल.

(ज) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा अठरावा वार्षिक अहवाल.

(४) संसदीय कार्य मंत्र्यांनी विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**४.** आज बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**५.** (१) श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांनी, “छत्रपती संभाजीनगर येथील आदर्श नागरी पतसंस्थेमध्ये गैरव्यवहार करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करणे” इ.बाबत म.वि.प. नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून सहकार मंत्र्यांनी सभागृहाच्या अनुमतीने निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**६.** (१) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, “पुणे वाहतूक पोलिसांकडून नागरिकांची सुरू असलेली लूट” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय महत्त्वाचा असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.सुनील शिंदे यांनी या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
या संदर्भात शासनाने निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणूकीकरीता बेकायदेशीर स्थगिती देण्यात येणे” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर विषय न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे सदर सूचना फेटाळली होती परंतु सदर विषय महत्त्वाचा असल्यामुळे सन्माननीय सदस्य यांना या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडण्यास संधी दिली आहे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, “राज्य मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष व सदस्यांनी दिलेले राजीनामे” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून या संदर्भात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.

**७.** (१) श्री.सुरेश धस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सहकार मंत्र्यांचे लक्ष वेधले-

“राज्यातील साखर कारखान्यांसाठी ऊस तोडणे, साळणे व त्यांच्या मोळ्या बांधून बैलगाड्या तसेच ट्रॅक्टर, मालट्रकमध्ये भरुन तो साखर कारखान्यांपर्यंत पोहोचविणे ही कामे करणारा मजुरांचा मोठा वर्ग कार्यरत असणे, हे मजूर मुख्यतः महाराष्ट्राच्या जिरायती व दुष्काळी भागातून साखर कारखान्यांवर काम करण्यासाठी वर्षातील ६ महिने येत असणे, साखर संघाने सन २०२० मध्ये १४ टक्के वाढ देऊन ३ वर्ष पूर्ण होऊनही ऊस तोडणी दरामध्ये वाढ करणेसाठी राज्यातील ७

संघटनांबरोबर करार न करणे, त्यामुळे ऊस तोडणी मजुरांची “मुकी-बहिरी कुणीही हाका” अशी अवस्था होणे, ऊस तोडणी मजुरांसाठी राज्यामध्ये कायदा अस्तित्वात नसणे, त्यामुळे साखर कारखाने, मुकादम व ऊसतोड मजुरांचा एकूण आर्थिक व्यवहार हा आतबट्टयाचा झालेला असणे, अनेक ठिकाणी मुकादमांवर ४२०, अपहरण व अॅट्रॉसिटी अॅक्ट अंतर्गत गुन्हे दाखल होणे, यास्तव राज्यातील ऊसतोड मजूर आणि मुकादमांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला प्रचंड असंतोष व संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.”

सहकार मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

माननीय उप सभापतींनी, दिल्ली येथे संसदेचे अधिवेशन सुरु असताना लोकसभा सभागृहाच्या गॅलरीतून दोन व्यक्तींनी सभागृहात उडी मारल्यामुळे तेथे थोडी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर अभ्यागतांना विधानपरिषद सभागृहाच्या गॅलरीतील पासेस बंद करण्यात येत आहे तसेच सध्या गॅलरीमध्ये जे अभ्यागत बसलेले आहेत त्यांना बसू द्यावे. मात्र नवीन अभ्यागतांसाठी गॅलरी पासेस बंद करण्यात येत आहेत असे सांगितले.

८. (१) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, “देशाच्या सर्वोच्च लोकसभा सभागृहात दोन व्यक्तींनी गॅलरीतून उडी मारून टिअर गॅस फेकणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

अॅड.अनिल परब, वि.प.स. यांनी उपरोक्त मुद्यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.
उपरोक्त मुद्यासंदर्भात उद्योग मंत्र्यांनी स्पष्टीकरण केले.
उपरोक्त मुद्यासंदर्भात माननीय उप सभापतींनी सविस्तर खुलासा केला.

(२) अॅड. अनिल परब, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

“मुंबई महानगरपालिकेत सहायक आयुक्तांची पदे नियमांचे व निकषांचे उल्लंघन करुन करण्यात येत असलेली भरती, महानगरपालिकेने दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी कार्यालयीन आदेश काढून सहायक अभियंता यांना देण्यात आलेली “कार्यकारी अभियंता” पदाची पदोन्नती, त्यानंतर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ व तदनंतर मार्च, २०२३ व जून, २०२३ मध्ये कार्यालयीन आदेश काढून कार्यकारी अभियंता (घ.क.व्य) परिमंडळ-७ यांना सहायक आयुक्त पदी पदस्थापना करण्यात येणे, सहायक आयुक्तांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसप्राप्त व कमीत कमी तीन वर्षांचा कालावधी पूर्ण होणे बंधनकारक असतानाही अटी व शर्तींचे उल्लंघन करुन काढलेल्या कार्यालयीन आदेश,

याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, महानगरपालिकेने चुकीच्या पद्धतीने काढलेल्या कार्यालयीन आदेशाची सखोल चौकशी करुन या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले-

"मुंबईतील मनोरंजनाचे हक्काचे केंद्र असलेले तसेच कामगार वर्गातील बऱ्याच कलाकारांना संधी देणारा परळ, मुंबई येथील दामोदर हॉल हा सांस्कृतिक वारसा असणे, त्यातून अनेक कलाकार उदयास येणे, दामोदर हॉलच्या बाजूला रहिवासी सोसायटी असणे, तथापि, सदर हॉल पाडण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, परंतु त्याचा पुनर्विकासाचा कुठलाही आराखडा जाहीर न करणे, पर्यायी जागा देण्याबद्दल अनिश्चित असणे, त्यामुळे जनतेमध्ये संभ्रम व असंतोष निर्माण झाला असणे, सदरहू संभ्रमाचे वातावरण व असंतोष दूर करण्याच्या दृष्टीने पर्यायी व्यवस्था होईपर्यंत तात्काळ सदर काम शासनाने थांबवण्यात येण्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी येथील जनतेने करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री विलास पोतनीस, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"बलात्काराचा गुन्हा दाखल करून व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देत दिंडोरी (जि.नाशिक) येथील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक पीठाच्या विश्वस्त यांच्याकडून खंडणी मागणाऱ्या कृषी सहाय्यक महिलेस १० लाख रुपये घेताना दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३ रोजी पोलिसांनी केलेली अटक, संबंधित महिला पिंप्री (ता.निफाड) येथे तालुका बीजगुणन केंद्रात कृषी सहाय्यक पदी कार्यरत असणे, सदरहू महिलेने सुमारे एक कोटीपेक्षा जास्त रक्कम उकळल्याचे भयानक वास्तव समोर येणे, पोलिसांनी घेतलेल्या सदरहू महिलेच्या घराच्या झडतीत तब्बल १९ लाख रुपये वसूल करणे, संबंधित महिलेस पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची सुनावण्यात आलेली पोलीस कोठडी, तरी देखील संबंधित महिलेचे अद्याप शासनाने न केलेले निलंबन, परिणामी खंडणी वसुली संदर्भात शासकीय अधिकारी/

कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) सर्वश्री सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर येथे महापारेषणचा एकच उपविभाग असणे, भौगोलिकदृष्ट्या अत्यंत मोठ्या असलेल्या गंगापूर तालुक्यात २०६ गावे असणे, त्यात विविध वर्गवारीच्या वीज ग्राहकांची संख्या ८००३० एवढी असणे, त्यापैकी वाळुज परिसरातील ग्राहकांची संख्या ५०,००० असणे, प्रस्तावित उपविभागासाठी ३०,००० ग्राहक संख्याची अट असणे, वाळुंज येथे उपविभाग निर्माण केल्यास या उपविभागास परिसरातील सर्व गावे व उद्योग १५ कि.मी.च्या अंतरावर येणार असणे, गंगापूर तालुक्यात ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या १५ उपकेंद्रातून तालुक्यातील विविध वर्गवारीच्या ग्राहकांना वीज पुरवठा केला जात असणे, जायकवाडी धरणाच्या पाणी फुगवट्यामुळे बारमाही सिंचनाची व्यवस्था असल्यामुळे शेतीसाठी विजेची मागणी वाढत असणे, गंगापूर तालुक्यात सद्यःस्थितीत वाळुंज, रांजणगांव, तुर्काबाद आणि जोगेश्वरी या ४ औद्योगिक वसाहती असून तुर्काबाद व रांजणगांव या औद्योगिक वसाहती वेगाने विकसित होत असणे, शेतकरी व लघु/मध्यम औद्योगिक प्रकल्पांना उच्च दर्जाची सेवा जलद गतीने देण्यासाठी गंगापूर उपविभागाचे विभाजन करुन नव्याने प्रस्तावित वाळुंज उपविभागाची निर्मिती करुन वाळुंज उपविभाग तसेच वाळुंज शाखेचे विभाजन करुन नव्याने रांजणगांव शाखेची निर्मिती करण्यासाठीचा प्रस्ताव मागील दोन वर्षांपासून प्रलंबित असणे, गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना व उद्योजकांना सुरळीत पूर्णपणे वीज मिळण्यासाठी विभाजन करण्याची गरज अत्यंत असणे, यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.."

उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(६) सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"राज्य शासनाच्या गृह विभागात सध्या ५२,८२२ पोलीस शिपाई पदे रिक्त असणे, त्यामुळे पोलीस शिपाई भरती तातडीने करावी अशी अनेक उमेदवारांची मागणी असणे, पोलीस भरतीसाठी

हे उमेदवार मोठ्या प्रमाणात सराव करीत असणे, कोरोना काळात अनेक उमेदवारांची वयोमर्यादा संपत असल्याने उमेदवार निराश झालेले असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सामान्य प्रशासन विभागामार्फत २ वर्ष कमाल वयोमर्यादा वाढवून देण्यात येणे, त्यानुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पूर्वी पोलीस भरती जाहिरात काढून पदे भरून घेतल्यास लाखो उमेदवार पोलीस भरतीस पात्र होणार असणे, त्यामुळे शासनाने तातडीने पोलीस भरतीचा निर्णय घ्यावा अशी मागणी होत असतानाही त्यावरील कार्यवाहीस होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील पोलीस भरतीस इच्छुक उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) श्री.धीरज लिंगाडे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"यवतमाळ नगरपरिषदेमध्ये घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची नस्ती दिनांक १९ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत सादर करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने मुख्याधिकारी नगरपरिषद, यवतमाळ यांना पत्र देऊन या प्रकरणातील माहिती ही विनाविलंब या कार्यालयास सादर करावी तसेच माहिती प्राप्त न झाल्यास आपणा विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशी ताकीद देऊनही यवतमाळ नगरपरिषद घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण नस्ती मुख्याधिकारी नगर परिषद, यवतमाळ यांना सादर न करणे, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना पत्र देऊन यवतमाळ नगरपरिषद घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण नस्ती शीघ्रतेने सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात असे कळविण्यात येणे, मा. उच्च न्यायालयात परिच्छेद निहाय अहवाल सादर करण्याबाबत विलंब होत असणे, वरिष्ठ कार्यालयाचे निदेशांचे पालन न करता कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तवणूक, १९७९ नियम ३ चे उल्लंघन केल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी याबाबतचा खुलासा यवतमाळ नगरपरिषद घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण नस्तीसह उपस्थित राहणेबाबत आदेशित करुनही उपस्थित न रहाणे, घनकचरा निविदा प्रक्रियेमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याची जनमानसात होत असलेली चर्चा, याप्रकरणी राज्य शासनाने सखोल चौकशी करुन संबंधित नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

उद्योग मंत्री (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरीता) यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री.अनिकेत तटकरे, वि.प.स. यांनी, “रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यात पांडापूर ते कासू येथे ४ दिवसांपासून लोक उपोषणाला बसलेले असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात निर्देश दिले जातील असे उद्योग मंत्र्यांनी सांगितले.

(३) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, “स्वयं अर्थसहाय्यित शाळांची आरटीई प्रतिपूर्ती अनेक वर्षांपासून प्रलंबित असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

**९.** आज बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**१०.** आज बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांपैकी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

माननीय उप सभापतींनी, महाराष्ट्र राज्य महिला आयोग आणि उप सभापती कार्यालय विधान परिषद यांच्या विद्यमाने महिला लोकप्रतिनिधींना सायबर सुरक्षित करणारा मिशन ई-सुरक्षा कार्यक्रम आज सायंकाळी ६.०० वाजता दुसरा मजला, विधान भवन येथे आयोजित करण्यात आल्याचे घोषित केले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ३ वाजून ४३ मिनिटांनी स्थगित झाली.
मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक सायंकाळी ४ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**११.** श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले –

“राज्यात मागील तीन महिने मराठा समाजाला आरक्षण देण्याचा मुद्दा आंदोलने, मोर्चे, अन्न सत्याग्रह इत्यादी माध्यमातून ऐरणीवर आला असणे, काही ......... आरक्षण मिळण्याकरिता जाळपोळ, दंगल इत्यादी माध्यमांचा वापर झाल्याचे निदर्शनास येणे, त्यापैकी काही गट मराठा समाजाला ओबीसीत समावेश न करता स्वतंत्र आरक्षण देण्याची मागणी करित असणे, तर ......... समाजाला कुणबी ओबीसींचे दाखले द्यावेत म्हणून आग्रही असणे, यासोबतच राज्यातील ओबीसी जनमोर्चा, धनगर, व्हीजेएनटी, एसबीसी, बंजारा, मुस्लिम इत्यादी समाजही आरक्षणाच्या मागणीसाठी पुढे आल्याची बाब निदर्शनास येणे, कोळी व महादेव कोळी समाजाला अनुसूचित जमातीत आरक्षणाचा लाभ मिळण्याबाबत व तसे दाखले देण्याबाबत होत असलेली मागणी,

महायुती शासनाच्या काळात मराठा समाजाला देण्यात आलेले आरक्षण परत मिळावे ही मराठा समाजाची अपेक्षा असणे, यासाठी क्युरेटिव्ह याचिकाही दाखल करण्यात आली असणे, न्यायमूर्ती भोसले समितीने सुचविलेल्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या असणे, मराठा आरक्षण प्रश्नी सरकारला मार्गदर्शन करण्यासाठी उच्च न्यायालयाच्या तीन निवृत्त न्यायमूर्तींची समिती निवृत्त न्यायमूर्ती श्री. शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली राज्य शासनाने गठीत केली असणे, इतर मागास समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याची शासनाची भूमिका असणे, केंद्र शासनाच्या विश्वकर्मा योजनेची सांगड घालत राज्यात त्याची प्रभावी अंमलबजावणी करुन बारा बलुतेदारांना लाभ मिळवून देण्याचे शासनाचे धोरण असणे, राज्यातील बारा जातींचा ओबीसी म्हणून महाराष्ट्राच्या सूचीत समावेश आहे, त्याच धर्तीवर केंद्राच्या सुचीत समावेश करण्यासाठी तसा प्रस्ताव राज्य शासनाकडून केंद्राकडे पाठविण्यात आला असणे, मराठा समाजाचा इम्पेरिकल डेटा गोळा करण्याचे काम युध्द पातळीवर सुरु असणे, निजामकालीन कुणबी समाजाच्या नोंदी तपासण्याचे काम युध्दपातळीवर सुरु असणे, सारथी, बार्टी, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ व महाज्योतीप्रमाणे इतर मागासवर्गाच्या ओबीसी महामंडळाला समान निधी देण्याचे आदेश अर्थ मंत्रालयाकडून काढण्यात येणे, बंजारा तांडे रस्त्यांना जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोड रस्ते योजना, धनगर वस्त्या रस्त्यांना जोडण्यासाठी यशवंतराव होळकर जोड रस्ते योजना व इतर मागासवर्ग विमुक्त जाती 'अ' भटक्या जमाती 'ब', 'ड' व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राज्य शासनाकडून लागू करण्यात आली असणे, आरक्षण आंदोलनाकडे राजकीयदृष्ट्या न बघता सर्वच राजकीय पक्षांनी चर्चा विमर्षाच्या माध्यमातून आरक्षण प्रश्नी तोडगा काढण्याची आवश्यकता, अन्य आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीतले आरक्षण देण्यासाठी शासन कटिबद्ध असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) ॲड. अनिल परब (२) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजी विधानपरिषद सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप यांनी दिनांक १२ डिसेंबर, २०२३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील अ.क्र. ३९ वरील श्री. सुधाकर अडबाले, वि.प.स. यांच्या "मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देऊन

ओबीसीकरण न करणेबाबत" या विषयावरील तारांकित प्रश्न क्रमांक २२१७२ मध्ये सन्माननीय सदस्य श्री. अभिजित वंजारी, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, श्री. राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.धीरज लिंगाडे व श्री. जयंत आसगावकर यांची नावे त्यांना कल्पना न देता त्यामध्ये समविष्ट करणे इ. बाबत उपस्थित केलेल्या मुद्यासंदर्भात माननीय उप सभापतींनी सविस्तर घोषणा केली.

सर्वश्री प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांनी, मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत उपस्थित केलेल्या प्रस्तावावरील चर्चा – चर्चा पुढे सुरू

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(३) श्री.शशिकांत शिंदे (भाषण अपूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

## गुरूवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३

(क) सर्वश्री जयंत प्र. पाटील, अभिजीत वंजारी, शशिकांत शिंदे, ॲड. अनिल परब, वि.प.स. यांची अल्पकालीन चर्चा.

श्री.जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

"महाराष्ट्र राज्यात उद्योग प्रकल्प उभारण्यासाठी राज्य शासनाकडून एमआयडीसी उद्योग प्रकल्पांना उभारण्यासाठी आरक्षित जागा देण्यात येणे, एमआयडीसीमध्ये असलेल्या वेगवेगळ्या क्लस्टर व आरक्षित जागांवर अनेक वर्षापासून उद्योग सुरू झालेले नसणे, राज्यातील विविध भागात उद्योग प्रकल्प सुरू करण्याकरिता शेतकऱ्यांकडून तुटपुंज्या किंमतीमध्ये जमिनी घेऊन उद्योग प्रकल्पांसाठी आरक्षित करण्यात येणे, परंतु अशा जागेवर अद्यापपर्यंत कोणतेही उद्योग सुरू न होणे वा तो प्रकल्पच रद्द होणे, परंतु आरक्षित केलेल्या जमिनी शासनाने शेतकऱ्यांना परत न करणे, राज्यात विविध विदेशी कंपन्यांकडून गुंतवणूक करून स्थानिकांना रोजगार देण्याचे स्वप्न दाखवणे, मुंबईच्या जवळ असणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा, तळोजा, रोहा, महाड, विळे-भागड, उसर या औद्योगिक वसाहती तसेच आर.सी.एफ., आय.पी.सी.एल., रिलायन्स, गेल इंडिया, ओ.एन.जी.सी., जे.एस. डब्ल्यू. हे मोठमोठे उद्योग सुरू झाले असणे, तसेच नैना प्रकल्प, मुंबई ऊर्जा प्रकल्प, टाटा पॉवर प्रकल्प यासारखे प्रकल्प शेतकऱ्यांच्या माथ्यावर मारण्यात येऊन शेतकऱ्यांची शेत जमीन कवडीमोल भावाने जबरदस्तीने संपादित करून शेत जमीन शासनाने ताब्यात घेणे, पेण तालुक्यातील सेझ प्रकल्पाकरिता ४५ गावांच्या जमिनी रिलायन्स या कंपनीने प्रकल्पासाठी शासनाकडून हस्तांतरीत करून घेणे, परंतु

या ठिकाणी कोणताही प्रकल्प अद्यापपर्यंत उभारण्यात न आल्यामुळे तत्कालीन उद्योग मंत्री यांनी सदर जमीन शेतकऱ्यांना देण्याचे आश्वासन सभागृहात देण्यात येऊनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही शासनाकडून करण्यात न येणे, गेले अनेक महिन्यांपासून विविध प्रकल्पांच्या विरोधात प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या मागण्यासाठी विविध आंदोलने, मोर्चे काढण्यात येऊन सुध्दा याबाबत शासनाकडून कोणतीही दखल घेण्यात न येणे, या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व रोजगाराचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असून प्रकल्पग्रस्त नोकरी पासून वंचित राहणे, तर अनेक प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन न झाल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्तांकडून अशा प्रकल्पांना विरोध करण्यात येणे, राज्य शासनाने यावर तातडीने उपाययोजना न केल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर होणारा अन्याय व उद्योग तसेच प्रकल्पांना होणाऱ्या विरोधाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अंबादास दानवे (विरोधी पक्ष नेते) (२) श्री. अनिकेत तटकरे

(३) श्री. सचिन अहिर (४) श्री. शशिकांत शिंदे

(५) श्री. प्रवीण दरेकर

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(ख) (१) ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री प्रवीण दरेकर, प्रसाद लाड, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

ॲड.निरंजन डावखरे वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

राज्यातील काही आदिवासी व्यक्तींनी आपल्या धर्माचा त्याग करून ईसाई/इस्लाम धर्म स्वीकारणे, इतर धर्म स्वीकारून सुद्धा सदर आदिवासी व्यक्ती आदिवासी विकास विभागामार्फत मिळणारे सर्व लाभ तसेच आरक्षण सुद्धा घेत असणे, काही दिवसांपूर्वी मुंबई महानगरामध्ये आदिवासी समाजाचा संविधान दिनानिमित्त मोर्चा आला असणे, यात अन्य धर्मांत धर्मांतरीत होणाऱ्या व्यक्ती व समुदायाला अनुसूचित जमातीच्या सूचीतून व आरक्षणाच्या फायद्यातून निष्कासित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली असणे, कौशल्य विभागातील आयटीआय मध्ये अशा प्रकारच्या अनेक बोगस आदिवासी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे निदर्शनास येणे, अशा बोगस आदिवासी विद्यार्थांवर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२-२६ वाजता स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-४० वाजता मा. उप सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (१) पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चाळीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** राज्य उत्पादन शुल्क मंत्री, (मुख्यमंत्री यांच्याकरिता) यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले.

(१) जिल्हा खनिज प्रतिष्ठान, अहमदनगर, भंडारा, गोंदिया, धाराशिव, सिंधुदुर्ग, नाशिक व सोलापूर या जिल्ह्यांचे सन २०१६-२०१७ ते २०२२-२०२३ व जिल्हा खनिज प्रतिष्ठान चंद्रपूर व यवतमाळ यांचे सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल.

(२) महाराष्ट्र मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल

(३) महा मुंबई मेट्रो (एम-३) संचलन महामंडळ मर्यादित यांचे सन २०१९-२०२०, सन २०२०-२०२१ व सन २०२१-२०२२ या वर्षांचे वार्षिक अहवाल

(४) महाराष्ट्र राज्य अपंग वित्त व विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१३-२०१४ या वर्षाचा वार्षिक अहवाल

(५) मॉयल लिमिटेड यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा एकसष्ठावा वार्षिक अहवाल.

(६) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल.

**३.** डॉ. प्रज्ञा सातव (समिती सदस्य ) यांनी शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजासाठी वेळ नेमून देणारे अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सभागृहास सादर केले व ते संमत करावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**४.** गुरुवार दिनांक १४ डिसेंबर, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी घोषित केले.

(१) सर्वश्री किरण सरनाईक व इतर वि.प.स. यांनी, सन २००५ पूर्वी विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सहाव्या व सातव्या वेतन आयोगाचे प्रलंबित हप्ते तसेच मृत्यू पावलेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना निवृत्तीवेतन योजनेचा लाभ मिळणे, इ. बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वयेच्या सूचनेस अनुलक्षनू माननीय उप सभापतींनी दिलेल्या निदेशानुसार शालेय शिक्षण मंत्री यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(१) श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांनी, "पिंप्रद, ता. फलटण, जि. सातारा या गावात छुप्या पध्दतीने सुरू असलेली गर्भलिंग निदान चाचणी" इ. बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यावर सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस वि.प.स. यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.
शासनाने या संदर्भात निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री. सुनील शिंदे वि.प.स. यांनी, "नागपूर येथील न्यूरॉन या खाजगी रुग्णालयाने वैद्यकीय उपचारासाठी लाखो रुपयांच्या बिल वसुलीसाठी दबाव टाकल्याने एका युवकाने केलेली आत्महत्या" इ. बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते यांनी, "मराठा समाजाला आरक्षण देणे" इ. बाबत नियम २८९ अन्वये सूचना दिली असून त्यावर विरोधी पक्ष नेत्यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे विरोधी पक्ष नेते यांनी उपरोक्त सूचनेच्या संदर्भात आपले म्हणणे मांडले.

## लक्षवेधी सूचना – (पुढे सुरू..)

(२) सर्वश्री अभिजीत वंजारी, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. अभिजीत वंजारी वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुखमंत्र्यांचे लक्ष वेधले.

राज्यातील विदर्भ वैधानिक विकास महामंडळ व इतर वैधानिक विकास महामंडळ यांची मुदत सन २०१९ मध्ये संपुष्टात आली असून ५ वर्ष उलटून गेल्यावरही या वैधानिक विकास महामंडळांना मुदतवाढ देण्यासंदर्भात शासनाने कोणताही निर्णय घेतला नसणे, दांडेकर समितीच्या अहवालाच्या निष्कर्षानुसार पश्चिम महाराष्ट्राच्या निमिर्तीपासून विदर्भातील सिंचनाचा व सर्व क्षेत्रातील विकासाचा अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टिकोनातून या महामंडळाची निर्मिती करण्यात येणे, परंतु आता गेल्या ५ वर्षापासून या महामंडळाची मुदतवाढ संपल्यापासून विदर्भाचा अनुशेष भरून काढण्याकरिता कोणताही निर्णय घेतला नसणे, सन २०२२ च्या नागपूर येथील अधिवेशनात विदर्भासंबंधित अनेक घोषणा करण्यात येणे, परंतु अनुशेष भरून काढण्याकरिता अतिरिक्त निधीची मान्यता देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसणे, या वैधानिक महामंडळाच्या मुदतवाढीकरिता केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून त्याचा पाठपुरावा करून ६ महिन्याच्या आत वैधानिक विकास महामंडळे पूर्ववत सुरू करण्याचे आश्वासन देऊनही प्रत्यक्षात कोणतीच कार्यवाही न होणे, त्यामुळे विदर्भाचा सर्व क्षेत्रातील अनुशेष वाढत असल्याने पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

उप मुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

( ३ ) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

मुंबईतील मुलुंड येथील सर्व्हे क्र. ६२२ पी, जमीन क्रमांक २६९ पी, ६२२ ब, ६२४ मधून २७८१९.५० चौ.मी. सन १८९४ मध्ये संन्यासी सेठ नथूलाल यांनी मृत्यूपूर्वी साधू, संन्यासीसाठी निवारा व भोजनगृह, भटक्या गायी, वासरे, गोठ्याच्या बांधकामाकरिता केलेली दान, त्यासंदर्भात मृत्यूपूर्वीचे केलेले दानपत्र, या जमिनीवर ५० मजूर गायींची सेवा, महात्म्यांच्या सेवेसाठी कार्यरत, असे असताना दिनांक २३ डिसेंबर, १९९४ ट्रस्टने कोकण विभाग आयुक्तांकडे ४ हजार चौ.मी. जागेवर २० युएल कायदा, १९७६ च्या कमकुवत कलमांतर्गत गोठ्यात काम करणाऱ्या कौरतीया मजुरांसाठी घरे बांधण्याची परवानगी मागितली असता कोकण आयुक्तांनी दिलेली परवानगी/मान्यता, ट्रस्टने सर्व जमीन विकासकास कवडीमोल दराने विक्री करणे, उर्वरित जमीन २७८१९.५० चौरस मीटर सन २००६ मध्ये धर्मादाय आयुक्तांनी शा.नि. तबेले/गोशाळे मुंबईबाहेर हलविण्याचा आदेश, जमिनी गोठ्यासाठी, भिक्षूंसाठी शेड निवारा, अन्नासाठी दान केलेली असताना धर्मादाय आयुक्तांनी कोणतीही खातरजमा न करता विश्वस्त व समता विकासक यांच्याशी हातमिळवणी करून रुपये ५ कोटी ४० लाख किंमतीची जमीन विकण्याची परवानगी,

समता विकासक व त्यांच्या भागीदारांनी जमीन विविध बँकाकडे गहाण ठेवून ३९०० कोटीचे घेतलेले कर्ज, उभारलेले टॉवर, उक्त जमीन सेठ नथूलाल यांनी मृत्यूपूर्वी साधू, संन्यासीसाठी निवारा व भोजनगृह, भटक्या गायी, वासरे, गोठ्याच्या बांधकामाकरिता दान केलेली असताना ट्रस्टने विकासकाबरोबर संगनमत करून केलेल्या गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाने सखोल चौकशी करून तिथे काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या राहण्याची सोय करण्याबाबत व दोषी विश्वस्त, विकासक व इतर शासकीय अधिकारी यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री (विधि व न्याय ) यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) सर्वश्री जयंत प्र. पाटील, अनिकेत तटकरे, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

रायगड जिल्ह्यातील अनेक नद्यांवर पाणी योजना राबविल्यानंतरही जल सिंचनाची स्थिती गंभीर असणे, वाढत्या औद्योगिकरणाबरोबर लोकवस्तीला पाणी पुरवठा करतांना रब्बी हंगामातील शेती संकटात येत असणे, रायगड जिल्ह्याचा शाश्वत विकास घडवताना जलसंपदा विभागाचे बाळगंगा, हेटवणे, सांबरकुंड, काळकुंभे, अंबोली हे प्रकल्प अनेक वर्ष अपूर्ण अवस्थेत असल्याने तत्कालीन जलसंपदा मंत्री यांनी याबाबत आढावा बैठक घेऊन या प्रकल्पासंबंधीची प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, परंतु अद्यापही याबाबतचे प्रस्ताव सादर न केल्याने काळकुंभे धरणाचे ७० टक्के काम होऊनही हा प्रकल्प रखडलेला असणे, सांबरकुंड धरणासाठी जून २०२० रोजी रू.७४२ कोटीची सुधारीत मान्यता देण्यात येऊनही अद्याप काम सुरू न होणे, तर पेण तालुक्यातील बाळगंगा धरणाचे काम सन २००९ पासून अपूर्ण अवस्थेत असून हेटवणे धरणास चतुर्थ सुधारीत प्रशासकीय मान्यता न दिल्याने या धरणापासून ३२ कि.मी. अंतरावर असणाऱ्या ५२ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईसह शेतकऱ्यांना दृष्काळसदृश परिस्थितीला सामोरे जावे लागणे, याबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी मोर्चे, आंदोलने करूनही शासनाने याकडे दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही.

उप मुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. एकनाथराव खडसे वि.प.स. यांनी, कर्मवीर भाऊराव मा. सा. कन्नमवार यांचे नाव शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाला देण्याबाबत मुद्दा उपस्थित केला.

उप मुख्यमंत्री यांनी याबाबत खुलासा केला.

(५) डॉ. वजाहत मिर्झा, सर्वश्री धीरज लिंगाडे, अभिजीत वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी डी. पाटील, डॉ. प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले,वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

डॉ.वजाहत मिर्झा वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्र्यांचे लक्ष वेधले.

महाराष्ट्र शासनाद्वारे विविध समाजातील तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी चालविण्यात येणाऱ्या स्वायत्त संस्था बार्टी, टार्टी, सारथी, अमृत आणि महाज्योती यांच्या धर्तीवरच महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या तरुणांसाठी मार्टी म्हणजेच 'मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर' ची स्थापना महाराष्ट्र शासनाने करावी याबाबत मुस्लिम समाजाकडून मागील तीन वर्षांपासून सातत्याने मागणी केली जात असणे, परंतु शासनाने याबाबत मार्टी ची स्थापना करू या आश्वासना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची कृती अद्याप पर्यंत केलेली नसणे, मार्टी कृती समितीकडून मा. मुख्यमंत्री व अल्पसंख्याक विकास मंत्री तसेच आमदार व खासदार यांना निवेदन देऊन सातत्याने या मागणीबाबत पाठपुरावा करण्यात आलेला असणे, परंतु शासनाकडून अल्पसंख्याक समाजाच्या विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मार्टीच्या स्थापनेबाबत फक्त आश्वासन दिली जात असणे, ऑक्टोबर २०२३ दरम्यान राज्य शासनाने बार्टी, टार्टी, सारथी, अमृत आणि महाज्योती या संस्थांमध्ये सुसूत्रता व एकता आणण्याचे दृष्टीने एक जीआर काढलेला असणे, परंतु हा शासन निर्णय काढताना मुस्लिम समाजातील तरुणांसाठी आवश्यक असलेल्या मार्टी च्या स्थापनेसाठीच्या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष केलेले असणे, राज्यात मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिटट्यूट अर्थात मार्टीची स्थापना तातडीने करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

अल्पसंख्याक विकास व औकाफ मंत्री यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून १४ मिनिटांनी स्थिगित झाली.

मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

राज्य उत्पादन शुल्क मंत्री ( मुख्यमंत्री यांचेकरिता ) यांनी, "जुनी पेन्शन योजना लागू करणे" इ. बाबत नियम ४६ अन्वये निवेदन केले.

श्री.जयंत प्र. पाटील वि.प.स. यांनी, श्रीमती साधना जराते, यांच्यावर बेजबाबदारपणे शस्त्रक्रिया केल्यामुळे त्यांचा झालेला मृत्यू, इ. बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

शासनाने दखल घ्यावी असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

याबाबत शासनाने नोंद घेतली असल्याचे राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी सांगितले.

"मराठा समाजाला आरक्षण मिळणे" इ. बाबतचा श्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

( १ ) श्री. शशिकांत शिंदे
( २ ) श्री. विक्रम काळे
( ३ ) श्री. जयंत प्र.पाटील
( ४ ) श्री. सुरेश धस
( ५ ) श्री. भाई जगताप
( ६ ) श्री. कपिल पाटील

**( चर्चा अपूर्ण..**

( १ ) डॉ.मनिषा कायंदे वि.प.स. यांनी, "परशुराम आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे व विधानपरिषद सदस्यांना स्वीकृत तारांकित प्रश्नांचे विवरण व तपशील विधानमंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे" इ. बाबत माहितीविषयक मुद्दे मांडले.

"मराठा समाजाला आरक्षण मिळणे" इ. बाबतचा श्री. प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

( ७ ) श्री.प् रसाद लाड
( ८ ) श्री. एकनाथराव खडसे
( ९ ) श्री. अनिकेत तटकरे
( १० ) श्री. नरेंद्र दराडे
( ११ ) डॉ.  प्रज्ञा सातव
( १२ ) श्री. अरुण लाड
( १३ ) श्री. अब्दुल्लाह खान दुर्राणी
( १४ ) श्री. अमोल मिटकरी
( १५ ) ॲड. निरंजन डावखरे

**( चर्चा अपूर्ण.. )**

श्री. अमोल मिटकरी वि.प.स. यांनी, राज्यातील पोलीस पाटील त्यांचा मागण्यांबाबत शासनाकडे पाठपुरावा करीत असणे, इ. बाबत माहितीविषयक मुद्दा मांडला.

## शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३

माननीय उप सभापतींनी, म.वि.प. नियम २६० अन्वये दिलेल्या मराठा आरक्षणाच्या प्रस्तावावर आज दुपारी सुरु करण्यात येणारी चर्चा या विषयाला न्याय देण्याच्या दृष्टिकोनातून आता सुरु करणार असल्याचे सांगितले.

'मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत' या विषयावरील श्री. प्रवीण दरेकर, श्रीमती मनिषा कायंदे, सर्वश्री विक्रम काळे, सुरेश धस, प्रसाद लाड, विप्लव बाजोरिया, सतिश चव्हाण, रणजितसिंह मोहिते-पाटील, किशोर दराडे, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, किरण सरनाईक, अनिकेत तटकरे, ॲड. निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दटके, वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरु)-

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री. अभिजीत वंजारी (२) श्री. महादेव जानकर (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

**सभागृहाची विशेष बैठक सकाळी १० वाजून ४१ मिनिटांनी सकाळी ११.०० वाजेपर्यंत स्थगित झाली.**

**स्थगितीनंतर सभागृहाची नियमित बैठक सकाळी ११.०० वाजता माननीय सभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.**

१. (१) सर्वश्री. विक्रम काळे, सतिश चव्हाण वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राज्यातील शाहु, फुले, आंबेडकर निवासी अनुसूचित जाती निवासी / अनिवासी आश्रमशाळांची तपासणी करणे, त्याची अ, ब, क, ड अशी वर्गवारी श्रेणी करणे, या श्रेणीनुसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा

निर्णय सन २०१९-२० मध्ये घेणे, गत अधिवेशनामध्ये या शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान तातडीने सुरु करण्यात येईल, असे तत्कालीन मंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वासित करणे, या प्रश्नासाठी मराठवाडा विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करून मा. मुख्यमंत्री महोदयांकडे या प्रश्नासाठी बैठकीचे आयोजन करणे, मा. मुख्यमंत्री महोदयांनी या सर्व शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीप्रमाणे वेतन अनुदान देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आणण्याच्या सूचना देऊन बराच कालावधी उलटणे, तरीही आजपावेतो या शाळांमधील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीनुसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक/कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना.”

पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी (मुख्यमंत्र्यांकरिता) निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधले –

“राज्यातील मध्यमवर्गीय व अल्पवर्गीय शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी सन २०२१ मध्ये शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) सुरु केलेली असणे, उक्त योजनेच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊन शेतकरी आत्महत्या रोखण्यास मदत होईल यासाठी राज्याच्या १५ जिल्ह्यातील ५१४ खेड्यांमध्ये सदर योजना सुरु करण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आलेली असणे, तथापि, अकोला जिल्ह्यातील ११६ गटांमध्ये कृषी कंपन्यांनी अवजारे खरेदीमध्ये अनियमितता केलेली असणे, सदरहू योजनेच्या अटी व शर्तीनुसार ट्रॅक्टरसह किमान ५ अवजारे खरेदी करणे बंधनकारक असतानाही ट्रॅक्टर खरेदी न करता अवजारे खरेदी करण्यात आलेल्या गटाला सुध्दा अनुदान देण्यात आले असणे, जुनी अवजारे रंगरंगोटी करून नवीन खरेदी करण्यात आल्याचे दाखविले असणे, याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, वाशिम यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत बोगस देयकांच्या आधारे खरेदी करण्यात आलेल्या अवजारांची चौकशी केलेली असणे, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून अनियमितता करणाऱ्या संबंधित गट, शेतकरी कंपन्या यांचेवर गुन्हे दाखल करून त्यांना सहाय्य करणाऱ्या कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना बडतर्फ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.”

कृषी मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. सचिन अहिर, अमोल मिटकरी, विक्रम काळे वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"मुंबई शहर माझगांव विभागातील भू.क्र.३६५ व ३६९ हे भूखंड जे पी एम जीजीभॉय ट्रस्ट, वाडिया ट्रस्ट, पेटीट ट्रस्ट, गोदरेज ट्रस्ट, मुंबई या ट्रस्टना दिनांक १२ एप्रिल, १९१० मध्ये भाडेपट्टयावर देण्यात येणे, सदरील भाडेपट्टयाची मुदत संपल्यामुळे जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर यांनी शासन निर्णय २०१२ नुसार मुंबईतील शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयांचे नूतनीकरण करण्यासंबंधीच्या विहित धोरणानुसार सदर भोगवटाधारकांना कळविण्यात येणे, मात्र त्यांच्याकडून त्याला प्रतिसाद देण्यात न येणे, त्याचप्रमाणे सदर मिळकतीवरील भाडेपट्टयाची रुपये ९ कोटी ५७ लाख २० हजार ६९७ इतकी रक्कम भरण्यात आलेली नसणे, शासनामार्फत जप्तीची कारवाई करण्यात येत असताना ट्रस्टकडून थकीत रक्कम भरण्याबाबतचे हमीपत्र लिहून देण्यात येऊन कारवाई थांबविण्याची करण्यात आलेली विनंती, परंतु अद्यापही रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली नसणे, असे असताना एनओसी न घेता सदरील जमीन परस्पर विकासकांना विकण्यात येणे, याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून कारवाईस दिरंगाई होत असणे, माझगांव येथील प्राईम लोकेशनची जमीन भोगवटाधारकांकडून शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरुन विकासकाला विकण्यात आलेली असणे, त्यामुळे शासनाचा करोडोचा महसूल बुडविण्यात येणे, सदर भूखंडावर वर्षानुवर्षे राहत असलेल्या रहिवाशांवरही दबाव आणला जात असून गरीब रहिवाशांना येथून बेदखल करण्यात येत असल्याने रहिवाशांमध्ये पसरलेले भीतीचे वातावरण, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले –

"कळमनुरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या हद्दीतील नामांकित शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अनेक सोयीसुविधांचा अभाव असणे, या निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना स्वतःच्या हातानेच स्वयंपाक करून जेवण बनवावे लागत असल्याच्या तक्रारी असणे, नामांकित इंग्रजी शाळेत सुविधा नसणे, मात्र सुविधा मिळत असल्याचा अहवाल देण्यात येणे, याप्रमाणेच

सोनपेठ येथील विजन पब्लिक स्कूलसह आणखी काही नामांकित इंग्रजी शाळांबाबत अशाच प्रकारे अनेक तक्रारी असणे, कळमनुरी आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत १०० विद्यार्थ्यांना पूर्णा येथील नामांकित इंग्रजी शाळेत प्रवेश देणे, ज्या शाळेत प्रवेश दिला त्या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी कुठल्याही प्रकारच्या सोयीसुविधा नसणे, एका मोठ्या हॉलमध्ये शेकडो विद्यार्थी राहत असणे, नामांकित इंग्रजी शाळा असताना तेथे काही वर्गासाठी इंग्रजी विषयाचा शिक्षकच नसल्याचा पालकांच्या तक्रारी असणे, तसेच दर महिन्याला अधिकारी भेट देऊन विद्यार्थ्यांना सोयी सुविधा मिळत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवित असणे, विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण व सोयीसुविधा मिळतात किंवा नाही याकडे लक्ष देणे वरिष्ठ अधिकारी यांचे काम असताना देखील ते प्रत्यक्ष भेट न देताच बोगस अहवाल तयार करीत असणे, परिणामी विद्यार्थी व पालकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने हायटेक पूर्णा व विजन पब्लिक स्कूल सोनपेठसह सर्व नामांकित शाळांची शाळेतील संपूर्ण कागदपत्रांची व सोयीसुविधांची तात्काळ तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

आदिवासी विकास मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

गृहनिर्माण मंत्र्यांनी , ' म्हाडाच्या वसाहतींमध्ये सेवा शुल्क माफ करणे ' इ.बाबत म.वि.प.नियम ४६ अन्वये निवेदन केले.

**सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १२ मिनिटांनी स्थगित झाली.**

**स्थगितीनंतर सभागृहाची बैठक पुन्हा दुपारी १२ वाजून २० मिनिटांनी सुरू झाली.**

**२.** (१) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील नऊ प्रश्न उत्तरीत झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील अठ्ठावीस प्रश्न हे वेळेअभावी झाले.

**३.** (१) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्र्यांनी, "कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवला.

(२) कृषी मंत्र्यांनी, " लोकलेखा समितीच्या सन २००१-२००२ च्या आठव्या अहवालातील परिच्छेद १.२८ नुसार मंत्रालयीन सर्व विभागांनी केलेल्या सन २०२२ -२०२३ या वित्तीय वर्षातील पुनर्विनियोजनाबाबतच्या माहितीचे एकत्रित विवरणपत्र" सभागृहासमोर ठेवले.

(३) उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले-

(क) "डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल"

(ख)"सोमय्या विद्याविहार विद्यापीठ यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल"

(ग) "डी.वाय.पाटील कृषी व तंत्र विद्यापीठ, तळसंदे कोल्हापूर यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" .

(४) कामगार मंत्र्यांनी पुढील अहवाल सभागृहासमोर ठेवले-

(१) "रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणीसावा वार्षिक अहवाल"

(२) "अमरावती जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१९-२०२० ते २०२०-२०२१ या वर्षांचा सातवा, आठवा वार्षिक अहवाल"

(३) "सोलापूर जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ यांचे सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षांचे वार्षिक अहवाल"

(४) "सुरक्षा रक्षक मंडळ बृहन्मुंबई व ठाणे जिल्हा यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल"

(५) "अहमदनगर माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा वार्षिक अहवाल"

(६) "पुणे माथाडी हमाल व इतर श्रमजीवी कामगार मंडळ यांचे सन २०१७-२०१८ ते २०२०-२०२१ या वर्षांचे अनुक्रमे अडतीसावा, एकोणचाळीसावा, चाळीसावा व एक्केचाळीसावा वार्षिक अहवाल"

(७) "पिंपरी-चिंचवड माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा एकोणतीसावा वार्षिक अहवाल"

(८) "अकोला – वाशिम - बुलढाणा जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, अकोला यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल"

(९) "सोलापूर जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांची सन २०२१-२०२२ या वर्षाचा तेहतीसावा वार्षिक अहवाल"

(१०) "यवतमाळ जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पाचवा वार्षिक अहवाल"

(११) “दि क्लिअरिंग ॲण्ड फॉरवर्डिंग असंरक्षित गोदी कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकतीसावा वार्षिक अहवाल”

(१२) “दि खोका मेकिंग ॲण्ड टिंबर मार्केट लेबर बोर्ड, मुंबई यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा एकोणपन्नासावा वार्षिक अहवाल”

(१३) “परभणी - हिंगोली जिल्हा माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ, परभणी यांचे सन २०१७-२०१८ ते २०१८-२०१९ या वर्षांचे चौदावा, पंधरावा वार्षिक अहवाल”

(१४) “किराणा बाजार व दुकाने माथाडी मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा बावन्नावा वार्षिक अहवाल”

(१५) “औरंगाबाद माथाडी व असंरक्षित कामगार मंडळ यांचा सन २०२१-२०२२ या वर्षाचा तीसावा वार्षिक अहवाल”

**४.** (१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, महाराष्ट्र विधानसभेने संमत केलेले सन २०२२ चे वि.स.विधेयक क्रमांक ३७- स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२ मागे घेण्यास अनुमती द्यावी, असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सन २०२२ चे वि.स.विधेयक क्रमांक ३७- स्वयं-अर्थसहाय्यित विद्यापीठे (सुधारणा) विधेयक, २०२२ मागे घेण्यात आले.

**५.** माननीय उप सभापतींनी, आज शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी म.वि.प. नियम ९३ अन्वये प्राप्त झालेल्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या सूचना व त्यावरील निर्णय सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

**६.** (१) श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी “ मुंबईतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडण्याचा शासन निर्णय जारी केल्यामुळे निर्माण झालेला असंतोष “ या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.
यासंदर्भात शासनाने शासनाने योग्य तो विचार करावा , असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(२) श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी “ मुंबईतील शाळेबाहेरील टपऱ्यांवर विद्यार्थ्यांना सहजपणे उपलब्ध होत असलेले नशेचे पदार्थ “ या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. विलास पोतनीस, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

(३) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी " मुंबईतील वाढत्या प्रदूषणाचे मोजमाप करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे अपुरी यंत्रणा उपलब्ध असणे " या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

यासंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे निर्देश माननीय उपसभापतींनी दिले.

(४) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी " राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयी नवीन आकडेवारी समोर येणे" या विषयाबाबत म.वि.प.नियम २८९ अन्वये सूचना दिली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी यासंदर्भात आपले म्हणणे मांडले.

**७.** (१) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी," पुणे ते बंगलोर या ग्रीन फिल्ड हायवेमध्ये बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांच्या भूसंपादित जमिनींची खरेदी" इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी," गडचिरोली जिल्ह्यातील कालेश्वरम् प्रकल्प मेडीगट्टा बॅरेज या प्रकल्पासाठी भूसंपादन न झालेल्या शेतजमिनीचा मोबदला शासनाने दिलेल्या आश्वासनाप्रमाणे प्रकल्प बाधित शेतकऱ्यांना मिळणे" इ.बाबत नियम ९३ अन्वये दिलेल्या सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार महसूल मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**८.** (१) श्री. राजहंस सिंह, वि.प.स. यांनी, ' मुंबईतील "एल" वॉर्डमधील एलबीएस रोडवर असलेल्या जवळपास १०८ चाळींचे रुपांतर अनधिकृत हॉटेल, बोर्डिंग, लॉजींगमध्ये झाले असल्याचे निदर्शनास येणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी, असे निदेश माननीय उपसभापतींनी दिले.

(२) श्री. जयंत प्र .पाटील, वि.प.स. यांनी, ' अलिबाग तालुक्यामध्ये असलेला जेल परुर ग्रामपंचायतीमध्ये हलविण्यासाठी व त्याकरिता तेथील जागा संपादन करण्याचे काम राज्य शासनाने केलेले असणे' इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. जयंत प्र .पाटील, वि.प.स. यांनी, ‘ अलिबाग तालुक्यात चौल, वरसोली चारमाळा येथे खाडी मुखावर असलेली जागा ही कोळी समाजासाठी राखीव असताना तेथे ओटे तोडून झाडे लावण्याचे काम बंगलेधारकांनी सुरु केलेले असणे ‘ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स. यांनी, ‘ नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांनी काम न करता संगनमताने कोट्यवधी रुपयाची बिले काढून अनिमियतता केली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(५) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, ‘ राज्यामध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगारांसाठी मोफत भोजन व्यवस्था योजनेचा लाभ नोंदणीकृत नसलेल्या व्यक्ती देखील घेत असणे ‘ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(६) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, ‘ राज्यात नंदुरबार जिल्ह्यात शासनाच्या समग्र अभियानातून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्यासाठी मिळणारे अनुदान शासनाकडून अजूनही प्राप्त न झाल्यामुळे शिक्षकांना आपल्या खिशातून साहित्य खर्च करावे लागत असल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्या सुमारास निदर्शनास येणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(७) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, ‘ राज्यात प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पाणीवापर संस्थेच्या स्थापनेसाठी व संपूर्ण सिंचन व्यवस्थापन शेतक-यांच्या हाती देण्यासाठी महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतक-यांकडून व्यवस्थापन अधिनियम, २००५ हा कायदा करून यापुढे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात पाणी वापर संस्थेची नोंदणी सहकार कायदा-१९६० अन्वये करण्यात येणार नाही, असा कायदा असतांनाही सहकार विभागाने सहायक निबंधक, सहकारी संस्था, वेल्हे यांनी अनेक बोगस सहकारी पाणी वापर संस्था नोंदणी करणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(८) श्री. सचिन अहिर, वि.प.स. यांनी, ‘ दक्षिण मुंबई महानगरपालिकेतर्फे बांधण्यात येणाऱ्या कोस्टल रोडचे काम ८२ टक्के पूर्ण झाले असून फेब्रुवारी, २०२४ पासून हा रस्ता रहदारी होणार असून हा रस्ता मुंबईकराच्या करातून १२७०० कोटी रुपये खर्च करून होत असून नवीन टोल आकारणी विचाराधीन असणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(९) श्री. गोपिचंद पाडळकर, वि.प.स. यांनी, ‘ राज्यातील १०८ क्रमांकाच्या रुग्णवाहिकेच्या चालक व डॉक्टर यांच्या विविध मागण्याबाबत दिनांक २६ जानेवारी २०१४ पासूनचे विषय प्रलंबित असणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१०) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, ‘ मुंबई – बडोदा द्रुतगती महामार्गासाठी डहाणू तालुक्यातील धानिवरी ईभाड पाडा येथील आठ आदिवासी कुटुंबांना मोबदला न देताच महसूल विभागाने पोलिसांच्या प्रचंड बंदोबस्तात त्यांच्या घरातून माहे एप्रिल २०२३ मध्ये बाहेर काढणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(११) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, ‘ राज्य शासनाने माहे जानेवारी २०२३ मध्ये शिक्षक भरतीचे सुतोवाच केले असूनही आजमितीपर्यंत एकाही उमेदवारास नियुक्ती मिळाली नसणे ‘ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१२) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, ‘ पश्चिम उपनगरातील नागरिकांचे रोज किमान ३ ते ४ तास वाहतूक कोंडीत जात असल्याने उपनगरीय जनता त्रस्त झालेली असणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(१३) श्री.महादेव जानकर, वि.प.स. यांनी, ‘ महाराष्ट्र राज्य अंगणवाडी कर्मचाऱ्यांचा आपल्या मागण्यांबाबत दिनांक ४ डिसेंबर, २०२३ पासून राज्यव्यापी संप सुरु असणे’ इ.बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

**सभागृहाची बैठक दुपारी ०२ वाजून ०८ मिनिटांनी मध्यंतरासाठी स्थगित झाली.**

**मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक पुन्हा दुपारी ०२ वाजून ४५ मिनिटांनी सुरू झाली.**

**९.** (१) श्री. गोपिचंद पाडळकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले –

“ .”पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक भरतीसाठी बिंदूनामावली अद्ययावत करण्याबाबतचे शिक्षण आयुक्त यांचे दिनांक २० जुलै, २०२३ रोजीचे पत्र निर्गमित झालेले असणे, त्यामधील (ब) मध्ये बिंदूनामावली रोस्टर बाबत खुल्या प्रवर्गाच्या तक्रारी विचारात घेऊन ज्या सूचना निर्गमित केलेल्या असणे, त्याच पद्धतीने NT-C (भज-क) प्रवर्गाचीही बिंदूनामावली तपासताना त्रुटी दूर केली जावी, बिंदूनामावलीतील घोळ दूर करून NT-C प्रवर्गाला ३.५ टक्के आरक्षण नुसार जागा मिळणेबाबत दिनांक १८ मे, २०२३ रोजीचे निवेदन दिलेले असणे. मागील सन २०१७ मधील शिक्षक भरतीमध्येही NT-C आरक्षण ३.५ टक्के असूनही आरक्षणानुसार (एनटी-सी प्रवर्गातील) जागांची भरती केली जात नसणे, त्याला कारण म्हणजे एनटीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांची मेरिटनुसार खुल्या गटात (open) मध्ये निवड होते, त्या जागांची नोंद रोस्टर तपासणीत जनरल मध्ये होण्याऐवजी एनटी-सी प्रवर्गामध्ये धरून रोस्टर तपासला जाणे, त्यामुळे एनटीसी

(NT-C) प्रवर्गातील जागांचा अनुशेष (रिक्त) राहण्याऐवजी अतिरिक्त दाखवल्या जात असणे, रोस्टर घोटाळ्यामुळे एनटीसी प्रवर्गातील ३.५ टक्के प्रमाणे जागांचा अनुशेष शिल्लक असूनही अतिरिक्त जागा दाखवल्यामुळे एनटी-सी प्रवर्गातील उमेदवारावर अन्याय होणे, त्यामुळे शासन स्तरावरून सर्व जिल्हा परिषद मधील एनटी-सी प्रवर्गाच्या बिंदूनामावली तपासणीतील त्रुटी दूर करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना योग्य आदेश देण्याची विनंती विद्यार्थी, लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे करूनही शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही.""

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**१०.** (१)श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी म.वि.प.नियम ९७ अन्वये पुढील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले-

"तळवडे, पिंपरी-चिंचवड, पुणे येथील मे. राणा इंजिनियरिंग, ज्योतिबा नगर येथे स्पारकल कॅन्डल तयार करण्याच्या कारखान्यात दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी स्फोट होऊन ६ महिला कामगार मृत्यूमुखी पडल्याची व १० कामगार जखमी झाल्याची दुर्घटना घडणे, सदर घटनेच्या ठिकाणी दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजी लोकप्रतिनिधी यांनी सदर दुर्घटना घडलेल्या ठिकाणी समक्ष पाहणी केली असता ज्याठिकाणी दुर्घटना घडली तेथे कच्चे बांधकाम असलेल्या इमारती व एक शटर असलेल्या शेडमध्ये औद्योगिक कारखाना सुरु असल्याचे निदर्शनास येणे, सदर कारखान्यात शोभेच्या दारुपासून वाढदिवसाकरीता वापरण्यात येणारे स्पारकल कॅन्डल तयार करण्याचे काम सुरु असणे, सदर ठिकाणी व्यवसाय मालकाव्दारे नियुक्त महिला कामगार काम करीत असणे, सदर व्यवसाय अवैध प्रकाराने असून परवानगी घेतलेली नसणे, सदर जागा ही रेड झोन मध्ये समाविष्ट असून तळवडे परिसरात साधारणपणे ३००० विविध प्रकारच्या आस्थापना कार्यरत असणे, स्पारकल कॅन्डल तयार करण्यासाठी Potassium Chlorate / Perchlorate, Stronium / Aluminium / Magnasium, Dextrin इत्यादी रसायने वापरल्याची शक्यता असणे, सदर जखमी व्यक्तीचे शासनाकडून ससून रुग्णालयात उपचार असून मृत्युमुखी पडलेल्या व्यक्ती मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत ०५ लाख रुपये मदत जाहीर करण्यात आलेली असणे, उक्त दुर्घटनेच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस यांनी भारतीय दंड संहिता १९६० कायद्याअंतर्गत कलम ३०४ (२) २८५, २८६, ३३७, ३३८ आणि बारीपदार्थ अधिनियम, १८८४ (५) व ९ (ब) अन्वये गुन्हा दाखल करून घेतला असणे, सदर आगीची दुर्घटना घडली ते ठिकाण रेड झोनमध्ये समाविष्ट असणे, परंतु सदर महानगरपालिका क्षेत्रातील रेड झोनबाबत नागरीकांमध्ये संभ्रम असून नागरीकांकडे याची कोणतीही माहिती उपलब्ध

नसणे, त्यामुळे पिंपरी- चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील रेड झोन हद्दीबाबत नकाशे व माहिती तात्काळ प्रसिद्ध करणेबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांना दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये विशेष लक्ष घालून कार्यवाहीबाबत निर्देश दिलेले असणे, तसेच याबाबत निर्णय होणे गरजेचे असणे, अशा प्रकारच्या घातक रसायनाशी निगडित असलेल्या उद्योगांचा परवाना कोणत्या कारणांसाठी आहे त्या सर्व विभागांच्या परवानग्या आहेत का याची तपासणी होऊन कार्यवाही होणे आवश्यक असणे, सदर औद्योगिक परिसरातील उद्योग व्यवसायांची तात्काळ माहिती संकलित करण्याबाबत तसेच पिंपरी-चिंचवड औद्योगिक आस्थापनांचे अग्नी सुरक्षेच्या अनुषंगाने सर्वेक्षण सुरु करणे, औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कामगारांसाठी सुरक्षात्माक उपाययोजना करण्यात यावी व औद्योगिक सुरक्षेबाबत कायदेशीर अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया, आणि उपाययोजना."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. सचिन अहिर (२) श्री. भाई जगताप

श्री. देवेंद्र फडणवीस ,उप मुख्यमंत्री (गृह) यांनी चर्चेस अल्पकालीन चर्चेस उत्तर दिले.

(२)श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांनी म.वि.प.नियम ९७ अन्वये पुढील अल्पकालीन चर्चा उपस्थित केली व भाषण केले-

"महाराष्ट्रातील Primitive आदिवासी मानल्या गेलेल्या कातकरी जमात असून या जमातीच्या संरक्षणासाठी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक हितसंवर्धन करणे, राज्याची विशेष जबाबदारी असणे, भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारानुसार भारत सरकारने बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६, अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा, १९८९ नुसार सक्तीचे काम करून घेणे अपराध ठरविला असणे, परंतु इगतपुरी तालुक्यातील १५ हून जास्त कुटुंबे, लहान मुलाबाळांसह नेवासा तालुक्यात ऊसतोडीचे काम करण्यासाठी एका कंत्राटदाराने या कामगारांना नेले असणे, काहींना दीड तर काहींना दोन हजार अनामत रक्कम उचल देणे, महिनाभर त्यांच्याकडून विनामोबदला काम करून घेणे, मात्र ज्यावेळी या कुटुंबियांची उपासमार सुरू झाली तेव्हा इगतपुरीला परत जाण्यासाठी त्यांनी केलेले वाहन कंत्राटदार आणि त्याच्या साथीदारांनी अडवणे, त्याविरोधात आदिवासी आढावा समितीचे अध्यक्ष यांनी रात्री दूरध्वनीव्दारे नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे तक्रार करणे, मात्र केवळ अटकाव केल्याची कलम ३४१ व ३४२ प्रमाणे खबर दाखल होणे, वस्तूतः हा अत्याचार प्रतिबंध कायद्याखाली गुन्हा असणे, वेठबिगार कायद्याखाली गुन्हा असणे, त्याशिवाय बेकायदेशीर अटकाव असणे, परंतु, FIR दाखल केली म्हणून रात्रभर ते मजूर नेवासा पोलीस स्टेशन येथे

बसून असणे, पूर्ण तपास होऊन ॲट्रॉसिटी ॲक्ट आणि वेठबिगारी कलम लावण्याची मजूरांनी मागणी करणे, आरोपीला तात्काळ अटक करण्याची गरज असणे, पोलीस निरीक्षक यांनी आपल्या कामांमध्ये हलगर्जीपणा केल्याने त्यांच्यावरही कारवाई होण्याची गरज असणे, आणि योग्य ती FIR दाखल करण्याचे आदेश होणे आवश्यक असणे, नाशिक जिल्ह्यात ३९, अहमदनगर जिल्ह्यात १ इतके असे एकूण १२९ इतके वेठबिगार शोधून मुक्त केलेले असणे, त्यांना मुक्तीचे दाखले मिळालेले असणे, त्यांच्या मालकांवर गुन्हे दाखल झालेले असणे, वेठबिगार दक्षता समित्या जिल्हा आणि उपविभागीय स्तरावर कार्यरत नसणे, केंद्र सरकारच्या नियमानुसार जिल्हा-दंडाधिकारी यांच्याकडे १० लाख रुपयांचा संचित निधी असणे, त्यातून मुक्ती नंतर तात्काळ मुक्त केलेल्या वेठबिगार मजूराला २० हजार रुपये तात्काळ सहाय्य देणे असणे, पुनर्वसनासाठी रुपये एक लाख अर्थसहाय्य देणे असणे, बालक किंवा अपंग असल्यास दोन लाख रुपये देणे असणे, परंतु, केंद्र सरकारच्या नियमानुसार वरीलपैकी एकालाही तात्काळ सहाय्य मिळालेले नसणे, पुनर्वसनासाठी आर्थिक सहाय्य मिळालेले नसणे, घरासाठी जागा आणि घरे मिळालेली नसणे, पुनर्वसन झालेले नसणे, जिल्हा दंडाधिकारी ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक यांनी तसेच, अध्यक्ष, राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समिती, महाराष्ट्र शासन यांनी वारंवार प्रधान सचिव, कामगार, मदत व पुनर्वसन यांना पत्र दिलेली असणे, राज्यात एकूण कातकरींची संख्या २ लाख ९५ हजार ९२ इतकी असणे, यापैकी ठाणे ५४८४९, रायगड १३७६६३, नाशिक १३९७२, पालघर ६४४०१ इतकी असणे, त्यांना रेशन कार्ड, आधार कार्ड, जातीचे दाखले, मुलांना आश्रम शाळेत शिक्षण, रोजगाराचा अभाव असणे, त्यामुळे राज्यातील एकूण कातकरी जमाती करिता राज्य शासनाने सर्वंकष योजना जाहीर केली असणे, परंतु ती अजून अंमलात न येणे, यामुळे राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी, ऊसतोडीवर, विटभट्या, कोळसा भट्ट्यावर, दगड खाणीमध्ये, द्राक्ष बागामध्ये वेठ बिगारी आढळून येणे, पोलिसांनी कारवाईसाठी दिरंगाई करणे, यामुळे संविधानाने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकाराचा गंभीर भंग झालेला असणे, यामुळे मुक्त वेठबिगारांची होणारी उपासमार, कातकरी समाज अजून दारिद्र्यात ढकलला जाणे, यामुळे आदिवासी समाजात पसरलेला असंतोष, यामुळे निर्माण झालेली अशांतता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उपरोक्त अल्पकालीन चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) ॲड.निरंजन डावखरे (२) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता

(३) श्री. श्रीकांत भारतीय (४) डॉ. मनिषा कायंदे

श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री (गृह) यांनी अल्पकालीन चर्चेस उत्तर दिले.

**११.** महसूल मंत्र्यांनी सन २०२२ चे वि.स.विधेयक क्रमांक ३६- महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक यावरील संयुक्त समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले.

**विचार, खंडशः विचार व संमत करणे–**

(२) उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी, सन २०२२ चे वि.स.विधेयक क्रमांक ३६- महाराष्ट्र लोक आयुक्त विधेयक, २०२२ सभागृहाच्या अनुमतीने विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडला व भाषण केले.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला-

(१) श्री. भाई जगताप (२) श्री. सचिन अहिर

उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर विधेयक संमत झाले.

'मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत' या विषयावरील श्री. प्रवीण दरेकर, श्रीमती मनिषा कायंदे, सर्वश्री विक्रम काळे, सुरेश धस, प्रसाद लाड, विप्लव बाजोरिया, सतिश चव्हाण, रणजितसिंह मोहिते-पाटील, किशोर दराडे, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, किरण सरनाईक, अनिकेत तटकरे, ॲड. निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दटके, वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव- (चर्चा पुढे सुरु).

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(३) श्री. रामराव पाटील (४) श्री. प्रवीण दटके

(५) श्री. गोपिचंद पडळकर (भाषण पूर्ण )

(चर्चा अपूर्ण)

माननीय उप सभापतींनी, आज शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी मान्य केलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

माननीय उप सभापतींनी, गुरुवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ व आज शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ रोजी मान्य केलेल्या म.वि.प.नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे घोषित केले.

'मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत' या विषयावरील श्री. प्रवीण दरेकर, श्रीमती मनिषा कायंदे, सर्वश्री विक्रम काळे, सुरेश धस, प्रसाद लाड, विप्लव बाजोरिया, सतिश चव्हाण, रणजितसिंह मोहिते-पाटील, किशोर दराडे, अमोल मिटकरी, चंद्रशेखर बावनकुळे, किरण सरनाईक, अनिकेत तटकरे, ॲड. निरंजन डावखरे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री श्रीकांत भारतीय, रमेशदादा पाटील, रामदास आंबटकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दटके, वि.प.स. यांचा प्रस्ताव. चर्चा पूढे सुरू

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.

उपरोक्त प्रस्तावावरील चर्चेत पुढील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(६) श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेता (भाषण पूर्ण)

(चर्चा अपूर्ण)

श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी, राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांनी सरकारी कर्मचाऱ्यांच्या पेन्शनबाबतची घोषणा मुख्यमंत्री महोदयांच्या वतीने या सभागृहात केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे कर्मचारी समन्वय समिती व शिक्षकांच्या वतीने आभार मानले.

माननीय मुख्यमंत्र्यांनी याबाबत आपल्या भावना व्यक्त केल्या व भाषण केले.

## सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३

श्री. भाई जगताप, वि.प.स. यांनी, "सोलार इंडस्ट्रीज इंडिया लि. या कंपनीत झालेल्या स्फोटात १४ कामगारांचा झालेला मृत्यू," इ. बाबत मुद्दा उपस्थित केला.

नियम २८९ अन्वयेच्या सूचनेच्या वेळी आपले विचार मांडण्याची संधी देण्यात येईल, असे मा. उपसभापतींनी सांगितले.

**१.** (१) सहा तारांकित प्रश्न उत्तरित झाले.

(२) तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील बत्तीस प्रश्न वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** श्री. श्रीकांत भारतीय (समिती प्रमुख), वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद आश्वासन समितीचा २०७ वा अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(१) सर्वश्री शशिकांत शिंदे, एकनाथराव खडसे, श्री.विलास पोतनीस, श्री.सचिन अहिर, श्री. अंबादास दानवे, वि.प.स. यांनी, "नागपूर बाजारगांव येथील स्फोटक कंपनीत झालेल्या स्फोटात ९ कामगारांचा झालेला मृत्यू," या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिलेली आहे. हा विषय आजच्या कामकाजपत्रिकेत समाविष्ट नाही. तथापि, विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या सूचनेसंबंधी सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे, असे माननीय उपसभापतींनी सांगितले.

सर्वश्री. शशिकांत शिंदे, अंबादास दानवे, भाई जगताप, वि.प.स. यांनी उपरोक्त विषयी आपले मत मांडले.

उपरोक्त नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंदर्भात नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा घेतली जाईल, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "शिवडीमधील मुंबई महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ६ मधील शालेय विद्यार्थ्यांचा रेल्वे रुळ ओलांडताना सुरू असलेला जीवघेणा प्रवास," या विषयावर म.वि.प. नियम २८९ अन्वये दिलेल्या सूचनेसंदर्भात शासनाने निवेदन करावे, असे निदेश देऊन सदर सूचनेस अनुमती नाकारित असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, "एकच विषय वेगवेगळे सदस्य विविध मार्गांनी मांडत असणे," इ, बाबत कार्यपद्धतीविषयक मुद्दा उपस्थित केला.

सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ४४ मिनिटांनी स्थगित झाली.

स्थगितीनंतर सभागृहाची बैठक दुपारी १ वाजून ५४ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**३.** (१) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी पात्रतेच्या जाचक अटी शिथिल करणे," इ, बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

(२) श्री. सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "सातरस्ता, मुंबई येथील नळवाला चाळ इमारतीचे प्रवेशद्वार साने गुरूजी मार्ग या मुख्य रस्त्यावर उभारणे," इ, बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार गृहनिर्माण मंत्र्यांनी निवेदन केले.

(३) श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. यांनी, "नंदूरबार जिल्ह्यातील आरोग्य विभागातील विविध समस्या," इ, बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

(४) श्री. अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी, "सारथी, बार्टी, टार्टी व अण्णासाहेब पाटील मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर महाज्योतीला निधी मिळणे," इ, बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अुलक्षून माननीय उपसभापतींच्या निदेशानुसार इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, "श्रीवर्धन (जि. रायगड) तालुक्यातील गालसुरे आडी महाड खाडीवरील पुलाची पुनर्बांधणी करणे," इ, बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, "भिवंडी-वाडा रस्त्यावर सुरू असलेले आंदोलन," इ, बाबत मुद्दा उपस्थित केला.

सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांनी याबाबत खुलासा केला.

श्री. देवेंद्र फडणवीस, उप मुख्यमंत्री यांनी, "नाशिकमध्ये एका विवाहप्रसंगी माध्यमांवर झालेली टीका," इ, बाबत खुलासा केला.

(६) श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांनी, "कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, प्रादेशिक विभाग, नाशिक यांच्यावरील अतिरिक्त कार्यभार," इ, बाबत दिलेल्या नियम ९३ अन्वये सूचनेस अनुलक्षून माननीय उप सभापतींच्या निदेशानुसार पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांनी निवेदन केले.

काही प्रश्नोत्तरे झाली.

**मध्यंतरासाठी सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून ४० मिनिटांनी स्थगित झाली.**

**मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ३ वाजून २० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.**

(१) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी, "पनवेल व कर्जत भागातून जाणाऱ्या उच्च दाबाच्या वीज वाहिनी टॉवर्स प्रकल्पाचा मार्ग बदलणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स. यांचा औचित्याचा मुद्दा असून ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे तो मुद्दा पटलावर ठेवत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**४.** (१) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, "पटसंख्येअभावी राज्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे १५ हजार शाळा बंद करण्याचा शिक्षण विभागाने घेतलेला निर्णय, या निर्णयामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अतिरिक्त होण्याचा निर्माण झालेला धोका," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली व आपले मत व्यक्त केले.

श्री. प्रवीण दटके, वि.प.स. यांनी, "हलबा-हलबी समाजाच्या प्रश्नांचा विचार करून त्यांच्या मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद देणे," इ. बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(२) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, "समुद्रात खाडीमार्गे कचरा टाकल्यामुळे मासेमारी व्यवसाय धोक्यात येऊन पर्यावरणाची हानी होणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, "राज्यातील अनुदानित व अंशतः अनुदानित शाळा व वर्ग तुकड्यांवरील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कॅशलेस रोकड विरहित वैद्यकीय सुविधा लागू करणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

(४) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे व श्री. अभिजित वंजारी, वि.प.स. यांचे औचित्याचे मुद्दे असून ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे ते मुद्दे पटलावर ठेवत असल्याचे माननीय उपसभापतींनी सांगितले.

(५) श्री. सत्याजित तांबे, वि.प.स. यांनी, "राज्यातील पत्रकारांच्या विविध मागण्या" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

संसदीय कार्यमंत्र्यांनी, यासंदर्भात जानेवारी महिन्यात बैठक घेण्यात येईल, असे सांगितले.

(६) श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स. यांनी, "कलगी-तुरा समाज उन्नती मंडळ, मुंबई यांच्या मागण्यांच्या संदर्भात तातडीने कार्यवाही करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

**५.** (१) सर्वश्री किरण सरनाईक, जयंत आसगावकर, किशोर दराडे, अभिजित वंजारी, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"शासन निर्णय दिनांक १२ व १५ फेब्रुवारी, २०२१ व ६ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील बहुतांश अनुदानास पात्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदान मिळत असणे, त्यादरम्यान केवळ शाळेचे मूल्यांकन उशिरा झाल्यामुळे बहुतांश शाळा अनुदानापासून वंचित राहिलेल्या असणे, त्यांच्या सोबतच्या शाळा पात्र ठरल्यामुळे व

या शाळा किरकोळ त्रुट्यांमुळे मागे राहून अनुदानापासून वंचित राहिल्याने या कर्मचाऱ्यांमध्ये नकारात्मकतेची भावना निर्माण होणे, या शाळांनी त्यांची शिक्षण आयुक्त तथा शिक्षण संचालक स्तरावरील सर्व त्रुटी पूर्ततेची कार्यवाही केलेली असणे, मागील दहा ते पंधरा वर्षापासून विनावेतन काम करत असल्यामुळे यांना वेतन अनुदानाची नितांत आवश्यकता असणे,त्यामुळे हे प्रलंबित प्रस्ताव तात्काळ निकाली काढून या सर्व प्रलंबित राहिलेल्या विनाअनुदानित शाळांना अनुदानास पात्र घोषित करून या सर्व शाळांना अनुदान देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले.

"राज्यासह देशात घरोघरी देवांच्या मूर्तीचे पूजन केले जात असून विधीवत त्याचे विसर्जन जलाशयात केले असणे, सार्वजनिक स्तरावर होणारे सणांचे साजरीकरण हे जन समुदायात नवचैतन्य देणारे असणे, रायगड जिल्हयातील पेण, हमरापूर हे गणेश मूर्तींचे माहेरघर समजले जात असणे, महाराष्ट्रात कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह देश विदेशात या मूर्तींची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असणे, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्तींमध्ये प्रदूषणकारक घटक कमी करण्याकरीता मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करून प्राथमिक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, राज्य शासनाकडून जाणीवपूर्वक उत्सवाच्या अगोदर पी.ओ.पी. मूर्तीकारांनी तयार केलेल्या मूर्ती विक्रीवर बंदी घालण्यात येणे, यामुळे मूर्तीकारांना मोठया प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागणे, यामुळे पी.ओ.पी. मूर्तीकारांमध्ये मूर्ती बनविण्याबाबत संभ्रम निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

शालेय शिक्षण मंत्र्यांनी, मुख्यमंत्री यांच्याकरिता निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(३) सर्वश्री. प्रवीण दरेकर, निरंजन डावखरे, प्रसाद लाड, अंबादास दानवे, रमेश पाटील, सचिन अहिर, वि.प.स. यांची लक्षवेधी सूचना.

श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"सोलापूर जिल्ह्यातील शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अडीच कोटींचे ग्रंथ दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी पुरविण्यात येणे, यामध्ये ग्रंथालय संचालक यांनी शासन निर्णय असताना सुध्दा स्वतः परिपत्रक काढून मनमानी करत अडीच कोटींची खरेदी केवळ ३ निविदा मागवून आपल्या मर्जीतल्या विक्रेत्याला पुरवठा आदेश देऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला असणे, ग्रंथालय संचालक यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी परिपत्रक काढून राज्यातील शासकीय ग्रंथालयांना नावीन्यपूर्ण योजनेतून कोणताही निधी घेता येणार नाही असे स्पष्ट नमूद केले असणे तसेच नियोजन शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ मध्ये स्पष्ट नमूद असूनही परिपत्रक काढण्यात येणे, त्याचबरोबर दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी दुसरे परिपत्रक काढून दिनांक १ एप्रिल, २०२३ पर्यंत वरील दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या परिपत्रक लागू होणार नाही असे त्यांनी नमूद केले असणे, दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच ३ लाखांवरील खरेदी ई-टेंडरद्वारे करावी असे स्पष्ट नमूद असूनही संचालकांनी सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांना मौखिक सूचना देऊन ३ निविदा घेवून रुपये अडीच कोटींची खरेदी केलेली असणे, दिनांक १९ जानेवारी, २०१६ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयामध्ये खरेदी समिती द्वारे खरेदी करावी असे स्पष्ट असूनही त्यांनी तसे केले नसणे, ग्रंथालय संचालक यांनी शासन निर्णयातील अटीची पूर्तता न करता केवळ आपल्या मनमानी कारभार व मोठया प्रमाणात केलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व ग्रंथालय संचालक यांना सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांच्यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया"

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(४) श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्र्यांचे लक्ष वेधले.

"कृत्रिम बुध्दिमत्ता अर्थात AI (Artificial Intelligence) ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनत असून भविष्यात जागतिक स्तरावर त्याची व्याप्ती अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता निर्माण होणे, AI च्या वेगवान प्रवाहात आपल्या राज्याला सामावून घेण्याकरिता Strong Social and Economic Structure तयार करण्याची आवश्यकता, AI चे तंत्रज्ञान आत्मसात करताना रोजगार निर्मितीपासून ते रोजगार सुरक्षितता तसेच शिक्षणाच्या गुणवत्तेपासून ते नैतिक व जबाबदार तंत्रज्ञान वापरणाऱ्यांपर्यंत सर्वच बाबींचा सखोल विचार करण्याची आवश्यकता, आपल्या राज्याला या क्षेत्रात सक्षम व अग्रेसर बनविण्याची एक सुवर्णसंधी निर्माण झालेली असणे, या संधीचा आपण फायदा न घेतल्यास AI च्या प्रभावाने

भविष्यात प्रभावित होणाऱ्या रोजगाराच्या संधीपासून आपल्या राज्यातील युवक वंचित राहण्याची शक्यता तसेच AI च्या प्रभावाने भविष्यात निर्माण होणारे संभाव्य धोके व गरज लक्षात घेता शासनाने या प्रकरणी कौशल्य विकास विभागामार्फत या क्षेत्रातील तज्ञ व तंत्रज्ञानाशी निगडित बाह्य गुणवत्तेच्या (External Talent) सहभागाने AI शी निगडित अभ्यासक्रमाची निर्मिती करून तो तातडीने अंमलात आणण्याची आवश्यकता, सद्यःस्थितीत व भविष्यात या क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना राज्यात आकर्षित करण्यासाठी, प्रोत्साहित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, एकंदरीत राज्याच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, उद्योग अशा विविध क्षेत्रांवर प्रभाव पाडणाऱ्या AI बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही याबाबतची शासनाची नेमकी भूमिका."

संसदीय कार्य मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(७) प्रा. राम शिंदे वि.प.स. यांनी, "अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर करणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(८) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी, "तुळजापूरच्या श्री तुळजाभवानी देवीचा एक किलो वजनाचा प्राचीन सोन्याचा मुकुट गायब होणे, या प्रकरणी तातडीने संबंधितांवर कारवाई करणे," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

यासंदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी गुन्हा दाखल करावा व त्याची दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(९) श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी, "प्रतिनिधींना अपमानास्पद वागणूक देणाऱ्या तुळजापूर प्रशासन व विश्वस्त यांची चौकशी करणे", "मुंबई आणि मिरा-भाईंदर येथे असलेल्या शत्रू संपत्तींवर भूमाफियांनी कब्जा केल्यामुळे त्यांच्याविरोधात कारवाई करणे", तसेच "राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांचे विविध मागण्यांसाठी सुरू असलेले आंदोलन, ," इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केले.

(३) श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स. यांनी, "कुळगाव-बदलापूर नगरपरिषदेच्या रहिवाशांनाही मालमत्ता करासंदर्भात अभय योजना लागू करणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(४) श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स. यांनी, "डॉ. संतुजी लाड आर्थिक विकास महामंडळाची निर्मिती करणे," इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

शासनाने दखल घ्यावी, असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी, “शासन दरबारी दखल न घेतल्यामुळे राज्य कर विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांनी सुरू केलेले आंदोलन” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(६) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, “शासनाने किनारपट्टीवरील जिल्ह्यांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(७) श्री. रमेश पाटील, वि.प.स. यांनी, “पालघर जिल्ह्यातील अर्नाळा येथील मच्छीमारांच्या समस्या,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(८) डॉ. मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी, “शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आंतर्वासिता कालावधीमध्ये मिळणाऱ्या विद्यावेतनात वाढ करणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(९) श्री. सत्यजित तांबे, वि.प.स. यांनी, “राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांच्या समस्या सोडविण्यासाठी तातडीने बैठक घेणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१०) श्री. गोपीचंद पडाळकर, वि.प.स. यांनी, “विधि व न्याय विभागातील धर्मादाय आयुक्त कार्यालयातील रिक्त पदे तातडीने भरणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(११) श्री. किरण सरनाईक, वि.प.स. यांनी, “राज्यातील ग्रामीण भागात विद्यार्थ्यांसाठी पुरेशा बसेस उपलब्ध करून देणे आणि शाळेच्या वेळापत्रकानुसार त्यांच्या वेळापत्रकांमध्ये बदल करणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१२) श्री. प्रवीण दटके. वि.प.स. यांनी, “नागपूर महानगरपालिकेतील ग्राहकांच्या थकीत पाणी, मालमत्ता कर देयक व दुकानांच्या थकीत भाड्याकरिता तात्काळ ॲमनेस्टी योजना लागू करणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

(१३) श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांनी, “सोलापूर महापालिका क्षेत्रातील साखर पेठ परिसरातील नागरिकांना वारंवार नोटीस देणे, याबाबत नागरिकांच्या अनेक तक्रारी असून त्याकडे सरकारने तातडीने लक्ष देणे,” इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

यासंदर्भात अधिवेशन संपण्यापूर्वी सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई केली जाईल, असे ग्राम विकास मंत्र्यांनी सांगितले.

## मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३

(१) श्री प्रवीण दटके, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले –

"नागपूर महानगरपालिकेंतर्गत, "Remediation of Landfill site through Biomining of Legacy Waste Disposal of Excavated Materials and Reclamation of Land at Bhandewadi Site, Nagpur" या कामाचे टेंडर दिनांक २२ जून, २०२३ रोजी जाहीर झाले असणे, तद्नंतर यावर दिनांक २८ जून, २०२३ रोजी प्री-बीड मीटिंग झाली असणे, या विशिष्ट टेंडर प्रक्रियेत अतिशय गंभीर स्वरूपाचे गैरव्यवहार सुरू असल्याची तक्रार आयुक्त, नागपूर महानगरपालिका यांच्याकडे अनेक संस्थांनी केली असणे, विशिष्ट कंपनीस मदत मिळावी म्हणून सीव्हीसी नियमबाह्य, इतर समान टेंडर प्रक्रियेबाह्य जाऊन अतिशय प्रतिबंधात्मक अशा अटी शर्ती ठेवणे, प्री बीड प्रक्रियेत इतर कंपनीच्या प्रश्नांना काहीच उत्तर न देता परस्पर प्री बीड प्रक्रिया समाप्त करणे असे प्रकार निदर्शनास आल्याची लेखी तक्रार लोकप्रतिनिधींनी केली असणे, तक्रारीच्या अनुषंगाने कोणतीच कार्यवाही न करता संपूर्ण प्रकाराकडे प्रशासनाने दुर्लक्ष केले असणे, सीव्हीसी नियमांना डावलून होत असलेल्या निविदा प्रक्रिया तात्काळ स्थगित करणेकामी शासनाने निर्देश देण्याची आवश्यकता, महानगरपालिका प्रशासनामार्फत जनतेच्या पैशाचा गैरव्यवहार थांबवून दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

उद्योग मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(२) श्री अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले -

"शिवनी (जि.अकोला) येथे सन १९४३ मध्ये ब्रिटीश शासनाच्या काळात विमानतळाची उभारणी करण्यात येणे, सदर विमानतळाच्या विस्तारीकरणासाठी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये मा.जिल्हाधिकारी, अकोला यांना २२.२४ हेक्टर जमिनीची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करणे व त्याप्रमाणे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मालकीची एकूण ६०.६८ हेक्टर जमीन संपादित करण्यात येणे, त्याकरिता जवळपास रुपये १०० कोटी निधीची आवश्यकता असणे, त्यासंदर्भात मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ७ फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत अकोला (शिवनी) विमानतळाच्या विकास व विस्तारीकरणाबाबत व्यवहार्यताबाबतचा अभ्यास करून त्याबाबतचा अहवाल करण्याचे सुचविणे, अकोला शहरापासून लगतच शेगाव

तीर्थक्षेत्र, कारंजा येथील श्री गुरु मंदिर तीर्थक्षेत्र, काटोल, बुलढाणा येथे श्री संत गुलाबबाबा तीर्थक्षेत्र तसेच नरनाळा अभयारण्यासारखे पर्यटन स्थळे असणे, डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ असणे, अकोला व खामगाव येथील एमआयडीसीमध्ये मोठया प्रमाणात उद्योग असून औद्योगिकरणाची वाढ करण्याचे व त्याचबरोबर बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने अकोला विमानतळाचे विस्तारीकरण करण्याची नितांत आवश्यकता व त्याबाबत स्थानिक नागरीक व उद्योजकांकडून होत असलेली मागणी, सबब, विमानतळाची गरज लक्षात घेता याबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

राज्य उत्पादन शुल्क (माननीय मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

आजच्या कामकाजपत्रिकेतील तिसऱ्या क्रमांकाची अर्धा तास चर्चा माननीय विरोधी पक्षनेते श्री.अंबादास दानवे यांची असून ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे चौथ्या क्रमांकावर दर्शविण्यात आलेली अर्धा तास चर्चा घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स यांनी, "नवी मुंबई-सायन-पनवेल मार्गावरील वाशी गाव येथे बस थांब्याचे शेड नसल्याबाबत" या विषयावरील सर्वश्री रमेश पाटील, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड निरंजन डावखरे, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स. यांचा दिनांक १८ जुलै,२०२३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ६ मधील अतारांकित प्रश्न क्रमांक १७४२७ ला दिलेल्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या बाबींवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले.

उद्योग (माननीय मुख्यमंत्री यांचेकरिता) मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.

(४) श्री.रामदास आंबटकर, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले –

"विदर्भ ॲग्रो सोल्युशन (जि.वर्धा) यांचेमार्फत शेतकऱ्यांसोबत हळद लागवडीकरिता करार करण्यात येणे, सदर शेतकऱ्यांनी उत्पादन केलेली हळद विदर्भ ॲग्रो सोल्युशनला विकली असता त्यांचे धनादेश काही शेतकऱ्यांना तीन महिन्यानंतर देण्यात आले असणे, सदर धनादेश न वटल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण होणे, सदर शेतकरी विदर्भ ॲग्रो सोल्युशनच्या कार्यालयात गेले असता सदर कार्यालय बंद असणे, संबंधित ॲग्रो सोल्युशन संचालकांचाही फोन बंद असणे, त्यामुळे विदर्भ ॲग्रो सोल्युशनकडे शेतकऱ्यांची लाखो रुपयांची थकबाकी असणे, सदर थकबाकी मिळणेसाठी वारंवार विदर्भ ॲग्रो सोल्युशनच्या कार्यालयात जाऊनही कोणतेही उत्तर

न मिळणे, सहा महिने उलटूनही हळद विक्री केलेले पैसे न मिळाल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागणे, संबंधित संचालकांवर कोणतीही कार्यवाही न होणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

पणन मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

(५) श्रीमती उमा खापरे, वि.प.स. यांनी पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित केली व भाषण केले -

"राज्यात गंगा स्नानाचे महत्व प्राप्त असलेल्या आणि लाखोंची तहान भागविणारी इंद्रायणी नदी (ता.मावळ, जि.पुणे) तिच्या उगम स्थानातूनच जलप्रदूषित झालेली असणे, औद्योगिक आणि नागरी भागातील मैला आणि रसायन मिश्रित सांडपाण्यामुळे नदीच्या पावित्र्यासह लाखो जलचर आणि नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असणे, वारंगवाडी लगतच्या इंद्रायणी-आंद्रा नदी संगमापासून पुढे नदीकाठच्या गावाची संख्या वाढत असल्याने इंद्रायणी नदीचे स्वच्छ पाणी प्रदूषित होणे, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळासह स्थानिक स्वराज्य संस्था आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या दुर्लक्षामुळे इंद्रायणी नदी प्रदूषित होणे, पुणे महानगरपालिका व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका परिसरात व पीएमआरडीए क्षेत्रातील हॉटेलमधील टाकाऊ पदार्थांच्या ओल्या कचऱ्यापासून गॅस निर्मिती करणाऱ्या कंपनीचे विनाप्रक्रिया सांडपाणी थेट ओढ्यात सोडल्याने ते पाणी नदीला येऊन मिळत असल्यामुळे जलप्रदूषण होणे, इंद्रायणी नदीच्या काठावर ठिकठिकाणी बंधारे बांधून ग्रामपंचायतीने आपापल्या गावांच्या पाणी योजना केल्या असून, त्यात कामशेत पासून नाणे, नवीन, उकसान, नानोली, साई, पारवाडी, घोणशेत, कचरेवाडी, वाउंड, कान्हे, नायगाव, जांभूळ, साते, सांगवी, वारंगवाडी, कातवी, आंबी इत्यादी गावांचा समावेश असणे, इंद्रायणी नदी पुढे पिंपरी चिंचवड मार्गे देहू आळंदी या परिसरातून पुढे जात असताना औद्योगिक क्षेत्रातून येणारे रसायनमिश्रित पाणी आणि मोठ्या प्रमाणात घरगुती मैला मिश्रित सांडपाणी हे या नदीत मिसळत असल्याने या नदीला प्रदूषणमुक्त करण्याची मागणी पर्यावरणस्नेही बरोबरच सर्वसामान्य जनतेतूनही होत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

शालेय शिक्षण, मराठी भाषा मंत्र्यांनी चर्चेस उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

अर्धा तास चर्चा संपली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून १७ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२-०० वाजता माननीय तालिका सभापती श्री. नरेंद्र दराडे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२-०० वाजता स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची बैठक दुपारी १२ वाजून ३० मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**१.** (क) (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील चव्वेचाळीस प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

**२.** श्री. महादेव जानकर, वि.प.स. यांनी, "श्री तुळजाभवानी देवीचा सोन्याचा मुकूट गायब असणे" इ. बाबत औचित्याचा मुद्दा उपस्थित केला.

या संदर्भात शासनाने दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

या संदर्भात तात्काळ आदेश देण्यात येतील आणि तक्रार दाखल करण्यात येईल असे उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी सांगितले.

**१.** (ख) सचिव -२ (कार्यभार) यांनी, अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**३.** गृहनिर्माण मंत्र्यांनी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा प्रशासन अहवाल सभागृहासमोर ठेवला.

**४.** (१) श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांनी, "लाड-पागे समितीच्या शिफारशीच्या तरतुदी शिथिल करून सफाई कर्मचाऱ्यांना कामावर घेणे" या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. सदर सूचना दालनात नाकारली असून सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
हा विषय गंभीर असल्यामुळे याबाबत शासनाने निवेदन करावे असे माननीय
उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी, “राज्यातील शासकीय, निमशासकीय कर्मचारी तसेच शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी यांची कंत्राटी पध्दतीने केलेली भरती रद्द करणे” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
शासनाने या संदर्भात निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, “महानिर्मितीच्या पद भरतीत झालेली अनियमितता” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. सदर सूचना दालनात नाकारली असून सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
याबाबत शासनाने निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, “प्रजा फाऊंडेशन व टाटा इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार मुंबई शहराच्या तुलनेत उपनगरांना कमी निधी मिळत असणे.” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. सदर सूचना दालनात नाकारली असून सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
सदर सूचनेस अनुमती नाकारण्यात आली असून शासनाने निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, “ठाण्यात प्रिया सिंग नामक तरुणीला कारखाली चिरडण्याचा केलेला प्रयत्न.” या विषयाबाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली आहे. सदर सूचना दालनात नाकारली असली तरी विषय महत्त्वाचा असल्यामुळे विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले म्हणणे मांडले.
श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी उपरोक्त सूचने समर्थनार्थ आपले म्हणणे मांडले.
शासनाने लवकरात लवकर निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांनी, “राज्यात अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे साडेचार लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे झालेले नुकसान” इ.बाबत उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

**आणि**

श्री.प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांनी, “अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्याची व राज्य सुजलाम सुफलाम करण्याची शासनाची भूमिका” या विषयावर उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा **– चर्चा पुढे सुरू –**

उपरोक्त म.वि.प. नियम ९७ अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या दोन्ही अल्पकालीन सूचना एकत्रित करून त्यावर चर्चा घेण्यात आली असून आता मंत्री महोदयांचे उत्तर होईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त दोन्ही अल्पकालीन सूचनेवरील एकत्रित चर्चेस कृषी मंत्र्यांनी उत्तर दिले.
काही प्रश्नोत्तरे झाली.
उपरोक्त अल्पकालीन चर्चा संपली असल्याचे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

(१) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, “मुंबई महानगरपालिकेच्या केईएम, नायर व सायन हॉस्पिटलमधील अपघात विभागातील डॉक्टरांनी बेमुदत संप सुरू केलेला असणे” इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

शासनाने याबाबत दखल घ्यावी असे माननीय तालिका सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी ३ वाजून ५ मिनिटांनी स्थगित झाली.
मध्यंतरानंतर सभागृहाची बैठक दुपारी ४-०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**५.** (क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे :-

(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ – महाराष्ट्र खाजगी विद्यापीठे (स्थापना व विनियमन) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.

(१) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (२) श्री.अभिजीत वंजारी

(३) श्री.कपिल पाटील (४) श्री.अरुण लाड

(५) श्री.अमोल मिटकरी (६) श्री.महादेव जानकर

विधेयकावरील चर्चेस उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी, "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ - जी.एच. रायसोनी आंतरराष्ट्रीय कौशल्य तंत्र विद्यापीठ, पुणे, विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्षनेते व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

**उपरोक्त विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला.**

(१) श्री.सचिन अहिर (२) श्री.अरुण लाड

(३) डॉ.मनिषा कायंदे (४) श्री.एकनाथराव खडसे

(५) श्री.प्रवीण दरेकर (६) श्री.कपिल पाटील

(७) श्री.धिरज लिंगाडे (८) श्री.अमोल मिटकरी

(९) श्री.अनिकेत तटकरे (१०) श्री.अभिजीत वंजारी

(११) श्री.राजेश राठोड (१२) श्री.गोपिचंद पडळकर

(१३) श्री.प्रसाद लाड

विधेयकावरील चर्चेस कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५७ - जी.एच. रायसोनी कौशल्य तंत्र विद्यापीठ, नागपूर, विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(४) क्रीडा मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ सभागृहाच्या अनुमतीने मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रस्ताव :-

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी, "सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ७५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे." इ.बाबत प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते (२) श्री.सचिन अहिर (भाषण अपूर्ण)

चर्चा अपूर्ण

आता विधेयकावरील चर्चा प्रलंबित ठेऊन लक्षवेधी सूचनेवरील चर्चा घेण्यात असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**६.** (१) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स. यांनी पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधले –

"श्री शनिशिंगणापूर जिल्हा अहमदनगर या राज्यस्तरीय तीर्थ व पर्यटन क्षेत्राकरिता सध्या असलेल्या विश्वस्त मंडळाद्वारे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता करण्यात आली असणे, देवस्थानातील कर्मचारी भरतीमध्ये कुठलीही जाहिरात न देता बोगस कर्मचारी भरती करण्यात आली असणे, कर्मचाऱ्यांकरिता बायोमेट्रिक हजेरी पद्धत व दैनंदिन कार्याचे रजिस्टर न ठेवता अनेक कर्मचाऱ्यांना घर बसल्या वेतन देण्यात येत असणे, दर्शनाकरिता बोगसरित्या पावत्या छपाई करून कोट्यवधीचा भ्रष्टाचार झालेला असणे, अनेक कर्मचारी खाजगी कंपन्यांमध्ये नियमितरित्या कार्यरत असतानाही त्यांना संस्थानमध्ये कार्यरत दाखवून त्यांची नियमित नियुक्ती करण्यात आली असणे, श्री शनेश्वर देवस्थानमध्ये विश्वस्त व्यवस्था अधिनियम, २०१८ हा कायदा लागू करण्यात यावा असा ठराव दोन्ही सभागृहात मंजूर करण्यांत येऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसणे, श्री शनिशिंगणापूर देवस्थानला प्राप्त होणारी कोट्यवधीची देणगी परस्पर खाजगी संस्थेकडे वळती करण्यात आली असणे, राज्य शासन व धर्मदाय आयुक्त यांच्या कोणत्याही आदेशाला न जुमानता संस्थानाचा कारभार मनमानी पद्धतीने चालत असल्याने याची चौकशी करून विश्वस्त मंडळ बरखास्त करणे व प्रशासकाची नेमणूक करण्याबाबत अनेकदा तक्रारी करूनही दखल घेतली नसल्याने स्थानिक भाविकांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला असणे, शासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन करावयाची आवश्यक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी निवेदन केले.
काही प्रश्नोत्तरे झाली.

**७.** संसदीय कार्यमंत्र्यांनी, मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ ते बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजीच्या विधानपरिषद कामकाजाचे कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर केले व सदर प्रतिवृत्त संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ – महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ वरील चर्चा – चर्चा पुढे सुरू**

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

श्री. सचिन अहिर (भाषण पूर्ण)

चर्चा अपूर्ण

म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्तावावरील चर्चेला मुख्यमंत्री उत्तर देतील असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सर्वश्री प्रवीण दरेकर व इतर वि.प.स. यांचा, "मराठा समाजाला आरक्षण मिळण्याबाबत" इ.बाबत म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू

प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.
उक्त प्रस्तावावरील चर्चेस मुख्यमंत्र्यांनी उत्तर दिले.
सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक सायंकाळी ७ वाजून ४१ मिनिटांनी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक सायंकाळी ७ वाजून ५१ मिनिटांनी पुन्हा सुरू झाली.

**(क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५३ - महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ (सुधारणा) विधेयक, २०२३ वरील चर्चा – चर्चा पुढे सुरू**

उपरोक्त विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा प्रस्ताव या दोन्ही प्रस्तावांवरील एकत्रित चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(३) डॉ.मनिषा कायंदे
(४) श्री.अमोल मिटकरी
(५) श्री.अनिकेत तटकरे
(६) श्री.प्रवीण दरेकर
(७) श्री.सुरेश धस
(८) श्री.एकनाथराव खडसे
(९) श्री.सुनील शिंदे
(१०) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे
(११) श्री.राजेश राठोड
(१२) श्री.भाई जगताप
(१३) श्री.किरण सरनाईक
(१४) श्री. गोपिचंद पडळकर
(१५) श्री.नरेंद्र दराडे

विधेयकावरील चर्चेस क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांनी उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

८. आज मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी म.वि.प. नियम १०१-अ अन्वये प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य करण्यात आलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याचे माननीय माननीय उप सभापतींनी सांगितले.

९. आज मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ रोजी प्राप्त झालेल्या औचित्यांच्या मुद्यांपैकी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवत असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री.रमेशदादा पाटील, वि.प.स. यांनी, "अनुसूचित जमातीच्या कोळी महादेव, कोळी मल्हार, कोळी टोकरे यांना घटनेप्रमाणे आरक्षण दिलेले असताना देखील तहसीलदार व प्रांत त्यांना हेतूपुरस्सर जात प्रमाणपत्र/जात पडताळणी प्रमाणपत्र उपलब्ध करून देत नसणे" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

(३) श्री.अमोल मिटकरी, वि.प.स. यांनी, "अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात पारस येथील विस्तारित सौर ऊर्जा प्रकल्पाला स्थगिती देऊन त्याऐवजी औष्णिक विद्युत प्रकल्प उभारण्यासंबंधी" इ.बाबत माहितीचा मुद्दा उपस्थित केला.

## बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३

(क) डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम २६० अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले -

"मागील अनेक दशकांपासून विदर्भ विकासाकरिता अनेक प्रयत्न करूनही विदर्भात शेती, उद्योग, रोजगार, सिंचन या क्षेत्रात प्रगती व विकास न होणे, विदर्भात असंख्य औष्णिक वीज प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होणे, वाढते तापमान व पर्यावरण बदलामुळे उन्हाळ्यात ४५ डिग्री पेक्षा जास्त तापमानाची दिवसा वाढ होणे, रोज कमवून हातावर पोट असणाऱ्या असंख्य लोकांचे उष्णतेमुळे मृत्यू होणे, उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे कामगारांचे तसेच उन्हातान्हात काम करणाऱ्या व श्रम गाळणाऱ्या लोकांचे हाल होणे, वन कायद्याच्या अडचणींमुळे वैनगंगा-पैनगंगा नदी- जोड प्रकल्प व शेतकऱ्यांचे सिंचन प्रकल्प पूर्ण न होणे, परिणामी आर्थिक प्रगतीवर विपरीत परिणाम होणे, विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात जंगल व वनक्षेत्र असल्याने व कायद्याची कठोर व सक्तीने अंमलबजावणी झाल्याने रानडुक्कर, रोहीहरिण यांसारख्या वन्य प्राण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणे, या वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होणे, नुकसानभरपाईची रक्कम प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अपुरी असणे, सातत्याने वाघांची संख्या वाढल्याने वाघांचा व बिबट्यांचा गावा गावात

प्रवेश वाढणे, गायी व शेळ्यांच्या शिकारीत वाढ होणे, वनक्षेत्रात पर्यटनाला चालना देण्यासाठी व या भागाच्या आर्थिक प्रगतीसाठी शासनाला ठोस कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता, कोर व बफर गावांच्या संख्येत वाढ होत असणे, अभयारण्य जाहीर होत असल्याने वनक्षेत्रात रहाणाऱ्या लोकांच्या हक्काचे संरक्षण न होणे, मनुष्य व वन्यजीवांच्या संघर्षात वाढ होणे, वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान वाचविण्यासाठी शासनाने चॅनलींग, फेन्सींगची योजना व पुरेसा निधी देऊन शेतकऱ्यांना मदत करण्याची व अनुदान देण्याची तसेच प्रभावी योजना राबविण्याची आवश्यकता, विदर्भात नागपूर बाहेरील क्षेत्रात कापूस व सोयाबीन उत्पादन प्रक्रिया तसेच सूतगिरणी उद्योग उभारण्याची आवश्यकता, मेट्रो रेल्वे तसेच एयरपोर्टची सुविधा नागपूर खेरीज अन्य जिल्ह्यात मध्यवर्ती ठिकाणी होण्याची आवश्यकता, सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी तापी खोरे व विदर्भ औद्योगिक विकास महामंडळ हे प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्याची आवश्यकता, वाढत्या बेरोजगारीमुळे गुन्हेगारीकडे व आत्महत्येच्या घटनेत होत असलेली वाढ, याबाबत शासनाने वनबाधित लोकांच्या कल्याणासाठी खनिज विकास निधी व मानव विकास मिशनच्या धर्तीवर किंवा डोंगरी विकास निधीच्या धर्तीवर विशेष निधी देऊन या भागाच्या नागरिकांचा रोजगार व दरडोई उत्पन्न वाढविण्याच्या योजना राबविण्याची नितांत आवश्यकता, राज्यातील व विशेषतः विदर्भातील तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राच्या विकासाकरिता पायाभूत सुविधांसह ठोस कार्यक्रम आखण्याची आवश्यकता, या सर्व स्थळांची प्रसिद्धी, जाहिरात, डॉक्युमेन्ट्री व वेगवेगळ्या महोत्सवाच्या माध्यमातून या भागातील सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राची वेगवेगळ्या चॅनल्सवर तसेच एअरपोर्ट व रेल्वेस्टेशन व हॉटेल्स येथे प्रसिद्धी करण्याची आवश्यकता, वनक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या कल्याणाकरिता व रोजगाराकरिता योजना राबविण्याची आवश्यकता, विदर्भात औद्योगिक प्रगती करण्याकरीता औद्योगिक क्षेत्र व दरडोई उत्पन्न कमी असलेल्या तालुक्यात व वन क्षेत्रात प्रदूषण विरहित उद्योगांबाबत धोरण आखण्याची आवश्यकता, विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरिता, शासनाने ठोस व कालबद्ध कार्यक्रम घोषित करण्याची आवश्यकता.”

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.महादेव जानकर (२) श्री.प्रवीण दरेकर (भाषण अपूर्ण)

चर्चा अपूर्ण

आता अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला सुरूवात होईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(ख) श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी म.वि.प. नियम २५९ अन्वये पुढील प्रस्ताव मांडला व भाषण केले -

"राज्याची ढासळलेली कायदा व सुव्यवस्था, मोठ्या शहरात संघटित गुन्हेगारीत झालेली वाढ, अपहरण, दरोडे, सायबर गुन्हे, घरफोड्या यासारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यात आलेले अपयश, अंमली पदार्थ, गुटखा व्यापार, जुगार, मटका या अवैध धंद्यात झालेली अपरिमित वाढ, रासायनिक व बंद कारखान्यांमध्ये अंमली पदार्थांचे मोठ्या प्रमाणात होत असलेले उत्पादन, त्याकडे झालेले दुर्लक्ष, ' अल्पवयीन मुले, मुली व महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये झालेली वाढ, विविध पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षकांकडून विनयभंगाच्या तक्रारी नोंदवून घेण्यास होत असलेली दिरंगाई, एका बाजूला जुन्या प्रकारचे गुन्हे आटोक्यात येत नसताना सायबर गुन्ह्यांमध्येही राज्याने बरीच आघाडी घेतली असणे, पोलीस दलांमध्ये कर्मचारी व अधिकारी यांच्या रिक्त पदांमुळे त्यांचेवर निर्माण झालेला ताण, पोलिसांवर हल्ले करण्याच्या घटनेत झालेली वाढ, राज्यात व केंद्रात सत्ता असतानाही केंद्र शासनाकडे प्रलंबित असलेला शक्ती कायदा मंजुरीच्या प्रतीक्षेत असणे, सरकार विरोधी भूमिका घेणाऱ्या पक्षांच्या कार्यकर्त्यांवर खोटे गुन्हे दाखल करणे, विविध शासकीय यंत्रणेचा होत असलेला गैरवापर, शिक्षण व्यवस्थेसाठी कोणताही निर्णय न घेता बीअर उद्योगाच्या माध्यमातून महसुलात वाढ होण्यासाठी तरुण व तरुणींना व्यसनाधीन करण्यासाठी समिती गठीत करण्याचा घेतलेला निर्णय, परराज्यातून राज्यात चोरट्या मार्गाने अवैधपणे होणारी दारूची वाहतूक, अन्न व औषधे प्रशासन विभागाकडून औषधी कंपन्यावर धाडी घालून कारवाई करण्याचा केलेला प्रकार, पनीर, दूध, मावा, मिठाई इत्यादी खाद्य पदार्थांमधील भेसळ रोखण्यास आलेले अपयश, सिंचनाच्या प्रलंबित योजना पूर्ण करून जलयुक्त शिवार योजना कमी पर्जन्यमान असलेल्या भागात प्राधान्याने राबविण्याची आवश्यकता, राज्यात विशेषतः विदर्भ, मराठवाड्यात रोजगार आणण्यात सकारात्मक पावले सरकारकडून उचलली जात नसणे, विदर्भासाठी मिहान प्रकल्प महत्त्वाचा असताना नव्याने उद्योगच न आल्याने मिहानचा उद्देश सफल होत नसणे, वैधानिक विकास मंडळांना मुदतवाढ देण्याचा निर्णय राज्याने घेतला असला तरी केंद्र सरकारकडे अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणे, परिणामी विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्रातील अनुशेष निर्मूलनाचे काम थांबलेले असणे, विदर्भ आणि मराठवाड्यासाठी गेल्या दीड वर्षात सरकारने केलेल्या घोषणांची अंमलबजावणी झालेली नसणे, या भागातील रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झाली असणे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावर उपाययोजना अभावी मोठ्या प्रमाणात झालेले अपघात, वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात झालेली वाढ व शेतीचे झालेले नुकसान, अत्यल्प मिळत असलेली मदत, ठाणे मुख्य वनपरिक्षेत्र कार्यालयात सुरू असलेला भ्रष्टाचार, धारावी पुनर्विकासात सरकारने बिल्डरधार्जिणी भूमिका घेतली असणे,

धारावी प्रकल्पाच्या नावावर होणारा टी.डी.आर. महाघोटाळा व दडपशाही, लोकप्रतिनिधी नसताना मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, नवी मुंबई व अमरावती महानगरपालिका प्रशासनाकडून अनेक धोरणात्मक निर्णय घेतले जात असून जनतेच्या पैशाची उधळपट्टी सुरू असणे, राज्यात विविध महानगरपालिकेत होत असलेले गैरव्यवहार व भ्रष्टाचार, महानगरपालिका हद्दीत विकासकांकडून करण्यात आलेले अवैध बांधकाम, मुंबई व राज्यात हवेच्या प्रदूषणाने सर्वोच्च पातळी गाठली असणे, मुंबईतील खुल्या जागा खाजगी संस्थांना देण्याच्या धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

प्रस्ताव प्रस्तुत झाला.
चर्चा अपूर्ण

श्री.प्रवीण दरेकर, वि.प.स. यांनी, "डॉ.नीलम गोऱ्हे, उप सभापती यांच्या बाबतीत करण्यात आलेले वक्तव्य" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते, श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

उक्त मुद्यासंदर्भात वने मंत्र्यांनी सविस्तर मत मांडले.

सदर प्रकरणी पुढील ८ दिवसांत संबंधितांकडून दिलगिरी व्यक्त करण्यासंदर्भात पत्र प्राप्त झाले नाही तर सन्माननीय सदस्य श्री.प्रवीण दरेकर यांना या विषयी हक्कभंग दाखल करण्याची परवानगी देण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी, "श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांच्याकडून माननीय मंत्रिमहोदयांचा उल्लेख यु-ट्यूब प्रसार माध्यमावर करण्यात येणे" इ.बाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी आपले मत व्यक्त केले.
उक्त मुद्यासंदर्भात वने मंत्र्यांनी देखील आपले मत व्यक्त केले.

डॉ.मनिषा कायंदे व इतर वि.प.स. यांनी, "विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरीता शासनाने ठोस व कालबध्द कार्यक्रम घोषित करण्याची आवश्यकता" इ.बाबत उपस्थित केलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - चर्चा पुढे सुरू

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

श्री.प्रवीण दरेकर (भाषण पूर्ण)

चर्चा अपूर्ण

सभागृहाची विशेष बैठक सकाळी ११ वाजून ४५ मिनिटांनी स्थगित झाली.

सभागृहाची नियमित बैठक दुपारी १२.०० वाजता माननीय उप सभापती डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली.

**१.** (क) (१) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील पाच तारांकित प्रश्नांची उत्तरे देण्यात आली.

(२) आजच्या दिवसाच्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील छप्पन्न प्रश्न हे वेळेअभावी अतारांकित झाले.

(ख) सचिव-२ (कार्यभार) यांनी, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवली.

**२.** (१) राज्य उत्पादन शुल्क (माननीय मुख्यमंत्री यांच्याकरिता) मंत्र्यांनी, महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांचे मा.राज्यपाल महोदयांना सादर केलेले सन २०१० चा १, सन २०१३ चे २, सन २०१४ चे ९, सन २०१५ चे ३, सन २०१९ चा १ आणि सन २०२० चा १ असे एकूण १७ विशेष अहवाल त्यावरील शासनाच्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनासह सभागृहासमोर ठेवले.

(२) महिला व बालविकास मंत्र्यांनी, (क) राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ६ (१) नुसार सन २०२३ – २०२४ च्या अर्थसंकल्पाच्या संदर्भात जमा व खर्चाच्या अर्धवार्षिक आढाव्याचे निष्कर्ष दर्शविणारे विवरणपत्र, (ख) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या भूमिकेवर कामगिरी लेखापरीक्षण अहवाल व तसेच (ग) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचे (१) सन २०२२-२०२३ या वर्षाचा विनियोजन लेखा अहवाल, (२) सन २०२२-२०२३ या वर्षाचा वित्तीय लेखा अहवाल खंड-एक व खंड-दोन सभागृहासमोर ठेवले.

(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा व महामंडळाची उपकंपनी प्रताप मिल, अमळनेर यांचा सन २०२०-२०२१ या वर्षाचा पंचावन्नावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवला.

(४) महिला व बाल विकास मंत्र्यांनी, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे यांचे सन २०१७-२०१८, सन २०१८-२०१९, सन २०२१-२०२२ व सन २०२२-२०२३ या वर्षांचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवले.

**३.** सचिव-२ (कार्यभार) यांनी, दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकाला राज्यपालांची अधिसंमती मिळालेल्या एका वि.स. विधेयकाचे नाव सभागृहास वाचून दाखविले.

**४.** आजच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्र.चार अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**५.** आजच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्र. पाच अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या लक्षवेधी सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**६.** आज प्राप्त झालेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनांपैकी मान्य झालेल्या सूचना सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**७.** आज प्राप्त झालेल्या औचित्याच्या मुद्यांपैकी मान्य करण्यात आलेले औचित्याचे मुद्दे सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेतील बाब क्र. पाच (ख) अंतर्गत दर्शविण्यात आलेल्या क्र. १ ते ७९ या लक्षवेधी सूचनांसंबंधीची निवेदने सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**८.** (क) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -

(१) पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० - महाराष्ट्र गोजातीय प्रजनन (विनियमन) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) श्री.एकनाथराव खडसे (२) डॉ.मनिषा कायंदे

(३) श्री.सचिन अहिर

विधेयकावरील चर्चेस पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय विकास मंत्र्यांनी उत्तर दिले.
विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

श्री.महादेव जानकर, वि.प.स. यांनी, दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत मुद्दा उपस्थित केला.

उपरोक्त मुद्यासंदर्भात सर्वश्री प्रवीण दरेकर, शशिकांत शिंदे, वि.प.स. यांनी आपले मत व्यक्त केले.

या संदर्भातील निर्णय अंतिम टप्प्यात असून आज या संदर्भात शासनाचे धोरण, निर्णय जाहीर करणार आहोत असे महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय विकास मंत्र्यांनी सांगितले.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५८ - महाराष्ट्र मराठी भाषा विद्यापीठ विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९ - महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

(४) उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६० - महाराष्ट्र विद्युत शुल्क (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (२) श्री.एकनाथराव खडसे

विधेयकावरील चर्चेस उप मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

(खंड २ ते ४ (दोन्ही सम्मिलित), खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

ज्याअर्थी, परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, कोणत्याही शिफारशीशिवाय हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

सभागृहाची बैठक दुपारी २ वाजून २६ मिनिटांनी, अर्ध्या तासासाठी स्थगित झाली.
सभागृहाची बैठक दुपारी ३.०० वाजता पुन्हा सुरू झाली.

**९.** कामगार मंत्र्यांनी, "सोलार इंडस्ट्रिज इंडिया लि.,गांव चाकडोह, बाजारगांव, अमरावती रोड, ता.काटोल, जि.नागपूर या कारखान्यात दिनांक १७ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ९.०० च्या सुमारास स्फोटाची घटलेली घटना" यासंबंधी सभागृहाच्या अनुमतीने म.वि.प. नियम ४७ अन्वये निवेदन केले.

**(ग) विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(२) सांस्कृतिक कार्य मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६२ - महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) (दुसरी सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला -

(१) ॲड.अनिल परब
(२) श्री.सुनील शिंदे
(३) श्री.सचिन अहिर
(४) ॲड.निरंजन डावखरे

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

विधानसभेने संमत केल्याप्रमाणे – विचार, खंडशः विचार व संमत करणे -

(२) पशुसंवर्धन मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५२ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

प्रश्न प्रस्तुत झाला.

विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांचा प्रस्ताव मांडण्यात आला नाही.

विधेयकावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.अभिजीत वंजारी (२) श्री.एकनाथराव खडसे

(३) श्री.शशिकांत शिंदे

विधेयकावरील चर्चेस महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.

विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.

खंडशः विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. यांनी, "जैन समाजाच्या न्याय्य हक्कासाठी व सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र आयोग निर्माण करण्याची आवश्यकता" इ.बाबत विशेष उल्लेखाची सूचना मांडली.

शासनाने याबाबत दखल घ्यावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**१०.** (१) श्री.कपिल पाटील, वि.प.स. यांनी म.वि.प. नियम २८९ अन्वये दिलेली सूचना दालनात नाकारली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(२) श्री. राजेश राठोड, वि.प.स. यांनी, "तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि देशातील अनेक राज्यामध्ये बंजारा समाज आदिवासी समाजामध्ये म्हणजे एसटी प्रवर्गात समावेश असल्याने महाराष्ट्र राज्यात सुद्धा बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमाती (ब) मध्ये करण्याची मागणी अनेक वेळा करुनही त्याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे" इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.राजेश राठोड, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.
हा विषय अत्यंत गंभीर असल्यामुळे शासनाने यावर निवेदन करावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(३) श्री.विलास पोतनीस, वि.प.स. यांनी, "जे.जे. रुग्णालयातील त्वचारोग विभागातील निवासी डॉक्टरांनी पुकारलेले सामूहिक रजा आंदोलन" इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर सूचना दालनात नाकारली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(४) श्री.सुनील शिंदे, वि.प.स. यांनी, "राज्यात हिमोफिलिया या दुर्मीळ आजारावरील औषधे उपलब्ध होत नसल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय" इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सदर सूचना दालनात नाकारली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

(५) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांनी, "मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत शासनाने सुस्पष्ट भूमिका व दिशा जाहीर करण्याबाबत होत असलेली मागणी" इ.बाबत म.वि.प. नियम २८९ अन्वये सूचना दिली असून सन्माननीय सदस्यांनी या संदर्भात थोडक्यात म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

उपरोक्त सूचनेसंदर्भात श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, वि.प.स. यांनी आपले म्हणणे मांडले.

सदर सूचनेस अनुमती नाकारली असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

श्री.अभिजीत वंजारी, वि.प.स. यांनी अंतिम आठवडा प्रस्तावरील आपले म्हणणे मांडावे असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**सर्वश्री अंबादास दानवे व इतर वि.प.स. यांनी, "राज्यातील ढासळलेली कायदा व सुव्यवस्था" इ.बाबत म.वि.प. नियम २५९ अन्वये उपस्थित केलेला अंतिम आठवडा प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू**

अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(१) श्री.अभिजीत वंजारी
(२) श्री.एकनाथराव खडसे
(३) ॲड.अनिल परब
(४) श्री.शशिकांत शिंदे (भाषण पूर्ण)

चर्चा अपूर्ण

अंतिम आठवडा प्रस्तावावर सर्व सन्माननीय सदस्यांनी भाषणे केलेली असून विदर्भाच्या प्रस्तावावरील भाषणाला सुरुवात करावी असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**डॉ.मनिषा कायंदे व इतर वि.प.स. यांनी, "विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरीता शासनाने ठोस व कालबद्ध कार्यक्रम घोषित करण्याची आवश्यकता" इ.बाबत म.वि.प. नियम २६० अन्वये उपस्थित केलेला प्रस्ताव – चर्चा पुढे सुरू**

प्रस्तावावरील चर्चेत खालील सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला –

(२) श्री.अमोल मिटकरी
(३) श्री.प्रवीण दटके
(४) ॲड.निलय नाईक
(५) श्री.सुधाकर अडबाले
(६) श्री.किरण सरनाईक
(७) श्री.अभिजीत वंजारी

उपरोक्त म.वि.प. नियम २५९ व म.वि.प. नियम २६० अन्वये या दोन्ही प्रस्तावावरील चर्चेस उप मुख्यमंत्री तथा गृह मंत्र्यांनी उत्तर दिले.

श्री.अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांनी उत्तरादाखल भाषण केले.

सभागृहाने उपरोक्त प्रस्तावांवर विचार केला असल्याचे माननीय उप सभापतींनी सांगितले.

**(ग) विधानसभेने संमत केल्यास – विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(१) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांनी, सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक ६१ - युनिव्हर्सल स्किलटेक विद्यापीठ, वसई विधेयक, २०२३ मांडले व सदर विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडला.

विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकून संमत झाला.
विधेयक खंडशः विचारात घेण्यात आले.
खंडश विचारानंतर उपरोक्त विधेयक संमत झाले.

आजच्या कामकाजपत्रिकेवरील अनुक्रमांक ९ वरील म.वि.प. नियम २६० अन्वये विरोधी पक्षाच्या प्रस्तावावरील चर्चा वेळेअभावी होणार नाही तसेच श्री. प्रवीण दरेकर, वि.प.स. व श्री. अंबादास दानवे, विरोधी पक्ष नेते यांच्या अर्धा-तास चर्चा सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

माननीय उप सभापतींनी, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ ते दिनांक २० डिसेंबर, २०२३ या सत्र कालावधीतील कामकाजाचा आढावा सदनासमोर ठेवला.

महाराष्ट्र विधानपरिषदेचे पुढील अधिवेशन सोमवार, दिनांक २६ फेब्रुवारी,२०२४ रोजी विधान भवन, मुंबई येथे घेण्यात येईल असे माननीय उप सभापतींनी सांगितले.

माननीय उप सभापतींनी, सत्र-समाप्तीसंबंधीचा माननीय राज्यपालांचा पुढील संदेश वाचून दाखविला -

"मी रमेश बैस, महाराष्ट्राचे राज्यपाल भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १७४, खंड (२) उपखंड (क) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून बुधवार दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी होणाऱ्या सभागृहाच्या बैठकीच्या समाप्तीबरोबरच महाराष्ट्र विधानपरिषदेचे अधिवेशन संस्थगित करीत आहे."

यानंतर राष्ट्रगीत म्हणण्यात आले.

विधानपरिषदेचे अधिवेशन रात्री ७ वाजून १४ मिनिटांनी संस्थगित झाले.

## बैठकींचे दिनांक व वेळ

| अ.क्र. | बैठकीचा दिनांक | बैठकीची वेळ | | एकूण वेळ | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | तास | मिनिटे |
| (१) | (२) | (३) | | (४) | |
| १ | गुरूवार, दिनांक ७ डिसेंबर, २०२३ | दुपारी १२.०० ते दुपारी १२-३१ | | ०० | - ३१ |
| २ | शुक्रवार, दिनांक ८ डिसेंबर, २०२३ | दुपारी १२.०० ते दुपारी ०१-२८ | | ०१ | - २८ |
| | | दुपारी ०१.३८ ते दुपारी ०३.४७ | | ०२ | - ०९ |
| ३ | सोमवार, दिनांक ११ डिसेंबर, २०२३ | दुपारी ०१.०० ते दुपारी ०२-४३ | | ०१ | - ४३ |
| | | दुपारी ०३.१५ ते सायं. ०७-०१ | | ०३ | - ४६ |
| ४ | मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.३० ते सकाळी ११-४९ | | ०१ | - १९ |
| | | दुपारी १२.०० ते दुपारी ०१-३७ | | ०१ | - ३७ |
| | | दुपारी ०२.१० ते सायं. ०७-१० | | ०५ | - ०० |
| ५ | बुधवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.३० ते सकाळी ११-४१ | | ०१ | - ११ |
| | | दुपारी १२.०० ते दुपारी ०१-०४ | | ०१ | - ०४ |
| | | दुपारी ०१.१४ ते दुपारी ०३-४३ | | ०२ | - २९ |
| | | दुपारी ०४.१५ ते सायं. ०६-३१ | | ०२ | - १६ |
| ६ | गुरूवार, दिनांक १४ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.१५ ते दुपारी १२.२६ | | ०२ | - ११ |
| | | दुपारी १२.४० ते दुपारी ०३-१४ | | ०२ | - ३४ |
| | | दुपारी ०४.०० ते रात्री ०९.३४ | | ०५ | - ३४ |
| ७ | शुक्रवार, दिनांक १५ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.१५ ते सकाळी १०.४१ | | ०० | - २६ |
| | | सकाळी ११.०० ते दुपारी १२.१२ | | ०१ | - १२ |
| | | दुपारी १२.२० ते दुपारी ०२.०८ | | ०१ | - ४८ |
| | | दुपारी ०२.४५ ते सायं. ०६.०३ | | ०३ | - १८ |
| ८ | सोमवार, दिनांक १८ डिसेंबर, २०२३ | दुपारी १२.०० ते दुपारी ०१.४४ | | ०१ | - ४४ |
| | | दुपारी ०१.५४ ते दुपारी ०२.४० | | ०० | - ४६ |
| | | दुपारी ०३.२० ते सायं. ०५.०६ | | ०१ | - ४६ |
| ९ | मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०२३ | सकाळी १०.१५ ते सकाळी ११.१७ | | ०१ | - ०२ |
| | | दुपारी १२.३० ते दुपारी ०३.०५ | | ०२ | - ३५ |
| | | दुपारी ०४.०० ते सायं. ०७.४१ | | ०३ | - ४१ |
| | | सायं. ०७.५१ ते रात्री ०८.४७ | | ०० | - ५६ |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| १० | बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ | सकाळी ०९.०० ते सकाळी ११.४५ | ०२ - ४५ |
| | | दुपारी १२.०० ते दुपारी ०२.२६ | ०२ - २६ |
| | | दुपारी ०३.०० ते रात्री ०७.१४ | ०४ - १४ |
| **एकूण : त्रेसष्ट तास एकतीस मिनिटे फक्त** | | | **६३ - ३१** |

## मत विभाजन

| दिनांक व प्रभारी सदस्य | प्रस्ताव/ सुधारणा | प्रस्तावाला/ सुधारणेला अनुकूल मत | प्रस्तावाला/ सुधारणेला प्रतिकूल मत | तटस्थ | प्रस्ताव/ सुधारणा संमत की असंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| -- | -- | निरंक | -- | -- | -- |

# विवरण क्रमांक - ६

## महाराष्ट्र विधानपरिषद नियमातील नियम ८(१) अन्वये, माननीय सभापतींनी नामनिर्देशत केलेली सभापती तालिका-

| अ.क्र. | सदस्यांचे नाव |
|---|---|
| १ | ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. |
| २ | श्री. अनिकेत तटकरे, वि.प.स. |
| ३ | श्री. धीरज लींगाडे, वि.प.स. |
| ४ | श्री. नरेंद्र दराडे,वि.प.स. |

# विवरण क्रमांक ७

## विविध विद्यापीठांवर सदस्यांची नामनियुक्ती

निरंक

# विवरण क्रमांक ८

## विधेयकावरील संयुक्त समितीवर सदस्यांची नामनियुक्ती / समिती नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव

निरंक

# विवरण क्रमांक ९

## विधेयकावरील संयुक्त समितीचा अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढीचा प्रस्ताव

निरंक

# विवरण क्रमांक १०

## विविध समित्यांच्या बैठका

| अ.क्र. | समितीचे नाव | बैठकीचा दिनांक | बैठकीत झालेले कामकाज |
|---|---|---|---|
| १) | विधानपरिषद कामकाज सल्लागार समिती | दिनांक २९ नोव्हेंबर, २०२३ | समितीने महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आगामी सन २०२३ च्या तृतीय (हिवााळी) अधिवेशनासंबंधात विचार-विनिमय करून गुरुवार दिनांक ७ डिसेंबर, २०२३ ते बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज घेण्याचे निश्चित केले. |
| | | दिनांक १९ डिसेंबर,२०२३ | समितीने सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनासंबंधात विचार-विनिमय करून मंगळवार दिनांक १९ डिसेंबर, २०२३ ते बुधवार, दिनांक २० डिसेंबर, २०२३ पर्यंतचे सभागृहाचे कामकाज निश्चित केले. |

# विवरण क्रमांक ११

## मत विभाजन

(म.वि.प.नियम ४१)

| दिनांक व प्रभारी सदस्य | प्रस्ताव/सुधारणा | प्रस्तावाला/ सुधारणेला अनुकुल मत | प्रस्तावाला/ सुधारणेला प्रतिकूल मत | तटस्थ | प्रस्ताव/ सुधारणा संमत की असंमत |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |

**निरंक**

# विवरण क्रमांक १२

## चर्चा समाप्तीचा प्रस्ताव

(म.वि.प.नियम ३८)

---

**निरंक**

---

# विवरण क्रमांक १३

## महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषदेच्या सन २०२३ मधील तृतीय (हिवाळी) अधिवेशनामध्ये विधानपरिषद विशेषाधिकार कक्षाकडे प्राप्त झालेल्या विशेषाधिकारभंगाच्या सूचनांचे विवरणपत्र.

| अ. क्र. | सूचना क्रमांक | सदस्यांचे नाव | विषय | सूचना सभागृहात मांडल्याचा दिनांक | सद्यस्थिती / निर्णय |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | **३१** | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स. दिनांक १४/१२/२०२३** | श्री. तानाजी सावंत, सार्वजनिक आरोग्य मंत्री महाराष्ट्र राज्य यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, "नंदुरबार जिल्ह्यातील बृहत आराखड्यास मंजुरी न मिळाल्याने जिल्ह्यातील आरोग्य सेवेवर विपरित परिणाम होत असणे" या विषयासंदर्भात दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी प्रथम अर्थसंकल्पीय अधिवेशन मार्च, २०२३ मध्ये सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेदरम्यान मा. आरोग्य मंत्री यांनी नंदुरबार जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र ग्रामीण रुग्णालयाचे जीआयएस नॅपिंगप्रमाणे जे नविन धोरण ठरले आहे ते काम जवळपास पूर्ण झाले आहे व पुढील आठवडयात त्याचे सर्टिफिकेशन होईल आणि त्याप्रमाणे जी उर्वरित कामे | | दिनांक ८/०१/२०२३ रोजी पर्यंत खुलासा मागविण्यात आला. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | आहेत ती पूर्ण होतील असे आश्वासन दिले. त्यानंतर श्री. एकनाथ खडसे, वि.प.स. यांनी विचारलेल्या उप प्रश्नाला माहिती देताना मा. मंत्री महोदयांनी पुढील महिन्यात नंदुरबार जिल्ह्याचा दौरा करतो आणि वस्तुस्थिती घेऊन पुढील तीन महिन्यांत संपूर्ण कार्यवाही पूर्ण केली जाईल असे आश्वासन दिले.परंतु तीन महिन्यांच्या कालावधीत आश्वासनाची प्रतिपूर्ती न झाल्याने सन्माननीय सदस्यांनी ही बाब दिनांक २४ जुलै, २०२३ रोजीच्या पावसाळी अधिवेशनात पुन्हा उपस्थित केली असता मा.उप सभापती यांनी अधिवेशन संपल्यावर मा. मंत्रीमहोदयांनी ताबडतोब नंदुरबार येथे जावे असे निर्देश दिल्यानुसार अधिवेशन संपल्यावर नंदुरबार येथे येण्याचे आश्वासन मा. मंत्री महोदयानी दिले होते, परंतु अधिवेशन संपून पाच महिन्याचा कालावधी होऊन सुद्धा आश्वासनाची पुर्तता झाली नसल्याने सन्माननीय सदस्यांचा व सभागृहाचा झालेला विशेषाधिकारभंग व अवमान हा होय". | |
| २ | २७ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स. दिनांक १३/०७/२०२३** | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, ठाणे-१ यांचेविरुद्ध सूचनेत उपस्थित केलेला मुख्य मुद्दा म्हणजे, " सन्माननीय सदस्य यांनी त्यांच्या आमदार निधीतून २५ लाख रुपये खर्च करून बोरी | सूचना खुलासा मागविण्यासाठी सादर करण्यात आली. |

**विवरण क्रमांक १३**—पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | कॉलनी शिवसेना कार्यालयानजीक, एम.जी.रोड, कांदिवली (प.), मुंबई येथे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवाशांसाठी प्रवासी निवारा शेड उभारुन दिनांक २५ एप्रिल, २०२३ रोजी सदरहू शेडचे हस्तांतरण महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाकडे केले व तेथून सिंधुदुर्गातील कणकवली, कुडाळ, सावंतवाडी, मालवण इत्यादी आगारात जाण्यासाठी बस सेवा उपलब्ध करून देण्यासाठी म.रा.मा.प.म.च्या विभाग नियंत्रक, ठाणे-१ यांना ५ महिन्यांपासून लोकप्रतिनिधी या नात्याने विनंती केली तसेच त्यासंदर्भात सन्माननीय सदस्यांनी व त्यांच्या स्वीय सहायकांनी विभागनियंत्रकांशी भ्रमणध्वनीवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न करूनही सन्माननीय सदस्यांना प्रतिसाद न देऊन त्यांच्या विनंतीकडे अक्षम्य दुर्लक्ष करून कर्तव्य पालनात दिरंगाई केल्याने झालेला सन्माननीय सदस्यांचा विशेषाधिकारभंग व अवमान हा होय." | | |

## विवरण क्रमांक – १४

## उपस्थित केलेले व पटलावर ठेवलेले औचित्याचे मुद्दे - ९९

| अ.क्र. | सदस्यांचे नाव व थोडक्यात विषय | मुद्दा सभागृहात उपस्थित केल्याचा तसेच पटलावर ठेवल्याचा दिनांक |
| --- | --- | --- |
| (१) | (२) | (३) |
| १ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>राज्यातील आरोग्य विभागांर्तगत गट ‘क’ आणि गट ‘ड’ या प्रवर्गासाठी २०२१ मध्ये ६२०५ पदासाठी परीक्षेबाबत. | ८/१२/२०२३ |
| २ | **श्री. किशोर दराडे, वि.प.स.**<br>शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना कॅशलेस वैद्यकीय प्रतिपूर्ती योजना लागू करण्याबाबत. | ८/१२/२०२३ |
| ३ | **श्री. किरण सरनाईक, वि.प.स.**<br>जुनी व नवीन पेन्शनचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी गठीत केलेल्या समितीचा सादर झालेला अहवाल यावर त्वरित निर्णय घेणेबाबत. | ८/१२/२०२३ |
| ४ | **श्री. नरेंद्र दराडे, वि.प.स.**<br>नाशिक जिल्ह्यात आवकाळी पावसाने झालेले नुकसान. | ८/१२/२०२३ |
| ५ | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.**<br>१० एप्रिल, २०१३ च्या शासन निर्णयातील क्रीडा प्रकारांमध्ये “मल्लखांब” या खेळाचा समावेश करण्याबाबत. | ८/१२/२०२३ |
| ६ | **श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.**<br>मैत्रेय प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत गुंतवणूक केलेल्या गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत. | ८/१२/२०२३ |

**विवरण क्रमांक – १४** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ७ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** | ८/१२/२०२३ |
| | सूर्या पाणी प्रकल्प योजनेतून वसई-विरार शहराला प्रतिदिन १८५ एमएलडी पाणीपुरवठा करण्याबाबत. | |
| ८ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** | ११/१२/२०२३ |
| | मौजे भोसरी (ता.माढा, जि.सोलापूर) येथील भूमापन क्रमांक व उप विभाग ३९/०४/५० अ हा प्लॉट बिनशेती (क्षेत्र २.७२.००) बाबत फसवणूक झाल्याबाबत. | |
| ९ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** | ११/१२/२०२३ |
| | पदव्युत्तर शिक्षण अर्धवट सोडणाऱ्या विद्यार्थ्यांवर दंडाची आकारणी न करण्याबाबत तसेच त्यांच्या विद्यावेतनात भरीव वाढ करण्याबाबत. | |
| १० | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.** | ११/१२/२०२३ |
| | नागपूर शहरातील उत्तर नागपूर विधान सभा क्षेत्रातील कामठी रोड येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्वेशन सेंटरमधे अनेक प्रकारच्या सुविधा अद्यापही पूर्ण झालेल्या नसल्याबाबत. | |
| ११ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** | ११/१२/२०२३ |
| | मुंबईसह राज्यातील नाट्यगृहांना उत्तम दर्जाच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत. | |
| १२ | **श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** | ११/१२/२०२३ |
| | शासकीय ८४४३ पदांच्या भरतीच्या परीक्षांचे निकाल प्रलंबित असल्याबाबत. | |
| १३ | **श्री. किशोर दराडे, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | राज्यातील अर्धवेळ ग्रंथपाल यांचे पूर्णवेळ ग्रंथपाल पदी उन्नयन करण्याबाबत. | |

**विवरण क्रमांक – १४** — पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| १४ | **श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | सारथी संशोधन अधिछात्रवृत्ती २०२३ पात्र सर्व मराठा आणि कुणबी मराठा विद्यार्थ्यांना CSMNRA २०२३ साठी १७ डिसेंबर रोजी घेण्यात येणारी सीईटी परीक्षा स्थगित करणेबाबत. | |
| १५ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | मुंबई विद्यापीठाच्या कलिना संकुलात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय संशोधन केंद्राच्या इमारतीचे बांधकाम सुरू करण्याबाबत. | |
| १६ | **डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | अनेक वर्षापासून हिंगोली जिल्हयातील इसापूर, सिद्धेश्वर आणि येलदरी या तीन्ही धरणग्रस्तांचे सामाजिक, आर्थिक सर्व्हेक्षं्ण करण्याच्या होत असलेल्या मागणीबाबत. | |
| १७ | **श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | "महाराष्ट् आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक संलग्न महाविद्यालयांचे ग्रंथपाल व संचालक शारीरिक शिक्षण पदास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम -१९९८ कलम २ (३५) च्या कलमा अंतर्गत "शिक्षक" संवर्गात समाविष्ट करण्याबाबत. | |
| १८ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | नवी मुंबईतील प्रकल्पग्रस्तांना राज्य सरकारच्या भूसंपादनाला पूर्वलक्षी प्रभाव वापरुन १२.५% भूखंड परताव्याच्या योजनेचा लाभ देण्याबाबत. | |
| १९ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | पुणे महानगर प्रदेश प्राधिकरणामधील आयुक्तांनी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची पद भरती केल्याबाबत. | |

**विवरण क्रमांक – १४** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २० | **श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | उच्च शिक्षण संचालनालयाच्या पुणे विभागामधील पारंपारिक व मुक्त विद्यापीठे, शैक्षणिक संस्था व महाविद्यालयांमध्ये विविध शिष्यवृत्ती योजनांसाठीची ४१०१ अर्ज प्रलंबित असल्याबाबत. | |
| २१ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.** | १२/१२/२०२३ |
| | बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ग/दक्षिण (G/SOUTH) विभागातील दीपक सिनेमा (गावडे चौक) येथील जुनी असलेली (तानसा पूर्व/पश्चिम) जलवाहिनी बदलण्याबाबत. | |
| २२ | **श्री. धीरज लिंगाडे, वि.प.स.** | १३/१२/२०२३ |
| | चिखली ( जि. बुलढाणा) तालुक्यातील माजी सैनिक प्रदीप ग्यानदेव थोरात हे शहीद व माजी सैनिकांना शिक्षक भरती मध्ये पात्र असतानाही रुजू न करण्यात आल्याबाबत. | |
| २३ | **श्री. किशोर दराडे, वि.प.स.** | १३/१२/२०२३ |
| | आदिवासी उपयोजन (टीएसपी प्लॅन) मध्ये लेखाशिर्ष २२०२१९०१ / एच ९७३ व १९४८ अंतर्गत अनियमित वेतन घेणाऱ्या राज्यातील शाळा व तुकड्यांचा वेतन खर्चाच्या बाबी (अनिवार्य) करिता शालेय शिक्षण विभागाचा (नॉन प्लॅन) नियमित लेखाशिर्ष २२०२४४२ मध्ये समावेश (बदल) करणे बाबत. | |
| २४ | **श्री. विक्रम काळे, वि.प.स.** | १३/१२/२०२३ |
| | महाराष्ट्रातील लोककलावंतांच्या मानधनात वाढ करण्याबाबत. | |
| २५ | **डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, वि.प.स.** | १३/१२/२०२३ |
| | हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या व हलाल प्रमाणित उत्पादन विक्री करणाऱ्या संस्थांची चौकशी करून हलाल प्रमाणित उत्पादनांवर बंदी आणण्याबाबत. | |

**विवरण क्रमांक – १४** — पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| २६ | **श्री. महादेव जानकर, वि.प.स.**<br>अंगणवाडी सेविकांच्या मागण्यासंदर्भात. | १३/१२/२०२३ |
| २७ | **डॉ. प्रज्ञा सातव, वि.प.स.**<br>अनेक वर्षापासून हिंगोली जिल्हयातील इसापूर, सिद्धेश्वर आणि येलदरी या तीन्ही धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाबाबत. | १३/१२/२०२३ |
| २८ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>वन विकास महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांबाबत. | १३/१२/२०२३ |
| २९ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>नागपूर महानगरपालिका नागपूर अंतर्गत जलकुंभाच्या १३ जागांचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत. | १३/१२/२०२३ |
| ३० | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने लिपिक, टंकलेखक व कर सहायक या संवर्गाच्या उमेदवारांची दुसऱ्यांदा टंकलेखन कौशल्य चाचणी घेत असताना चुकीचा की-बोर्ड दिल्याबाबत. | १३/१२/२०२३ |
| ३१ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>अरबी समुद्रात जेलीफिशमुळे मासेमारी न करता आल्याने मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत. | १३/१२/२०२३ |
| ३२ | **श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.**<br>अमली पदार्थांचा वाढता वापर रोखण्याबाबत. | १३/१२/२०२३ |
| ३३ | **श्री. आमश्या पाडवी, वि.प.स.**<br>राज्यातील विविध देवस्थानाच्या ईनामी जमिनी बेकायदेशीरपणे व बोगस कागदपत्रे तयार करुन भुमाफियांकडून लाटण्यात येत असल्याबाबत. | १४/१२/२०२३ |

**विवरण क्रमांक – १४** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ३४ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.**<br>राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये विविध संवर्गांमध्ये होणाऱ्या भरती संदर्भात परिक्षा व इतर प्रक्रिया करीता होत असलेल्या विलंबाबाबत. | १४/१२/२०२३ |
| ३५ | **श्री. जयंत आसगावकर, वि.प.स.**<br>श्री स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर, संजयनगर शिंदेमळा, सांगली या शाळेस चुकीची व जाणीवपूर्वक कारणे दाखवून शाळा अपात्र करण्याच्या उद्देशाबाबत. | १४/१२/२०२३ |
| ३६ | **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.**<br>इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत ९७६ आश्रमशाळांतील अधिक्षकांना आदिवासी विकास विभागाचे धर्तीवर आर्थिक लाभ देण्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ३७ | **श्री. राजहंस सिंह, वि.प.स.**<br>मुंबईतील कुर्ला एल वॉर्ड मध्ये असलेल्या चाळींचे रुपांतर अनधिकृत हॉटेल, बोर्डींग-लॉजींग मध्ये झाले असल्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ३८ | **श्री. किशोर दराडे, वि.प.स.**<br>शालेय शिक्षण विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नतीचा लाभ मिळणेबाबत. | १४/१२/२०२३ |
| ३९ | **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे, वि.प.स.**<br>आर.टी.ई. प्रतिपुर्तीची थकित रक्कम मिळण्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४० | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.**<br>सन २०१३ कलम १८ (१) (२) मध्ये अंशतः बदल करून खाण पट्टयाचा कालावधी २० वर्षाचा करणेबाबत. | १४/१२/२०२३ |

**विवरण क्रमांक – १४** — पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ४१ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>नवी मुंबई महानगरपालिकेच्या उद्यान विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांनी काम न करता कोट्यावधी रुपयांची बिले काढून अनियमितता केल्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४२ | **श्री. अभिजित वंजारी, वि.प.स.**<br>राज्यामध्ये नोंदणीकृत बांधकाम कामगारासाठी रोजमजुरीसोबत मोफत जेवण देण्याची योजनेबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४३ | **श्रीमती उमा खापरे, वि.प.स.**<br>राज्यात नंदुरबार जिल्ह्यात शासनाच्या समग्र अभियानातून जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना शैक्षणिक साहित्यसाठी मिळणारे अनुदान शासनाकडून अजूनही प्राप्त न झाल्यामुळे शिक्षकांना आपल्या खिशातून साहित्य खर्च करावे लागत असल्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४४ | **श्री. सचिन अहिर, वि.प.स.**<br>सहायक निबंधक सहकारी संस्था, वेल्हे यांनी अनेक बोगस सहकारी पाणी वापर संस्थेच्या नोंदी केल्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४५ | **श्री. गोपिचंद पडळकर, वि.प.स.**<br>राज्यातील १०८ रुग्णवाहिका चालक व डॉक्टर यांच्या विविध मागण्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४६ | **श्री. सुनिल शिंदे, वि.प.स.**<br>आरोग्य केंद्रे आणि शाळा वसई-विरार महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्याबाबत. | १४/१२/२०२३ |
| ४७ | **श्री. विलास पोतनीस, वि.प.स.**<br>राज्यातील शिक्षक भरतीची प्रक्रिया तातडीने पूर्ण करण्याबाबत. | १४/१२/२०२३ |

## विवरण क्रमांक – १४ —पुढे चालू

| (१) | (२) | (३) |
|---|---|---|
| ४८ | **श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.**<br>राज्यातील संजय गांधी निराधार पेन्शन योजनेच्या लाभार्थ्यांना पूर्ण माहिती मिळण्याबाबतची उपाययोजना राबवावी व कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर बंद केलेल्या कालावधीची पेन्शन देण्याबाबत. | १५/१२/२०२३ |
| ४९ | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.**<br>अकोला शहरातील लघु व्यावसायियिकांसाठी हॉकर्स झोन निविदा प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत. | १५/१२/२०२३ |
| ५० | **प्रा. राम शिंदे, वि.प.स.**<br>अहमदनगर जिल्ह्याचे पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर जिल्हा असे नामांतरण करण्याबाबत. | १५/१२/२०२३ |
| ५१ | **श्री. किशोर दराडे, वि.प.स.**<br>खाजगी आय टी आय संस्थेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यावेतन मिळणेबाबत. | १५/१२/२०२३ |
| ५२ | **श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>नवी मुंबई तळोजा औद्योगिक क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त सदराखालील भूखंड चुकीच्या पद्धतीने वाटप केल्याने येथील प्रकल्पग्रस्त शेतकरी श्री.पुरुषत्तम शेवाडे, श्री.चित्रसेन निमकर, श्रीमती शुभांगी जोशी या शेतकऱ्यांवर अन्याय झाल्याबाबत. | १५/१२/२०२३ |
| ५३ | **श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील, वि.प.स.**<br>राज्यात ग्रामीण भागातील आवास योजनेत बाह्य संस्थेमार्फत कार्यरत हजारो गृहनिर्माण अभियंत्यांच्ये मानधन रखडले असल्याबाबत. | १५/१२/२०२३ |
| | | निधी देण्याचे आदेश अर्थ मंत्रालयाकडून काढण्यात येणे, बंजारा तांडे रस्त्यांना जोडण्यासाठी संत सेवालाल महाराज जोड रस्ते योजना, धनगर वस्त्या रस्त्यांना जोडण्यासाठी यशवंतराव होळकर जोड रस्ते योजना व इतर मागासवर्ग विमुक्त जाती 'अ' भटक्या जमाती 'ब', 'ड' व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमाच्या निवासी शाळांमध्ये शिक्षण देण्याची योजना राज्य शासनाकडू लागू करण्यात आली असणे, आरक्षण आंदोलनाकडे राजकीय दृष्ट्या न बघता सर्वच राजकीय पक्षांनी चर्चाविमर्षाच्या माध्यमातून आरक्षण प्रश्नी तोडगा काढण्याची आवश्यकता, अन्य आरक्षणाला हात न लावता मराठा समाजाला न्यायालयात टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीतले आरक्षण देण्यासाठी शासन कटिबध्द असणे, याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका." | | |
| ३. | **डॉ.मनिषा कायंदे** व इतर वि.प.स. यांचा म.वि.प.नियम २६० अन्वये प्रस्ताव - | "मागील अनेक दशकांपासून विदर्भ विकासाकरिता अनेक प्रयत्न करूनही विदर्भात शेती, उद्योग, रोजगार, सिंचन या क्षेत्रात प्रगती व विकास न होणे, विदर्भात असंख्य औष्णिक वीज प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होणे, वाढते तापमान व पर्यावरण बदलामुळे उन्हाळ्यात ४५ डिग्री पेक्षा जास्त तापमानाची दिवसा वाढ होणे, रोज कमवुन हातावर पोट असणाऱ्या असंख्य लोकांचे उष्णतेमुळे मृत्यू होणे, उन्हाळ्यात वाढत्या तापमानामुळे कामगारांचे तसेच उन्हातान्हात काम करणाऱ्या व श्रम गाळणाऱ्या लोकांचे हाल होणे, वन कायद्याच्या अडचणींमुळे वैनगंगा-पैनगंगा नदी-जोड प्रकल्प व | दिनांक २० डिसेंबर, २०२३. | एकत्रित चर्चा झाली. |

**विवरण क्रमांक – १७** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शेतकऱ्यांचे सिंचन प्रकल्प पूर्ण न होणे, परिणामी आर्थिक प्रगतीवर विपरीत परिणाम होणे, विदर्भाच्या बहुतांश जिल्ह्यात जंगल व वनक्षेत्र असल्याने व कायद्याची कठोर व सक्तीने अंमलबजावणी झाल्याने रानडुक्कर, रोहीहरिण यांसारख्या वन्य प्राण्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणे, या वन्य प्राण्यांमुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे नुकसान होणे, नुकसानभरपाईची रक्कम प्रत्यक्ष नुकसानीच्या तुलनेत अपुरी असणे, सातत्याने वाघांची संख्या वाढल्याने वाघांचा व बिबट्यांचा गावा गावात प्रवेश वाढणे, गायी व शेळ्यांच्या शिकारीत वाढ होणे, वनक्षेत्रात पर्यटनाला चालना देण्यासाठी व या भागाच्या आर्थिक प्रगतीसाठी शासनाला ठोस कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता, कोर व बफर गावांच्या संख्येत वाढ होत असणे, अभयारण्य जाहीर होत असल्याने वनक्षेत्रात रहाणाऱ्या लोकांच्या हक्काचे संरक्षण न होणे, मनुष्य व वन्यजीवांच्या संघर्षात वाढ होणे, वन्य प्राण्यांच्या उपद्रवामुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान वाचविण्यासाठी शासनाने चॅनलींग फेन्सींगची योजना व पुरेसा निधी देऊन शेतकऱ्यांना मदत करण्याची व अनुदान देण्याची तसेच प्रभावी योजना राबविण्याची आवश्यकता, विदर्भात नागपूर बाहेरील क्षेत्रात कापूस व सोयाबीन उत्पादन प्रक्रिया तसेच सूतगिरणी उद्योग उभारण्याची आवश्यकता, मेट्रो रेल्वे तसेच एयरपोर्टची सुविधा नागपूर खेरीज अन्य जिल्ह्यात मध्यवर्ती ठिकाणी होण्याची आवश्यकता, सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी तापी खोरे व विदर्भ औद्योगिक विकास महामंडळ हे | | |

**विवरण क्रमांक – १७** —पुढे समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | प्रलंबित प्रकल्प मार्गी लावण्याची आवश्यकता, वाढत्या बेरोजगारीमुळे गुन्हेगारीकडे व आत्महत्येच्या घटनेत होत असलेली वाढ, याबाबत शासनाने वनबाधित लोकांच्या कल्याणासाठी खनिज विकास निधी व मानव विकास मिशनच्या धर्तीवर किंवा डोंगरी विकास निधीच्या धर्तीवर विशेष निधी देऊन या भागाच्या नागरिकांची रोजगार व दरडोई उत्पन्न वाढविण्याच्या योजना राबविण्यााची नितांत आवश्यकता, राज्यातील व विशेषतः विदर्भातील तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राच्या विकासाकरिता पायाभूत सुविधांसह ठोस कार्यक्रम आखण्याची आवश्यकता, या सर्व स्थळांची प्रसिद्धी, जाहिरात, डॉक्युमेन्ट्री व वेगवेगळ्या महोत्सवाच्या माध्यमातून या भागातील सर्व प्रसिद्ध तीर्थक्षेत्र व पर्यटन क्षेत्राची वेगवेगळ्या चॅनल्सवर तसेच एअरपोर्ट व रेल्वेस्टेशन व हॉटेल्स येथे प्रसिद्धी करण्याची आवश्यकता, वनक्षेत्रात राहणाऱ्या आदिवासींच्या कल्याणाकरिता व रोजगाराकरिता योजना राबविण्याची आवश्यकता, विदर्भात औद्योगिक प्रगती करण्या करीता औद्योगिक क्षेत्र व दरडोई उत्पन्न कमी असलेल्या तालुक्यात व वन क्षेत्रात प्रदूषण विरहीत उद्योगांबाबत धोरण आखण्याची आवश्यकता, विदर्भाच्या सर्वांगीण विकासाकरिता, शासनाने ठोस व कालबद्ध कार्यक्रम घोषित करण्याची आवश्यकता.” | | |

# विवरण क्रमांक १८

## अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये)(सर्वसाधारण)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (सर्वसाधारण) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकुण आलेल्या सूचनांची संख्या | --- | ३७ |
| (२) | स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | --- | २५ |
| (३) | सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या | --- | ० |
| (४) | अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | --- | १२ |
| (५) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | --- | ५ |
| (६) | बॅलट मध्ये आलेल्या परंतू चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या | --- | ५ |
| (७) | विभाग/ सदस्य निर्देशित संख्या | --- | ० |
| (८) | मा.सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | --- | ० |
| (९) | व्यपगत झालेल्या सूचना *<br>( * म.वि.प. नियम २० नुसार ) | --- | १८* |

सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात एकूण ३७ सर्वसाधारण अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी २५ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या १० सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. **त्यापैकी ५ अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली व २ अर्धा-तास चर्चेच्या सूचना पुढे ढकलण्यात आल्या आहेत.**

# विवरण क्रमांक १९

## अर्धा-तास चर्चेच्या सूचना (नियम ९२ अन्वये)(प्रश्नातून उद्‌भवलेल्या)

महाराष्ट्र विधानपरिषद नियम ९२ अन्वये सार्वजनिक महत्त्वाच्या बाबींवर प्राप्त झालेल्या (प्रश्नांच्या उत्तरातून उद्‌भवणाऱ्या) अर्धा-तास चर्चेच्या सूचना.

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | एकूण आलेल्या सूचनांची संख्या | --- | २४ |
| (२) | स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | --- | १४ |
| (३) | सदस्यांनी मागे घेतलेल्या सूचनांची संख्या | --- | ० |
| (४) | अस्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या | --- | १० |
| (५) | चर्चा झालेल्या सूचनांची संख्या | --- | १ |
| (६) | बॅलट मध्ये आलेल्या परंतु चर्चा न झालेल्या सूचनांची संख्या | --- | ३ |
| (७) | विभाग/ सदस्य निर्देशित संख्या | --- | ० |
| (८) | मा.सदस्यांनी दिलेल्या परंतु कार्यवाहीत न घेतलेल्या सूचना | --- | ० |
| (९) | व्यपगत झालेल्या सूचना *<br>( * म.वि.प. नियम २० नुसार ) | --- | १३* |

सन २०२३ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनात एकूण २४ अर्धा-तास चर्चेच्या सूचना प्राप्त झाल्या असून त्यापैकी १४ सूचना स्वीकृत झालेल्या आहेत. स्वीकृत सूचनांपैकी बॅलटमध्ये आलेल्या ४ सूचना चर्चेसाठी ठेवण्यात आलेल्या होत्या. **त्यापैकी एका अर्धा-तास चर्चेच्या सूचनेवर चर्चा झाली.**

# विवरण क्रमांक २०

## म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | आलेल्या सूचनांची संख्या | - | २६ |
| (२) | स्वीकृत सूचनांची संख्या | - | २५ |
| (३) | अस्वीकृत सूचनांची संख्या | - | -- |
| (४) | सभागृहात चर्चा झालेल्या सूचना | - | ०६ |
| (५) | सम्मिलित करण्यात आलेल्या सूचना | - | ०१ |

| अ.क्र | सदस्यांचे नाव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | **सर्वश्री जयंत पाटील,** अभिजित वंजारी, शशिकांत शिंदे, ॲड. अनिल परब यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**<br>"महाराष्ट्र राज्यात उद्योग प्रकल्प उभारण्यासाठी राज्य शासनाकडून एमआयडीसी उद्योग प्रकल्पांना उभारण्यासाठी आरक्षित जागा देण्यात येणे, एमआयडीसीमध्ये असलेल्या वेगवेगळ्या क्लस्टर व आरक्षित जागांवर अनेक वर्षापासून उद्योग सुरू झालेले नसणे, राज्यातील विविध भागात उद्योग प्रकल्प सुरू करण्याकरिता शेतकऱ्यांकडून तुटपुंज्या किंमतीमध्ये जमिनी घेऊन उद्योग प्रकल्पांसाठी आरक्षित | **१४ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | करण्यात येणे, परंतु अशा जागेवर अद्यापपर्यंत कोणतेही उद्योग सुरू न होणे वा तो प्रकल्पच रद्द होणे, परंतु आरक्षित केलेल्या जमिनी शासनाने शेतकऱ्यांना परत न करणे, राज्यात विविध विदेशी कंपन्यांकडून गुंतवणूक करून स्थानिकांना रोजगार देण्याचे स्वप्न दाखवणे, मुंबईच्या जवळ असणाऱ्या रायगड जिल्ह्यातील पाताळगंगा, तळोजा, रोहा, महाड, विळे-भागड, उसर या औद्योगिक वसाहती तसेच आर.सी.एफ., आय.पी.सी.एल., रिलायन्स, गेल इंडिया, ओ.एन.जी.सी., जे.एस.डब्ल्यू. हे मोठमोठे उद्योग सुरू झाले असणे, तसेच नैना प्रकल्प, मुंबई ऊर्जा प्रकल्प, टाटा पॉवर प्रकल्प यासारखे प्रकल्प शेतकऱ्यांच्या माथ्यावर मारण्यात येऊन शेतकऱ्यांची शेत जमीन कवडीमोल भावाने जबरदस्तीने संपादीत करून शेत जमीन शासनाने ताब्यात घेणे, पेण तालुक्यातील सेझ प्रकल्पाकरिता ४५ गावांच्या जमिनी रिलायन्स या कंपनीने प्रकल्पासाठी शासनाकडून हस्तांतरीत करून घेणे, परंतु या ठिकाणी कोणताही प्रकल्प अद्यापपर्यंत उभारण्यात न आल्यामुळे तत्कालीन उद्योग मंत्री यांनी सदर जमीन शेतकऱ्यांना देण्याचे आश्वासन सभागृहात देण्यात येऊनही याबाबत अद्याप कोणतीही कार्यवाही शासनाकडून करण्यात न येणे, गेले अनेक महिन्यांपासून विविध प्रकल्पांच्या विरोधात प्रकल्पग्रस्तांनी त्यांच्या मागण्यासाठी विविध आंदोलने, मोर्चे काढण्यात येऊन सुध्दा याबाबत शासनाकडून कोणतीही दखल घेण्यात न येणे, या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व रोजगाराचा प्रश्न वर्षानुवर्षे प्रलंबित असून प्रकल्पग्रस्त नोकरी पासून वंचित राहणे, तर अनेक प्रकल्पग्रस्तांचे योग्य पुनर्वसन न झाल्याने स्थानिक प्रकल्पग्रस्तांकडून अशा प्रकल्पांना विरोध करण्यात येणे, | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | राज्य शासनाने यावर तातडीने उपाययोजना न केल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांवर होणारा अन्याय व उद्योग तसेच प्रकल्पांना होणाऱ्या विरोधाबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| २. | **श्रीमती उमा खापरे,** सर्वश्री प्रविण दरेकर, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –** <br> “तळवडे, पिंपरी-चिंचवड, पुणे येथील मे. राणा इंजिनियरिंग, ज्योतिबा नगर येथे स्पारकल कॅन्डल तयार करण्याच्या कारखान्यात दिनांक ८ डिसेंबर, २०२३ रोजी स्फोट होऊन ६ महिला कामगार मृत्यूमुखी पडल्याची व १० कामगार जखमी झाल्याची दुर्घटना घडणे, सदर घटनेच्या ठिकाणी दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजी लोकप्रतिनिधी यांनी सदर दुर्घटना घडलेल्या ठिकाणी समक्ष पाहणी केली असता ज्याठिकाणी दुर्घटना घडली तेथे कच्चे बांधकाम असलेल्या इमारती व एक शटर असलेल्या शेडमध्ये औद्योगिक कारखाना सुरू असल्याचे निदर्शनास येणे, सदर कारखान्यात शोभेच्या दारुपासून वाढदिवसाकरिता वापरण्यात येणारे स्पारकल कॅन्डल तयार करण्याचे काम सुरु असणे, सदर ठिकाणी व्यवसाय मालकाव्दारे नियुक्त महिला कामगार काम करीत असणे, सदर व्यवसाय अवैध प्रकाराने असून परवानगी घेतलेली नसणे, सदर जागा ही रेड झोन मध्ये समाविष्ट असून तळवडे परिसरात साधारणपणे ३००० विविध प्रकारच्या आस्थापना कार्यरत असणे, स्पारकल कॅन्डल तयार करण्यासाठी Potassium Chlorate / Perchlorate, Stronium / Aluminium / Magnasium, Dextrin इत्यादी | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक – २०** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | रसायने वापरल्याची शक्यता असणे, सदर जखमी व्यक्तीचे शासनाकडून ससून रुग्णालयात उपचार असून मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्ती मुख्यमंत्री सहायता निधीमार्फत ०५ लाख रुपये मदत जाहीर करण्यात आलेली असणे, उक्त दुर्घटनेच्या अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस यांनी भारतीय दंड संहिता, १९६० कायद्याअंतर्गत कलम ३०४ २८५ (२), २८६, ३३७, ३३८ आणि बारीपदार्थ अधिनियम, १८८४ ९ व (५)(ब) अन्वये गुन्हा दाखल करून घेतला असणे, सदर आगीची दुर्घटना घडली ते ठिकाण रेड झोनमध्ये समाविष्ट असणे, परंतु सदर महानगरपालिका क्षेत्रातील रेड झोनबाबत नागरिकांमध्ये संभ्रम असून नागरीकांकडे याची कोणतीही माहिती उपलब्ध नसणे, त्यामुळे पिंपरी-चिंचवड मनपा कार्यक्षेत्रातील रेड झोन हद्दीबाबत नकाशे व माहिती तात्काळ प्रसिद्ध करणेबाबत विभागीय आयुक्त, पुणे यांना दिनांक ०४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये विशेष लक्ष घालून कार्यवाहीबाबत निर्देश दिलेले असणे, तसेच याबाबत निर्णय होणे गरजेचे असणे, अशा प्रकारच्या घातक रसायनाशी निगडीत असलेल्या उद्योगांचा परवाना कोणत्या कारणांसाठी आहे त्या सर्व विभागांच्या परवानग्या आहेत का याची तपासणी होऊन कार्यवाही होणे आवश्यक असणे, सदर औद्योगिक परिसरातील उद्योग व्यवसायांची तात्काळ माहिती संकलित करण्याबाबत तसेच पिंपरी-चिंचवड औद्योगिक आस्थापनांचे अग्नी सुरक्षेच्या अनुषंगाने सर्वेक्षण सुरू करणे, औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या सर्व कामगारांसाठी सुरक्षात्माक उपाययोजना करण्यात यावी व औद्योगिक सुरक्षेबाबत कायदेशीर अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया, आणि उपाययोजना. | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| ३. | **सर्वश्री कपिल पाटील,** निरंजन डावखरे, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**<br><br>"महाराष्ट्रातील Primitive आदिवासी मानल्या गेलेल्या कातकरी जमात असून या जमातीच्या संरक्षणासाठी सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक हितसंवर्धन करणे, राज्याची विशेष जबाबदारी असणे, भारतीय संविधानातील मूलभूत अधिकारानुसार भारत सरकारने बंधबिगार पद्धती (उच्चाटन) अधिनियम, १९७६, अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायदा १९८९ नुसार सक्तीचे काम करून घेणे अपराध ठरविला असणे, परंतु इगतपुरी तालुक्यातील १५ हून जास्त कुटुंबे, लहान मुलाबाळांसह नेवासा तालुक्यात ऊसतोडीचे काम करण्यासाठी एका कंत्राटदाराने या कामगारांना नेले असणे, काहींना दीड तर काहींना दोन हजार अनामत रक्कम उचल देणे, महिनाभर त्यांच्याकडून विनामोबदला काम करून घेणे, मात्र ज्यावेळी या कुटुंबियांची उपासमार सुरू झाली तेव्हा इगतपुरीला परत जाण्यासाठी त्यांनी केलेले वाहन कंत्राटदार आणि त्याच्या साथीदारांनी अडवणे, त्याविरोधात आदिवासी आढावा समितीचे अध्यक्ष यांनी रात्री दूरध्वनीव्दारे नेवासा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्याकडे तक्रार करणे, मात्र केवळ अटकाव केल्याची कलम ३४१ व ३४२ प्रमाणे खबर दाखल होणे, वस्तूतः हा अत्याचार प्रतिबंध कायद्याखाली गुन्हा असणे, वेठबिगार कायद्याखाली गुन्हा असणे, त्याशिवाय बेकायदेशीर अटकाव असणे, परंतु, FIR दाखल केली म्हणून रात्रभर ते | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | मजूर नेवासा पोलीस स्टेशन येथे बसून असणे, पूर्ण तपास होऊन ॲट्रॉसिटी ॲक्ट आणि वेठबिगारी कलम लावण्याची मजूरांनी मागणी करणे, आरोपीला तात्काळ अटक करण्याची गरज असणे, पोलीस निरीक्षक यांनी आपल्या कामांमध्ये हलगर्जीपणा केल्याने त्यांच्यावरही कारवाई होण्याची गरज असणे, आणि योग्य ती FIR दाखल करण्याचे आदेश होणे आवश्यक असणे, नाशिक जिल्ह्यात ३९, अहमदनगर जिल्ह्यात १ इतके असे एकूण १२९ इतके वेठबिगार शोधून मुक्त केलेले असणे, त्यांना मुक्तीचे दाखले मिळालेले असणे, त्यांच्या मालकांवर गुन्हे दाखल झालेले असणे, वेठबिगार दक्षता समित्या जिल्हा आणि उपविभागीय स्तरावर कार्यरत नसणे, केंद्र सरकारच्या नियमानुसार जिल्हा दंडाधिकारी यांच्याकडे १० लाख रुपयांचा संचित निधी असणे, त्यातून मुक्ती नंतर तात्काळ मुक्त केलेल्या वेठबिगार मजूराला २० हजार रुपये तात्काळ सहाय्य देणे असणे, पुनर्वसनासाठी रुपये एक लाख अर्थसहाय्य देणे असणे, बालक किंवा अपंग असल्यास दोन लाख रुपये देणे असणे, परंतु, केंद्र सरकारच्या नियमानुसार वरीलपैकी एकालाही तात्काळ सहाय्य मिळालेले नसणे, पुनर्वसनासाठी आर्थिक सहाय्य मिळालेले नसणे, घरासाठी जागा आणि घरे मिळालेली नसणे, पुनर्वसन झालेले नसणे, जिल्हा दंडाधिकारी ठाणे, पालघर, रायगड आणि नाशिक यांनी तसेच, अध्यक्ष, राज्यस्तरीय आदिवासी विकास आढावा समिती, महाराष्ट्र शासन यांनी वारंवार प्रधान सचि, कामगार, मदत व पुनर्वसन यांना पत्र दिलेली असणे, राज्यात एकूण कातकरींची संख्या २ लाख ९५ हजार ९२ इतकी असणे, यापैकी ठाणे ५४८४९, रायगड १३७६६३, नाशिक | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | १३९७२, पालघर ६४४०१ इतकी असणे, त्यांना रेशन कार्ड, आधार कार्ड, जातीचे दाखले, मुलांना आश्रम शाळेत शिक्षण, रोजगाराचा अभाव असणे, त्यामुळे राज्यातील एकूण कातकरी जमाती करिता राज्य शासनाने सर्वंकष योजना जाहीर केली असणे, परंतु ती अजून अंमलात न येणे, यामुळे राज्यात वेगवेगळ्या ठिकाणी, ऊसतोडीवर, विटभट्या, कोळसा भट्ट्यावर, दगड खाणीमध्ये, द्राक्ष बागामध्ये वेठ बिगारी आढळून येणे, पोलिसांनी कारवाईसाठी दिरंगाई करणे, यामुळे संविधानाने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकाराचा गंभीर भंग झालेला असणे, यामुळे मुक्त वेठबिगारांची होणारी उपासमार, कातकरी समाज अजून दारिद्र्यात ढकलला जाणे, यामुळे आदिवासी समाजात पसरलेला असंतोष, यामुळे निर्माण झालेली अशांतता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ४. | **सर्वश्री अंबादास दानवे,** अभिजीत वंजारी, सचिन अहिर, शशिकांत शिंदे, अशोक ऊर्फ भाई जगताप, कपिल पाटील, ॲड.अनिल परब, सर्वश्री नरेंद्र दराडे, सतेज उर्फ बंटी पाटील, एकनाथराव खडसे, राजेश राठोड, सुधाकर अडबाले, धीरज लिंगाडे, विलास पोतनीस, जयंत पाटील, किरण सरनाईक, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुनिल शिंदे, डॉ.प्रज्ञा सातव, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**<br>"राज्यात माहे नोव्हेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पडलेल्या अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे २२ जिल्ह्यातील सुमारे साडेचार लाख हेक्टरपेक्षा जास्त पिकांचे झालेले नुकसान, सद्यःस्थितीत पंचनामे काम संथगतीने सुरु असल्याने नुकसानीचा | **१९ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

## **विवरण क्रमांक – २०** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | आकडा वाढण्याची शक्यता असणे, अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगामात काढून ठेवण्यात आलेल्या पिकांचेही नुकसान झाले असल्याने पंचनामा करताना उक्त नुकसानीचा समावेश करण्याची आवश्यकता असणे, अवकाळी पावसामुळे १० जणांचा मृत्यू झाला असून शेकडो पशुधनही शेतकऱ्यांनी गमावले असणे, पावसामुळे ऊसाची तोड थांबल्याने गळीत हंगामावरही विपरीत परिणाम होण्याची शक्यता असणे, मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील पर्यावरणीय वातावरणात प्रचंड बदल झाला असून पाऊस व वातावरणातील बदलामुळे पुन्हा राज्यातील उरलेली पिके नुकसानीच्या उंबरठ्यावर आली असणे, अवकाळी पावसामुळे नुकसान न झालेल्या पिकांवर पांढरी बुरशी, करपा व अन्य बुरशीजन्य रोगाची तसेच कीड रोगाची लागण होण्याची शक्यता निर्माण झालेली असणे, अवकाळी पाऊस व मिचौंग चक्रीवादळामुळे राज्यातील संपूर्ण मच्छिमारी ७ ते १० दिवस बंद राहिल्यामुळे मच्छिमारांचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले असणे, तथापि, शासनाने अद्याप या नुकसानीचे पंचनामे केले नसणे, राज्यात झालेली अतिवृष्टी, त्यानंतर पडलेल्या दुष्काळाची मदत अद्याप शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, पीक विमा कंपन्यांच्या मुजोरपणामुळे शेतकरी पीक विम्यापासूनही वंचित राहिले असणे, एकाच वर्षात अतिवृष्टी, दुष्काळ व अवकाळीमुळे राज्यातील शेतकरी पूर्णतः उध्वस्त झाला असल्यामुळे पीक कर्ज फेडण्यासही असमर्थ असणे, राज्यसरकारने शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करण्याचा निर्णय घेण्याची आवश्यकता असणे, तसेच सोयाबीन, कापूस व संत्री उत्पादन खर्च प्रचंड वाढले असून बाजारात मिळणारा भाव अत्यल्प असणे, | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | त्यातच येलो मोझॅंक, बोंडअळी व पेरणी केल्यानंतर पाऊस न पडल्याने सोयाबीन-कापसाचे झालेले प्रचंड नुकसान, त्यामुळे उत्पादनात झालेली प्रचंड घट, काढणी खर्चही परवडत नसल्याने अनेक शेतकऱ्यांनी उभ्या पिकात शेळ्या-मेंढ्या सोडल्या असणे, सोयाबीन, कापूस व संत्रा उत्पादक शेतकरी आत्महत्येच्या उंबरठ्यावर उभा असणे, तसेच पोखरा योजनेतून शेडनेट उभारण्यासाठी बॅंक व कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना मदत दिली जात असणे, तथापि, वादळी वाऱ्यात सदरहू शेडनेट वाहून गेल्यावर नुकसान भरपाई मिळण्यासाठी कोणताही विमा नसणे, त्याचप्रकारे पशुधन नुकसानग्रस्तांना विमा नसणे, याबाबत शासनाकडून आश्वासनांचा पाऊस पाडणे, परंतू त्याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचे दिसून येणे, त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली शासनाप्रती असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तातडीने निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |
| ५. | **सर्वश्री प्रविण दरेकर,** रामराजे नाईक-निंबाळकर, डॉ.मनिषा कायंदे, प्रा.राम शिंदे, सर्वश्री विक्रम काळे, किशोर दराडे, सुरेश धस, सतिश चव्हाण, विजय उर्फ भाई गिरकर, अब्दुल्लाहखान दुर्राणी, प्रसाद लाड, अनिकेत तटकरे, चंद्रशेखर बावनकुळे, अमोल मिटकरी, प्रविण पोटे-पाटील, निरंजन डावखरे, निलय नाईक, रामदास आंबटकर, रणजितसिंह मोहिते-पाटील, रमेशदादा पाटील, रामराव पाटील, रमेश कराड, प्रविण दटके, गोपिचंद पडळकर, वसंत खंडेलवाल, श्रीकांत भारतीय, उमा खापरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, महादेव जानकर, **वि.प.स.** यांची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –** | **१९ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

## विवरण क्रमांक – २० —पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | "राज्यात ज्या शेतकऱ्यांनी सन २०१९ नंतर शेतीचे नवीन खाते उघडले आहे त्या शेतकऱ्यांना पीएम किसान योजना व नमो शेतकरी महासन्मान निधी योजना या योजनांचा लाभ मिळत नसणे, राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी पेरण्यांची चिंता सतावत असताना काढणी झालेल्या खरीपांच्या पिकांना योग्य भाव मिळेल की नाही अशी चिंता शेतकऱ्यांना भेडसावत असणे, राज्यात कापूस, सोयाबीन, तूर, धान, कांदा, केळी, संत्रा या पिकांचे नासाडी झाली असणे, सोयाबीनचे दर हमी भावापेक्षा खाली गेल्याचे निदर्शनास येणे, कमी व अवकाळी पावसामुळे दाटलेली दुष्काळी छाया आणि किडरोगाच्या प्रकोपामुळे कापूस व सोयाबीनच्या उत्पादनात खुपच घट झाली असणे, केंद्र सरकारने कांद्याची किमान निर्यातमूल्य (एमईपी) थेट ८०० डॉलर प्रतिटन करण्याचा निर्णय घेतल्याने कांदा निर्यातीला खिळ बसल्याचे निदर्शनास येणे, राज्य शासनाने शेतकऱ्यांना २ ऐवजी ३ हेक्टरपर्यंत मदत केली असणे, एनडीआरएफ निकषाप्रमाणे केंद्र सरकारने ४० तालुके दुष्काळग्रस्त घोषित केले असून उर्वरित सर्व तालुक्यांची जबाबदारी राज्य शासनाने घेतली असणे, जे नुकसान झाले आहे त्यासह शेतकऱ्यांच्या यापुर्वीच्या देखील सर्व नुकसानीची भरपाई देण्यास सरकार कटीबध्द असणे, पैनगंगा ते वैनगंगा जोडणी प्रकल्पास मान्यता देण्यात येणे, शासनाने केंद्राच्या निकषात न बसणाऱ्या १२०० मंडळांना दुष्काळसदृश जाहिर केले असणे, तसेच २० लाखांपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या खात्यात २५ टक्के अग्रीम राशी जमा केली असणे, शेतकऱ्यांना विविध प्रकारचे लाभ डीबीटीच्या माध्यमातून देण्यात येणे, राज्यात हळद उत्पादनात | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | वाढ होत असल्याने हळद निर्यातीला प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, आदर्श गाव योजनेत निवड झालेल्या गावांना दिल्या जाणाऱ्या निधीत हेक्टरी १० हजार रुपयांची वाढ झाली असणे, लोकसहभाग आणि जलसंधारणाच्या कामातून राज्यात व देशात ओळख निर्माण करणाऱ्या आदर्श गाव राळेगणसिध्दी व हिवरे बाजार या गावांच्या धर्तीवर राज्यातील अन्य गावांचा विकास व्हावा याकरिता शासनाने आदर्श गाव योजना प्रकल्प व संकल्प समिती गठीत केली असणे, दुष्काळी भागातील गावे, गावकऱ्यांचा एकोपा व लोकसहभाग अधिक असलेल्या गावात जलसंधारण ग्रामविकासाची कामे करताना सप्तसुत्रीनुसार अंमलबजावणी करण्याचे शासनाचे धोरण असणे, रब्बी हंगामासंबंधी फळ पिक विमा योजनेत सहभागाबाबत कार्यवाही सुरु असणे, केळी पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पिक विमा योजनेतून शेतकरी विमा संरक्षण देण्यात येणे, पिक विमा योजनेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांकडून सातबारा उताऱ्यावर २०२३-२४ संबंधी केळी पिकांची नोंद नसल्यास स्वयंघोषणापत्रावर केळी लागवड केली आहे अशी घोषणा केल्यास त्याला पिक विमा योजनेत सहभागी करून घ्यावे म्हणून शासनाकडून बँकांना निदेश दिले असणे, विदर्भातील कृषी क्षेत्राचा फायदा व्हावा याकरिता कृषी महाविद्यालयाच्या जागेवर शासनाकडून कृषी तज्ञ डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या नावाने आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सेंटर उभारण्याचा शासनाचा मानस असणे, राज्यातील शेतकरी केंद्रबिंदू मानून अवकाळी पावसामुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याची व राज्य सुजलाम सुफलाम करण्याची शासनाची भूमिका, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| ६. | **सर्वश्री अंबादास दानवे,** विलास पोतनीस, सचिन अहिर, शशिकांत शिंदे, अशोक उर्फ भाई जगताप, एकनाथराव खडसे, अरुण लाड, सुनिल शिंदे, आमश्या पाडवी, **वि.प.स.** याची **म.वि.प. नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा –**<br><br>"नागपूर जिल्ह्यातील बाजार गाव येथे संरक्षण क्षेत्रासाठी शस्त्रास्त्रांचे उत्पादन करणाऱ्या सोलर ग्रुपच्या इकॉनॉमिक एक्सप्लोजिव्ह लिमिटेड या कारखान्यात दिनांक १७ डिसेंबर, २०२३ रोजी स्फोट होऊन ९ कामगारांचा मृत्यू झाला असून यात ६ महिला आणि ३ पुरुषांचा समावेश असणे व तीन कामगार गंभीर जखमी होणे, सदरहू घटना घडल्यानंतर कर्मचाऱ्यांचे कुटुंबिय कंपनी परिसरात जमल्याने पोलिसांनी त्यांचेवर अमानुषपणे लाठीचार्ज केल्यामुळे अनेक वृध्द व अपंग बांधव जखमी झालेले असणे, तसेच स्फोटक बनवणाऱ्या कारखान्यामध्ये काम करणारे कामगार प्रशिक्षण घेतलेले हवे परंतु येथे अकुशल कामगार अत्यल्प वेतनावर कंत्राटी पद्धतीने घेण्यात आले असणे, कारखान्याकडून सुरक्षा निकषांचे उल्लंघन केलेले असणे, ज्या ठिकाणी सैन्यांचा दारुगोळा तयार होतो तेथे सुरक्षा निकष पाळणे आवश्यक असताना त्याकडे केलेले दुर्लक्ष, कारखान्यात ५ हजार कर्मचारी कार्यरत असून त्यांना केवळ १२ हजारच वेतन दिले जात असणे, २२-२३ वर्षांच्या मुलींना प्रशिक्षण न देता कंत्राटी पद्धतीने कामाला लावण्यात येणे, उक्त कंपनीला ७० हेक्टर शासनाकडून वन जमीन देण्यात आली असून सदरहू कंपनीत कर्मचाऱ्यांचे शोषण देखील होत असल्याच्या अनेक तक्रारी असणे, सन २०१८ मध्ये अशाच प्रकारे घडलेल्या घटनेत मृत व्यक्तींच्या कुटूंबाला २५ लाख देण्यात | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक – २०** —पुढे चालू

| (१) | (२) | (३) | (४) |
| --- | --- | --- | --- |
| | आलेले असणे, तथापि, दिनांक डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या मृतांच्या कुटुंबियांची राज्य शासनाकडून केवळ ५ लाखांवर बोळवण केली जाणे, या अपघाताची भीषणता पाहता दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या मृतांच्या कुटुंबियांची प्रत्येकी ५० लाख रुपये इतकी आर्थिक मदत देऊन मृतांच्या वारसांना नोकरी देण्याची आवश्यकता.” | | |

# विवरण क्रमांक २१

## म.वि.प. नियम १०१ अन्वये लक्षवेधी सूचना

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | प्राप्त झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ६२३ |
| (२) | स्वीकृत करण्यात आलेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | १४३ |
| (३) | सभागृहात चर्चा झालेल्या एकूण लक्षवेधी सूचना | - | ३० |

| अ.क्र. | लक्षवेधी सूचना क्र. | सदस्यांचे नांव व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | १५६ | **श्री.प्रसाद लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :—<br>“महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षण उपाययोजना अधिनियम, २००६ अन्वये इमारतींचे मालक-भोगवटादार, गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या | **८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | इमारतींचे फायर ऑडीट परवानाधारक अग्निशमन यंत्रणेमार्फत करून घेणे आणि त्याचा अहवाल संबंधित महानगरपालिकेला सादर करणे बंधनकारक असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, किती संस्थांनी अहवाल सादर केले आहेत व किती संस्थांनी ऑडीट अहवाल सादर केले नाहीत, त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली याबाबत कोणतीही माहिती महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध नसल्याचे निदर्शनास येणे, उत्तुंग इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी त्यांची अग्निसुरक्षा कशी तपासली जाते, आजतागायत किती इमारतींची तपासणी केली, या विषयी तपशीलवार प्रमाणपत्र देण्याचे आदेश सन २०१५ साली मा.उच्च न्यायालयाने एका प्रकरणात महानगरपालिका व अग्निशमन दलाला दिले असणे, परंतु आजपर्यंत ही माहिती देण्यात आली नसल्याचे समोर येणे, मुंबईत मागील अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात घडत असलेल्या भीषण आगीच्या घटना रोखण्याकरिता मुंबईतील गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचे फायर ऑडीट पारदर्शकपणे करण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २ | २३ | **सर्वश्री अमोल मिटकरी**, विक्रम काळे, अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, अंबादास दानवे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | "जांबरगाव (ता.वैजापूर, जि.छत्रपती संभाजीनगर) टोलनाक्याजवळ मध्यरात्री समृध्दी महामार्गावर भरधाव टेम्पो ट्रॅव्हलर ओव्हर लोडेड ट्रकला धडकल्याने भीषण अपघात होऊन १२ भाविकांचा जागीच मृत्यू व २३ जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडल्याचे दिनांक १४ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, तसेच नाशिक जिल्ह्यातील इंदिरानगर परिसरातील कुटुंबिय बुलढाणा जिल्ह्यातील सैलानीबाबा दर्ग्याच्या दर्शनासाठी गेले असताना तेथून परत येत असताना भीषण अपघात झाल्याचे निदर्शनास येणे, सदरहू अपघात प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांचे (आरटीओ) वेगवान वाहन तपासणी कार्यवाही दरम्यान झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येणे, संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द निलंबनाची कारवाई करून सदर अपघात नेमका कशामुळे झाला याची चौकशी करून शासनास अहवाल सादर करण्याबाबत तसेच मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात येईल असे मा.मुख्यमंत्र्यांनी आदेशित करणे, तदूनुषंगाने उपरोक्त प्रकरणाची वरिष्ठ पातळीवर चौकशी करून मृतांच्या कुटुंबियांना तसेच अपघातात जबर जखमी झालेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याची आवश्यकता, तसेच समृध्दी महामार्गावर यापूर्वीसुध्दा बऱ्याचदा अपघात झाले असून या अपघातात शेकडो प्रवाशांचा मृत्यू झालेला असणे, हे अपघात रोखण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | २३६ | **श्री.सत्यजीत तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>“सिन्नर औद्योगिक क्षेत्रामध्ये केंद्र सरकार सेझ अधिनियम, २००५ अन्वये इंडियाबुल्स एसइझेड या प्रकल्पासाठी शासनाने १०४७ हेक्टर ८२ आर म्हणजेच २६०० एकर क्षेत्र वाटप केलेले असणे, हा प्रकल्प सध्या बंद पडलेला असणे, दिलेल्या जमिनीपैकी फक्त सुमारे ४३३.०५ हेक्टर जमिनीवर इंडिया बुल्सने औष्णिक प्रकल्पाचे अर्धवट स्वरूपाचे काम केलेले असणे व उर्वरित जमीन विनावापर पडून असणे, इंडियाबुल्स प्रकल्पाची शिल्लक जागा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ताब्यात घेणे गरजेचे असणे, शासन कोणत्याही प्रकल्पाला जागा देताना तो प्रकल्प ठराविक वेळेत सुरु करण्याच्या अटीसह जागा देत असणे, त्यामुळे या प्रकरणात शर्तभंग देखील झालेला असणे, हा प्रकल्प करीत असताना स्थानिक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता न होणे, सद्यस्थितीत सिन्नर, नाशिक, अहमदनगर व उत्तर महाराष्ट्रातील विद्यमान व नव्याने येऊ पाहणाऱ्या उद्योगांसाठी जागा उपलब्ध नसल्यामुळे इंडियाबुल्स प्रकल्पाची जागा तातडीने एम.आय.डी.सी. ने ताब्यात घेऊन राखीव ठेवण्याची आवश्यकता असणे, या प्रकल्पाजवळच समृद्धी, सुरत चेन्नई महामार्ग, पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे असे प्रकल्प निर्माणाधीन असल्यामुळे या जागेचे मोठे महत्व असणे, त्यामुळे अपूर्ण असलेल्या इंडियाबुल्स प्रकल्पाची जागा ताब्यात घेऊन पुनर्वाटप करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.” | **८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **४** | **२०३** | **सर्वश्री सतेज** ऊर्फ **बंटी पाटील**, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, डॉ.प्रज्ञा सातव, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्य शासनाच्या गृह विभागात सध्या ५२,८२२ पोलीस शिपाई पदे रिक्त असणे, त्यामुळे पोलीस शिपाई भरती तातडीने करावी अशी अनेक उमेदवारांची मागणी असणे, पोलीस भरतीसाठी हे उमेदवार मोठ्या प्रमाणात सराव करीत असणे, कोरोना काळात अनेक उमेदवारांची वयोमर्यादा संपत असल्याने उमेदवार निराश झालेले असणे, माहे मार्च, २०२३ मध्ये सामान्य प्रशासन विभागामार्फत २ वर्ष कमाल वयोमर्यादा वाढवून देण्यात येणे, त्यानुसार दिनांक ३१ डिसेंबर, २०२३ पूर्वी पोलीस भरती जाहिरात काढून पदे भरून घेतल्यास लाखो उमेदवार पोलीस भरतीस पात्र होणार असणे, त्यामुळे शासनाने तातडीने पोलीस भरतीचा निर्णय घ्यावा अशी मागणी होत असतानाही त्यावरील कार्यवाहीस होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील पोलीस भरतीस इच्छुक उमेदवारांमध्ये पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | १८ | **सर्वश्री विलास पोतनीस**, सुनिल शिंदे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- <br> “बलात्काराचा गुन्हा दाखल करून व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करण्याची धमकी देत दिंडोरी (जि.नाशिक) येथील श्री स्वामी समर्थ आध्यात्मिक पिठाच्या विश्वस्त यांच्याकडून खंडणी मागणाऱ्या कृषी सहाय्यक महिलेस १० लाख रुपये घेताना दिनांक १९ नोव्हेंबर, २०२३ रोजी पोलिसांनी केलेली अटक, संबंधित महिला पिंप्री (ता.निफाड) येथे तालुका बीजगुणन केंद्रात कृषी सहाय्यक पदी कार्यरत असणे, सदरहू महिलेने सुमारे एक कोटीपेक्षा जास्त रक्कम उकळल्याचे भयानक वास्तव समोर येणे, पोलिसांनी घेतलेल्या सदरहू महिलेच्या घराच्या झडतीत तब्बल १९ लाख रुपये वसूल करणे, संबंधित महिलेस पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता तीन दिवसांची सुनावण्यात आलेली पोलीस कोठडी, तरी देखील संबंधित महिलेचे अद्याप शासनाने न केलेले निलंबन, परिणामी खंडणी वसूली संदर्भात शासकीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका.” | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |
| ६ | ३ | **सर्वश्री सुनिल शिंदे**, विलास पोतनीस, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- <br> “गत काही वर्षांत बेस्टच्या परिवहन सेवेला तोटा झालेला असणे, तसेच अनेक आंदोलनांनी घेरलेले असणे, बेस्टच्या ताफ्यात प्रवाशांच्या | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | सोयीसाठी दाखल झालेल्या वातानुकूलित सिंगल/ डबल डेकर बस, त्यामुळे बेस्टची प्रवासी संख्या वाढून उत्पन्न मिळण्याऐवजी तोटा वाढलेला असणे, खर्च कमी करून उत्पन्न वाढविण्याच्या उद्देशाने बेस्ट उपक्रमाने भाडेतत्वावरील बसगाड्या आणून स्वमालकीपेक्षा भाड्याच्या गाड्यांची संख्या वाढवण्यावर दिलेला भर, सहा बस पुरवठादारांकडून कंत्राटी पद्धतीवर चालक, वाहक आणि यांत्रिकी कर्मचाऱ्यांचे घेतलेले मनुष्यबळ, विविध प्रयोग करूनही बेस्टचे उत्पन्न वाढून तोटा कमी करण्यात आलेले अपयश, सन २०१९ मध्ये बेस्ट उपक्रम, मुंबई महानगरपालिका आणि कामगार संघटनांमध्ये बेस्टला आर्थिक संकटातून बाहेर काढण्यासाठी झालेला सामंजस्य करार, बेस्टला सन २०१९ ते २०२३ या काळात मुंबई महानगरपालिकेने प्रदान केलेली ६०३३ कोटी ८५ लाख रुपयांची रक्कम, तरीही बेस्टची फारशी समाधानकारक न झालेली प्रगती, त्यामुळे वर्षानुवर्षे प्रलंबित राहिलेल्या बेस्ट कर्मचाऱ्यांच्या अनेक मागण्या, बेस्टच्या ताफ्यात सद्यःस्थितीत स्वमालकीच्या असलेल्या केवळ १६८६ बस, सन २०२५ नंतर त्यांचे आयुर्मान संपणार असल्याने ताफ्यात एकही बस शिल्लक न राहण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे कर्मचारी आणि प्रवाशांमध्ये शासनाबद्दल पसरलेली नाराजीची भावना, यास्तव बेस्टच्या मालकीचा ३३३७ बसचा ताफा कायम | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ठेवण्यासह बेस्ट कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ७ | ३९७ | **सर्वश्री प्रवीण दटके**, चंद्रशेखर बावनकुळे, निलय नाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"नागपूर शहरात असणाऱ्या महानगरपालिका, नागपूर सुधार प्रन्यास आणि नझूल जमिनीवर सुमारे ४२४ अतिक्रमित झोपडपट्टी अस्तित्वात असणे, शहरातील साधारणतः ८ लाख जनसंख्या यामुळे प्रभावित असणे, सन २००२ साली शहरातील झोपडपट्टी आणि अतिक्रमण निर्मुलनाच्या अनुषंगाने गरजू नागरिकांना पट्टे वाटप करण्याचा शासन निर्णय झाला असणे, सन २००७ साली शहरातील कामगार कॉलनी, तुकडोजी नगर येथून पट्टे वाटप प्रक्रियेची सुरुवात करताना आलेल्या अडचणीच्या दृष्टीने गृहनिर्माण संस्थेच्या मार्फत पट्टे वाटप करण्याऐवजी वैयक्तिक पातळीवर करण्याबाबत बदल सुचविण्यात आले असणे, सन २०१६ च्या नागपूर सुधार प्रन्यासच्या परिपत्रकानुसार अधिकृत झोपडपट्टीवर पट्टे नियमानुकूल करण्यास सुरुवात झाली असणे, आजतागायत १० हजार पट्टे वाटप प्रक्रिया पूर्ण झाली असणे, परंतु खाजगी मालमत्ता आणि झुडपी जंगले व्याख्येत येणाऱ्या जागेवर पट्टे वाटप करण्यास शासन स्तरावर अडचणी येत असणे, झुडपी पट्ट्यांचा संदर्भ वन विभाग, केंद्र शासनाशी येत असल्याने शासनाने केंद्र शासनाशी पत्रव्यवहार आणि बैठकीतून सदर प्रश्नी सकारात्मकरित्या धोरण आखण्याची असणारी गरज, खाजगी | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मालमत्तेवरील आणि झुडपी पट्टे वाटप धोरण प्रभावीपणे राबवणेकामी जनतेचे प्रश्न आणि लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी लक्षात घेता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ८ | ३१८ | **डॉ.मनिषा कायंदे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"अंबरनाथ (पश्चिम) मौजे जांभीवली तालुका अंबरनाथ येथील सर्वे नं. ३/१अ, ब, क, ड (४० एकर) १७/ १ अ ब (१८ एकर) अशी एकूण ५८ एकर जमीन महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने संपादन केलेली असणे, सदर जमिनीचा मोबदला मिळण्यासाठी जमीन मालकांनी महामंडळाकडे अर्ज करणे, नमूद जमीन विशेष भूसंपादन अधिकारी, उल्हास खोरे प्रकल्प, ठाणे यांनी सन १९७४ साली महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी संपादीत केलेली असणे, संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला आजतागायत देण्यात आलेला नसणे, मोबदला मिळावा याकरिता भूसंपादन कायदा सन २०१३ नुसार जमीन मालकांनी शासनाच्या संबंधित विभागाकडे अर्ज करणे, जमिनीच्या मोबादल्याकरिता प्रादेशिक अधिकारी २, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ ठाणे व उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी मिळकतीबाबतचा निवाडा, कब्जे पावती, संयुक्त मोजणी पत्रक यांचा अहवाल देण्यास जाणीवपूर्वक | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | टाळाटाळ करणे, यामुळे स्थानिक शेतकऱ्यांमध्ये शासनाबद्दल निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ९ | ८७ | **श्री.विक्रम काळे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अन्न व औषध प्रशासन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "राज्यातील शाळांच्या १०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास शासनाने मनाई आदेश लागू करण्यात येणे, तथापि मुंबईतील अनेक शाळांजवळ, शहरांच्या अनेक भागात राजरोसपणे तंबाखूजन्य पदार्थ व बंदी असलेला गुटखा देखील विकला जात असल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, वास्तविक शासनाच्या एकूण १२ यंत्रणांना तंबाखूजन्य पदार्थांच्या अवैध विक्री विरोधात कारवाई करण्याचे अधिकार असणे, मात्र बहुतांश सर्वच यंत्रणांकडून अपेक्षित कारवाई होत नसल्याने मुंबईतील कांदिवली (पूर्व) येथील पायोनियर पब्लिक स्कूल, क्रांतीनगर, आकुर्ली तसेच चांदिवली येथील संघर्ष नगर वसाहतीतील पालिका शाळेसमोर व अन्य शाळांच्या परिसरात आणि घाटकोपर परिसरात सुगंधी सुपारीच्या नावाखाली पदार्थांची सर्रास विक्री होत असल्याचे निदर्शनास येत असणे, परंतु अन्न व औषध प्रशासन विभागाने गेल्या वर्षभरात या पदार्थांची विक्री करणाऱ्या टपऱ्यांविरोधात एकही कारवाई केली नसल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे शाळांमधील विद्यार्थी नकळत व्यसनाकडे ओढला जाणे, परिणामी विद्यार्थ्यांचे पालक, शिक्षण संस्थांचे मुख्याध्यापक, शाळा कृती समितीचे | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | पदाधिकारी यांचेमध्ये पसरलेला असंतोष, अलिकडेच अशाच प्रकरणातून अहमदनगर येथील सारडा विद्यालयाचे मुख्याध्यापक यांचेवर टपरीवाल्याकडून जीवघेणा हल्ला झाल्याची घटना लक्षात घेता संबंधित १२ यंत्रणांकडून कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १० | २२९ | **ॲड.अनिल परब, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "मुंबई महानगरपालिकेत सहायक आयुक्तांची पदे नियमांचे व निकषांचे उल्लंघन करून करण्यात येत असलेली भरती, महानगरपालिकेने दिनांक १७ सप्टेंबर, २०२१ रोजी कार्यालयीन आदेश काढून सहायक अभियंता यांना देण्यात आलेली "कार्यकारी अभियंता" पदाची पदोन्नती, त्यानंतर महानगरपालिका, सामान्य प्रशासन विभागाकडून दिनांक १४ नोव्हेंबर, २०२२ व तद्नंतर मार्च, २०२३ व जून, २०२३ मध्ये कार्यालयीन आदेश काढून कार्यकारी अभियंता (घ.क.व्य) परिमंडळ-७ यांना सहायक आयुक्त पदी पदस्थापना करण्यात येणे, सहायक आयुक्तांची पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून शिफारसप्राप्त व कमीत कमी तीन वर्षांचा कालावधी पूर्ण होणे बंधनकारक असतानाही अटी व शर्तींचे उल्लंघन करून काढलेल्या कार्यालयीन आदेश, याकडे शासनाचे होत असलेले | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अक्षम्य दुर्लक्ष, महानगरपालिकेने चुकीच्या पध्दतीने काढलेल्या कार्यालयीन आदेशाची सखोल चौकशी करून या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.” | | |
| ११ | ४६४ | **सर्वश्री प्रविण दरेकर**, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- “मुंबईतील मनोरंजनाचे हक्काचे केंद्र असलेले तसेच कामगार वर्गातील बऱ्याच कलाकारांना संधी देणारा परळ, मुंबई येथील दामोदर हॉल हा सांस्कृतिक वारसा असणे, त्यातून अनेक कलाकार उदयास येणे, दामोदर हॉलच्या बाजूला रहिवासी सोसायटी असणे, तथापि सदर हॉल पाडण्यात येत असल्याचे निदर्शनास येणे, परंतु त्याचा पुनर्विकासाचा कुठलाही आराखडा जाहीर न करणे, पर्यायी जागा देण्याबद्दल अनिश्चित असणे, त्यामुळे जनतेमध्ये संभ्रम व असंतोष निर्माण झाला असणे, सदरहू संभ्रमाचे वातावरण व असंतोष दूर करण्याच्या दृष्टीने पर्यायी व्यवस्था होईपर्यंत तात्काळ सदर काम शासनाने थांबवण्यात येण्याबाबत उपाययोजना करण्याची मागणी येथील जनतेने करणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना.” | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |
| १२ | ४७४ | **श्री.धीरज लिंगाडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | “यवतमाळ नगरपरिषदेमध्ये घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची नस्ती दिनांक १९ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत सादर करण्याबाबत मा. उच्च न्यायालयाने मुख्याधिकारी नगरपरिषद, यवतमाळ यांना पत्र देऊन या प्रकरणातील माहिती ही विनाविलंब या कार्यालयास सादर करावी तसेच माहिती प्राप्त न झाल्यास आपणा विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, अशी ताकीद देऊनही यवतमाळ नगरपरिषद घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण नस्ती मुख्याधिकारी नगर परिषद, यवतमाळ यांना सादर न करणे, जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना पत्र देऊन यवतमाळ नगरपरिषद घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण नस्ती शीघ्रतेने सादर करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात असे कळविण्यात येणे, मा. उच्च न्यायालयात परिच्छेद निहाय अहवाल सादर करण्याबाबत विलंब होत असणे, वरिष्ठ कार्यालयाचे निदेशांचे पालन न करता कर्तव्यात हलगर्जीपणा केल्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा वर्तवणूक, १९७९ नियम ३ चे उल्लंघन केल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस देऊन दिनांक ३ एप्रिल, २०२३ रोजी याबाबतचा खुलासा यवतमाळ नगरपरिषद घनकचरा निविदा प्रक्रिया बाबतची संपूर्ण नस्तीसह उपस्थित राहणेबाबत आदेशित करूनही उपस्थित न रहाणे, घनकचरा निविदा प्रक्रियेमध्ये मोठा गैरव्यवहार झाल्याची जनमानसात होत असलेली चर्चा, याप्रकरणी राज्य | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शासनाने सखोल चौकशी करून संबंधित नगरपरिषद मुख्याधिकारी यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **१३** | **३०** | **सर्वश्री सतिश चव्हाण**, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर येथे महापारेषणचा एकच उप विभाग असणे, भौगोलिकदृष्टया अत्यंत मोठ्या असलेल्या गंगापूर तालुक्यात २०६ गावे असणे, त्यात विविध वर्गवारीच्या वीज ग्राहकांची संख्या ८००३० एवढी असणे, त्यापैकी वाळुंज परिसरातील ग्राहकांची संख्या ५०,००० असणे, प्रस्तावित उप विभागासाठी ३०,००० ग्राहक संख्याची अट असणे, वाळुंज येथे उप विभाग निर्माण केल्यास या उप विभागास परिसरातील सर्व गावे व उद्योग १५ कि.मी.च्या अंतरावर येणार असणे, गंगापूर तालुक्यात ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या १५ उपकेंद्रातून तालुक्यातील विविध वर्गवारीच्या ग्राहकांना विज पुरवठा केला जात असणे, जायकवाडी धरणाच्या पाणी फुगवट्यामुळे बारमाही सिंचनाची व्यवस्था असल्यामुळे शेतीसाठी विजेची मागणी वाढत असणे, गंगापूर तालुक्यात सद्यःस्थितीत वाळुंज, रांजणगांव, तुर्काबाद आणि जोगेश्वरी या ४ औद्योगिक वसाहती असून तुर्काबाद व रांजणगांव या औद्योगिक वसाहती वेगाने विकसित होत असणे, शेतकरी व लघु/मध्यम औद्योगिक प्रकल्पांना उच्च दर्जाची सेवा जलद गतीने देण्यासाठी गंगापूर उप विभागाचे विभाजन करून नव्याने प्रस्तावित वाळुंज उप विभागाची | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | निर्मिती करून वाळुंज उप विभाग तसेच वाळुंज शाखेचे विभाजन करून नव्याने रांजणगांव शाखेची निर्मिती करण्यासाठीचा प्रस्ताव मागील दोन वर्षापासून प्रलंबित असणे, गंगापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना व उद्योजकांना सुरळीत पूर्णपणे वीज मिळण्यासाठी विभाजन करण्याची गरज अत्यंत असणे, यावर शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| **१४** | **४३२** | **श्री.सुरेश धस**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्यातील साखर कारखान्यांसाठी ऊस तोडणे, साळणे व त्यांच्या मोळ्या बांधून बैलगाड्या तसेच ट्रॅक्टर, मालट्रकमध्ये भरुन तो साखर कारखान्यांपर्यंत पोहोचविणे ही कामे करणारा मजुरांचा मोठा वर्ग कार्यरत असणे, हे मजूर मुख्यतः महाराष्ट्राच्या जिरायती व दुष्काळी भागातून साखर कारखान्यांवर काम करण्यासाठी वर्षातील ६ महिने येत असणे, साखर संघाने सन २०२० मध्ये १४ टक्के वाढ देऊन ३ वर्ष पूर्ण होऊनही ऊस तोडणी दरामध्ये वाढ करणेसाठी राज्यातील ७ संघटनांबरोबर करार न करणे, त्यामुळे ऊस तोडणी मजुरांची "मुकी-बहिरी कुणीही हाका" अशी अवस्था होणे, ऊस तोडणी मजुरांसाठी राज्यामध्ये कायदा अस्तित्वात नसणे, त्यामुळे साखर कारखाने, मुकादम व ऊसतोड मजुरांचा | **१३ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण आर्थिक व्यवहार हा आतबट्ट्याचा झालेला असणे, अनेक ठिकाणी मुकादमांवर ४२०, अपहरण व ॲट्रॉसिटी ॲक्ट अंतर्गत गुन्हे दाखल होणे, यास्तव राज्यातील ऊसतोड मजूर आणि मुकादमांमध्ये मोठ्या प्रमाणावर निर्माण झालेला प्रचंड असंतोष व संतापाची भावना, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **१५** | **३७६** | **सर्वश्री निरंजन डावखरे**, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्यातील काही आदिवासी व्यक्तींनी आपल्या धर्माचा त्याग करून ईसाई/इस्लाम धर्म स्वीकारणे, इतर धर्म स्वीकारून सुद्धा सदर आदिवासी व्यक्ती आदिवासी विकास विभागामार्फत मिळणारे सर्व लाभ तसेच आरक्षण सुद्धा घेत असणे, काही दिवसांपूर्वी मुंबई महानगरामध्ये आदिवासी समाजाचा संविधान दिनानिमित्त मोर्चा आला असणे, यात अन्य धर्मांत धर्मांतरीत होणाऱ्या व्यक्ती व समुदायाला अनुसूचित जमातीच्या सूचीतून व आरक्षणाच्या फायद्यातून निष्कासित करण्यात यावे अशी मागणी करण्यात आली असणे, कौशल्य विभागातील आयटीआय मध्ये अशाप्रकारच्या अनेक बोगस आदिवासी विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे निदर्शनास येणे, अशा बोगस आदिवासी विद्यार्थांवर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया." | **१४ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १६ | १०३ | **सर्वश्री अभिजित वंजारी**, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्यातील विदर्भ वैधानिक विकास महामंडळ व इतर वैधानिक विकास महामंडळ यांची मुदत सन २०१९ मध्ये संपुष्टात आली असून ५ वर्ष उलटून गेल्यावरही या वैधानिक विकास महामंडळांना मुदतवाढ देण्यासंदर्भात शासनाने कोणताही निर्णय घेतला नसणे, दांडेकर समितीच्या अहवालाच्या निष्कर्षानुसार पश्चिम महाराष्ट्राच्या निमितींपासून विदर्भातील सिंचनाचा व सर्व क्षेत्रातील विकासाचा अनुशेष भरून काढण्याच्या दृष्टिकोनातून या महामंडळाची निर्मिती करण्यात येणे, परंतु आता गेल्या ५ वर्षापासून या महामंडळाची मुदतवाढ संपल्यापासून विदर्भाचा अनुशेष भरून काढण्याकरिता कोणताही निर्णय घेतला नसणे, सन २०२२ च्या नागपूर येथील अधिवेशनात विदर्भासंबंधित अनेक घोषणा करण्यात येणे, परंतु अनुशेष भरून काढण्याकरिता अतिरिक्त निधीची मान्यता देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसणे, या वैधानिक महामंडळाच्या मुदतवाढीकरिता केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवून | १४ डिसेंबर, २०२३ | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | त्याचा पाठपुरावा करून ६ महिन्याच्या आत वैधानिक विकास महामंडळे पूर्ववत सुरू करण्याचे आश्वासन देवूनही प्रत्यक्षात कोणतीच कार्यवाही न होणे, त्यामुळे विदर्भाचा सर्व क्षेत्रातील अनुशेष वाढत असल्याने पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| १७ | ३८८ | **श्री.महादेव जानकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "मुंबईतील मुलुंड येथील सर्व्हे क्र. ६२२ पी, जमीन क्रमांक २६९ पी, ६२२ ब, ६२४ मधून २७८१९.५० चौ.मी. सन १८९४ मध्ये संन्यासी सेठ नथूलाल यांनी मृत्यूपूर्वी साधू, संन्यासीसाठी निवारा व भोजनगृह, भटक्या गायी, वासरे, गोठ्याच्या बांधकामाकरिता केलेली दान, त्यासंदर्भात मृत्यूपूर्वीचे केलेले दानपत्र, या जमिनीवर ५० मजूर गायींची सेवा, महात्म्यांच्या सेवेसाठी कार्यरत, असे असताना दिनांक २३ डिसेंबर, १९९४ ट्रस्टने कोकण विभाग आयुक्तांकडे ४ हजार चौ.मी. जागेवर २० युएल कायदा १९७६ च्या कमकुवत कलमांतर्गत गोठयात काम करणाऱ्या कौरतीया मजुरांसाठी घरे बांधण्याची परवानगी मागितली असता कोकण आयुक्तांनी दिलेली परवानगी/मान्यता, ट्रस्टने सर्व जमीन विकासकास कवडीमोल दराने विक्री करणे, उर्वरित जमीन २७८१९.५० चौरस मीटर सन २००६ मध्ये धर्मादाय आयुक्तांनी शा.नि. तबेले/गोशाळे मुंबईबाहेर हलविण्याचा आदेश, जमिनी गोठ्यासाठी, भिक्षूंसाठी शेड निवारा, अन्नासाठी दान केलेली असताना धर्मादाय आयुक्तांनी कोणतीही | **१४ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | खातरजमा न करता विश्वस्त व समता विकासक यांच्याशी हातमिळवणी करून रुपये ५ कोटी ४० लाख किंमतीची जमिन विकण्याची परवानगी, समता विकासक व त्यांच्या भागीदारांनी जमीन विविध बँकाकडे गहाण ठेऊन ३९०० कोटीचे घेतलेले कर्ज, उभारलेले टॉवर, उक्त जमीन सेठ नथूलाल यांनी मृत्यूपूर्वी साधू, संन्यासीसाठी निवारा व भोजनगृह, भटक्या गायी, वासरे, गोठ्याच्या बांधकामाकरिता दान केलेली असताना ट्रस्टने विकासकाबरोबर संगनमत करून केलेल्या गैरव्यवहाराप्रकरणी चौकशी करण्याची आवश्यकता, शासनाने सखोल चौकशी करून तिथे काम करणाऱ्या मजुरांना त्यांच्या राहण्याची सोय करण्याबाबत व दोषी विश्वस्त, विकासक व इतर शासकीय अधिकारी यांच्याविरुध्द कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| १८ | ४७७ | **सर्वश्री जयंत पाटील**, अनिकेत तटकरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "रायगड जिल्ह्यातील अनेक नद्यांवर पाणी योजना राबविल्यानंतरही जल सिंचनाची स्थिती गंभीर असणे, वाढत्या औद्योगिकरणाबरोबर लोकवस्तीला पाणी पुरवठा करतांना रब्बी हंगामातील शेती संकटात येत | **१४ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | असणे, रायगड जिल्ह्याचा शाश्वत विकास घडवताना जलसंपदा विभागाचे बाळगंगा, हेटवणे, सांबरकुंड, काळकुंभे, अंबोली हे प्रकल्प अनेक वर्ष अपूर्ण अवस्थेत असल्याने तत्कालीन जलसंपदा मंत्री यांनी याबाबत आढावा बैठक घेऊन या प्रकल्पासंबंधीची प्रलंबित कामे पूर्ण करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, परंतु अद्यापही याबाबतचे प्रस्ताव सादर न केल्याने काळकुंभे धरणाचे ७० टक्के काम होऊनही हा प्रकल्प रखडलेला असणे, सांबरकुंड धरणासाठी जून २०२० रोजी रू.७४२ कोटीची सुधारित मान्यता देण्यात येऊनही अद्याप काम सुरू न होणे, तर पेण तालुक्यातील बाळगंगा धरणाचे काम सन २००९ पासून अपूर्ण अवस्थेत असून हेटवणे धरणास चतुर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता न दिल्याने या धरणापासून ३२ कि.मी. अंतरावर असणाऱ्या ५२ गावांमध्ये पिण्याच्या पाण्याच्या तीव्र टंचाईसह शेतकऱ्यांना दृष्काळसदृष्य परिस्थितीला सामोरे जावे लागणे, याबाबत शेतकऱ्यांनी वेळोवेळी मोर्चे, आंदोलने करूनही शासनाने याकडे दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व कार्यवाही." | | |
| **१९** | **३१** | **डॉ.वजाहत मिर्झा**, सर्वश्री धीरज लिंगाडे, अभिजित वंजारी, राजेश राठोड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **१४ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | "महाराष्ट्र शासनाद्वारे विविध समाजातील तरुणांच्या सर्वांगीण विकासासाठी चालविण्यात येणाऱ्या स्वायत्त संस्था बार्टी, टार्टी, सारथी, अमृत आणि महाज्योती यांच्या धर्तीवरच महाराष्ट्रातील मुस्लिम समाजाच्या तरुणांसाठी मार्टी म्हणजेच 'मौलाना आझाद रिसर्च अँड ट्रेनिंग सेंटर' ची स्थापना महाराष्ट्र शासनाने करावी याबाबत मुस्लिम समाजाकडून मागील तीन वर्षांपासून सातत्याने मागणी केली जात असणे, परंतु शासनाने याबाबत मार्टी ची स्थापना करू या आश्वासना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची कृती अद्याप पर्यंत केलेली नसणे, मार्टी कृती समितीकडून मा.मुख्यमंत्री व अल्पसंख्यांक विकास मंत्री तसेच आमदार व खासदार यांना निवेदन देऊन सातत्याने या मागणीबाबत पाठपुरावा करण्यात आलेला असणे, परंतु शासनाकडून अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मार्टीच्या स्थापनेबाबत फक्त आश्वासन दिली जात असणे, ऑक्टोबर २०२३ दरम्यान राज्य शासनाने बार्टी, टार्टी, सारथी, अमृत आणि महाज्योती या संस्थांमध्ये सुसूत्रता व एकता आणण्याचे दृष्टीने एक जीआर काढलेला असणे, परंतु हा शासन निर्णय काढताना मुस्लिम समाजातील तरुणांसाठी आवश्यक असलेल्या मार्टी च्या स्थापनेसाठीच्या मागणीकडे शासनाने दुर्लक्ष केलेले असणे, राज्यात मुस्लिम समाजातील विद्यार्थ्यांच्या विकासासाठी मौलाना आझाद रिसर्च | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अँड ट्रेनिंग इन्स्टिटयूट अर्थात मार्टीची स्थापना तातडीने करण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २० | २२४ | **श्री.अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्यातील मध्यमवर्गीय व अल्पवर्गीय शेतकऱ्यांच्या समस्या लक्षात घेऊन शेतकऱ्यांच्या हितासाठी सन २०२१ मध्ये शासनाने नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना (पोकरा) सुरु केलेली असणे, उक्त योजनेच्या माध्यमातून राज्यातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ होऊन शेतकरी आत्महत्या रोखण्यास मदत होईल यासाठी राज्याच्या १५ जिल्ह्यातील ५१४ खेड्यांमध्ये सदर योजना सुरु करण्याची घोषणा शासनाकडून करण्यात आलेली असणे, तथापि, अकोला जिल्ह्यातील ११६ गटांमध्ये कृषी कंपन्यांनी अवजारे खरेदीमध्ये अनियमितता केलेली असणे, सदरहू योजनेच्या अटी व शर्तीनुसार ट्रॅक्टरसह किमान ५ अवजारे खरेदी करणे बंधनकारक असतानाही ट्रॅक्टर खरेदी न करता अवजारे खरेदी करण्यात आलेल्या गटाला सुध्दा अनुदान देण्यात आले असणे, जूनी अवजारे रंगरंगोटी करून नवीन खरेदी करण्यात आल्याचे दाखविले असणे, याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, वाशिम यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत बोगस देयकांच्या आधारे खरेदी करण्यात आलेल्या अवजारांची चौकशी केलेली असणे, उक्त प्रकरणी शासनाने | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | चौकशी करून अनियमितता करणाऱ्या संबंधित गट, शेतकरी कंपन्या यांचेवर गुन्हे दाखल करून त्यांना सहाय्य करणाऱ्या कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांना बडतर्फ करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २१ | ५९० | **सर्वश्री विक्रम काळे**, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्यावतीने राज्यातील शाहु, फुले, आंबेडकर निवासी अनुसचित जाती निवासी / अनिवासी आश्रमशाळांची तपासणी करणे, त्याची अ, ब, क, ड अशी वर्गवारी श्रेणी करणे, या श्रेणीनुसार शाळांना २० टक्के वेतन अनुदान देण्याचा निर्णय सन २०१९-२० मध्ये घेणे, गत अधिवेशनामध्ये या शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतन अनुदान तातडीने सुरु करण्यात येईल, असे तत्कालीन मंत्री महोदयांनी सभागृहाला आश्वासित करणे, या प्रश्नासाठी मराठवाडा विभागाच्या शिक्षक लोकप्रतिनिधींनी पाठपुरावा करून मा. मुख्यमंत्री महोदयांकडे या प्रश्नासाठी बैठकीचे आयोजन करणे, मा. मुख्यमंत्री महोदयांनी या सर्व शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीप्रमाणे वेतनअनुदान देण्यासाठी तात्काळ प्रस्ताव मंत्रीमंडळापुढे आणण्याच्या सूचना देऊन बराच कालावधी उलटणे, तरीही आजपावेतो या शाळांमधील | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतन श्रेणीनूसार वेतन अनुदान मिळत नसणे, यामुळे शिक्षक/कर्मचाऱ्यांची होत असलेली उपासमार व उर्वरित सर्व शाळांतील शिक्षक/कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणीनुसार वेतन अनुदान देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना." | | |
| **२२** | **५४८** | **सर्वश्री सचिन अहिर**, अमोल मिटकरी, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्षवेधतील :-<br><br>"मुंबई शहर माझगांव विभागातील भू.क्र.३६५ व ३६९ हे भूखंड जे पी एम जीजीभॉय ट्रस्ट, वाडिया ट्रस्ट, पेटीट ट्रस्ट, गोदरेज ट्रस्ट, मुंबई या ट्रस्टना दिनांक १२ एप्रिल, १९१० मध्ये भाडेपट्टयावर देण्यात येणे, सदरील भाडेपट्टयाची मुदत संपल्यामुळे जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर यांनी शासन निर्णय २०१२ नुसार मुंबईतील शासकीय जमिनीवरील संपुष्टात आलेल्या भाडेपट्टयांचे नूतनीकरण करण्यासंबंधीच्या विहित धोरणानुसार सदर भोगवटाधारकांना कळविण्यात येणे, मात्र त्यांच्याकडून त्याला प्रतिसाद देण्यात न येणे, त्याचप्रमाणे सदर मिळकतीवरील भाडेपट्टयाची रुपये ९ कोटी ५७ लाख २० हजार ६९७ इतकी रक्कम भरण्यात आलेली नसणे, शासनामार्फत जप्तीची कारवाई करण्यात येत असताना ट्रस्टकडून थकीत रक्कम भरण्याबाबतचे हमीपत्र लिहून देण्यात येऊन कारवाई थांबविण्याची करण्यात आलेली विनंती, परंतु अद्यापही रक्कम शासनाकडे जमा करण्यात आलेली नसणे, असे असताना एनओसी न घेता सदरील जमीन परस्पर विकासकांना विकण्यात येणे, | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | याबाबत जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्याकडून कारवाईस दिरंगाई होत असणे, माझगांव येथील प्राईम लोकेशनची जमीन भोगवटाधारकांकडून शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून विकासकाला विकण्यात आलेली असणे, त्यामुळे शासनाचा करोडोचा महसूल बुडविण्यात येणे, सदर भूखंडावर वर्षानुवर्षे राहत असलेल्या रहिवाशांवरही दबाव आणला जात असून गरीब रहिवाश्यांना येथून बेदखल करण्यात येत असल्याने रहिवाश्यांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, याप्रकरणी शासनाने चौकशी करून संबंधितावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका." | | |
| **२३** | **५६३** | **डॉ.प्रज्ञा सातव**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"कळमनुरी येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या हद्दीतील नामांकीत शाळांमध्ये विद्यार्थ्यांना अनेक सोयीसुविधांचा अभाव असणे, या निवासी शाळांमध्ये विद्यार्थ्यांना स्वतःच्या हातानेच स्वयंपाक करून जेवण बनवावे लागत असल्याच्या तक्रारी असणे, नामांकीत इंग्रजी शाळेत सुविधा नसणे, मात्र सुविधा मिळत असल्याचा अहवाल देण्यात येणे, याप्रमाणेच सोनपेठ येथील विजन पब्लिक स्कूलसह आणखी काही नामांकीत इंग्रजी शाळांबाबत अशाचप्रकारे अनेक तक्रारी असणे, | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कळमनुरी आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत १०० विद्यार्थ्यांना पूर्णा येथील नामांकीत इंग्रजी शाळेत प्रवेश देणे, ज्या शाळेत प्रवेश दिला त्या ठिकाणी विद्यार्थ्यांसाठी कुठल्याही प्रकारच्या सोयीसुविधा नसणे, एका मोठ्या हॉलमध्ये शेकडो विद्यार्थी राहत असणे, नामांकीत इंग्रजी शाळा असताना तेथे काही वर्गासाठी इंग्रजी विषयाचा शिक्षकच नसल्याचा पालकांच्या तक्रारी असणे, तसेच दर महिन्याला अधिकारी भेट देऊन विद्यार्थ्यांना सोयी सुविधा मिळत असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळवित असणे, विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण व सोयीसुविधा मिळतात किंवा नाही याकडे लक्ष देणे वरिष्ठ अधिकारी यांचे काम असताना देखील ते प्रत्यक्ष भेट न देताच बोगस अहवाल तयार करीत असणे, परिणामी विद्यार्थी व पालकांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने हायटेक पूर्णा व विजन पब्लिक स्कूल सोनपेठसह सर्व नामांकीत शाळांची शाळेतील संपूर्ण कागदपत्रांची व सोयीसुविधांची तात्काळ तपासणी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याबाबत करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| २४ | ३३६ | **श्री.गोपिचंद पडळकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "पवित्र पोर्टल मार्फत शिक्षक भरतीसाठी बिंदूनामावली अद्ययावत करण्याबाबतचे शिक्षण आयुक्त यांचे दिनांक २० जुलै, २०२३ रोजीचे पत्र निर्गमित झालेले असणे, त्यामधील (ब) मध्ये बिंदूनामावली रोस्टर | **१५ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | बाबत खुल्या प्रवर्गाच्या तक्रारी विचारात घेऊन ज्या सूचना निर्गमित केलेल्या असणे, त्याच पद्धतीने NT-C (भज-क) प्रवर्गाचीही बिंदूनामावली तपासताना त्रुटी दूर केली जावी, बिंदूनामावलीतील घोळ दूर करून NT-C प्रवर्गाला ३.५ टक्के आरक्षण नुसार जागा मिळणेबाबत दिनांक १८ मे, २०२३ रोजीचे निवेदन दिलेले असणे. मागील सन २०१७ मधील शिक्षक भरतीमध्येही NT-C आरक्षण ३.५ टक्के असूनही आरक्षणानुसार (एनटीसी प्रवर्गातील) जागांची भरती केली जात नसणे, त्याला कारण म्हणजे एनटीसी प्रवर्गातील ज्या उमेदवारांची मेरिटनुसार खुल्या गटात (open) मध्ये निवड होते, त्या जागांची नोंद रोस्टर तपासणीत जनरलमध्ये होण्याऐवजी एनटीसी प्रवर्गामध्ये धरून रोस्टर तपासला जाणे, त्यामुळे एनटीसी (NT-C) प्रवर्गातील जागांचा अनुशेष (रिक्त) राहण्याऐवजी अतिरिक्त दाखवल्या जात असणे, रोस्टर घोटाळ्यामुळे एनटीसी प्रवर्गातील ३.५ टक्के प्रमाणे जागांचा अनुशेष शिल्लक असूनही अतिरिक्त जागा दाखवल्यामुळे एनटीसी प्रवर्गातील उमेदवारावर अन्याय होणे, त्यामुळे शासन स्तरावरून सर्व जिल्हा परिषद मधील एनटीसी प्रवर्गाच्या बिंदूनामावली तपासणीतील त्रुटी दूर करण्यासंदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना योग्य आदेश देण्याची विनंती विद्यार्थी, लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे करूनही शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही." | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५ | २१५ | **सर्वश्री किरण सरनाईक**, जयंत आसगावकर, किशोर दराडे, अभिजित वंजारी, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"शासन निर्णय दिनांक १२ व १५ फेब्रुवारी, २०२१ व ६ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्रातील बहुतांश अनुदानास पात्र प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांना अनुदान मिळत असणे, त्यादरम्यान केवळ शाळेचे मूल्यांकन उशिरा झाल्यामुळे बहुतांश शाळा अनुदानापासून वंचित राहिलेल्या असणे, त्यांच्या सोबतच्या शाळा पात्र ठरल्यामुळे व या शाळा किरकोळ त्रुट्यांमुळे मागे राहून अनुदानापासून वंचित राहिल्याने या कर्मचाऱ्यांमध्ये नकारात्मकतेची भावना निर्माण होणे, या शाळांनी त्यांची शिक्षण आयुक्त तथा शिक्षण संचालक स्तरावरील सर्व त्रुटी पुर्ततेची कार्यवाही केलेली असणे, मागील दहा ते पंधरा वर्षापासून विनावेतन काम करत असल्यामुळे यांना वेतन अनुदानाची नितांत आवश्यकता असणे,त्यामुळे हे प्रलंबित प्रस्ताव तात्काळ निकाली काढून या सर्व प्रलंबित राहिलेल्या विनाअनुदानित शाळांना अनुदानास पात्र घोषित करून या सर्व शाळांना अनुदान देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | **१८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |
| २६ | ६१२ | **श्री.जयंत पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **१८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | "राज्यासह देशात घरोघरी देवांच्या मूर्तीचे पूजन केले जात असून विधीवत त्याचे विसर्जन जलाशयात केले असणे, सार्वजनिक स्तरावर होणारे सणांचे साजरीकरण हे जन समुदायात नवचैतन्य देणारे असणे, रायगड जिल्ह्यातील पेण, हमरापूर हे गणेश मूर्तींचे माहेरघर समजले जात असणे, महाराष्ट्रात कोकण, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्रासह देश विदेशात या मूर्तींची निर्यात मोठ्या प्रमाणात केली जात असणे, मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार प्लास्टर ऑफ पॅरीसच्या मूर्तींमध्ये प्रदूषणकारक घटक कमी करण्याकरिता मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करून प्राथमिक अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात येणे, राज्य शासनाकडून जाणीवपूर्वक उत्सवाच्या अगोदर पी.ओ.पी. मूर्तीकारांनी तयार केलेल्या मूर्ती विक्रीवर बंदी घालण्यात येणे, यामुळे मूर्तीकारांना मोठया प्रमाणात आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागणे, यामुळे पी.ओ.पी. मूर्तीकारांमध्ये मूर्ती बनविण्याबाबत संभ्रम निर्माण होणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| २७ | ५८९ | **सर्वश्री प्रविण दरेकर**, निरंजन डावखरे, प्रसाद लाड, अंबादास दानवे, रमेश पाटील, सचिन अहिर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **१८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

"सोलापूर जिल्ह्यातील शासन मान्य सार्वजनिक ग्रंथालयांना अडीच कोटींचे ग्रंथ दिनांक १९ जुलै, २०२३ रोजी पुरविण्यात येणे, यामध्ये ग्रंथालय संचालक यांनी शासन निर्णय असताना सुद्धा स्वतः परिपत्रक काढून मनमानी करत अडीच कोटींची खरेदी केवळ ३ निविदा मागवून आपल्या मर्जीतल्या विक्रेत्याला पुरवठा आदेश देऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केलेला असणे, ग्रंथालय संचालक यांनी दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी परिपत्रक काढून राज्यातील शासकीय ग्रंथालयांना नाविन्यपूर्ण योजनेतुन कोणताही निधी घेता येणार नाही असे स्पष्ट नमूद केले असणे तसेच नियोजन शासन निर्णय दिनांक २७ ऑगस्ट, २०१४ मध्ये स्पष्ट नमूद असूनही परिपत्रक काढण्यात येणे, त्याचबरोबर दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजी दुसरे परिपत्रक काढून दिनांक १ एप्रिल, २०२३ पर्यंत वरील दिनांक १० फेब्रुवारी, २०२३ रोजीच्या परिपत्रक लागू होणार नाही असे त्यांनी नमूद केले असणे, दिनांक १ डिसेंबर, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार तसेच ३ लाखांवरील खरेदी ई-टेंडरद्वारे करावी असे स्पष्ट नमूद असूनही संचालकांनी सोलापूर जिल्हा ग्रंथालय अधिकाऱ्यांना मौखिक सूचना देऊन ३ निविदा घेऊन रुपये अडीच कोटींची खरेदी केलेली असणे, दिनांक १९ जानेवारी, २०१६ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या शासन निर्णयामध्ये खरेदी समितीद्वारे खरेदी करावी असे स्पष्ट असूनही त्यांनी तसे केले नसणे, ग्रंथालय संचालक यांनी शासन निर्णयातील अटीची पूर्तता न करता केवळ आपल्या मनमानी कारभार व

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मोठया प्रमाणात केलेल्या भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता व ग्रंथालय संचालक यांना सक्तीच्या रजेवर पाठवून त्यांच्यावर शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रीया " | | |
| २८ | ४८८ | **श्री. श्रीकांत भारतीय, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- <br> "कृत्रिम बुध्दिमत्ता अर्थात AI (Artificial Intelligence) ही मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनत असून भविष्यात जागतिक स्तरावर त्याची व्याप्ती अधिक प्रमाणात वाढण्याची शक्यता निर्माण होणे, AI च्या वेगवान प्रवाहात आपल्या राज्याला सामावून घेण्याकरिता Strong Social and Economic Structure तयार करण्याची आवश्यकता, AI चे तंत्रज्ञान आत्मसात करताना रोजगार निर्मितीपासून ते रोजगार सुरक्षितता तसेच शिक्षणाच्या गुणवत्तेपासून ते नैतिक व जबाबदार तंत्रज्ञान वापरणाऱ्यांपर्यंत सर्वच बाबींचा सखोल विचार करण्याची आवश्यकता, आपल्या राज्याला या क्षेत्रात सक्षम व अग्रेसर बनविण्याची एक सुवर्णसंधी निर्माण झालेली असणे, या संधीचा आपण फायदा न घेतल्यास AI च्या प्रभावाने भविष्यात प्रभावित होणाऱ्या रोजगाराच्या संधीपासून आपल्या राज्यातील युवक वंचित राहण्याची शक्यता तसेच AI च्या प्रभावाने भविष्यात निर्माण होणारे संभाव्य धोके व गरज लक्षात घेता शासनाने या प्रकरणी कौशल्य विकास | **१८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | विभागामार्फत या क्षेत्रातील तज्ञ व तंत्रज्ञानाशी निगडीत बाह्य गुणवत्तेच्या (External Talent) सहभागाने AI शी निगडीत अभ्यासक्रमाची निर्मिती करून तो तातडीने अंमलात आणण्याची आवश्यकता, सद्यःस्थितीत व भविष्यात या क्षेत्रात गुंतवणूक करणाऱ्या कंपन्यांना राज्यात आकर्षित करण्यासाठी, प्रोत्साहित करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, एकंदरीत राज्याच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, उद्योग अशा विविध क्षेत्रांवर प्रभाव पाडणाऱ्या AI बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही याबाबतची शासनाची नेमकी भूमिका." | | |
| २९ | ४५२ | **श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"श्री शनिशिंगणापूर जिल्हा अहमदनगर या राज्यस्तरीय तीर्थ व पर्यटन क्षेत्राकरिता सध्या असलेल्या विश्वस्त मंडळाद्वारे मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार व अनियमितता करण्यात आली असणे, देवस्थानातील कर्मचारी भरतीमध्ये कुठलीही जाहिरात न देता बोगस कर्मचारी भरती करण्यात आली असणे, कर्मचाऱ्यांकरिता बायोमेट्रिक हजेरी पद्धत व दैनंदिन कार्याचे रजिस्टर न ठेवता अनेक कर्मचाऱ्यांना घर बसल्या वेतन देण्यांत येत असणे, दर्शनाकरिता बोगसरित्या पावत्या छपाई करून कोट्यवधीचा भ्रष्टाचार झालेला असणे, अनेक कर्मचारी खाजगी कंपन्यांमध्ये नियमितरित्या कार्यरत असतानाही त्यांना संस्थानमध्ये कार्यरत दाखवून | **१९ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | त्यांची नियमित नियुक्ती करण्यात आली असणे, श्री शनेश्वर देवस्थान मध्ये विश्वस्त व्यवस्था अधिनियम, २०१८ हा कायदा लागू करण्यात यावा असा ठराव दोन्ही सभागृहात मंजूर करण्यांत येऊनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसणे, श्री शनिशिंगणापूर देवस्थानला प्राप्त होणारी कोट्यवधीची देणगी परस्पर खाजगी संस्थेकडे वळती करण्यात आली असणे, राज्य शासन व धर्मदाय आयुक्त यांच्या कोणत्याही आदेशाला न जुमानता संस्थानाचा कारभार मनमानी पध्दतीने चालत असल्याने याची चौकशी करून विश्वस्त मंडळ बरखास्त करणे व प्रशासकाची नेमणूक करण्याबाबत अनेकदा तक्रारी करूनही दखल घेतली नसल्याने स्थानिक भाविकांनी आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला असणे, शासनाने या गंभीर प्रकरणाची दखल घेऊन करावयाची आवश्यक कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **३०** | **३३१** | **श्रीमती उमा खापरे**, सर्वश्री प्रविण दरेकर, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- <br> “राज्यात गंगा स्नानाचे महत्त्व प्राप्त असलेल्या आणि लाखोंची तहान भागवणाऱ्या मावळ तालुक्याची लोकमाता इंद्रायणी नदी उगम स्थानातूनच प्रदूषित होत असणे, औद्योगिक आणि नागरी भागातील मैला आणि | **१९ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली (उक्त दिवशी याच विषयासमान अर्धातास चर्चेची सूचना असल्याने एकत्रित चर्चा झाली.)** |

रसायनमिश्रित सांडपाण्यामुळे नदीच्या पावित्र्यासह लाखो जलचर आणि नागरिकांचे आरोग्य यामुळे धोक्यात आलेले असणे, वारंगवाडी लगतच्या इंद्रायणी-आंद्रा नदी संगम पासून पुढे नदीकाठच्या गावाची संख्या वाढत असल्याने इंद्रायणी नदीचे पाणी प्रदूषित होत असणे, राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळासह स्थानिक स्वराज्य संस्था आणि एमआयडीसीच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे इंद्रायणी नदी प्रदूषित झाली असणे, पुणे महापालिका व पिंपरी चिंचवड महापालिका परिसरात व पीएमआरडीए क्षेत्रातून वाहणारी इंद्रायणी नदी प्रदूषित होत असणे, हॉटेलमधील टाकाऊ पदार्थांच्या ओल्या कचऱ्यापासून गॅस निर्मिती करणाऱ्या कंपनीचे विनाप्रक्रिया सांडपाणी थेट ओढ्यात सोडल्याने ते पाणी नदीला येऊन मिळत असणे, इंद्रायणी नदीच्या काठावर ठिकठिकाणी बंधारे बांधून ग्रामपंचायतीने आपापल्या गावांच्या पाणीयोजना केल्या असून या कामशेत पासून नाणे, नवीन, उकसान, नानोली, साई, पारवाडी, घोणशेत, कचरेवाडी, वाउंड, कान्हे, नायगाव, जांभूळ, साते, सांगवी, वारंगवाडी, कातवी, आंबी आदीगावांचा समावेश असणे, इंद्रायणी नदी पुढे पिंपरी-चिंचवड मार्गे देहू आळंदी या परिसरात इथून पुढे जात असताना औद्योगिक क्षेत्रातून येणारे रसायन मिश्रित पाणी आणि मोठ्या प्रमाणात घरगुती मैला मिश्रित सांडपाणी हे या नदीत मिसळत असल्याने या नदीला प्रदूषण मुक्त करण्याची मागणी पर्यावरणस्नेही बरोबरच सर्वसामान्य जनतेतूनही होत असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना."

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| **३१.** | **२७६** | **श्री.अशोक** ऊर्फ **भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"जि.धाराशिव येथे दिनांक २२ डिसेंबर, २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य भरारी पथक यांनी नोंदवलेल्या गुन्ह्यात गोवा राज्यात निर्मित केलेले विदेशी मद्याचे सुमारे २०४ बॉक्स जप्त करण्यात येणे, या गुन्ह्यामध्ये दोन आरोपींना अटक करण्यात येणे, आरोपींनी दिलेल्या माहितीनुसार सदरचा माल सोलापूर येथे राहणाऱ्या रहिवाशाने पुरविला असल्याचे सांगणे, या प्रकरणाची सखोल चौकशी करणे अपेक्षित असताना मात्र सदर प्रकरणाची तत्कालीन निरीक्षक, भरारी पथक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सखोल चौकशी न करता हेतूपुरःसरपणे दुर्लक्ष केल्याचे स्पष्ट होणे, त्यामुळे त्यांना दिनांक ४ डिसेंबर, २०२० रोजी निलंबित करण्यात आलेले असताना सुमारे ९ ते १० महिन्याच्या निलंबनाच्या नंतर पुणे जिल्ह्यात पुनर्स्थापित करण्यात आले असणे, वास्तविक, मुळात निलंबन कालावधी संपुष्टात झाल्यानंतर किंवा एखाद्या निलंबित कर्मचाऱ्याला पूनर्स्थापित करताना त्या कर्मचाऱ्याला शिक्षा म्हणून ज्या पदस्थापनेवरून निलंबित झाले आहे ते वगळता इतर ठिकाणी त्यांची पदस्थापना करण्यात यावी, अशी नियमात तरतूद असताना त्यांची सेवा महाराष्ट्र राज्य, भरारी पथक येथे पद उपलब्ध | **१८ डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | नसतानाही वर्ग करण्यात येणे, त्यामुळे या प्रकरणात मोठा गैरव्यवहार झाला असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत आरोपींवर कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **३२.** | **४२१** | **श्री.एकनाथराव खडसे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्यातील तृतीयपंथी समुदायाला संधीची समानता मिळण्यासाठी तृतीयपंथी हक्क अधिकार संघर्ष समितीच्या वतीने शासकीय नोकरी व शिक्षणात १ टक्के समांतर आरक्षण देऊन तृतीयपंथी समुदायाला सामावून घ्यावे, शासनाचे कल्याणकारी योजना, घरकुल तसेच इतर आवास योजनांमध्ये कागदपत्रांच्या जाचक अटी शिथिल करून तृतीयपंथी व्यक्तीस लाभ देण्यात यावा अशा विविध मागण्यांसंदर्भात दिनांक १२ एप्रिल, २०२३ व दिनांक २७ जून, २०२३ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मोर्चा काढणे, मा.मुख्यमंत्री व मान्यवरांनी भेटी दरम्यान मागणी संदर्भात आश्वासन देणे, परंतु अद्यापपावेतो आश्वासनाची पूर्तता न करणे, जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तृतीयपंथी हक्क अधिकार संघर्ष समिती महाराष्ट्र राज्य यांचेकडून दिनांक ३० ऑक्टोबर, २०२३ ते दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या दरम्यान पुन्हा आमरण अन्नत्याग उपोषण करणे, मात्र सदर विषय गांभीर्याने न घेता ठोस निर्णय न होणे, महाराष्ट्र शासनाच्या उदासीन धोरणामुळे तृतीयपंथी समुदायामध्ये शासनाप्रती निर्माण झालेली तीव्र नाराजी, तृतीयपंथी हक्क व संरक्षण विधेयक, २०१९ व नालसा निकाल | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | २०१४ अन्वये तृतीयपंथी समुदायाला संधीची समानता मिळण्यासाठी शासकीय नोकरी, शिक्षणामध्ये समांतर आरक्षण लागू करणे, प्रवर्ग निहाय भरती प्रक्रियेमध्ये १ टक्के समांतर आरक्षण लागू करून तृतीयपंथी समुदायाला सामावून घेऊन लाभ देण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३३. | २७१ | **प्रा.राम शिंदे**, सर्वश्री प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "राज्यात यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील खरडगाव येथील कंत्राटी लाईनमन यांचा विद्युत पोलवर अपघाती मृत्यू झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी सर्वपक्षीय सामाजिक संघटना व सकल धनगर समाज बांधव तसेच नेर तालुक्यातील शिरजगाव, खरडगाव परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी केली असणे, या मागणीची तात्काळ दखल घेऊन त्यांच्या कुटुंबियांना ५० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य करून त्यांच्या कुटुंबातील एका व्यक्तीला शासकीय नोकरीत सामावून घेण्याची मागणी त्यांच्या | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कुटुंबियांनी व परिसरातील शेतकरी व ग्रामस्थांनी केली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ३४. | ९२ | **सर्वश्री अरुण लाड**, धीरज लिंगाडे, अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, सर्वश्री सतेज ऊर्फ बंटी पाटील, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने दिनांक २५ व २६ ऑक्टोबर, २०२३ मध्ये एमपीएससीच्या प्रशिक्षण प्रवेशासाठी परीक्षा घेण्यात येणे, या परिक्षेसाठी ३९ हजार पेक्षा जास्त उमेदवार पात्र ठरलेले असणे, त्यापैकी १९ हजार १७३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिलेली असणे, परिक्षेचा निकाल महाज्योतीच्या वेबसाईटवर जाहीर करण्यात येणे, ही परिक्षा २०० गुणांची असताना प्रत्यक्षात विद्यार्थ्यांना २०० पेक्षा जास्त गुण मिळणे, या निकालामुळे विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम निर्माण होणे, हा निकाल जाहीर करण्याचे काम एका खाजगी एजन्सीला देण्यात आले असल्यामुळे या निकालात गोंधळ झाल्याचे स्पष्ट होणे, त्यामुळे जबाबदार एजन्सीवर कारवाई करण्याबाबत मागणी होत असतानाही शासनाकडून कारवाई करण्यास होत असलेला विलंब, यासंदर्भात चौकशी करुन विद्यार्थ्यांना न्याय देण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया." | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३५. | ३९२ | **श्री.आमश्या पाडवी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"नंदुरबार जिल्हा हा महाराष्ट्रातील पहिला "अंमलीपदार्थ मुक्त जिल्हा" असल्याची घोषणा विशेष पोलीस निरिक्षक यांनी केल्यानंतर स्थानिक प्रशासनाने दिनांक १९ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास "अंमलीपदार्थ मुक्त जिल्हा" कार्यक्रम साजरा करणे, अंमलीपदार्थ मुक्त जिल्हा म्हणून नंदुरबार जिल्ह्याची घोषणा झाल्यानंतर आठवडाभरात म्हणजेच दिनांक २५ ऑगस्ट, २०२३ रोजी नंदुरबार जिल्ह्यातील नवापूर पोलीसांनी ९ लाख रुपयांची विनापरवाना वाहतूक होत असलेल्या देशी दारुचा मुद्देमाल जप्त करण्यात येणे, तसेच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात गांजाची शेती असल्याचेही निदर्शनास येणे, परिणामी काही पोलीस अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क विभाग, परिवहन विभागातील अधिकारी हे अंमलीपदार्थ तस्करांना पाठीशी घालत असल्याचे उघडकीस येणे, शासनाने उक्त प्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून दोषी आढळून येणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |
| ३६. | ५२२ | **श्री.नरेंद्र दराडे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | "मौजे खंबाळे (ता.इगतपुरी, जि.नाशिक) येथील गट क्र.४२८/१ येथे अनधिकृतपणे खडी क्रशर सुरु असणे, सदर खडी क्रशरच्या मालकाकडे शासनाची व पर्यावरण विभागाची कोणतीही परवानगी नसणे, तथापि सदर खडी क्रशर गेल्या ५ वर्षापासून अनधिकृतरित्या सुरुच असणे, सदर खडी क्रशर आवाजामुळे व उडणाऱ्या धुळीमुळे शेजारीच असलेल्या आदिवासी वस्तीतील लोकांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागणे, यासंदर्भात स्थानिक नागरीकांनी जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे वारंवार तक्रारी करुनही सदर अनधिकृत खडी क्रशरवर अद्यापही कोणतीच कारवाई झालेली नसणे, त्यामुळे या अनधिकृत व्यवसायाला स्थानिक प्रशासन पाठीशी घालत असल्याचा जनमांनसात निर्माण झालेला संशय, परिणामी नागरीकांत वाढता तीव्र असंतोष, शासनाने या प्रकरणी तातडीने चौकशी करून शासनाच्या आवश्यक त्या कोणत्याही परवानग्या न घेता अनधिकृतपणे सुरू असलेल्या खडी क्रशरच्या मालकावर व त्याला पाठिशी घालणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **३७.** | **२३४** | **श्री.सत्यजीत तांबे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"शासनाने सन २०१६ मध्ये महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाची स्थापना केलेली असणे, भारत नेट प्रकल्प, आपले सरकार पोर्टल आणि लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवा ऑनलाईन करणे हे प्रमुख उद्देश पूर्ण केलेले नसणे, सदर महामंडळाची आर्थिक उलाढाल | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | १००० कोटींपेक्षा अधिक असूनही महामंडळाने स्थापनेपासून विधिमंडळास वार्षिक अहवाल सादर केलेला नसणे, त्यामुळे जनतेच्या कराच्या पैशाचा योग्य वापर होत नसणे, भारत सरकारच्या भारत नेट या महत्वकांक्षी प्रकल्पाबाबत महामंडळास गांभीर्य नसणे, या प्रकल्पात ठेकेदारांनी कामाचा दर्जा योग्य न राखणे, या प्रकल्पातून किती ग्रामपंचायतीपर्यंत इंटरनेट सुविधा पोहोचली याची ठोस माहिती महामंडळाकडे उपलब्ध नसणे, ऑप्टिकल केबल टाकण्याची अनेक कामे अपूर्ण असणे, महामंडळातील कर्मचाऱ्यांसाठी योग्य वेतन व नियमित धोरण नसणे, कर्मचाऱ्यांना वैद्यकीय विमा सुद्धा मिळत नसणे, दिनांक १४ नोव्हेंबर ते २५ नोव्हेंबर २०२३ दरम्यान महामंडळाच्या आऊट लूक ईमेल सर्व्हरचे पैसे न भरल्यामुळे सर्व्हर बंद पडल्याची नामुष्की ओढवणे, सदरील सर्व्हर बंद अवस्थेत असल्यामुळे महाडीबीटी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरण योजनेसारखे अनेक पोर्टल बंद होऊन शासनाची नाहक बदनामी होणे, महामंडळात अशासकीय सदस्य निवडीसाठी कोणतीही विहित प्रक्रिया व नियम नसणे, महामंडळाच्या ढिसाळ कारभाराची सखोल चौकशी करून जबाबदारी निश्चित करून विहित कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| ३८. | ४३१ | **श्री.रामराव पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | "दिनांक १९ जून, २०२३ रोजी किनवट जिल्हा गोरक्षा प्रमुख व इतर असे एकूण ८ जण मारुती ईर्टीगा गाडीने एका कार्यक्रमात जाताना त्यांच्यावर कसायांनी पाळत ठेऊन सुनियोजित कट रचुन प्राणघातक हल्ला करणे, याच गोरक्षक कार्यकत्यांनी दिनांक १७ जून, २०२३ रोजी भोकर पोलीस स्टेशन अंतर्गत ३ गोवंशाचे वाहन पकडुन दिलेले असणे, त्यावेळी भोकर पोलीस स्टेशनच्या आवारात सदरील गाडीचे काही कसायांनी फोटो काढून घेऊन दिनांक १९ जून, २०२३ रोजी सापळा रचून १४-१५ लोकांनी गोरक्षकांवर केलेला हल्ला, या हल्ल्यात गोरक्षक यांचा मृत्यू होणे, तसेच ४ जण गंभीर जखमी झाले असून त्यांना नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात येणे, दिनांक १७ जून, २०२३ रोजी नांदेड विभाग गोरक्षा प्रमुख यांच्यावर असाच प्राणघातक हल्ला करणे, सदर हल्ल्याचा तपास अद्यापही पोलिसांनी केलेला नसणे, उक्त दोन्ही घटनांचा एकमेकांशी पूर्ण संबंध असून या सर्व प्रकरणाचा तपास होणे गरजेचे असतानाही पोलीसांकडून व्यवस्थित तपास न करता आरोपींना पाठीशी घालण्याचे काम सुरु असणे, या सर्व प्रकारामुळे नांदेड जिल्ह्यातील नागरिकांमध्ये निर्माण झालेली तीव्र संतापाची भावना, सदर घटनांची उच्चस्तरीय चौकशी करण्याची विविध संघटनांकडून होत असलेली मागणी, शासनाने उक्त प्रकरणाची तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ३९. | ५९७ | **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | “भिमा खोऱ्यातील पाण्याची वाढती मागणी लक्षात घेऊन कृष्णा खोऱ्यातील राज्याच्या वाट्याला आलेले मात्र अडवू न शकलेले पाणी भिमा नदी खोऱ्यात वळवण्यासाठी महाराष्ट्र शासनाने सन २००४ मध्ये कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना मंजूर करून कामाचा शुभारंभ करण्यात येणे, मात्र अद्यापही या योजनेच्या कामाला गती मिळालेली नसणे, कृष्णा खोऱ्यात अनेक सिंचन योजना शासनाने मंजूर केलेल्या असणे, त्यापैकी अनेक योजनांना शाश्वत पाणी कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजना पूर्ण झाल्यावरच मिळणार असणे, भिमा खोऱ्यातील उजनी धरणाच्या वरच्या क्षेत्रात दिवसेंदिवस पाण्याची मागणी वाढत असल्याने इतर नद्यांमधून भिमेत व उजनी धरणात पाणी वळवले तरच भिमा खोऱ्यातील पाण्याची गरज भागणार असणे, अन्यथा कृषी क्षेत्राचे नुकसान होऊन, रोजगाराच्या संधी कमी होण्याबरोबरच स्थलांतराचे प्रमाण वाढणार असणे, त्यामुळे कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेला पर्याय नसणे, या योजनेद्वारे कृष्णा खोऱ्यातील अतिरिक्त ११५ टीएमसी पाणी भिमा खोऱ्यात येऊन सातारा, सांगली, सोलापूर, पुणे, धाराशीव, बीड जिल्ह्यातील ३१ तालुक्यातील पाण्याचे दुर्भीक्ष कमी होऊन जलसाठ्यात वाढ होऊन भूगर्भातील पाणी पातळीतही वाढ होणार असणे, परिमाणी कायमच्या दुष्काळी परिस्थितीमुळे कृषी क्षेत्रात निर्माण झालेले संकट टाळता येऊन बेरोजगारी, स्थलांतर, | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न सुटण्यास मदत होण्याबरोबरच कोल्हापूर, सांगली भागात पावसाळ्यात नेहमीच निर्माण होणाऱ्या पूरपरिस्थितीमुळे होणारे नुकसान टाळता येणार असणे, त्यामुळे कृष्णा-भिमा स्थिरीकरण योजनेस गती देण्यासाठी तातडीने अंमलबजावणी करून उपाययोजना करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया." | | |
| ४०. | ५१९ | **श्री.अनिकेत तटकरे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"मा.राज्यमंत्री यांच्या दालनात दिनांक ०८ ऑक्टोबर, २०२१ रोजी सेवानिवृत्त कर्मचारी संघटना तसेच वन विभाग यांचे अधिकारी यांची बैठक झालेली असणे, सदर बैठकीत ठरल्यानुसार सन १९७३ च्या सेवा शर्तीप्रमाणे सातवी पास असलेल्या व भरती झालेल्या कर्मचारी यांना सेवाप्रवेशोत्तर सन १९८७ व १९९८ च्या शासन अधिसूचनेप्रमाणे सेवानिवृत्त झाल्यावर व सेवानिवृत्तीच्या उंबरठ्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना एसएससी पास असणे हे बंधनकारक करण्यात आलेले असणे, त्यामुळे अधिसूचना दिनांक २० मार्च, १९९७ ची अंमलबजावणी न करता दिनांक ६ एप्रिल, १९९८ नुसार वन विभागाच्या वनरक्षक पदावर रुजू असलेल्या कर्मचारी यांची ज्येष्ठता गमावली जाणे, त्यामुळे वन कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, परिणामी कर्मचाऱ्यांसाठी एसएससी पास ही शैक्षणिक अर्हता बंधनकारक न करता पूर्वीच्या धोरणानुसार सातवी पास ही अर्हता कायम ठेवण्याची आवश्यकता व त्याबाबत शासनाची भूमिका." | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४१. | ५१२ | **श्री.राजेश राठोड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>“राज्यात बंजारा समाजाचा समावेश विमुक्त जातीमध्ये असून तेलंगणा, आंध्रप्रदेश व अनेक राज्यांमध्ये बंजारा समाज हा आदिवासीमध्ये समाविष्ट असल्याने राज्यात सुध्दा बंजारा समाजाचा समावेश अनुसूचित जमातीमध्ये करण्याची मागणी अनेकदा करुनही त्याबाबत कोणतीच कार्यवाही न होणे, यासाठी बंजारा समाजाच्या विविध संघटना अनेक वर्षांपासून शासनाकडे आंदोलने करून मागणी करत असणे, परंतु अद्यापही याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय न घेतल्यामुळे राज्यातील बंजारा समाजात पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने त्वरीत निर्णय घेऊन शासनाने विमुक्त जाती (अ) मधून अनुसूचित जमाती मध्ये करून देण्याची होत असलेली मागणी, जेणेकरुन कोणत्याही मूळ आरक्षणाला धक्का न लागता बंजारा समाजाला न्याय देण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.” | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |
| ४२. | २४३ | **सर्वश्री रमेशदादा पाटील**, प्रविण दरेकर, प्रसाद लाड, चंद्रशेखर बावनकुळे, निरंजन डावखरे, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पर्यटन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

"सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून जाहीर केलेला असताना आजपर्यंत केंद्र व राज्य शासनाने कोणत्या सुविधा पर्यटन व्यवसाय वाढीसाठी दिल्या त्या जाहीर कराव्यात अशी मागणी स्थानिक भूमिपुत्रांनी माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान करणे, स्थानिक भूमिपुत्रांनी बँकेचे कर्ज काढून आपला रोजगार उभा केलेला असताना त्यांना सहकार्य करण्याचे सोडून त्यांचा रोजगार हिरावून घेत असल्याचे शासनाप्रती निर्माण झालेली भावना, मा.पंतप्रधान महोदयांनी देशातील तरुणांना रोजगार देण्याचे ध्येय ठेवले असताना युवकांनी उभा केलेला रोजगार तोडण्यासाठी शासन प्रयत्न करीत असणे, पर्यटन, मच्छीमार व्यवसाय उभा करण्यासाठी अनेकांनी मेहनत घेतली मात्र प्रशासनाने दिलेल्या एका नोटीसद्वारे हा व्यवसाय उध्वस्त होणे, स्थानिक मच्छीमार नागरिक व पर्यटन व्यवसायासाठी आवश्यक सर्व नियमांमध्ये हे व्यवसाय करीत असतानाही त्यांना प्रशासनाकडून नाहक त्रास होत असणे, मालवणच्या समुद्रातील सिंधुदुर्ग किल्ल्यावर मा.पंतप्रधान महोदय येत असल्याने मालवणचे नाव देशाच्या आणि जागतिक पातळीवर पोहोचणार असणे, या दौऱ्याचे कारण काढून प्रशासनाने राजकोट ते दांडी किनारपट्टीवरील शेकडो बांधकामे पाडण्याच्या नोटीस बजावलेल्या असणे, त्यामुळे एक दिवसाच्या दौऱ्यासाठी हजारो कुटुंब विस्थापित करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतल्याने मच्छीमार, श्रमिक मच्छीमार, मत्स्य व्यावसायिक आणि पर्यटक व्यवसायिकांनी याबाबत जिल्हा अधिकाऱ्यांना भेटून निवेदन देऊन भूमिका मांडणार असल्याचे जाहीर करणे, बेकायदेशीर बांधकामे तोडण्यासाठी मालवण किनारपट्टीवरील मच्छीमारांना नोटीस

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | देण्यात येत असून मात्र तारकर्ली, देवबाग मध्येही अनधिकृत बांधकामे असून इतर किनारपट्टीवरील लोकांसाठी वेगळा न्याय प्रशासन देत असणे, सर्व किनारपट्टी एकच असताना महसूल यंत्रणांकडून अशाप्रकारे वेगवेगळी भूमिका घेण्यात आल्याने नागरिक विरोध करीत असणे, त्यामुळे सदर दिलेल्या नोटीस मागे घेण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ४३. | ६०३ | **श्री.शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- <br>"नाशिक जिल्ह्यात बऱ्याच ठिकाणी खाजगी बाजार समित्यांना शासनाने दिलेली परवानगी, शेतमाल खरेदी करणारे व्यापारी खाजगी बाजारसमितीमध्ये जाऊन शेतमाल खरेदी करणे, बाजार समितीमधील माथाडी मंडळाचे नोंदीत पूर्वीपासून कामे करणाऱ्या माथाडी-मापाडी कामगारांनी याठिकाणी कामाची रितसर मागणी करणे, पणन संचालक, पुणे, अध्यक्ष, माथाडी मंडळ, नाशिक, जिल्हा उपनिबंधक, नाशिक यांचेकडे रितसर पत्रव्यवहार करून सुध्दा अद्यापपर्यंत कामगारांना काम देण्यात न येणे, खाजगी बाजार समित्यांमध्ये बाजार समितीमधील व्यापारी शेतमाल खरेदीस जात असल्यामुळे बाजार समितीमध्ये आवक घटणे, खाजगी बाजार समितीमध्ये आवक वाढलेली असल्यामुळे बाजार | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | समितीमध्ये पूर्वीपासून कामे करणाऱ्या नोंदीत माथाडी-मापाडी कामगारांची कामे कमी झाल्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती खालावलेली असणे, वास्तविक महाराष्ट्र शासनाच्या सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग यांचेकडील दिनांक ६ ऑक्टोबर, २०१६ रोजीचे पत्र व पणन संचालक, पुणे यांचेकडील दिनांक २० ऑक्टोबर, २०१६ रोजीच्या परिपत्रकानुसार परवानाधारक खाजगी बाजारसमित्यांनी कृषी उत्पन्न बाजारसमितीच्या आवारातील पूर्वीपासून कामे करणाऱ्या नोंदीत माथाडी-मापाडी कामगारांच्याकडून माथाडी अनुषंगिक कामे करून घ्यावीत व झालेल्या कामाची बाजारसमित्यांनी निर्धारित केलेल्या दराप्रमाणे मजुरीची रक्कम देण्यात यावीत तसेच सदर कामगारांना प्रचलित पध्दतीप्रमाणे माथाडी कायद्याचे संरक्षण राहील तसेच मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी धुळे जिल्ह्यातील खाजगी बाजारसमित्यांना माथाडी कायद्याची अंमलबजावणी करावी असे निर्देश असणे, संबंधित खाजगी बाजारसमित्यांना सूचना दिल्या असतांना खाजगी बाजारसमित्यांनी सदर नोंदीत कामगारांना कामे न दिल्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, या नोंदीत कामगारांना खाजगी बाजारसमित्यात त्यांच्या हक्काची कामे देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना” | | |
| **४४.** | **५२०** | **श्री.कपिल पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | "राज्य मंत्रीमंडळाने मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँकेचा शासकीय व्यवहार करणाऱ्या बँकांच्या यादीत समावेश करणे, शालेय शिक्षण विभागाने दिनांक ५ डिसेंबर, २०२३ रोजी मुंबईतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पगार राष्ट्रीयकृत युनियन बँकेतून काढून मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत खाते उघडण्यास शासन निर्णय जारी करणे, त्यामुळे निर्माण झालेला असंतोष, शिक्षक भारती संघटनेने शिक्षकांच्या नियमित व सुरक्षित पगारासाठी मा.मुंबई उच्च न्यायालय आणि मा.सर्वोच्च न्यायालयापर्यंत लढा देणे, शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित, सुरक्षित व सुलभ पगार देणे शासनाची जबाबदारी असणे, शिक्षक/शिक्षकेतरांचे पगार खाते कोणत्या बँकेत असावे याची निवड करण्याचा अधिकार शिक्षक/शिक्षकेतरांना असणे, मा.मुख्यमंत्री यांनी मुंबईतील शैक्षणिक संस्थांच्या मालमत्ता कराच्या माफीची घोषणा करूनही मुंबई महानगरपालिकेकडून मालमत्ता कर माफीबाबत पत्र न काढल्याने अंमलबजावणी न होणे, शैक्षणिक संस्थांना वीज बिल आणि पाणी बिल व्यावसायिक दराने न लावता सवलत देण्याबाबत बैठक घेण्याची घोषणा करूनही बैठक न होणे, झोपडपट्टी पुनर्विकास अंतर्गत बाधित शाळांसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ चे विनियम ३३ (१०) चे खंड ८.१ मधील प्रस्तावित | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | फेरबदलाबाबत उक्त अधिनियमाच्या कलम ३७(१कक) वैधानिक कार्यवाहीबाबत मा.मुख्यमंत्री यांची अंतिम मान्यता मिळण्याची आवश्यकता असणे, यामुळे शिक्षक/शिक्षकेतर, संस्थाचालक यांच्यामध्ये पसरलेला असंतोष आणि संताप, याबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही." | | |
| ४५. | ५५१ | **डॉ.मनिषा कायंदे**, श्री.प्रविण दरेकर, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन वापरातील विविध उत्पादनांना हलाल प्रमाणपत्र देणाऱ्या मुंबईतील हलाल कौन्सिल ऑफ इंडिया, जमीयत उलेमा यांसारख्या कंपन्या अनधिकृतपणे हलाल प्रमाणपत्र देत बेकायदेशीर फंडिंग जमा करत असल्याचा प्रकार निदर्शनास येणे, हलाल प्रमाणित केलेली दैनंदिन वापरातील अनेक उत्पादने एका विशिष्ट धर्माच्या ग्राहकांना बेकायदेशीरपणे विक्री होणे, त्या संस्थांना प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नसून या संस्था हलाल प्रमाणपत्र वितरित करून जमा पैसा देशविरोधी कारवायांमध्ये वापरत असल्याचा संशय, हलाल प्रमाणपत्रामुळे देशातील जातीय सलोखा नष्ट होत असून त्याचा फायदा देश विरोधी शक्तींना होत असण्याची शक्यता, याबाबत ग्राहकांमध्ये संभ्रम निर्माण होऊन लेबल नसलेल्या कंपन्यांच्या उत्पादन विक्रीला बसलेली खिळ, शाकाहारी पदार्थांना हलाल प्रमाणपत्राची गरज नसणे अन्न उत्पादनांना गुणवत्ता प्रमाणपत्र देण्यासाठी आपल्या देशात FDA आणि FSSAI या अधिकृत | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | संस्था असणे, अन्य संस्थांना प्रमाणपत्र देण्याची परवानगी नसणे, सौंदर्यप्रसाधने व घरगुती वापरातील वस्तूंना देखील विशिष्ठ रक्कम आकारून प्रमाणपत्रे देणे, हलाल प्रमाणित उत्पादने अनेक शासकीय प्रकल्प, उपक्रमांमध्ये विक्री होणे, हलाल प्रमाणपत्रासारख्या धार्मिक प्रमाण पत्रामुळे मांसाचा सर्व व्यवसाय हिंदू खाटीकांकडून अन्य धर्मियांकडे जाणीवपूर्वक वळवला जाऊन हिंदू खाटीक वर्गाची बेरोजगारी वाढणे, उत्तर प्रदेश प्रमाणेच राज्यात हलाल प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या संस्था, पदार्थ विकणाऱ्या संस्थांवरती करण्यात येणारी कारवाई व शासनाची भूमिका." | | |
| ४६. | ५२६ | **सर्वश्री वसंत खंडेलवाल**, श्रीकांत भारतीय, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महिला व बालविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्य शासनाच्या महिला व बाल विकास विभागाचा दिनांक २ एप्रिल, २०१८ रोजीच्या शासन निर्णय क्रमांक अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, अन्वये अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण देण्यात येणे, सदरहू शासन लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणाऱ्या सरळसेवा भरतीसाठी हा निर्णय लागू राहील असे स्पष्टपणे या शासन निर्णयात नमूद करण्यात आलेले असतानाही शासनाच्या विविध विभागांकडून या शासन | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | निर्णयाकडे दुर्लक्ष होत असल्याने राज्यातील अनाथ मुलांवर अन्याय होत असल्याची बाब निदर्शनास येणे, सदरहू शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर महसूल, सहकार, पणन व वस्त्रोद्योग, आदिवासी, बृहन्मुंबई महानगरपालिका इ. विविध शासकीय विभागांमार्फत करण्यात आलेल्या पदभरतीत अनाथ उमेदवारांकरिता आरक्षण न दिल्याची बाब निदर्शनास येणे, प्रशासनामार्फत सदरहू शासन निर्णयाचे काटेकोर पालन होत नसल्याने शासकीय नोकरीस पात्र व इच्छुक असलेल्या अनाथ उमेदवारांवर होत असलेला अन्याय, त्यानुषंगाने शासनामार्फत करण्यात येणाऱ्या पदभरतीत अनाथ उमेदवारांकरिता असलेल्या आरक्षणाचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत शासनाच्या सर्व विभागांना तातडीने आदेश देण्याची आवश्यकता, तसेच अनाथ आरक्षणाचा शासन निर्णय निर्गमित झालेल्या दिनांकापासून आजमितीपर्यंत ज्या विभागांनी भरती प्रक्रिया राबविली त्यामध्ये सुधारणा करून अनाथांना त्यांच्या हक्काच्या जागा उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, शासनाने या प्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४७. | १३० | **सर्वश्री जयंत आसगावकर**, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

## **विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | "पूर्व व्यवसायिक अभ्यासक्रमाच्या कर्मचाऱ्यांना विनाअनुदान काळातील सेवेस (सन १९८२ ते १९९०) मान्यता देणारा प्रश्न बरेच वर्ष प्रलंबित असणे, दिनांक ११ जुलै, २०१० रोजी शासन आदेश निघून देखील मान्यता न देणे, या शासन आदेशानुसार (सन १९८२-१९९०) या काळातील विनाअनुदानित सेवेस मान्यता देण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी या कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ४८. | १८७ | **श्री.अशोक** ऊर्फ **भाई जगताप**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील अंधेरी के वेस्ट विभागाच्या अखत्यारितीतील सर्वे नं. ६५/६६ १-५१ या भुखंडावरील झोपडपट्टी पुनर्वसन अंतर्गत मिलेनिअर रियालिटी आशियाना को. ऑप. हौ. सोसायटी लि. या इमारतीचे बांधकाम होणे, सदर बांधकाम होत असताना बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीतील के-वेस्ट विभागाच्या पालिका अधिकाऱ्यांच्या संगनमताने भुखंडाला लागून असलेल्या मोठा मोगरा नाला अनधिकृतपणे अरुंद करून तो आच्छादित करणे, नाल्यावर अनधिकृत बांधकाम करणे, बांधकाम आराखड्यानुसार काम न झाल्याने आपतकालीन सेवा देणाऱ्या | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | वाहनांस इमारतीपर्यंत पोहचण्याचा मार्ग उपलब्ध नसणे, दुर्घटना घडल्यास मोठ्या प्रमाणात जिवित हानी होण्याची शक्यता, अंधेरी सबवे व लगतच्या दाटीवाटीच्या लोकवस्तीमध्ये दूषित पाण्याचा निचरा न होणे, त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरणे, सामान्य जनतेचे आरोग्य धोक्यात येणे, महानगरपालिकेच्या Designated officer Asst. Engineer (B&F), ward K West यांनी दिनांक २ डिसेंबर, २०१७ व दिनांक २३ जून, २०२३ च्या आदेशान्वये सदरचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याचे आदेश दिले असणे, वेळोवेळी मिलेनियर हेरिटेज या इमारतीचे मोगरा नाल्यावरील अनधिकृत बांधकामाचा प्रश्न विविध लोकप्रतिनिधींनी सभागृहात मांडण्यात येणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, अशा सर्वसामान्य जनतेच्या जिवाशी खेळणाऱ्या विकासकांवर व त्यांना सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होण्याची आवश्यकता यामुळे जनतेत पसरलेला असंतोष, त्यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ४९. | ४०३ | **सर्वश्री प्रवीण दटके**, चंद्रशेखर बावनकुळे, निलय नाईक, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"नागपूर महानगरपालिका, नागपूर मार्फत ग्राहकांच्या थकीत पाणी बिल, थकीत प्रॉपर्टी कर आणि महानगरपालिकेच्या दुकानांचे थकीत भाडे या सर्वांवर २४ % दराने दंड आकारला जात असणे, प्रचंड दंड लावण्याच्या अन्यायकारक पद्धतीमुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये वाढलेली तीव्र | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | असंतोषाची भावना, शेकडो रहिवासी असणाऱ्या म्हाडाच्या इमारतीमध्ये एकत्रित कनेक्शनवर एकच बिल जारी होण्याने बिले नेहमीच थकीत राहत असणे, थकीत बिलावर २४% दराने दंड आणि या दंडावर देखील २४% दराने व्याज आकरणीमुळे ग्राहकांमध्ये वाढत असलेला असंतोष, थकीत कर आणि बिल वसुलीत अतार्किक पद्धतीने लावलेला २४% दंड माफ करण्याबाबत तसेच पाणी बिलाच्या रकमेची विभागणी करून कुटुंबानुसार बिले जारी करण्याबाबत जनतेकडून पुकारण्यात आलेले आंदोलन आणि लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, ग्राहकांचे हित लक्षात घेऊन दंड माफ करण्याची आवश्यकता, याबाबत शाासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **५०.** | **३३३** | **सर्वश्री सतेज** ऊर्फ **बंटी पाटील**, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजित वंजारी, राजेश राठोड, जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"राज्य शासनाने विविध जिल्ह्यातील नद्यांचे प्रदूषण दूर करण्याचा उपक्रम हाती घेतलेला असणे, यासाठी कोट्यवधी रुपयाची तरतूद केलेली असणे, प्रसंगी कर्ज घेतलेले असणे, परंतु कोल्हापूर जिल्ह्यातील पंचगंगा प्रदूषणाचा मुद्दा सन १९९० पासून उपस्थित होत असणे, मा.उच्च न्यायालयात यावर | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | सुनावण्या झालेल्या असणे, कोल्हापूर, इचलकरंजी महानगरपालिका कार्यक्षेत्रातून मोठ्या प्रमाणावर या नदीत सांडपाणी मिसळत असणे, औद्योगिक सांडपाण्याचे प्रमाण हे अधिक असणे, त्यामुळे या नदीचे मोठ्या प्रमाणावर प्रदूषण झाले असून या नदीतील जैवविविधता धोक्यात आली असणे, यामुळे येथील प्रशासनाने या नदीकाठच्या एकूण ८० गावांमधील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी सर्वेक्षण करण्यात येणे, त्यासाठी सुमारे २५२ कोटी रुपये खर्च येणार असणे, त्यासाठीचा प्रस्ताव शासनास दिलेला असणे, सदर प्रस्ताव चार महिन्यात मंत्रालयात लालफितीत पडून असणे, मात्र यावर निर्णय झालेला नसणे त्यामुळे राज्यातील इतर नद्यांचे प्रदूषण दूर करण्यासाठी शासन कोट्यवधी रुपयाची तरतूद केलेली असतानाही कोल्हापूर मधील पंचगंगा नदीसाठी शासन दुजाभाव दाखवत असल्याची भावना येथील जनतेत निर्माण झालेली असून त्यामुळे या प्रस्तावास तातडीने मान्यता देणे आवश्यक असणे, मात्र यावरील कारवाईस शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे येथील जनतेत पसरलेल्या असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना यामुळे शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ५१. | २१९ | **श्री.किरण सरनाईक**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणात विद्यार्थी तालुका तथा जिल्हास्तरावर दररोज शाळेत शिक्षणासाठी येत असणे, राज्य परिवहन बसेसच्या फेऱ्यांचे शाळांच्या वेळापत्रकानुसार सुयोग्य वेळापत्रक नसणे, ग्रामीण भागातील | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना येणे-जाणे करण्याकरिता अपुऱ्या बस फेऱ्या असणे, परिणामी विद्यार्थ्यांना येणे-जाणे करताना त्रास होत असणे, अपुऱ्या बसेस व अयोग्य वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांना शाळेच्या सुरुवातीच्या काही तासिका तसेच शेवटच्या काही तासिका गमवाव्या लागत असणे, परिणामी विद्यार्थ्यांचे न भरून निघणारे शैक्षणिक नुकसान होत असणे, हे शैक्षणिक नुकसान रोखण्याकरिता सुयोग्य वेळापत्रक तसेच पुरेशा बसेस देण्याची आवश्यकता असणे, या समस्येकडे तात्काळ लक्ष देऊन पुरेशा बसेस उपलब्ध करून तसेच शाळांच्या वेळापत्रकानुसार बसेसच्या वेळापत्रकांमध्ये आवश्यक तो बदल करून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान रोखण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| ५२. | १६३ | **श्री.प्रसाद लाड**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"पेमेंट गेटवे/पे आऊट सुविधा पुरविणाऱ्या कंपनीचे खाते हॅक करून तब्बल १६ हजार १८० कोटीची लूट करण्यात आल्याची घटना ठाण्यामध्ये दिनांक ९ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, या प्रकरणी नोंदणी नसलेल्या भागीदारी कंपन्यांशी संबंधित आरोपीं विरोधात ठाण्यातील नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असणे, लुटीच्या या मेगा रॅकेटमध्ये अनेक मोठ्या व्यक्ती असण्याची शक्यता, | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ठाणे पोलिसांची आर्थिक गुन्हेशाखा अधिक तपास करत असणे, या १६ हजार १८० कोटींच्या लूट प्रकरणी सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, खोट्या कागदपत्रांचा वापर करून नोंदणी नसलेल्या विविध भागीदारी कंपन्यांच्या नावे बँक खाती उघडून मोठ्या प्रमाणात शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर शासनाने करावयाची कठोर कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| ५३. | १०६ | **सर्वश्री अभिजित वंजारी**, सतेज ऊर्फ बंटी पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री जयंत आसगावकर, धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **उप मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br><br>“राज्यात वित्त विभागाच्या माध्यमातून वेगवेगळया योजनांच्यामार्फत लोकप्रतिनीधींचा निधी व त्याला खर्च करण्याची मर्यादा तसेच जिल्हा वार्षिक योजनेतील निधी वाटपाचे निकष वेळोवेळी नियोजन विभागाच्या वतीने शासन निर्णयाद्वारे निर्गमित करणे, त्यानुसार राज्यात प्रत्येक जिल्हा नियोजन समितीने खर्च करणे बंधनकारक असणे, निधी वाटपाच्या निकषानुसार विभागनिहाय तसेच योजनानिहाय निधी वाटप होणे अपेक्षित असणे, परंतु अनेक विभागात शून्य टक्के निधी खर्च होणे हे अन्यायकारक असणे, विशेषतः अनेक जिल्ह्यामध्ये शासकीय मध्यवर्ती विभागातील व जिल्हा ग्रंथालयाची स्थापना या ग्रंथालयांना आर्थिक सहाय्य व अनुदान | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | वाटप करणे, शासन मान्यताप्राप्त विभागीय तथा जिल्हा व तालुकास्तरावरील ग्रंथालयाची निधीअभावी दुरवस्था होणे, अनेक वर्षांपासून या ग्रंथालयाची दर्जावाढ न होणे, वाढीव अनुदान न मिळणे, अनुदाना अभावी विद्यार्थ्यांना लागणारे स्पर्धा परीक्षा पुस्तके व इतर आवश्यक साहित्य उपलब्ध न होणे, या कारणास्तव ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असंतोष पसरणे, आजही राज्यात मोठ्या प्रमाणावर या ग्रंथालयाच्या माध्यमातून स्पर्धा परीक्षेची तयारी व शासकीय नोकरीच्या पूर्वपरिक्षेची तयारी आर्थिक पाठबळाअभावी केली जाणे, या शाळांमध्ये बसण्यायोग्य डेस्क बेंचचा अभाव, स्वच्छतागृहाचा अभाव असणे, खेळांचे मैदान नसणे, ग्रामीणभागात शिक्षणाप्रती विद्यार्थ्यांच्या मनात उदासिनता निर्माण होणे, याकरिता जिल्हा नियोजनामार्फत निधीवाटपाच्या निकषामध्ये बदल करून दरवर्षी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांचे नुतनीकरण करणे, विद्यार्थ्यांना सर्वप्रकारचे साहित्य पुरविणे, शासन मान्यताप्राप्त ग्रंथालयांना वाढीव अनुदान देणे व त्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| **५४.** | ४४१ | **सर्वश्री सतिश चव्हाण**, विक्रम काळे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

"मौजे अब्दीमंडी (ता.जि.छत्रपती संभाजीनगर) येथील गट नं. ११, १२, २६, ३७ व ४२ चे एकूण क्षेत्र २५० एकर ही एका व्यक्तीची मिळकत असणे, परंतु महसूली लेखात ई.पी. सरकार अर्थात (Evacu Property) नमूद असणे, जमीन मालक यांच्या अपिलावर जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांनी दिनांक १७ ऑक्टोबर २०२३ रोजी निर्णय देऊन ई.पी. सरकार अर्थात (Evacu Property) ऐवजी संबंधित जमीन मालक यांची मिळकत असल्याची नोंद घेण्याचे निर्देश दिले असणे, परंतु अप्पर तहसीलदार, छत्रपती संभाजीनगर यांनी जिल्हाधिकारी यांनी पारित केलेल्या आदेशाची अंमलबजावणी न करता त्रयस्थ व्यक्ती यांच्या नावे महसूली अभिलेखात नोंद केली असणे, तसेच सदर जमिनीची दिनांक ८ नोव्हेंबर, २०२३ रोजी फेरफारची नोंद करण्यात आली असणे, तर दिनांक ९ नोव्हेंबर, २०२३ रोजी पुन्हा त्रयस्थ व्यक्तिचे नावे विक्री पत्र करून त्याच दिवशी फेरफारची नोंद केली असणे, मूळ मालकावर अन्याय करून २५० एकर जमीनीची अंदाजे किंमत रूपये ५०० कोटी रुपयांचा गैरव्यवहार केला असणे, सदर जमीन मूळ मालकाला द्यावी व या जमिनीच्या खरेदी विक्री, फेरफार प्रकरणात दोषी असणारे मंडळ अधिकारी, तलाठी, तहसीलदार, दुय्यम निबंधक यांच्यावर कारवाई करण्यात यावी व मूळ मालकास न्याय देण्यासंदर्भात शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ५५. | ८१ | **श्री.गोपिचंद पडळकर**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- <br> "राज्यामध्ये सन २०२० ते सन २०२२ दरम्यान जेएनपीटी बंदरामधून मिक्स मिनरल हायड्रोकार्बन ऑइल तसेच इंडस्ट्रियल फर्नेस ऑइल अशा विविध नावाने बोगस बायोडिझेलचे विविध आयातदारांमार्फत मोठ्या प्रमाणात आयात मागवण्यात आली असता सदर आयात सदृश्यपदार्थ मोठ्या वाहनांमध्ये पर्यायी डिझेल इंधन स्वरूपात वापरण्यात आलेला असणे, सदर कालावधीमध्ये सरकारी पेट्रोलियम कंपन्या HPCL, BPCL, IOCL यांच्या डिझेल विक्रीमध्ये जवळपास ५०% तफावत आढळून आलेली असणे, परिणामी मोठ्या प्रमाणात शासनाचा महसूल अपहार झालेला असणे, सदर प्रकरणी तत्कालीन नियंत्रक शिधावाटप यांच्या नेतृत्वाखाली तत्कालीन मुख्य सचिव, यांच्या निर्देशाने कारवाई अभिप्रेत असताना तत्कालीन नियंत्रक शिधावाटप यांनी सदर बोगस बायोडिझेल विकणारे आयातदार यांच्यासोबत एका इसमाच्या माध्यमातून आर्थिक हितसंबंध प्रस्थापित करून मोठ्या प्रमाणात अरबो रुपयांचा भ्रष्टाचार करून, सदर बोगस बायोडिझेल विक्री व्यवसायाला पाठबळ देऊन, मोठ्या प्रमाणात शासनाचा महसूल बुडवलेला असणे, सदर प्रकरणी | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | एस.आय.टी स्थापन करून शासनाने तात्काळ करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.” | | |
| **५६.** | **४१५** | **सर्वश्री सचिन अहिर**, विलास पोतनीस, सुनिल शिंदे, अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, विक्रम काळे, अशोक ऊर्फ भाई जगताप, महादेव जानकर, एकनाथराव खडसे, ॲड.अनिल परब, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **वैद्यकीय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>“राज्यातील नांदेड येथील शासकीय रुग्णालयात दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ ते ४ ऑक्टोबर, २०२३ या कालावधीत ८९ रुग्णांचा झालेला मृत्यू, त्यात ३८ बालकांचा समावेश असणे, त्याचप्रमाणे छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात ३५ रुग्णांसह २ बालकांचा तसेच नागपूर येथील मेडीकल कॉलेज आणि मेयो रुग्णालयात २३ रुग्णांचा झालेला मृत्यू, यातील बहुतेक मृत्यू एकाच दिवशी झालेले असणे, राज्यातील शासकीय रुग्णालयातील मोठ्या प्रमाणात तज्ञ डॉक्टरांसह, वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची असणारी रिक्त पदे, रुग्णालयातील स्वच्छतेकडे रुग्णालय प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, औषधांचा होत असलेले अपुरा पुरवठा, त्यामुळे रुग्णांच्या मृत्युमध्ये मोठ्या प्रमाणात झालेली वाढ, नांदेड येथील रुग्णालय ५०० बेडचे असताना प्रत्यक्षात ८०० ते ९०० रुग्णांवर होत असलेले उपचार, त्यामुळे रुग्णालयांवर वाढत असलेला ताण, शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी सर्वसामान्य नागरिकांमध्ये शासनाविरुध्द पसरलेला असंतोष व वाढती असुरक्षितता, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन तातडीने उपाययोजना करण्याची आवश्यकता, | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया." | | |
| ५७. | ४२३ | **श्री.एकनाथराव खडसे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **आदिवासी विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- "जळगाव जिल्ह्यातील आदिवासी कोळी बांधवांच्या समन्वय समितीने दिनांक १० ऑक्टोबर, २०२३ ते ०४ नोव्हेंबर, २०२३ पर्यंत केलेले आमरण अन्नत्याग उपोषण, सदर उपोषणास ग्रामविकास मंत्री, पाणीपुरवठा मंत्री यांनी भेटी देऊन कोळी नोंदीनुसार सरसकट अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र देण्याचे तसेच जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालय, धुळे येथून जळगाव येथे स्थलांतरित करण्याचे दिलेले आश्वासन, मुख्यमंत्री यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०२३ रोजी ग्रामविकास मंत्री, पाणीपुरवठा मंत्री, आदिवासी विकास मंत्री, मदत व पुनर्वसन मंत्री आमदार, खासदार तसेच संबंधित विभागाचे अधिकारी तसेच आदिवासी कोळी आंदोलन समन्वय समितीचे अध्यक्ष व सदस्य यांचे उपस्थितीत संयुक्त बैठक आयोजित करणे, बैठकीत अनुसूचित जमातीतील आदिवासी कोळी बांधवाना जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सुरळीत मिळणे करिता उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्तींचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करणे, रक्तनाते संबंधात असलेले वैधता प्रमाणपत्र ग्राह्य | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | धरून त्यांच्या कुटुंबातील इतर सदस्यांना अनुसूचित जातीचे वैधता प्रमाणपत्र देणे, अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय धुळे येथून जळगाव येथे सुरू करणे, याबाबत चर्चा करून आश्वासन देणे, मात्र अद्यापपावेतो कोणत्याही आश्वासनाची पूर्तता न होणे, कोळी समाजास अनुसूचित जातीचे जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र मिळण्यास विलंब होणे, परिणामी, आदिवासी कोळीबांधवाना कोळी नोंदीनुसार सरसकट अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र वितरीत करून लाभ देण्यासाठी निर्णय घेण्याची आवश्यकता यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना | | |
| **५८.** | **३७०** | **श्री.शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **कामगार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"एक्साईड इंडस्ट्रीज लिमिटेड, ई-५ नवनागापूर एमआयडीसी, अहमदनगर ह्या कंपनी मध्ये काम एक कंत्राटी कामगार कंपनीत शिसे (lead) युक्त प्रदूषित वातावरणात इतर अंदाजे ३,५०० कामगारांप्रमाणे दररोज काम करत असणे, तो बॉक्सिंग टेबल विभागात काम करत होता व शिस्याचा पावडरचा धुराळा उडून नाका तोंडात रोजच्या रोज श्वसनावाटे शरीरात जात असणे, तशी तक्रार व्यवस्थापन प्रतिनिधी ह्यांना त्याने केली असणे, हा कामगार पहिल्या पाळीत काम करत असताना पोटात असह्य वेदना होऊन उलटी होऊ लागली व त्यांस उपचारासाठी श्रीदीप हॉस्पिटल (स्टेशन रोड, अहमदनगर) इथे उपचारासाठी दाखल करण्यात येऊन त्यानंतर २८ तारखेला साई माऊली सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल, | **२० डिसेंबर, २०२३.** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | अहमदनगर, येथे दाखल करण्यात येणे, दिनांक २९ ऑक्टोबर, २०२३ रोजी त्याचा मृत्यू होणे, सर्व उपचार खर्च कामगाराच्या वडिलांनी स्वतःच्या खिशातून करणे, कंपनीत एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन विषबाधा होत असताना अहमदनगर औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय यंत्रणेचे होत असलेले दुर्लक्ष, या कारखान्यात कामगारांच्या संरक्षणाची कोणतीही यंत्रणा नसणे, त्यामुळे तेथील कामगारांमध्ये पसरलेले भितीचे वातावरण, मृत्यूमूखी पडलेल्या कामगारांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देण्याची नितांत आवश्यकता, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | | |
| **५९.** | **१७१** | **ॲड. निरंजन डावखरे**, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, रमेशदादा पाटील, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"मुंबईपासून ८० कि.मी. अंतरावर असलेला पालघर जिल्हा जेव्हा स्थापन झाला त्यावेळी २०० ते ३०० कोटी रुपये खर्च केले जाणे, एक जिल्हा करण्याकरीता किमान ५०० कोटी रुपये खर्च करणे अपेक्षित असून त्यातले अर्धे खर्च झाले असणे, तरीही हा जिल्हा राज्यात विकासाच्या यादीत शेवटचा असणे, आरोग्याच्या मुलभूत सोयीसुविधा नसल्याने येथे आजही लोकांचे मृत्यू होत असणे, रस्ते नसल्याने बाळंतीण बाईला झोळी करून | **२० डिसेंबर, २०२३.** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | दवाखान्यात आणेपर्यंत तिचा जीव जाणे, उपचार मिळत नाही म्हणून जवळच असलेल्या गुजरात राज्यातल्या वापी, वलसाड, सिल्वासा येथे नागरिकांना जावे लागणे, येथील रुग्णालयांत पुरेशी औषधे नाहीत, यंत्रसामग्री नाहीत, औषध खरेदी करण्यासाठी तात्पुरता निधी देखील जिल्ह्यास्तरावर नसणे, डहाणू, जव्हा, कासा या तीन उपजिल्हा रुग्णालयांत एक आश्रम पथक आणि पालघर, मनोर, बोईसर, तलासरी, वाणगाव, मोखाडा, विक्रमगड, वाडा, विरार या ९ ग्रामीण रुग्णालयांत मिळून मोठ्या प्रमाणावर जागा रिक्त असणे, पालघर जिल्ह्याच्या विकासाच्या दृष्टीने आरोग्य यंत्रणा सक्षम करण्याकरिता शासनाने ठोस उपाययोजना करावयाची गरज असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना." | | |
| **६०.** | **१९१** | **सर्वश्री अमोल मिटकरी**, विक्रम काळे, अनिकेत तटकरे, सतिश चव्हाण, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"अकोला शहरातील रामदास पेठमधील सिटी रुग्णालयामध्ये रुग्णास दिनांक ९ जानेवारी, २०२२ रोजी उपचारासाठी दाखल करणे, रुग्णालय प्रशासनाने त्यांच्या औषधोपचारासाठी २० हजार रुपये भरणा करण्यास सांगण्यात येणे, रुग्णाच्या मुलीने त्याच दिवशी २० हजार रुपये भरण्यात येणे, रुग्ण शासन योजनेचा लाभार्थी असताना त्यांचेकडून घेतलेले २० हजार रुपये त्यांना अद्याप परत करण्यात न येणे, रुग्णास वेळेवर औषधे न देणे, फीडींग फेकून देणे, अस्वच्छता, आजाराबाबत गंभीरतापूर्वक | **२० डिसेंबर, २०२३.** | **चर्चा झाली नाही.** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | लाईन ऑफ मेडिकल ट्रिटमेंट न होणे, यासर्व कारणास्तव दिनांक १४ जानेवारी, २०२२ रोजी रुग्णाचा मृत्यू होणे, सदर रुग्णाचा मृत्यू हा संशयास्पद असून रुग्णालय प्रशासनाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप त्यांच्या मुलीने व कुटुंबियांनी करण्यात येणे, त्याबाबत तक्रार निवेदन जिल्हाधिकारी, संबंधित वैद्यकीय विभागाच्या यंत्रणा, पोलिस स्टेशनला देण्यात येणे, सदर प्रकरणी सविस्तर चौकशीची मागणी करण्यात येणे, त्यादरम्यान सिटी रुग्णालयाचे डॉक्टर ह्यांनी तक्रारकर्तीस तक्रार मागे घेण्यास दबाव आणण्यात येणे, त्यानुसार जिल्हाधिकारी, अकोला यांनी शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमणे, चौकशी समितीने दीड वर्षापूर्वी याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी अकोला यांना व शासनास सादर करण्यात येणे, मागील दीड वर्षापासून जिल्हाशल्य चिकित्सक यांनी कोणतीही कारवाई न करणे, परिणामी तक्रारदार व त्यांचे कुटुंबियांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, असुरक्षिततेची व चिंतेची भावना, सदर रुग्णालयातील डॉक्टर यांचेसह अन्य डॉक्टर्स यांचेविरुध्द दंडात्मक कारवाई करुन कुटुंबियांनी रुग्णालयाकडे भरणा केलेली रक्कम त्यांना परत करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ६१. | १६४ | **ॲड.अनिल परब**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **गृहनिर्माण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | "मुंबई शहर व उपनगरातील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे बांधकाम केलेल्या इमारतीमधील घर हस्तांतरण करणेबाबतची असलेली १० वर्षांची अट शिथील करून पाच वर्षे इतकी करण्याबाबत राज्य शासनाने अनेकवेळा आश्वासन देऊनही अद्याप झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पातील घरे हस्तांतरणाची अट राज्य शासनानेतर्फे शिथील करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास येणे, मुंबई शहर उपनगरात झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील १० वर्षाच्या आतील सुमारे ६६ हजाराहून अधिक रहिवाशी कुटुंबांनी घरे विकत घेतली असून अद्याप त्यांच्या नावे हस्तांतरीत झाली नसल्याने त्यांना संरक्षण प्राप्त होत नसल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात होत असलेली गैरसोय, सदरहू प्रकरणी राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतील घरे हस्तांतरणासाठी असलेली १० वर्षांची अट शिथील करून ५ वर्षे करण्याबाबत राज्य शासनाने शासन निर्णय जारी करून त्याची तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी एसआरए योजनेतील रहिवाशी कुटुंबांमध्ये निर्माण झालेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया." | | |
| ६२. | १८१ | **सर्वश्री रामदास आंबटकर**, चंद्रशेखर बावनकुळे, रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :- | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | “राज्यात ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात ओबीसी विद्यार्थ्यांची संख्या असणे, पुढील शिक्षणासाठी राहण्याची सोय विद्यार्थ्यांना गैरसोयीचे होत असल्याने याबाबत ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह बांधकाम करण्याची मागणी ओबीसी सामाजिक संघटनेच्या माध्यमातून केली जाणे, त्याला दुजोरा देत मागील हिवाळी अधिवेशनात संपूर्ण राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू करण्याची घोषणा मा.उप मुख्यमंत्री यांनी करणे, वास्तविकता ग्रामीण भागातील ओबीसी, व्हीजेएनटी व विशेष मागासवर्ग विद्यार्थ्यांना शहरात शिक्षण घेणे अवघड असल्यामुळे व राहण्याची सोय गरीब विद्यार्थ्यांना परवडण्यासारखे नसल्याने विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहत असणे, त्यामुळे राज्यातील ३६ जिल्ह्यांत प्रत्येकी २ अशी ७२ वसतीगृह बांधण्याचा निर्णय होऊनही अद्याप वसतीगृहाचा प्रस्ताव सादर न झाल्याने स्वाधार योजनेचा लाभापासून विद्यार्थी वंचित असणे, त्यामूळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा प्रश्न निर्माण होणे, शैक्षणिक वर्षात राहण्याची सोय नसल्याने विद्यार्थ्यांना अडचणीचे जाणे, त्यामुळे आर्थिक भुर्दंडाची वेळ विद्यार्थ्यांवर येणे, त्यामुळे शासनाने त्वरीत वसतीगृहाचा प्रस्ताव मान्यतेसाठी पाठवून वसतीगृह बांधकामाची प्रक्रिया तातडीने करण्याची आवश्यकता, शासनाने यावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६३. | ५३३ | **श्री.अंबादास दानवे**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-<br>"फुड सेफ्टी सर्व्हीस, नागपूर या कंपनीने इतर मागास व बहूजन कल्याण विभागात अन्न व सुरक्षा व्यवस्थापन, अन्न सुरक्षा प्राधिरणाची सुमारे १ लक्ष रक्कम ४५ हजार प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आल्याची बाब निदर्शनास येणे, त्यासाठी सदर कंपनीला रुपये ३५ कोटी रक्कम शासनाकडून अदा करण्यात येणे, वास्तविकतः या कंपनीकडून फक्त १५ हजार प्रशिक्षणार्थींना भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI) कडून प्रमाणपत्र देण्यात आले असणे, उर्वरित १ लक्ष ३० हजार बोगस प्रमाणपत्र या कंपनीकडून सादर करण्यात येवून शासनाची १० कोटींपेक्षा जास्तची फसवणूक करण्यात येणे, खोटी आकडेवारी सादर करुन फुड सेफ्टी सर्विस, नागपूर या कंपनीने शासनाची फसवणूक करणे, उक्त प्रकरणी संबंधित विभागातील अधिकाऱ्यांचा हात असणे, त्यामुळे सदर कंपनीला काळ्या यादीत टाकून कंपनीच्या संचालकांवर फौजदारी गुन्हे दाखल करणे, शासनाची फसवणूक केलेल्या रुपये १० कोटीची रक्कम संबंधित कंपनीकडून वसूल करुन कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया." | **२० डिसेंबर, २०२३** | **चर्चा झाली नाही.** |
| ६४. | ५३० | **श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप**, **वि.प.स.**<br>नागपूर एसटी महामंडळात कार्यरत असलेले दिव्यांग कर्मचारी हंसराज सुकदेवे यांना निवृत्तीला सहा महिने राहिले असताना विभाग नियंत्रक | **कित्ता** | |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | यांनी परिपत्रकाचा भंग करून बदली केल्याचा प्रकार माहे नोव्हेंबर, २०२३ च्या दरम्यान उघडकीस येणे, या नियमबाह्य प्रकारामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, महिला कर्मचारी यांच्या वर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध व दमदाटी करून असंविधानिक भाषा वापरून अपमानित केल्याबद्दल गणेशपेठच्या राज्य परिवहन महामंडळ विभागीय कार्यालयासमोर महिला कर्मचाऱ्यांच्या नेतृत्वात प्राणांतिक उपोषण सुरू करणे, त्या वर महिला आयोगाने दखल घेऊन सुद्धा सदर प्रकरणी एसटी महामंडळाकडून हा अन्याय दूर केला जात नाही, तोपर्यंत उपोषण सुरू ठेवणे व निव्वळ तोंडी आश्वासनावर उपोषण सोडणे,याप्रकरणी राज्य शासनाने तातडीने चौकशी करून नियमबाह्य काम करणाऱ्या एसटी महामंडळातील अधिकारी यांचे विरुध्द करावयाची निलंबन किंवा बदलीची कारवाई व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ६५ | ३७ | **श्री. अमोल मिटकरी**, श्री. सतिश चव्हाण, श्री. विक्रम काळे, श्री. एकनाथराव खडसे **वि.प.स.**<br><br>राज्यातील सामाजिक न्याय विशेष सहाय्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या राज्यातील २,५०० अनुदानित वसतीगृहांना माहे जुलै, २०२३ पासून शासनाकडून अनुदान न मिळाल्यामुळे इमारत भाडे, कर्मचाऱ्यांचे मानधन व या वसतीगृहात शिक्षण घेणाऱ्या सुमारे १ लाखापेक्षा जास्त | **कित्ता** | |

विद्यार्थ्यांचा भोजनाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, राज्यातील सर्व जिल्ह्यातून मागासवर्गीय व गरीब विद्यार्थ्यांना वसतीगृहात शिक्षण घेण्याशिवाय दुसरा पर्याय नसल्यामुळे ते शासनाच्या वसतीगृहात राहून शिक्षण घेत असणे, सुमारे सहा महिन्यांपासून राज्यातील शासकीय वसतीगृहांना देखील शासनाने अनुदान न दिल्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची उद्भवलेली परिस्थिती, ठाणे जिल्ह्यातील २६ वसतीगृहात मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत असणे, परंतु या वसतीगृहांना शासनाने अनुदान न दिल्यामुळे तेथील विद्यार्थ्यांवर उपासमारीची परिस्थिती उद्भवलेली असणे, परिणामी काही संस्थाचालक उधारीवर किराणा सामान खरेदी करून विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था करीत असणे, परंतु दुकानदारसुद्धा त्यांना उधारीवर धान्य देण्यास टाळाटाळ करीत असल्यामुळे विद्यार्थ्यांना उपाशी राहावे लागत असणे, शासनाने या मागासवर्गीय वसतीगृहांना त्वरीत अनुदान देण्याची आवश्यकता व विद्यार्थ्यांच्या भोजनाची व्यवस्था करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| ६६ | ५५८ | **श्री. कपिल पाटील**, **वि.प.स.** | **कित्ता** |

कचरा वेचण्याचं काम करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना लागू असणे, या योजने अंतर्गत रु. ३,०००/- वार्षिक शिष्यवृत्ती मिळणे, या योजनेसाठी ५० टक्के हिस्सा राज्य व ५० टक्के हिस्सा केंद्र सरकारचा असणे, सदर शिष्यवृत्तीसाठी कागदपत्रांची पूर्तता

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करून गेल्या तीन वर्षांचे अर्ज समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे येथे जमा करूनही अद्याप २५७९ विद्यार्थी यांची ५५,३६,५००/- रुपयांची शिष्यवृत्ती प्रलंबित असणे, सदर योजनेचे नाव साफ सफाई क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती असे या योजनेचे सुधारित नाव २०१८ पासून केले असूनही मात्र शाळेत आणि सरकारी दफ्तरी 'अस्वच्छ शिष्यवृत्ती' या नावाने ओळखली जात असल्याने विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होणे, शिष्यवृत्ती न मिळाल्याने शाळेमध्ये फी भरता न येणे, मुलांना व पालकांना वारंवार अपमान सहन करावा लागणे, या मुलांच्या शाळा गळतीची शक्यता निर्माण होणे, यामुळे निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ६७ | ५६० | **श्री. कपिल पाटील**, **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | राज्यात तसेच मुंबईत दिव्यांगांच्या विशेष शाळा असून या शाळांमध्ये विद्यार्थी दररोज सहा ते साडेसहा तास शिक्षण घेत असणे, सदर विद्यार्थी मानसिक व शारीरिक क्षमतेपेक्षा जास्त काळ शाळेत असणे, आरटीई २००९ नुसार विशेष शाळेतील दिव्यांग विद्यार्थी व शिक्षक यांचे कामाचे तास व शिक्षणाचे तास निश्चित केलेले असून काही ठिकाणी विद्यार्थ्यांना जास्त वेळ शाळेत ठेवले जाणे, जास्त वेळ शाळेत बसल्यामुळे हे विद्यार्थी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | अस्वस्थ होणे, या विद्यार्थ्यांमध्ये चिडचिड निर्माण होऊन आक्रमक होणे, शिक्षकांना ढकलून मारण्याचा प्रयत्न करु शकणे, या निर्माण होणाऱ्या गंभीर प्रश्नाबाबत शासनाची भूमिका आणि करावयाची कार्यवाही. | |
| ६८ | २९९ | **श्रीमती उमा खापरे**,श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. रमेशदादा पाटील,ॲड. निरंजन डावखरे,श्री. निलय नाईक,प्रा. राम शिंदे **वि.प.स.**<br>राज्यात चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा शहरालगत असलेल्या एकोणा-मारडा खुला कोळसा खाणीमुळे अनेक समस्यांना नागरिकांना तोंड द्यावे लागत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, कोळशाची जड वाहतूक शेतात उडणारी धूळ आणि आता घरांना पडणाऱ्या भेगा यामुळे येथील नागरिक त्रस्त झालेले असणे, दोन वर्षापूर्वी माढेळी रोडवरील एकोणा-मारडा ही खुली कोळसा खाण सुरू करण्यात आली त्यावेळी वेकोलीने नागरिकांना सर्व प्रकारचे आश्वासन दिले मात्र त्याची पूर्तता झाली नसल्याने याच मार्गावर तीन जिनिंग फॅक्टरी, संस्कार भारती शाळेसह महाकाली नगरी आणि इतर वसाहती असून दुपारी या कोळसा खाणीमध्ये मोठ्या क्षमतेने ब्लास्टिंग केली जाते त्यामुळे घरांना आणि जिनिंग फॅक्टरींना हादरे बसत असणे, अधिक क्षमतेच्या ब्लास्टिंगमुळे घरांच्या भिंतीला तडे गेलेले असून वारंवार दुरुस्ती करून सुद्धा तडे जाणे चालूच असल्याने नागरिक त्रस्त झालेले असणे , याबाबत अनेकदा वेकोलीकडे तक्रारी करूनही कोणतीच कार्यवाही होत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करत असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६९ | ७ | **श्री. सुनिल शिंदे**,श्री. विलास पोतनीस,श्री. जयंत पाटील **वि.प.स.**<br>नवी मुंबईत गृहनिर्माण व घरविक्रीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सिडकोकडून ९० हजार घरे बांधण्याचा निर्णय घेतला असणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, अल्प उत्पन्न घटक व सर्वसामान्य जनतेसाठी घरे तसेच व्यापारी व वाणिज्य वापरासाठी व्यावसायिक गाळे बांधण्यात येणार असणे, सन २०१८-१९ मध्ये पंतप्रधान आवास योजनेंतर्गत सिडकोमार्फत बांधण्यात आलेली घरे व व्यावसायिक गाळे विविध कारणांमुळे विक्रीविना राहिल्याने दुरुस्ती-देखभालीचा खर्च सिडकोकडून करण्यात येणे, या गृहनिर्माण योजनेतील घरे/सदनिका/व्यावसायिक गाळे यांची मार्केटींग, ब्रँडींग, सेल्स आणि प्रकल्प अस्तित्वात आल्यानंतर त्याचे मार्केटींग करण्यासाठी मे.थॉटट्रेन डिजाईन प्रा.लि.सह मे.हेलीओसमेडीअम बाजार प्रा.लि यांची सल्लागार संस्था म्हणून नियुक्ती केलेली असून सदर कंपनीसोबत ६९९ कोटी रुपयांचा करार केला असणे, सिडकोने सादर कंपनीस कंत्राट दिल्यामुळे विक्री केलेल्या घरामागे या कंपनीला १ लाख रुपये जादा मिळणार असणे, तथापी कंपनीने मागील एका वर्षात एकाही घराची विक्री केलेली नसतानाही १२० कोटी रुपये कंपनीला देऊन नियोजित गृह प्रकल्पाच्या जाहिराती आणि इव्हेन्टवर १५० कोटी रुपये खर्चाच्या प्रस्तावास सिडकोने दिलेली मान्यता, तळोजा, खारघर, | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | बामणडोंगरी, मानसरोवर आदी ठिकाणी घरे विक्रीसाठी तयार असूनही कंत्राटदारास दलाली देण्यासाठी थांबवण्यात आलेली घरांची लॉटरी, सिडकोने आजतागायत विविध ठिकाणी लाखो घरे बांधून त्यांची विक्री करण्यात येणे, तत्कालीन विरोधी पक्षनेते (विधानसभा) यांनी उक्त प्रकरणी सखोल चौकशी करून सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत लेखी कळवूनही सिडकोने कोणतीही कार्यवाही न करणे, सदर तक्रारीची दखल घेऊन तात्काळ अहवाल सादर करण्याबाबत शासनाने माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये आदेश देऊनही सिडकोने अद्याप सादर न केलेला अहवाल, सर्वसामान्य जनतेला परवडणाऱ्या दराने घरे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने काम करत असताना त्यांना मार्केटिंग करण्याची वेळ आल्याने घरांच्या किंमतीमध्ये वाढ होऊन दरवाढीचा भुर्दंड सर्वसामान्य नागरिकांना बसणार असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| ७० | १४ | **श्री. विलास पोतनीस**,श्री. सुनिल शिंदे,श्री. विक्रम काळे,श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.**<br>ठाणे महानगरपालिकेच्या कळवा रुग्णालयात दिनांक १३ ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्या सुमारास दहा तासात १८ रुग्णांचा तसेच तत्पूर्वी ४८ तासांत ५ रुग्णांचा प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे झालेला दुर्दैवी मृत्यू, याच रुग्णालयात मागील आठ महिन्यांत १०६१ रुग्णांचा मृत्यु झाल्याची धक्कादायक बाब उघडकीस येणे, मर्यादेपेक्षा जास्त प्रमाणात दाखल | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | झालेले रुग्ण, रुग्णालयाच्या बाहेर रुग्णांच्या नातेवाईकांना बसण्यासाठी असणाऱ्या कठड्यावरच रुग्णांवर होत असलेले उपचार, त्यामुळे रुग्णालयात सुरु असलेला अनागोंदी कारभार, डॉक्टर आणि नर्सेसची असणारी कमतरता तसेच इतर कर्मचा-यांची तब्बल ३०० पदे रिक्त असणे, त्याचप्रमाणे सदर रुग्णालयातील १४ शस्त्रक्रिया विभागांपैकी ५ विभाग बंद अवस्थेत असणे, जिल्ह्यातील शासकीय रुग्णालय बंद असल्याने कळवा रुग्णालयावर पडलेला अतिरिक्त ताण, त्यामुळे आरोग्य सुविधा बळकट करण्याची आवश्यकता, रुग्णांना जेवण देण्यासाठी नियुक्त केलेल्या केटरर्सकडून रुग्णांना जेवण देण्यात न येणे, रात्रनिवारा बंद असल्याने रुग्णांच्या नातेवाईकांची होत असलेली गैरसोय, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी समिती नियुक्त करणे, परंतू सदर समितीने शासनास सादर केलेला अहवाल अद्याप जाहिर करण्यात आलेला नसणे, परिणामी सर्वसामान्य नागरीकांत वाढता तीव्र असंतोष, शासनाने उक्त प्रकरणी करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ७१ | १९ | **श्री.विलास पोतनीस**, श्री. सुनिल शिंदे, श्रीमती उमा खापरे, श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. निलय नाईक, प्रा. राम शिंदे **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | राज्यात विशेषतः मुंबई, ठाणे, पुणे इत्यादी ठिकाणी दिवसेंदिवस वाढत असलेली भटक्या कुत्र्यांची संख्या, सध्या मुंबई शहरात सुमारे १ लाख | | |

६४ हजारांवर असणारी भटक्या कुत्र्यांची संख्या असणे, त्यामध्ये दिवसेंदिवस मोठया प्रमाणात होत असलेली वाढ, मागील पाच वर्षाच्या कालावधीत भटक्या कुत्र्यांनी तब्बल ३ लाख ८० हजार व्यक्तींना घेतलेले चावे, चालू वर्षाच्या आठ महिन्यात सुमारे ३७ हजार लोकांना घेतलेले चावे, तसेच ठाणे शहरात भटक्या श्वानाच्या हल्ल्यात एका उद्योजकाचा यांचा माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान मृत्यू झाल्याचे निदर्शनास येणे, मागील आठवड्यात कळवा येथे भटक्या कुत्र्याने चार ते पाच जणांचे लचके तोडले असणे, ठाणे महापालिका हद्दीत मागील साडेचार महिन्यात ९३३ घटना घडलेल्या असणे, कुत्र्याने चावा घेतल्यास व दुर्लक्ष झाल्यास रेबिज होण्याचा वाढत असलेला धोका, वाढत असलेल्या भटक्या कुत्र्यांच्या संख्येवर नियंत्रण आणण्यास महापालिकांना आलेले अपयश, धिम्या गतीने होत असलेले निर्बीजीकरण, भटक्या कुत्र्यांची पसरलेली दहशत, त्यामुळे सर्वसामान्य माणसांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण, महापालिकांचे कुत्र्यांच्या लसीकरणाकडे होणारे दुर्लक्ष, यावर शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया.

७२ ४६ **श्री. चंद्रशेखर बावनकुळे**, **वि.प.स.** **कित्ता**

नगरपरिषद भंडारा अंतर्गत येथील विकास कामाचे निविदे प्रक्रियेत नियमबाहय व बेकायदेशीर अटी व शर्ती निविदेमध्ये टाकून आर्थिक हित साधण्यासाठी कंत्राटदाराची साखळी तयार करून शासकीय रकमेचा

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | अपहार केल्याचे दि. ४/५/२०२२ ला तक्रार जिल्हाधिकारी भंडारा यांना केलेली असून याबाबतचा चौकशीचा अनुपालन अहवाल कार्यकारी अभियंता सार्वनिक बांधकाम विभाग. भंडारा यांनी दि. १६/१२/२०२२ ला सादर केलेला असुन यात पदाचा दुरूपयोग करून दिलेला अनुपालन अहवाल खोटा व चुकीचा असल्याचे तक्रार नगरसेवकांनी केलेली असणे, या अहवालात महा. शासन सा.बां. शासन निर्णय, म्युनिसिपल अकाउंट कोड व स्थायी निर्देश विरूद्ध अनुपालन अहवाल दिलेला असल्याने तसेच याबाबतचा पुरावा सिद्ध करून दिल्याने कायदेशीर कारवाई करून सेवेतून बडतर्फ करण्याची मागणी केलेली असणे, शासकीय निधी मध्ये मंजुर कामाच्या निविदे प्रक्रियेत पारदर्शकता न पाळता व स्वैच्छिक आवश्यक बदल करून निविदा प्रक्रिया पार करून हितसंबंधाने लाभ दिलेला दिसून येत असूनही याबाबत कुठलिही कार्यवाही संबंधित विभागाने अथवा प्रशासकीय यंत्रणेने केलेली दिसून येत नसणे, त्यामुळे पैशाचा झालेला अपहार, या सर्व प्रकरणाची विशेष चौकशी होणे आवश्यक असणे, तातडीने याबाबत चौकशी करून दोषी अधिकारी तथा खोटा अनुपालन अहवाल सादर करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करणेबाबत शासनाची आवश्यक प्रतिक्रीया व कार्यवाही. | | |
| **७३** | **९०** | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** | **कित्ता** | |

मुंबई महानगरपालिकेच्या जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेच्या माध्यमातून सन २०२५ पर्यंत क्षयरोगाचे उच्चाटन करण्याची मोहीम मुंबई महानगरपालिकेने हाती घेतलेली असणे, क्षयरोग बाधितांना योग्य उपचार मिळावेत यासाठी मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक विभागातील आरोग्य केंद्राच्या माध्यमातून क्षयरोग रुग्णांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असणे, सदर माहे जून, २०२३ पासून औषध केंद्रावर येणाऱ्या रुग्णांना लिनेझोलीड, क्लोफाजीमाईन, सायक्लोसीरीन, बीपीक्यु, लेव्होफ्लोक्साईन, मॉक्सीफ्लोक्साईन, या आवश्यक असलेल्या क्षयरोगावरील औषधाच्या तुटवड्यामुळे रुग्णाचे हाल होणे, क्षयरोगावरील रुग्णांची औषधे बाहेरून विकत घ्यावी लागणे, क्षयरोगावरील औषधाच्या किंमती जास्त असल्याने रुग्णांना दरमहा ४ हजार रुपयांचा भुर्दंड सोसावा लागून बाहेरील दुकानातून औषधे खरेदी करावी लागत असल्याने रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, परिणामी प्रशासनाकडून रुग्णांना पुरेशा प्रमाणात औषधाचा पुरवठा होत नसल्याने अतिरिक्त आयुक्त आणि कार्यकारी आरोग्य अधिकारी यांचेकडे पत्रव्यवहार करण्यात येऊनही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी रुग्णांचे हाल होऊन नातेवाईकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने दखल घेऊन मुंबई महानगरपालिकेने प्रत्येक विभागातील आरोग्य केंद्राच्या माध्यमातून क्षयरोग रूग्णांना आरोग्याच्या सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ७४ | २०१ | **श्री. सतेज** ऊर्फ **बंटी पाटील**, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, **श्री. अभिजित वंजारी**, श्री. राजेश राठोड, श्री. जयंत आसगावकर, श्री. धीरज लिंगाडे, डॉ. प्रज्ञा सातव, डॉ. वजाहत मिर्झा, श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.**<br><br>कोल्हापूर, सातारा, कराड या भागातून दररोज ५० लाख लिटर दूध पुणे मुंबईला पुरवले जात असणे, कोल्हापूर व सातारा जिल्ह्यातून दररोज ३०० हून अधिक ट्रक भाजीपाला पुणे, मुंबईला जात असणे, या जिल्ह्यात साखर उत्पादनातही मोठ्या प्रमाणात होत असणे, हा नवीन रेल्वे मार्ग झाल्यास मालवाहतूक खर्चही कमी होणेची शक्यता असणे, अडचणीतील साखर कारखान्यांना त्यांचा लाभ होण्याची शक्यता असणे, कोल्हापूर सातारा व परिसरातील आयटी क्षेत्रामधील सुमारे १० हजार कर्मचारी पुणे, मुंबई येथे दररोज प्रवास करीत असणे, कोल्हापूर व सातारा या जिल्ह्यांचे औद्योगिक दृष्ट्या महत्त्व लक्षात घेता पुणे ते कोल्हापूर हा नवीन अति जलद रेल्वे मार्गामुळे कोल्हापूर, सातारा, कराड या परिसरातील उद्योगाला चालना मिळणार असणे, तसेच येथील जनतेचा वेळ, श्रम व पैसा वाचणार असणे, त्यामुळे कोल्हापूर - पुणे नवीन अति जलद रेल्वे लाईन सुरु करणे बाबत अनेकदा मागणी करण्यात आलेला असणे व पाठपुरावा करूनही अद्याप कार्यवाही करण्यात शासनाकडून होत असलेला विलंब, परिणामी | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | येथील जनतेत पसरले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया. | |
| ७५ | २४० | **श्री. रमेशदादा पाटील**,श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे,श्रीमती उमा खापरे,श्री. निलय नाईक,श्री. सत्यजीत तांबे **वि.प.स.**<br>मुंबईतील हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने मार्च २०२३ मध्ये दिलेले असणे, मात्र मुंबई महानगरपालिकेसह संबंधित यंत्रणातर्फे मुंबईतील हवेचे प्रदूषण रोखण्यासाठी विविध उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी न झाल्यामुळे हवा गुणवत्ता निर्देशांकानुसार माहे ऑक्टोबर व नोव्हेंबर, २०२३ मध्ये मुंबईतील हवेचा दर्जा अति धोकादायक पातळीपर्यंत खालावला असल्याची बाब निदर्शनास येणे, याबाबत मा. उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने चिंता व्यक्त केली असणे, याप्रकरणी स्वतःहून जनहित याचिका दाखल करून घेत असल्याचे स्पष्ट करीत मा.उच्च न्यायालयाने याप्रकरणी राज्याचे महाधिवक्ता यांना सहकार्यासाठी पाचारण केलेले असणे, हवेचा दर्जा खालावल्याची परिस्थिती मुंबईसह पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर अशा मोठ्या शहरांमध्येही निदर्शनास येणे, धोकादायक हवेमुळे राज्यातील नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होऊन सर्दी, खोकला, ताप, स्वाईन फ्लू, डेंगू, मलेरिया इ. सारख्या आजारांच्या साथी पसरणे, राज्यातील अनेक नागरिक या व्याधींनी आजारी असणे, | **कित्ता** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | मुंबईत साथीच्या आजारापासून मुक्ती मिळवण्यासाठी पालिका प्रशासन कोट्यावधी रुपयांचा खर्च करून उपाययोजना राबवून परिस्थिती नियंत्रण आणल्याचा दावा करणे, महानगरपालिका व राज्य शासनाच्या रुग्णालयामध्ये चतुर्थ श्रेणीचे सुमारे एक लाख पंचेचाळीस हजार कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असणे, पालिकेच्या कीटकनाशक विभागात अनेक पदे रिक्त असणे, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे प्रदूषण व साथीच्या आजारावर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविताना पालिकेला आलेले अपयश, हवेच्या प्रदूषण नियंत्रणासाठी मा. मुख्यमंत्री यांनी बैठक घेणे, या बैठकीतील तात्काळ आणि दीर्घकालीन उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी न होणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाने जल, वायु, ध्वनि प्रदूषण रोखण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची स्पष्टता नसणे, राष्ट्रीय हरित लवादाच्या धोरणांची राज्यात अंमलबजावणी कोणत्या यंत्रणेद्वारे केली जाते याबाबत स्पष्टता नसणे, या महानगरांमध्ये एकाच वेळी सुरू असलेल्या पायाभूत सुविधांच्या कामांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे असणे, त्यामुळे राज्यातील मुंबईसह मोठ्या शहरांमधील हवेचा दर्जा सुधारण्यासाठी पर्यावरण विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, संबंधित महानगर विकास प्राधिकरण यांनी एकत्रितरित्या समन्वयाने धोरण ठरवण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाचे कार्यवाही व उपाययोजना. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | ३१० | **श्री. प्रवीण दटके**, श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. निलय नाईक **वि.प.स.** स्थानिक संस्था कर LBT कायद्याअंतर्गत व्यापाऱ्यांना सवलत देण्यासाठी पुन्हा एकदा तडजोड योजना (Amnesty Scheme) लागू करण्याची व्यापाऱ्यांकडून होत असलेली मागणी, महानगरपालिकेच्या कर संग्रहात वाढ होण्याचा उद्देश मात्र कराव्यतिरिक्त लावण्यात आलेले व्याज आणि शास्ती याचा बोजा हा करापेक्षा जास्त असल्याने तसेच कोरोना परिस्थितीमुळे आलेली जागतिक मंदी यामुळे व्यापाऱ्यांची कर भरण्यास असणारी अनुत्सुकता, LBT नियमांच्या नियम ३६ मध्ये बदल करून व्यापा-यांना अपिल करतेवेळी भरावयाची संपूर्ण विवादित रक्कमे ऐवजी कमी रक्कम भरून अपिल करण्याची सवलत देण्याबाबत व्यापारी आणि लोकप्रतिनिधींनी यांच्याकडून होत असलेली मागणी, याबाबतीत व्यापाऱ्यांना न्याय मिळवून देणे तसेच महानगपालिकेची कर वृद्धी होणे या विचाराने स्थानिक संस्था करात LBT मध्ये तडजोड योजना Amnesty Scheme लागू करणेबाबत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **कित्ता** |
| ७७ | ३३० | **श्रीमती उमा खापरे**,श्री. प्रविण दरेकर,श्री. रमेशदादा पाटील **वि.प.स.** पुणे महापालिका व पिंपरी-चिंचवड महापालिका परिसरात व ग्रामीण भागात होत असलेल्या अनधिकृत बांधकामाचा दाखला देत दिनांक ३१ मार्च २०१५ ची पीएमआरडीएची स्थापना झाली परंतु ७ हजार २५६.४६ किलोमीटर कार्यक्षेत्र असलेल्या या प्राधिकरणात अनधिकृत बांधकामांना | **कित्ता** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | आळा घालण्याऐवजी मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे होत असणे, विकास आराखडा तयार करण्यासाठी व प्राधिकरणाच्या अंतर्गत जमिनीचे व मालमत्तांचे मोजमाप करण्यासाठी भौगोलिक माहिती प्रणाली (जीआयसी) ही आधुनिक प्रणाली उपयोगात आणली जात असताना ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात आलेल्या मिळकतीचे सर्वेक्रमांक व माहिती प्रत्यक्षातील मिळकतीशी जुळत नाहीत त्यामुळे ड्रोनमध्ये त्रुटी असणे, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरणाने (पीएमआरडीए) भोसरी प्राधिकरण सेक्टर १२ येथे गृहप्रकल्प राबविला तेथे लोक राहायला गेले, मात्र गुणवत्तापूर्ण कामे न झाल्यामुळे व विविध प्रकारच्या समस्या असल्याने येथील सदनिका धारक त्रस्त असणे, तसेच हा प्रकल्प एकाच अधिकाऱ्याकडे अनेक वर्ष असून एसटीपी प्रकल्प ही अद्याप सुरू नसणे, पुणे महानगर क्षेत्र प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) अधिकाऱ्यांवर कोणाचाही अंकुश नसल्याने औंध येथील भाड्याच्या कार्यालयातून कामे करण्यात येत असल्याने नागरिकांची कामे वेळेवर होत नसणे, त्यामुळे नागरिकांना कामे करून घेण्यासाठी एजंटचा आधार घ्यावा लागत असल्याने नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक समस्या निर्माण होत असणे, यामुळे येथील नागरिकांकडून नाराजी व्यक्त करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.” | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७८ | ३७८ | **श्री. प्रवीण दटके**,श्री. चंद्रशेखर बावनकुळे **वि.प.स.**<br>नागपूर महानगरपालिका अंतर्गत मालमत्ता कराकरिता तडजोड योजना (Amnesty Scheme) लागू करण्याची जनतेकडून होत असलेली मागणी, शहरात साधारणतः ३ लक्ष १२ हजार नागरिकांचे मालमत्ता कर थकीत असणे , एकूण ७५० कोटी मालमत्ता कराची रक्कम थकीत असणे, महापालिकेच्या कर संग्रहात वाढ होण्याचा उद्देश मात्र कराव्यतिरिक्त लावण्यात आलेली शास्ती व व्याजाची रक्कम ही करा पेक्षा जास्त असल्याने कर आणि व्याज भरण्यास सामान्य जनतेची असणारी असमर्थता , कोरोना परिस्थिती आणि जागतिक मंदीमुळे जनता आर्थिक अडचणीत आली असणे, महापालिकेच्या ४२६ झोपडपट्टीत ही योजना चालू केली असणे, त्याच धर्तीवर संपूर्ण शहरात योजना लागू करण्याची आवश्यकता , लोकप्रतिनिधीमार्फत लेखी निवेदनाद्वारे ही योजना राबवून महापालिकेच्या करसंग्रहात वाढ होण्याच्या दृष्टीने होणारी मागणी, सदर बाबत नागरिकांचे आणि महापालिकेचे हित पाहता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **कित्ता** |
| ७९ | ४२४ | **श्री. अंबादास दानवे**, **वि.प.स.**<br>ठाणे शहरातील व्होल्टास लि. या कंपनीस औद्योगिक वापर करण्याकरिता देण्यात आला असणे, सदरहू कंपनीने उक्त भुखंडातील १०,३३७ चौ.मी इतका अतिरिक्त भुखंड सन २००३ मध्ये औद्योगिक वापराकरिता असलेल्या शासनाच्या अटी व शर्ती नुसार ज्युपिटर लाईफ लाईन ली. या | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कंपनीस विक्री केलेला असणे, त्यानुसार त्यांना रुग्णालयाच्या बांधकामासाठी महानगरपालिकेकडून १ चटई क्षेत्र निर्देशांक प्रमाणे नकाशा मंजूर करण्यात आलेला असणे, तथापि, सदरहू कंपनीने ज्यादा चटई क्षेत्र निर्देशांक प्राप्त करण्याच्या दृष्टीने सब रजिस्टर हैदराबाद यांना ज्यूपिटर फाऊंडेशनला पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट घोषित करण्याचा अधिकार नसताना दिनांक १७ जानेवारी, २००५ रोजी बोगस प्रमाणपत्र तयार करून डॉ. अजय ठक्कर यांनी महाराष्ट्र राज्य तसेच तेलंगणा राज्य (पूर्वीचे आंध्रप्रदेश) यांची केलेली फसवणूक, मा.सर्वोच्य न्यायालय व मा.उच्च न्यायालय यांच्या आदेशानुसार इंडियन ट्रस्ट ॲक्ट १८८२ अंतर्गत रजिस्टर केलेली ट्रस्ट पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट नसूनही ज्यूपिटर फाऊंडेशन या संस्थेला ठाणे महानगरपालिकेने २००% चटई क्षेत्र दिलेला असणे, ठाणे महानगरपालिका आणि डॉ. अजय ठक्कर यांनी संगनमताने सदरहू अनियमितता करून मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालय मुंबई यांच्या आदेशाचा केलेला अवमान, उक्त प्रकरणी चौकशी करून ज्युपिटर लाईफ लाईन ली. कंपनीच्या मालकावर गुन्हा दाखल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८० | ४७५ | **श्री. सुरेश धस, वि.प.स.**<br>धाराशिव नगर परिषदेंतर्गत विविध प्रकारच्या घोटाळ्यांचे एकूण ८ गुन्हे दाखल असणे,जिल्हाधिका-यांनी आदेशित करूनही विद्यमान मुख्याधिका-यांनी जाणीवपुर्वक गुन्हे दाखल करण्यास टाळाटाळ करणे,मोजमाप पुस्तिका गहाळचा गुन्हा दाखल करणे,त्यासंदर्भात पत्र आल्यावर पुन्हा चोरीचा, अज्ञातावर गुन्हा दाखल करून दोषींना पाठीशी घालणे,बॉयोमायनिंग प्रकरणी सभागृहासही खोटे उत्तर देणे,पोलीस मुख्यालयांसमोरील बेकायदेशीर बांधकाम परवानगीस अभय देऊन त्याचेही सभागृहाला खोटे उत्तर देणे,कालांतराने उच्च न्यायालयाला सदरील बांधकाम खुल्या जागेत असल्याची लेखी कबुली देणे,नगर पालिकेतील एकुण ३९ खात्याची माहिती देणे,चौकशी समितीला प्रत्यक्षात १३८ खाती सापडणे,एवढी खाती काढण्याचे काय हेतु असणे, बोगस गुंठेवा-या प्रकरणी चौकशी समितीच्या अहवालानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी आदेश देऊनही मुदतीत गुन्हा दाखल न करणे,शहरातील ओपन स्पेसवरही गुंठेवा-या करणे,भकास उद्याने,कचऱ्याचा गंभीर प्रश्न,रस्त्यांची प्रचंड दुरावस्था,साथीचे वाढलेले आजार,निकृष्ट दर्जाची कामे,मोठ्या प्रमाणावर काढलेली बोगस बिले,मोजमाप पुस्तिका गहाळ करणे,मुद्दाम चुकीचे गुन्हे दाखल करणे,आरोप सिद्ध होऊनही सेवानिवृत्त अभियंत्याला जाणीवपुर्वक पाठीशी घालणे इत्यादी.बाबींमुळे सबंधितांस तात्काळ निलंबित करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यासाठी जनता,कर्मचारी व अधिकाऱ्यांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष व तीव्र संतापाची भावना यांवर शासनाची भूमिका व तातडीने करावयाची कार्यवाही. | **कित्ता** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८१ | ४९१ | **श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप, वि.प.स.**<br>मुंबई महानगरपालिकेचे मुंबई सेंट्रल येथे नायर रुग्णालय व टोपीवाला राष्ट्रीय वैदयकीय महाविदयालय असणे,रुग्णालयात ५१ विविध रोगांची डिपार्टमेंट असून सर्वच रोगांवर उपचार होणे, १ जानेवारी ते ३१ डिसेंबर २०२२ या वर्षभरात १४ लाख रुग्णांवर उपचार करण्यात येणे व रोजची नवीन रुग्णसंख्या २५०० वर उपचार घेत असणे, नायर रुग्णालय वैद्यकीय महाविद्यालय असून त्याठिकाणी दरवर्षी नवीन १५० एम.बी.बी.एस. विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत असणे, याठिकाणी पोस्ट ग्रॅज्युएशन वैद्यकीय शिक्षणाची सोय असणे, दरवर्षी २०० डॉक्टर्स या ठिकाणी एम.डी, एमएस अशा पोस्ट ग्रॅज्युएशन कोर्समध्ये प्रवेश घेत असणे, तथापि मुंबई महानगरपालिकेच्या अक्षम्य निष्काळजीपणामुळे मेडिकल कॉलेजच्या प्रोफेसर ३५, सहयोगी प्रोफेसर २२ व सहाय्यक प्रोफेसर १३० जागा रिक्त असणे, मेडिकल कॉन्सिलच्या नियमांप्रमाणे ४ वर्षे अनुभवानंतर सहाय्यक प्रोफेसरला सहयोगी प्रोफेसर अशी बढती देण्यात येणे,तसेच ३ वर्षे अनुभवानंतर सहयोगी प्रोफेसरला प्रोफेसर पदावर बढती देण्यात येणे,मुंबई महानगरपालिकेकडून मेडिकल कौन्सिलच्या नियमाना पूर्णपणे दुर्लक्ष करून ६-७ वर्षे काम करणाऱ्या सहाय्यक प्राध्यापकांना सुध्दा बढती न देणे,वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिने | **कित्ता** | |

प्राध्यापकांच्या नियुक्ती होणे आवश्यक असणे,बढती मिळत नसल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत असणे,नायर वैद्यकीय महाविद्यालयांमधील सर्व सहाय्यक प्राध्यापक,सहयोगी प्राध्यापकांमध्ये शासनाबाबत निर्माण झालेला असंतोष, चिडीची भावना,शासनाने याप्रकरणी तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया.

| | | | |
|---|---|---|---|
| ८२ | ६११ | **श्री. शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** | **कित्ता** |
| | | सातारा जिल्ह्यातील कोरेगाव येथे वॉर्ड क्र.३ मध्ये ट्रीमिक्स कॉंक्रिट रोड व गटर बांधण्याच्या कामाच्या अंदाजपत्रकास व तांत्रिक मंजुरी महाराष्ट्र जीवनप्राधिकरण यांचेकडून घेण्यांत आलेली असणे, सदर अंदाजपत्रक सार्व.बांधकाम विभाग किंवा राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण यांचेकडून घेणे जरुरी असतांना महाराष्ट्र जीवनप्राधिकरण यांचेकडून घेतल्यामुळे ट्रीमिक्स कॉंक्रिट रस्ते व गटर या कामांची सखोल माहिती महाराष्ट्र जीवनप्राधिकरण या विभागाकडे नसल्यामुळे हे काम निकृष्ट दर्जाचे झालेले असणे, हे काम रात्रीच करावे असे नगरपंचायतीचे आदेश नसणे, या कामाची कोणतीही तांत्रिक चाचणी करण्यांत न येणे, सदर कामासाठी स्टील हे अँटी करोसीव स्टील वापरणेचे अंदाजपत्रकात नमूद केलेले असणे, मात्र सदर कामात अँटी करोसीव स्टील न वापरता नेहमीचे स्टील वापरण्यात आलेले असणे, यासर्व प्रकरणांची व केलेल्या निकृष्ट दर्जांच्या कामाची चौकशी करण्याची व संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. | |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८३ | ४४३ | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>मुंबईतील साकीनाका येथील खैरानी रोड परिसरात अनधिकृतपणे चालणारे छोटे कारखाने, बेकरी-विविध वस्तू तयार करणाऱ्या उद्योगांच्या भट्ट्यांच्या चिमण्यांतून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे परिसरातील वस्त्यांमध्ये नागरिकांना श्वसनाचा प्रचंड त्रास होत असल्याचे माहे, नोव्हेंबर २०२३ मध्ये निदर्शनास येणे, श्वसनाचे विकार होत असल्याने येथील १३ अनधिकृत भट्ट्यांवर पालिकेने कारवाई करूनही काही भट्ट्या पुन्हा उभ्या राहिल्या असणे, पूर्व उपनगरातील कुर्ला, गोवंडी, मानखुर्द या भागातून अवैध बांधकामाच्या सर्वाधिक तक्रारी आल्या असणे, फरसाण कारखाना, अवैध गॅरेज, गोदामे यांची येथील संख्या मोठी असणे, त्यामुळे येथील कारखान्यांना पालिकेकडून नोटिसा बजावण्यात आल्या असणे, परंतु प्रदूषण वाढत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **कित्ता** | |
| ८४ | ११० | **श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप**,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. अभिजित वंजारी,श्री. राजेश राठोड,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,डॉ. प्रज्ञा सातव,डॉ. वजाहत मिर्झा,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेला गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने व उपोषण, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरु असणे, तसेच अनेक तरुणांनी मराठा आरक्षण मिळण्याबाबत केलेल्या आत्महत्या, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरु रहावी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता व यावर राज्य शासनाची प्रतिक्रिया. | |
| ८५ | २२३ | **श्री. जयंत पाटील**, श्री. अंबादास दानवे **वि.प.स.** यांच्या लक्षवेधी सूचना क्र. वरील निवेदन उप मुख्यमंत्री सभागृहासमोर ठेवतील:-<br>भिवंडी, शिळ, मुंब्रा, कळवा आणि दिवा क्षेत्रामध्ये विद्युत सेवा देणारी टोरँटो कंपनी व त्यांच्या आस्थापनेवर नियुक्त करण्यात आलेल्या कार्यालयामधील कर्मचाऱ्यांकडून तेथील ग्राहकांना नाहक त्रास देण्यात येत असणे, टोरँटो विद्युत पुरवठा करणाऱ्या कंपनीकडून सदर भागात अवाजवी विद्युत देयके ग्राहकांना पाठविण्यात येत असून देयकासंबंधी तक्रार केल्यास तक्रारीची दखल सुद्धा घेतली जात नसणे, नागरीक तक्रार | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करण्यासाठी गेले असता त्यांना तासनतास कार्यालयात बसून ठेवण्यात येत असणे, तसेच एका कामासाठी तक्रारींसाठी अनेकवेळा कार्यालयात यावे लागणे, तसेच नवीन विद्युत जोडणीची मागणी केली असता त्यांना वेळेवर विद्युत जोडणी उपलब्ध करण्यासाठी टाळाटाळ करण्यात येणे, तसेच दुरूस्तीची कामे देखील विलंबाने करण्यात येणे, त्यामुळे लोकांना ५ ते ४ तास विना विद्युत पुरवठा राहावे लागत असणे, सदर गोष्टींमुळे सर्वसामान्य नागरीकांना नाहक त्रास सहन करावा लागणे, शासनाकडून विद्युत पुरवठा करण्यासाठी खाजगी कंपनीला दिलेले कंत्राट रद्द करून महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीने विद्युत पुरवठा व वीज वितरण करण्याचे काम पूर्ववत हाती घेण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व केलेली उपाययोजना. | | |
| ८६ | १३ | **श्री. विलास पोतनीस**,श्री. सुनिल शिंदे,श्री. विक्रम काळे,श्री. सतिश चव्हाण,श्री. अभिजित वंजारी,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,श्री. सुधाकर अडबाले,श्री. महादेव जानकर,श्री. अंबादास दानवे,श्री. एकनाथराव खडसे,ॲड. अनिल परब **वि.प.स.** | **कित्ता** | |

पुणे शहरातील ससून रुग्णालयात राजरोसपणे अंमली पदार्थ, ड्रग्ज आदिंची तस्करी होत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, ससून रुग्णालयात येरवडा कारागृहात ड्रग्जचे रॅकेट व तस्करी प्रकरणात कैदी असलेला आरोपी ललित पाटील गत अनेक महिन्यांपासून उपचारांच्या नावाखाली दाखल होऊन रुग्णालयातून ड्रग्जचे रॅकेट चालवित असल्याचे समोर येणे, मुंबई, नाशिक रोड जवळील शिंदेगांव येथे एम.आय.डी.सी. भागात एम.डी. या ड्रग्सचे गोडाऊन धाड टाकून त्यामध्ये २५० कोटी रुपयांचे १३३ किलोचे अंमली पदार्थ जप्त करण्यात येणे, अशा पद्धतीच्या अनेक घटना अलिकडच्या काळात आपल्या राज्यात मोठ्या प्रमाणात आढळणे, मेफेड्रॉनच्या विक्रीतून आलेल्या पैशांतून गुन्हेगारांने मोठ्या प्रमाणात जमविलेली अवैध संपत्ती, उक्त गुन्ह्यामध्ये पोलिसांनी केलेल्या चौकशीत राजकीय पाठबळ असल्याचे समोर येणे, ससून रुग्णालयात सदर आरोपीला व्हीआयपी ट्रीटमेंट देण्यात येणे, सुरक्षा यंत्रणा आणि रुग्णालय प्रशासनाशी आर्थिक हितसंबंध असल्यामुळे कारागृहातील कैदयांना रुग्णालयात मिळत असलेल्या सोयीसुविधा, अंमली पदार्थ तस्करीतील मुख्य सूत्रधार ललित पाटील प्रकरणात दोषी आढळून आलेले ससून रुग्णालयाचे तत्कालिन अधिष्ठाता डॉ.संजीव ठाकूर यांना वाचवण्याचा शासनाकडून होत असलेला प्रयत्न, त्यांना अद्याप अटक न होणे, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेली असंतोषाची भावना, तसेच तरूण मुलामुलींना या अंमली पदार्थाचा पुरवठा होत असणे, रेव्ह पार्टी तसेच अनेक पार्ट्यांमध्ये अंमली

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | पदार्थांचा सर्रास उपयोग होणे व त्यामुळे तरूणपिढीचे भविष्य धोक्यात येणे, जेलमध्ये सुध्दा कैदयांना या अंमली पदार्थाचा पुरवठा पोलीसांच्या व इतर कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून केल्याच्या घटना उघडकीस आल्या असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, उक्त प्रकरणी चौकशीकरून मुख्य सुत्रधार व सर्व आरोपी तसेच ससून रुग्णालयातील वरिष्ठ अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ८७ | ६८ | **श्री. विक्रम काळे**, श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.**<br>दि. ४ सप्टेंबर, २०२३ वा त्यासुमारास जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी, ता. अंबड येथे आपल्या मागण्यांसाठी शांततेने आंदोलन व उपोषणाला बसलेल्या मराठा उपोषणकर्त्यांवर पोलिसांनी केलेला अमानुष लाठीहल्ला, या लाठीहल्ल्यात शेकडो आंदोलनकर्ते जबर जखमी झाले असून पोलिसांकडून अश्रुधूराच्या नळकांड्यासुध्दा फोडण्यात आलेल्या असणे, मराठा आंदोलकांवर पोलिसांनी केलेल्या लाठीचार्जच्या निषेधार्थ ठिकठिकाणी मोर्चे काढून बंद पुकारण्यात आलेला असणे, पोलिसांनी केलेल्या या लाठीमाराची चौकशी करण्याची व संबंधित पोलिस अधिकारी यांचेविरुध्द कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| ८८ | ८५ | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.**<br>ठाणे जिल्ह्यातील पाचपाखाडी आणि चेंदणी नाका येथे मुदत ठेवी आणि कर्जावर आकर्षक व्याज देणाऱ्या मनसिध्दी अर्बन निधी प्रा. लि. कंपनीच्या दोन संचालकांनी सुमारे ५०० गुंतवणूकदारांचे सुमारे ५ कोटी रुपये हडप केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान घटना उघडकीस येणे, दिनांक ४ नोव्हेंबर, २०२३ रोजी अचानक कार्यालयातील महत्त्वाची कागदपत्र गायब झाल्याचे कर्मचाऱ्यांच्या लक्षात आल्याने या प्रकरणी २२ कर्मचाऱ्यांनी व १५० गुंतवणूकदारांनी नौपाडा पोलीस ठाण्यात संचालकांवर गुन्हा दाखल करण्यासाठी चार दिवसांपासून पोलीस ठाण्यात फेऱ्या मारूनही पोलिसांनी या संचालकांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यासाठी कोणतीही कारवाई केलेली नसणे, परिणामी नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेली संतापाची भावना, गुंतवणूकदारांची हडप केलेली रक्कम गुंतवणूकदारांना परत मिळवून देण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया. | **कित्ता** |
| ८९ | २५६ | **श्री. अंबादास दानवे**,ॲड. अनिल परब **वि.प.स.**<br>मराठा आरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या आंदोलनास माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान लागलेले हिंसक वळण, आंदोलनकर्त्यांनी बीडमध्ये बसची केलेली तोडफोड व जाळण्यात आलेल्या बसेस, मराठवाड्यात मोठ्या प्रमाणात निघालेले मार्चे, आंदोलनकर्त्यांनी टॉवरवर | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | चढून केलेले उपोषण आणि आंदोलन, रस्त्यावर वाहतूक बंद करून जाळण्यात आलेले टायर, मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या फोटोंना काळे फासणे, आंदोलनात बंद पडलेली एसटी वाहतूक आणि एसटीचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, राजकीय नेत्यांची जाळलेली घरे, आंदोलनकर्त्यांची करण्यात आलेली धरपकड, १४४ आंदोलकांना आरोपी म्हणून केलेली अटक, त्यांच्याकडून नुकसानीची वसूली करण्यासाठी त्यांची जप्त केली जाणारी मालमत्ता, मराठा समाजाने आंदोलकांवर दाखल केलेले गुन्हे मागे घेण्यात यावे अशी केलेली मागणी, शासनाचे त्याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी मराठा समाजात पसरलेले तीव्र असंतोषाचे व अस्थिरतेचे वातावरण, शासनाने तातडीने मराठा आरक्षणासाठी करण्यात आलेल्या आंदोलनातील अटक केलेल्या व गुन्हे दाखल केलेल्या आंदोलकावरील गुन्हे तात्काळ मागे घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही, शासनाची भूमिका वा प्रतिक्रीया. | | |
| **९०** | **३२६** | **श्री. एकनाथराव खडसे, वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | वाळूंज (ता.आष्टी, जि.बीड) येथे एका आदिवासी महिलेची विवस्त्र करून धिंड काढल्याची घटना दि. १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी उघडकीस येणे, या घटनेची तक्रार दाखल करण्यास गेले असता, तेथील पोलिसांनी | | |

प्रथम तक्रार दाखल करून घेण्यास केलेली टाळाटाळ, या घटनेची चित्रफित समाजमाध्यमांवर प्रसिद्ध झाल्यानंतर पोलिसांनी तक्रार दाखल करून घेणे, त्यामुळे पोलिसांच्या कार्यपद्धतीबद्दल तेथील नागरीकांनी व्यक्त केलेली नाराजी, एका लोकप्रतिनिधींच्या पत्नीने या आदिवासी महिलेच्या जमिनीचा ताबा बळजबरीने घेण्याचा प्रयत्न केलेला असणे, याला विरोध केल्यामुळे या आदिवासी महिलेला विवस्त्र करण्यात येणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींच्या पत्नीसह २ व्यक्तींविरुद्ध विनयभंगासह अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अधिनियमानूसार आष्टी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येणे, या आदिवासी महिलेला विवस्त्र केल्यामुळे तेथील नागरीकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या आरोपींविरुध्द कठोर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया

९१ ३९६ **श्री. अमोल मिटकरी**, श्री. विक्रम काळे, श्री. अनिकेत तटकरे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अरुण लाड **वि.प.स.** **कित्ता**

अकोला शहरातील कैलास टेकडी परिसरात दिनांक १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी तेथील एका गावगुंडाने १४ वर्षांच्या मुलीला तेथील सिंधी कॅम्प स्मशानभूमीत नेऊन सिगारेटचे चटके देऊन तिच्यावर पाशवी व अमानवी बलात्कार केल्याची घटना घडल्याचे उघडकीस येणे, इतकेच नव्हेतर त्यानंतर पीडितेला विद्रुप करण्याची एका केशकर्तनालय नेऊन तिचे मुंडण देखील केल्याचे निदर्शनास येणे, तसेच आरोपीने मुलीला व तिच्या

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | कुटुंबियांना जीव मारुन टाकण्याची धमकी देण्यात आलेली असणे, दरम्यानच्या काळात ही घटना कळताच तेथील एका राजकीय पक्षाच्या महिला आघाडी कार्यकर्त्यांनी त्याबाबत खदान पोलीस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवून आरोपीविरुद्ध कारवाईची मागणी करण्यांत आल्यावर पोलिसांनी आरोपीला पोक्सोसह विविध कलमान्वये गुन्हा नोंदविणेत येणे, परंतु पुढे कोणतीही कारवाई करण्यात न येणे, तसेंच या घटनेची दखल घेऊन आरोपीना कडक शिक्षा देण्याबाबत कार्यवाही केली जाईल असे राज्य महिला आयोगाकडून सांगण्यात आलेले असणे, याबाबत शासनाने सविस्तर चौकशी करून निभर्या योजनेंतर्गत पीडीत मुलीला आर्थिक सहाय्य करण्याची तसेच तिच्या कुटुंबियांना पोलीस संरक्षण देण्याची आवश्यकता, शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ९२ | ४९२ | **श्री. अब्दुल्लाखान दुर्राणी**, **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | परभणी जिल्ह्यातील पाथरी तालुक्यातील पठाण मोहल्ला येथे तेथील विधानपरिषदेच्या सदस्यांवर करण्यात आलेला जिवघेणा हल्ला, त्याठिकाणी हसीब खान, तहेजिब खान या इसमाने विधानपरिषद सदस्यांना शिवीगाळ करण्यास केलेली सुरुवात व जिवे मारण्याची दिलेली धमकी, संबंधित मा.सदस्यांचा मुलगा त्यांना वाचविण्यासाठी गेला असता | | |

त्यापदाधिकाऱ्यासोबत असणाऱ्या व्यक्तींनी त्यांच्या मुलावर केलेला जीवघेणा हल्ला,त्यात मा.लोकप्रतिनिधीच्या मुलाला झालेली गंभीर दुखापत, संबंधित लोकप्रतिनिधी त्यांच्या मुलासाठी पाथरी पोलिस स्टेशन येथे हसीब खान तहेजिब खान व इतर ११ व्यक्तीविरुद्ध तक्रार नोंदविण्यास गेले असता तेथे हजर असलेले पोलिस निरीक्षक तसेच पोलिसानी तक्रार घेण्यास दिलेला नकार, दि.२६/१०/२०२३ रोजी संबंधित लोकप्रतिनिधीनी पोलिस अधिक्षक यांचेकडे तक्रार नोंदविण्यास गेले असतांना त्यानी सुध्दा सहकार्य करण्यास दिलेला नकार, ३०७ कलमासाठी नोंद करणे, परंतु गुन्हा गंभीर असतांना सुध्दा नविन पोलिस निरीक्षकांची नियुक्ती करून कलम ३०७ रद्द करून कलम ३२५ व अनुसाद गुन्हा नोंद करुणे, पोलिस आरोपीला वाचविण्याचा प्रयत्न करीत असणे,अद्यापही हसीब खान, तहेजिब खान यांना अटक न केल्यामुळे तेथील नागरीकांत पसरलेला तीव्र असंतोष, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून संबंधित आरोपीविरुध्द कारवाई करण्याची तसेच त्याला पाठीशी घालणाऱ्या नविन पोलिस निरीक्षकांना निलंबित करण्याची होत असलेली मागणी याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| ९३ | ५०७ | **श्री. अमोल मिटकरी**, **वि.प.स.** | **कित्ता** |
| | | वरळी मुंबई येथील खान अब्दुल गफार खान बँक्वेट हॉल असणे, या हॉल शेजारील नॅशनल असोशिएशन फॉर ब्लाइंड या इमारतीत अंध | |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विद्यार्थ्यांना निवास व अध्ययनाची व्यवस्था असणे , या हॉलमध्ये लग्न, लेटनाईट पार्टी, विविध समारंभ आयोजित करण्यात येणे, या समारंभांमध्ये नेहमीच क्षमतेपेक्षा जास्त येणाऱ्या अभ्यागताच्या वाहनामुळे वरळी सी-फेस वरील रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असून महत्त्वाच्या व्यक्तीच्या प्रवासादरम्यान मोठ्या प्रमाणात सुरक्षेचा अडथळा निर्माण होणे,अतिमहत्वाच्या व्यक्तीच्या सुरक्षेला धोका निर्माण होणे, बँक्वेट हॉलमधील अभ्यांगतांच्या सोयीसाठी वाहतूक पोलिसांनी पादचारी सिग्नल बंद करणे, यामुळे नॅशनल असोसिएशन फॉर ब्लाइंड येथील अंध विद्यार्थ्यांना तसेच महापालिका शाळेतील विद्यार्थी व वृध्द नागरिक यांना रस्ता क्रॉस करण्यास अडथळा निर्माण होणे, याबाबत तक्रारी करूनसुध्दा कोणतीच कारवाई न होणे,त्यामुळे पोलीसांची याबाबत संशयास्पद भुमिका असणे, बँक्वेट हॉलमधील समारंभात दरम्यान विविध वाद्याचा तसेच संगीत व्यवस्थेचा आवाज मर्यादेपेक्षा अधिक तसेच रात्री १० नंतर देखील डीजे सुरू असणे, याबाबत नागरिकांनी तक्रारी करुनही पोलीस विभागाने कोणतीही कारवाई न करणे, या संपूर्ण प्रकरणी अंध विद्यार्थ्यांना तसेच शेजारील नागरिकांना त्रास होणे, याबाबत वारंवार तक्रार करून देखील कोणतीही कारवाई होत नसल्याने स्थानिक नागरीकांमध्ये निर्माण होणारा असंतोष, याबाबत गृह विभागाने करावयाची कारवाई व तातडीने करावयाच्या उपाययोजना. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ९४ | ५३४ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.**<br>राष्ट्रीय गुन्हा नोंद विभागाने जाहीर केलेल्या आकडेवाडीनुसार महिला अत्याचार, खून या सारख्या गंभीर गुन्ह्यात महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर येणे, महिलांसाठी देशात सर्वाधिक सुरक्षित असलेले मुंबई शहर आता महिला अत्याचारामध्ये दुसऱ्या क्रमांकावर असणे, दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचाराच्या प्रमाणात वाढ होत असल्याचे चित्र निर्माण होणे, राज्यात महिला-मुली बेपत्ता होण्याच्या प्रमाणात वाढ होत असून दिवसा सरासरी ७० महिला दररोज बेपत्ता होत असणे, वाशिम जिल्ह्यातील कौशल्य विकास विभागातील एका महिला अधिकारीबाबत तेथील सहायक आयुक्त, वाशिम व उपायुक्त, अमरावती यांनी व्हॉट्स ॲप वर अश्लील व आक्षेपार्ह चॅटींग करणे, चुकीच्या पद्धतीने कार्यालयात सी.सी. टी.व्ही कॅमेरे लावून त्या अधिकारी महिलेवर पाळत ठेवणे, सहायक आयुक्त, वाशिम यांचेवर लैंगिक छळाबाबत वाशिम पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल असणे, गुन्हा दाखल होवून देखिल हेतुपुरस्पर संबंधित सहाय्यक आयुक्त, वाशिम व उपायुक्त, अमरावती यांचेवर विभागाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, सहायक आयुक्त, वाशिम हे त्यांच्या हाताखालील कर्मचाऱ्यांना हाताशी धरुन त्या महिलेला मानसिक त्रास देत असल्याचे निदर्शनास येणे, उक्त अधिकाऱ्याचे तातडीने निलंबित करून त्यांचेवर कडक कारवाई करण्यासंदर्भात राज्य महिला आयोगाकडून संबंधित खात्याच्या सचिवांना निर्देश देण्यात येणे, याबाबत तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९५ | ५४७ | **श्री. अमोल मिटकरी**, **वि.प.स.**<br>अकोला महानगरपालिकेच्या आयुक्तांच्या शासकीय निवासस्थान येथे झाडावरील आगे मोहळ काढत असतांना झाडावरुन पडल्याने दि. १४/३/२०२३ रोजी श्री. बाबूराव जंजाळ, रा.वाडेगाव, ता.बाळापूर यांचा झालेला दुदैवी मृत्यु, श्री. जंजाळ यांना झाडावर चढताना त्यांच्या सुरक्षितेची कोणतीही काळजी घेतली नसल्यामुळे त्याचा मृत्यु झाला अशी त्यांच्या मुलाने संबंधित पोलीस स्टेशनला तक्रार करणे, यासंबंधात चौकशी करून महापालिका आयुक्त तथा प्रशासक, अकोला महानगरपालिका तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता हे कारणीभूत असल्यामुळे त्यांच्यावर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. | **कित्ता** | |
| ९६ | ५५६ | **श्री. सचिन अहिर**, **वि.प.स.**<br>पुणे विभागातील बुलढाणा अर्बन को.ऑप.सोसायटीचे अध्यक्ष,कार्यकारी संचालक व संचालक यांनी १० ते १२ हजार कोटी रुपयांच्या ठेवी बेनामी ठेविदारांकडून जमा करणे,याबाबत डेक्कन पोलिस स्टेशन,पुणे येथे २६.९.२०१७ रोजी एफआयआर क्र.२४६/२०१७ भादवि ४०३,४०६,४०९,४२० या प्रमाणे दाखल असूनही तपास व आरोपींना अटक न करता हेच आरोपी अव्याहत सोसायटीचे काम पाहत | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असणे,सोसायटीने एनपीआय कर्जधारकास २४५ कोटीचे कर्ज प्रोजेक्ट सुरू नसतांना (फंड डायव्हर करणे/मनी लॉंडरिंग) देऊन ठेवीदारांची फसवणूक,मनमानी करणे,व बरेच खोटी बनावट कर्ज प्रकरणे जवळच्या नातेवाईकांना व मित्रमंडळीना स्वः फायद्यासाठी वितरित करणे, तसेच सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मुलाचे मायक्रो फायनान्स कंपनीस अनधिकृतरित्या वित्त पुरवठा करणे,अनेक सहकारी , नागरी सहकारी बँका, सोसायटया, ट्रस्ट स्वःफायदयासाठी,काळा पैसा चलनात आणण्यासाठी चालविणे, खाजगी व्यक्ती यांचे नावावर पैसा फिरवून मोठया प्रमाणावर काळा पैसा चलनात आणणे, शासनाचे कर बुडविणे, निधीचा गैरवापर करणे, रोजच्या रोकड मध्ये मोठी तफावत असणे, अनधिकृतपणे बेनामी बँकेचे लॉकर वापरणे इत्यादी सहकार खात्याचे अधिका-यांसमवेत संगनमताने गैरव्यवहार करणे व सर्व ठेवीदारांचे निधीचा बेकायदेशीर वापर करणे, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कारवाई, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया. | |
| ९७ | ३४४ | **श्री. अभिजित वंजारी**,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात दिवाणी व फौजदारी स्वरूपाच्या केसेस लढणाऱ्या वकिलांवर विरोधी पक्षांच्या अशिलाकडून अनेकवेळा जीवघेणे | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | हल्ले झाल्याचे आढळून येणे, तसेच अनेकदा न्यायालय परिसरात सुद्धा खुलेआम आरोपींचे अथवा तक्रारदारांची हत्त्या झाल्याच्या घटना सुद्धा अनेक जिल्ह्यात नोंदविल्या गेल्या असणे, त्याशिवाय अनेक फौजदारी गुन्ह्यात पब्लिक प्रॉसिक्युटरवर सुद्धा गुन्हेगारी स्वरूपांच्या टोळ्यांपासून दबावतंत्र निर्माण केल्याच्या अनेक घटना घडल्या असणे, या कारणास्तव आपल्या राज्यात Advocate Protection Act नव्याने लागू करण्याची आवश्यकता भासत असून राज्य शासनामध्ये अशा प्रकारच्या अनेक फौजदारी स्वरूपाच्या घटनांवर आळा घालण्यासाठी Advocate Protection Act लागू केला असणे, परंतु वकील संघटनांकडून आपल्या राज्यामध्ये Advocate Protection Act लागू करण्यासंदर्भात वारंवार मागणी करून सुद्धा शासन याबाबत शासन कोणतीही भूमिका बजावत नसणे, त्यामुळे राज्यातल्या वकीलांमध्ये शासनाप्रती असंतोष निर्माण झाला असणे, Bar Council of India ही वकीलांची वैधानिक संघटना असून त्यांच्या सुद्धा मार्गदर्शिकेमध्ये देशातल्या सर्वच राज्यामध्ये Advocate Protection Act लागू करण्याची भूमिका असून राज्य शासनाच्या धर्तीवर राज्यात सुद्धा Advocate Protection Act लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| **९८** | **३५६** | **श्री. विजय** ऊर्फ **भाई गिरकर, वि.प.स.** | **कित्ता** | |

पुणे जिल्ह्यातील साबळेवाडी (ता.खेड) येथील चासकमान डाव्या कालव्यासाठी सन १९९५ मध्ये तेथील शेतकऱ्यांकडून जमिनीचा कब्जा घेण्यात येणे, सदर शेतक-यांना गेली २८ वर्षे संपादन मोबदला मिळालेला नसणे, त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते यांनी शासनाकडे पाठपुरावा केला असता संपादन प्रक्रीया व्यपगत झाल्याची माहिती समोर येणे, चासकमान प्रकल्प विभागाला फेब्रुवारी, २०२३ मध्ये निवेदन देण्यात येणे, त्यानुसार शिक्रापूर उपविभागीय कार्यालयाने बंद नलिका प्रस्तावित असल्याने २८ वर्षाचा भुभाडे अहवाल माहे एप्रिल २०२३ मध्ये तयार करून वरिष्ठ कार्यालयाकडे पाठविला असणे, कार्यकारी अभियंता, चासकमान प्रकल्प यांनी अधीक्षक अभियंता, पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ यांना जुलै २०२३ मध्ये तसेच पुणे पाटबंधारे प्रकल्प मंडळ यांनी दि.१८ सप्टेंबर २०२३ रोजी मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, पुणे यांना सदर अहवाल सादर करण्यात येणे, साबळेवाडी येथील ४५ गटांचा २८ वर्षे कालावधीचा रू.३,५३,८७,०८८ चा भुभाडे प्रस्ताव असून पावसाळी अधिवेशनात विधानपरिषदेत तारांकित प्रश्न उपस्थित केला, त्यावर निधीची उपलब्धतेनुसार अदा करण्याचे प्रस्तावित आहे असे लेखी उत्तरात नमुद केले असणे, मुख्य अभियंता यांच्याकडे अहवाल सादर करूनही त्यांनी चासकमानचा सुप्रमा शासनाकडे प्रलंबित असल्याचे सांगितले, गेली २८ वर्षे शेतकऱ्यांकडून संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला त्यांना मिळण्याकरिता शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवशक्यता व शासनाची प्रतिक्रिया.

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९९ | ३६७ | **श्री. अंबादास दानवे**,श्री. सचिन अहिर **वि.प.स.**<br>\राज्यातील माहूर व किनवट (जि. नांदेड) तसेच आर्णी, घाटंजी, महागांव (जि.यवतमाळ) या तालुक्यांमधील पैनगंगा नदीवरील नियोजित निम्न पैनगंगा धरणाला तसेच संबंधित ९५ धरणग्रस्त गावातील जमिनीच्या भूसंपादनास निम्न पैनगंगा धरण विरोधी संघर्ष समितीने शासनास, जिल्हाधिकारी, नांदेड व यवतमाळ यांना दिनांक २४ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या लेखी निवेदनाव्दारे विरोध दर्शविलेला असणे, नियोजित निम्न पैनगंगा धरणामुळे ९५ गावे बाधित होणार असून या गावांमधील सुमारे १.५ लाख शेतकरी, नागरिक तसेच ५०,००० एकर सुपीक व २५,००० एकर वन जमिनीचे कायमस्वरुपी नुकसान होणार असणे, या प्रकल्पावर शासनाने नेमलेल्या चितळे समितीने आक्षेप घेऊनही शासनाने धरणासंदर्भात कामांसाठी कंत्राटदार नियुक्त करण्याबाबतची निविदा प्रक्रिया राबविलेली असणे, सबब सदरहू प्रकल्प तातडीने रद्द करण्यासाठी समस्त ग्रामस्थांनी साखळी उपोषण, आमरण उपोषण व जलसमाधी करण्याबाबत तसेच सदर न्याय्य मागण्या मान्य होईपर्यंत कोणत्याही प्रकारच्या निवडणुकांवर संबंधित सर्व धरणग्रस्त गावांचा जाहीर बहिष्कार करण्याबाबत शासनास निवेदन देण्यात येणे, तथापि, याबाबत शासनाकडून कोणतीही कार्यवाही करण्यात न आल्याने ग्रामस्थ शेतकरी | कित्ता | |

यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण तसेच उदरनिर्वाहाचे व रोजगाराचे मुख्य साधन असलेली शेतजमीन/शेतीवरील व्यवसाय नष्ट झाल्याने त्या गावांमध्ये शेतकऱ्यांच्या संभाव्य आत्महत्यांचे प्रमाण वाढण्याची असलेली दाट शक्यता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

१०० ३८४ श्री. सत्यजीत तांबे **वि.प.स.** **कित्ता**

राज्यातील अनेक जिल्ह्यांचा समतोल विकास झालेला नसणे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षाच्या जिडीपी बाबतीत मुंबई (३.९२ लाख कोटी), ठाणे (२.८९ लाख कोटी), पुणे (२.३२ लाख कोटी), नाशिक (१.०१ लाख कोटी), नागपूर (१.००लाख कोटी) या जिल्ह्यांच्या तुलनेत गडचिरोली (९ हजार कोटी), वाशिम (१३ हजार कोटी), भंडारा (१३ हजार कोटी), हिंगोली (१४ हजार कोटी) आणि नंदुरबार (१४ हजार कोटी) या ५ जिल्ह्यांचा जिडीपी अत्यंत कमी असणे, प्रादेशिक असमतोलता दूर करण्यासाठी २०११ मध्ये नेमलेल्या केळकर समितीने २०१३ मध्ये अभ्यासांती अहवाल सादर करणे, मात्र या समितीचा अहवाल शासनाने अद्याप स्वीकारला नसणे, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र विकास महामंडळाची मुदतवाढ न झाल्यामुळे महामंडळाच्या पुनर्स्थापनेचा प्रस्ताव विद्यमान सरकारने राष्ट्रपतींकडे पाठवला असून तो प्रलंबित असणे, जी.डी.पी.च्या बाबतीत शेवटच्या १० स्थानावर असलेल्या मागास जिल्ह्यांच्या विकासासाठी व या जिल्ह्यांना

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मुख्य प्रवाहात आणण्यासाठी ठोस कृती आराखडा तयार करण्याची गरज असणे, राज्यातील १२ अतिमगास जिल्ह्याचा विकास करण्यासाठी राज्य शासनाने मानव विकास मिशनची स्थापना करून विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरू केलेली असणे, मात्र त्याची प्रभावी अंमलबजावणी होऊन या १२ जिल्ह्यांमध्ये मानव विकास निर्देशांक उंचावलेला आहे किंवा कसे? याचा आढावा घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाची प्रतिक्रिया, करावायची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| १०१ | ५५ | **श्री. विक्रम काळे**,श्री. शशिकांत शिंदे,श्री. सतिश चव्हाण,श्री. जयंत आसगावकर,श्री. सुधाकर अडबाले,श्री. राजेश राठोड,श्री. अभिजित वंजारी,डॉ. वजाहत मिर्झा,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. किरण सरनाईक,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. धीरज लिंगाडे,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. किशोर दराडे **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | राज्यामध्ये दिनांक १ नोव्हेंबर, २००५ रोजीपासून सेवेत आलेल्या शिक्षक तसेच अधिकारी-कर्मचाऱ्यांना नविन अंशदायी व त्यानंतर एनपीएस पेन्शन योजना लागू करण्याचा निर्णय घेणे, सन २००५ पासून आजपावेतो १७ वर्षाचा कालावधी पूर्ण होऊनदेखील अनेकांची पेन्शन खाती न उघडणे, ही नवीन पेन्शन योजना शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या हिताची नसणे, राज्यभरातून शिक्षक तसेच शासकीय, निमशासकीय अधिकारी | | |

कर्मचाऱ्यांनी जुनी पेन्शन योजना मिळावी यासाठी वेळोवेळी आंदोलन करणे, नोकरी हा एकमेव आधार व उत्पन्नाचे साधन असल्यामुळे सेवानिवृत्तीनंतर एक मोठा आधार जुन्या पेन्शनचा असणे, सन १९८२ ची जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शेजारील पंजाब, झारखंड, राजस्थान व हिमाचल प्रदेश इत्यादी राज्य सरकारांनी निर्णय घेणे, त्याच धर्तीवर महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात एनपीएस पेन्शन योजनेऐवजी सन १९८२ ची जुनीच पेन्शन योजना आमचे सरकार देणार, अशी उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांनी जानेवारी, २०२३ च्या शिक्षक – पदवीधर निवडणूकीमध्ये करणे, राज्य कर्मचारी संघटनेने यासाठी संप करणे, राज्य शासनाने अभ्यास समितीचे गठन करणे, त्याचा अहवाल शासनास प्राप्त होणे, तरीही सकारात्मक निर्णय न होणे, तरीही जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत अद्यापही शासनाने कोणताच निर्णय न घेणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

१०२ १३५ **श्री. धीरज लिंगाडे**,श्री. अभिजित वंजारी,श्री. राजेश राठोड,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. जयंत आसगावकर,डॉ. वजाहत मिर्झा,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** **कित्ता**

तत्कालीन शासनाने सन २०१७ मध्ये राज्यातील शेतक-यांना कर्जमाफी देणारी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना लागू करणे, पण राज्यातील ६ लाख ५६ हजार शेतकरी अजूनही या योजनेपासून वंचित असणे, ५ हजार ९७५ कोटी रुपयांच्या कर्जमाफीची त्यांना सात वर्षानंतरही प्रतिक्षा करावी लागत असणे, लाखो शेतकऱ्यांच्या अडलेल्या

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | कर्जमाफीचा पाठपुरावा मंत्रालयातून घेतला असता या शेतकऱ्यांची यादीच महाआयटीकडून अद्याप सहकार विभागाला मिळाली नसल्याची बाब उघडकीस येणे, परिणामी हे वंचित शेतकरी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सातत्याने आंदोलने करीत असतानाही त्याकडे शासनाकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी या वंचित शेतकऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| १०३ | ३८३ | **श्री. शशिकांत शिंदे, वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | उस तोडण्यासाठी शेतकऱ्यांसमोर मोठ्या अडचणी निर्माण होत असून उसतोड करणाऱ्या टोळ्या आणि हार्वेस्टर चालक शेतकऱ्यांकडून ऊसतोडीसाठी अवाच्या सव्वा रक्कम मागून शेतकऱ्यांची लूट करीत असल्याचे निदर्शनास येणे, सद्यःस्थितीत दुष्काळी स्थिती असल्याने ऊसाची पूर्ण वाढ झालेली नसणे, पर्यायाने उसाचे उत्पन्न घटले असतानाही कारखान्याच्या टोळ्या ऊसतोडीसाठी शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी करीत असणे, चालू वर्षी १ नोव्हेंबरपासून राज्यातील साखर कारखान्यांचा गाळप हंगाम सुरु झाला असून सातारा जिल्ह्यातील देऊर गावात कारखान्यांचे हार्वेस्टर चालक दाखल झाले असून त्यांच्यामार्फत शेतकऱ्यांकडून एकरी तीन हजारांची मागणी होत असणे, याकडे | | |

कारखान्यांचे लक्ष नसल्याने हार्वेस्टर मालक शेतकऱ्यांकडून पैसे उकळत असल्याचे वारंवार निदर्शनास येणे, चालू हंगामात ऊसक्षेत्र घटल्याने चालू हंगाम जानेवारी अखेर बंद होईल, अशी सर्वत्र परिस्थिती असणे, त्यामुळे ज्या शेतकऱ्यांकडे पाणी नाही तो मिळेल त्या कारखान्यांना ऊस घालत असणे व यातच शेतकऱ्यांची अडवणूक सुरु असणे, दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याअभावी ऊस वाळत आहे, असे असतांना ऊसतोडीसाठी जादा पैसे मागणे चुकीचे असणे, त्यामुळे आधीच तोट्यात जाणाऱ्या शेतकऱ्यांची अशी अडवणूक करणे योग्य नसून, कारखान्यांनी याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, अशी ऊस उत्पादक शेतकऱ्यांकडून करण्यात येत असलेली मागणी, परिणामी त्याबाबत शासनाने ऊस उत्पादक शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| १०४ | ३१९ | **श्री. एकनाथराव खडसे**, **वि.प.स.** | **कित्ता** |

बुलढाणा जिल्ह्यातील मलकापूर येथील नगरपरिषदेने मालमत्तेवर अवाजवी २ टक्के दराने शास्तीचा निर्णय घेणे, त्यामुळे मलकापुर येथील मालमत्ताधारकांना अवास्तव शास्तीच्या नोटीसा प्राप्त होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली घबराहट, मलकापूर नगरपरिषदेने नागपूर येथील कोलंबो प्रा.लि., या कंपनीस मालमत्ता कर आकारणीसाठी सर्वे करण्यासाठी नेमणूक करणे, सदर कोलंबो प्रा.लि., कंपनीने चुकीचा व सदोष सर्व्हे करणे व त्यामुळे अवास्तव मालमत्ता कराची देयके नागरिकांना देण्यात येणे, सदर सदोष सर्व्हे रद्द करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | व नागरिकांनी जिल्हाधिकारी बुलढाणा, विभागीय आयुक्त, अमरावती तसेच शासनाकडे दिलेल्या निवेदनावर कोणतीही कार्यवाही न होणे, २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सदर प्रकरणी चर्चा झाल्यानंतर सूद्धा कोलंबो प्रा.लि. या कपंनीचा सदोष सर्व्हे रद्द करून नव्याने सर्व्हे करण्याबाबत कोणतीही कार्यवाही न होणे, वेळोवेळी आश्वासन दिल्यानंतर सूद्धा शासनाने सदर सदोष कर वसूली स्थगित करण्याबाबत कोणतेही आदेश दिलेले नसणे, यास्तव सदर कोलंबो प्रा.लि. या कंपनीने सदोष सर्व्हे करून लादण्यात आलेली आवस्तव शास्ती रद्द करून पून्हा नव्याने सर्व्हे करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| १०५ | ४८२ | **श्री. अंबादास दानवे**, **वि.प.स.**<br>मौजे धारुर, ता.जि. बीड येथील सर्व्हे क्र. ३५९, ३६३ व ५५१ हे बालाजी मंदीर कटघरपुरा धारुर या मंदिराच्या देखभाली साठी या सेवेच्या अटीवर तत्कालीन निजाम सरकारने मशरु तुल खिदमत यांना इनामी दिलेली असणे, बालाजी मंदीराचे इतर हक्कात असणारे प्रमोद कुमार शरदकुमार तिवारी व त्यांचे वारस दुष्यंत प्रमोद कुमार तिवारी या दोघांनी उपजिल्हाधिकारी भु-सुधार बीड, तहसिलदार धारुर मुख्याधिकारी नगरपरिषद व सहायक धर्मदाय आयुक्त बीड यांच्याशी आर्थिक संगनमत | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | करून अवैधपणे वर्ग-३ चे वर्ग – १ मध्ये रुपांतरीत करून जमीन अकृषिक करून प्लॉट पाडून विक्री करीत असणे, त्यामुळे सदरील अकृषी रद्द करून सदरील जमिनीच्या मालकी हक्कात बालाजी मंदीर देवस्थान यांचे नावे करण्याची होत असलेली मागणी, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून वर्ग-३ चे वर्ग – १ मध्ये रुपांतरीत करून अकृषिक करणाऱ्या संबंधित अधिकारी यांचेवर कारवाई करून सदरहू जमीन बालाजी मंदीर यांचे नावे करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| **१०६** | **५२७** | **श्री. अमोल मिटकरी, वि.प.स.** | **कित्ता** |
| | | शासनाने सिलिंग कायद्याअंतर्गत अल्पभूधारक मागासवर्गीय आणि माजी सैनिक,सैनिकाच्या विधवांना शासनाच्या धोरणानुसार जमिनी दिलेल्या असणे, यापैंकी अनेक जमिनी आता रहिवास क्षेत्रात आलेल्या असणे, तथापि सदर जमिनी या वर्ग दोनमध्ये ठेवण्याचे शासकीय धोरण असणे, शेतीसाठी उपयोग होत असलेल्या जमिनी विक्री प्रक्रियेत साधारणपणे वर्ग दोनच राहिल्या तर काहीच समस्या उद्‌भवत नसणे पण जसे जसे रहिवास क्षेत्र वाढत गेले आहे तसे तसे त्यातील अनेक जमिनी पिवळया पट्टयात आलेल्या असणे, अशा जमिनीचे शासकीय मुल्यांकनानुसार जिल्हाधिकारी यांचेकडे पन्नास टक्के रक्कम भरुन सदर जमिनीची विक्री करण्याची परवानगी देण्यांत येत असणे, त्यामुळे लाभधारकांनी जमिनी रितसर बिगरशेती करून भूखंड विकसित केलेले असून या भूखंडाची | |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | विक्री होऊन घरेही बांधलेली असणे, शासनाच्या धोरणानुसार या जमिनीवर वर्ग दोन अशी नोंद राहिल्याने अनेक प्रश्न निर्माण होणे, त्याचबरोबर खरेदी विक्री व्यवहारात प्रत्येकवेळी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घ्यावी लागत असणे, त्याचा नाहक त्रास मागासवर्गीय व माजी सैनिक आणि त्यांच्या वारसांना सहन करावा लागून सरकार दरबारी अनेकदा हेलपाटे मारावे लागून मूळ समस्या टांगत्या स्वरुपात राहत असणे, परिणामी, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| १०७ | ५३७ | **श्री. महादेव जानकर, वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | मौजे परळी, ता.परळी जि.बीड येथील सर्वे नं ४१ व ४२ मधील २ एकर १२ गुंठे जमीन शासन मालकीची असणे,दोन्ही सर्वे नंबर चे मूळ अभिलेख सन १९५९-१९६० ,१९७४-१९७५ व १९९६-१९९७ नुसार सात बारावर सर्वे नं ४१ वर सरकार क्षेत्र १ एकर ०५ गुंठे व सर्वे नं ४२ वर सरकार क्षेत्र १ एकर ०७ गुंठे अशी नोंद असणे, महसूली अधिकारी व कर्मचारी यांनी फेर क्र.१९२३ अन्वये शासनाचे नाव सात बारावरुन परस्पर कमी करणे,शासनाचे कसलेली आदेश नसणे,सन १९९७-१९९८ मध्ये अभिलेख पुनर्लेखनात पूर्वी शासनाच्या आदेशास आळे पडल्याने सात बारावर जाणीवपूर्वक शासनाचे नाव घेण्यात न येणे,फेर महसूली | | |

अधिकाऱ्यांनी चुकीने घेतला असल्याचे पत्रव्यवहारातून निष्पन्न होणे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, बीड यांच्या न्यायालयात दाबा क्र.केस नं१९८९ –सीडी –आरसीआर-अे ४७मधील सुनावणीमध्ये फेरक्र.१९२३ बेकायदेशीरअसल्याने तो रदद करण्याबाबत आदेश होणे, विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांचेकडील पत्र दि १७ जाने,२०१२ अन्वये फेरफार क्र १९२३ अयोग्य असल्याचे जिल्हाधिकारी बीड यांना कळविण्यात येणे, जमिनीवर श्री.सतीश श्रीनिवास मुंदडा व महर्षी कणाद शिक्षणसंस्था यांचा बेकायदेशीर ताबा,सबब परळी येथील कोटयावधी रुपये किंमतीची शासकीय मालकीची सर्वे नं ४१ व ४२ मधील एकूण २ एकर १२ गुंठे जागा महसूलअधिकाऱ्यांच्या संगनमताने खाजगी व्यक्तीने हडप केलेली असणे अभिलेखा नुसार सदरजागा शासन मालकीची असल्याने सिद्ध होत असतांना देखील प्रशासनाकडून जाणीवपूर्वक कार्यवाही न करणे,

| | | | |
|---|---|---|---|
| १०८ | ४५३ | **श्री. चंद्रशेखर बावनकुळे**, **वि.प.स.** | **कित्ता** |

वन्यजीव व सर्प यांचे संरक्षण करणेबाबत शासनाचे धोरणानुसार राज्यात अनेक प्राणी मित्र व सर्पमित्र यांची नेमणुक करण्यात आली असणे, अनेकांनी याबाबतचे विशेष प्रशिक्षण घेवून शासनाकडे अधिकृत नोंदणी केली असणे, विशेषतः विषारी सर्प पकडून त्यांना सुरक्षित स्थळी सोडण्याच्या कामात अनेकदा अपघात होवून सर्पमित्रांचा जीव धोक्यात येणे, वन्यजीव व विषारी सर्प पकडताना अपघातामुळे अनेक प्राणीमित्र

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | व सर्पमित्रांना योग्य उपचाराअभावी कायमचे अपंगत्व आले असणे, त्यांचे पश्चात त्यांच्या कुटूंबियांवर निराधार होवून उपासमारीची वेळ येत असणे, या प्राणीमित्र व सर्पमित्रांमध्ये अनेक बेरोजगार सुशिक्षीत युवकांचा समावेश असणे, आर्थिक दुर्बलतेमुळे त्यांना योग्य उपचार मिळत नसणे, आपला जीव धोक्यात घालून वन्यजीव व सर्प यांचे संवर्धन करून शासनाला सहकार्य करणाऱ्या या प्राणीमित्र व सर्पमित्रांच्या भविष्याकरीता आर्थिक संरक्षण मिळणे करीता त्यांना अपघाती विमा व उपचार विमा व ईतर आवश्यक सुविधा लागू करणेबाबत शासनाची आवश्यक कार्यवाही व प्रतिक्रिया. | | |
| १०९ | ९ | **श्री. सुनिल शिंदे**, श्री. विलास पोतनीस **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | धुळे प्रादेशिक मुख्य वन संरक्षक कार्यालयाच्या अखत्यारीतील मेवासी वन विभागात अनेक अधिकाऱ्यांनी रोजगार हमी योजनेवरील मजूरांच्या मजूरीत अपहार केल्याचे माहे नोव्हेंबर, २०२३ मध्ये निदर्शनास आलेली घटना, एकाच मजूराला एकाच दिवशी एका पेक्षा अधिक ठिकाणी कामावर असल्याचे दाखविणे, अनेक मजूरांच्या बाबतीत घडलेली घटना, प्रत्यक्षात २४९ रुपये मजूरी असताना मजूरांना देण्यात आलेली फक्त १०० रुपये मजूरी, यासंदर्भात वन विभागाने केलेली चौकशी समाधानकारक नसणे, मजूरांच्या मजूरीचा शासकीय अधिकाऱ्यांनी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | केलेला अपहार, शासनाचे मोठया प्रमाणात झालेले आर्थिक नुकसान, याबाबत एसआयटी मार्फत चौकशी करण्याची सातत्याने होत असलेली मागणी, याकडे शासनाने हेतूपूर्वक केलेले दुर्लक्ष, परिणामी वन विभागातील अधिकारी / कर्मचाऱ्यांवरील जनतेचा उडालेला विश्वास, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| **११०** | **३०७** | **श्रीमती उमा खापरे**,श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,श्री. रमेशदादा पाटील,ॲड. निरंजन डावखरे,श्री. निलय नाईक,प्रा. राम शिंदे **वि.प.स.**<br><br>राज्यात सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील चांदोली अभयारण्यातील हिंस्त्र श्वापदाचे वाढलेले हल्ले आणि यामध्ये मृत्युमुखी पडणारी माणसे आणि पाळीव प्राणी यामध्ये दिवसेंदिवस वाढ होत असणे, गेल्या वर्षभरात दोन चिमुकल्या मुलींना बिबट्याच्या हल्ल्यात जीव गमवावा लागला तर ४० ते ५० गाई म्हशी शेळ्यांचा पडशा पाडला तरीही तुटपुंजा मदतीशिवाय आणि आश्वासनाशिवाय इथल्या भूमिपुत्रांना कोणतीच मदत मिळत नसणे, शित्तूर वारूण येथे दिनांक २० नोव्हेंबर, २०२३ रोजी भर दिवसा आईच्या डोळ्यात तळीचा वाडा येथील धनगर वस्तीतील चिमुकल्या मुलीचा बिबट्याने फडशा पाडला असणे, काही महिन्यापूर्वी या विभागात उदगीरच्या केदार लिंग वाडीजवळ एका चिमुकलीवर झडप घालून ठार केली असणे,तसेच उखळू येथील श्रेयस वडाग शित्तूर वारुणच्या एका इसमावर गव्याचा प्राणघातक हल्ला केदारलिंग वाडीवरील वृद्ध | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शेतकऱ्यांवरील हल्ला आणि आशा कित्येक घटना घडल्यावर वन विभाग ठोस उपाययोजना करणार असणे, चांदोली अभयारण्यात पर्यटनासाठी मुक्त सोडलेले हिंस्त्र प्राणी अन्न पाण्याच्या शोधासाठी मानवी वस्तीत शिरून लोकांच्या जीवाशी खेळत असतानाही वन विभाग मात्र सुस्त असणे, यामुळे या परिसरातील लोक भयभीत झालेले असणे, त्यामुळे शेती हा मुख्य व्यवसाय असणाऱ्या भूमिपुत्रांनी शेती कशी करावी हा गंभीर प्रश्न निर्माण झालेला असणे, त्यासाठी लोकप्रतिनिधी आणि वन विभागाने यावर ठोस तोडगा काढण्याची मागणी लोकांमधून होत असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना. | | |
| १११ | ४९ | **श्री. विक्रम काळे**,श्री. अभिजित वंजारी,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | राज्यातील ग्रामीण व निमशहरी भागातील सार्वजनिक वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांमध्ये अतिदक्षता विभाग, शस्त्रक्रिया विभाग यासह बालरोग विभागामध्ये काम करण्यासाठी विशेष तज्ज्ञांचा सातत्याने तुटवडा असल्याचे निदर्शनास येत असणे, शासनाच्या अटी व शर्तीनुसार वैद्यकीय पदव्युत्तर परिक्षेनंतर एक वर्षांची सेवा देणे हे संबंधित डॉक्टरांवर | | |

बंधनकारक असणे, तसेंच सेवेची पूर्तता न केल्यास ५० लाख रुपये इतकी दंडात्मक रक्कम आकारली जात असणे, सदरची दंडात्मक रक्कम मोठी असल्याने वरिष्ठ निवासी डॉक्टर्स हे ग्रामीण भागापेक्षा मुंबई, पुण्यासारख्या शहरांमध्ये काम करण्यास प्राधान्य देत असल्याचेही निदर्शनास येणे, त्यामुळे नांदेड, नंदुरबार, गोंदिया, बीड, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे व अन्य शहरात देखील बंधपत्रित (बॉन्ड केलेल्या) वरिष्ठ निवासी डॉक्टरांच्या रिक्त पदांची संख्या मोठया संख्येने आढळून येणे, त्यामुळे ठाणे,नांदेड,छत्रपती संभाजी महाराज नगर, पुणे व नागपूर येथे उपचाराअभावी मोठया प्रमाणात रुग्ण दगावल्याचे अलिकडेच निदर्शनास येणे, परिणामी, रुग्ण व त्यांचे नातेवाईक व अन्य नागरिकांमध्ये निर्माण झालेले भितीचे वातावरण व असुरक्षिततेची भावना, शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स व अन्य कर्मचारी वर्ग तातडीने उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

११२ १५८ **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** **कित्ता**

मुंबईतील जे.जे. व जी.टी. रुग्णालयातील खाजगी पॅथॉलॉजिस्टची रुग्णांच्या तपासणीसाठी चढाओढ सुरु असून रुग्णालयाच्या गेटवरच टेक्निशियन तगधरून उभे राहत असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, या लॅबचे टेक्निशियन थेट वार्डमध्ये जाऊन रुग्णाचे नमुने गोळा करत असणे, परंतु रुग्णालय प्रशासनाने त्यांच्यावर पोलीस कारवाई सुरु केल्यावर आता या लॅबचे टेक्निशियन

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | गेट बाहेर उभे राहून रुग्णांना लॅबमध्ये घेऊन जात असल्याचे उघडकीस येणे, खाजगी लॅबमध्ये रुग्णांचे नमुने घेऊन नातेवाईक जाऊन अर्ज भरतात मात्र काही नमुन्यांची चाचणी केली जात नसून फक्त रिपोर्ट दिला जात असणे, या रिपोर्टसाठी डॉक्टरला स्वाक्षरीसाठी अधिक कमिशन मिळत असणे, जे.जे. आणि जी.टी. रुग्णालयांच्या परिसरात असलेल्या खाजगी लॅबमध्ये काही डॉक्टरांची पार्टनरशिप असल्याचे आढळून येणे, रिएजंट नाहीत, मशीन बंद आहे असे सांगून रुग्णांना या लॅब मधूनच चाचण्या करण्याचे सल्ले संबंधित डॉक्टर देत असल्याची माहिती समोर येणे, उक्त प्रकरणी सखोल चौकशी करण्याची आवश्यकता, अशाप्रकारे रुग्णांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या दोषी डॉक्टरांवर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ११३ | ५१७ | **श्री. राजेश राठोड**, **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | नागपूर स्थित केअर खासगी रुग्णालय येथे डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे अरुण थूल यांचा मृत्यू झाल्याची बाब २८ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, सदर प्रकरणी मृत व्यक्तीच्या नातेवाईकांनी सीताबर्डी पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली असता पोलीस प्रशासनातील तपास अधिकारी वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल सबनीस व नागपूर महानगरपालिका वैद्यकीय अधिकारी, नागपूर वैद्यकीय | | |

महाविद्यालय येथील तपास समिती यांनी कोणतीही कारवाई न करणे, महाराष्ट्र वैद्यकीय परिषद यांच्यामार्फत फिर्यादीला मत मांडण्याकरिता योग्य वेळ न देता आरोपी असलेल्यांना पुरावे देऊन मदत करणे, जे. जे.रुग्णालय समिती सदस्य यांची नेमणूक व एक वर्ष प्रकरण प्रलंबित ठेवून शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करून खोटा रिपोर्ट तयार करणे, सदर विषयी तक्रारदाराने वारंवार सर्व स्तरावर न्याय मागून हि कोणतीही कारवाई न होणे, फिर्यादीचे खोटे हस्ताक्षर करून दिशाभूल करणे, सीसीटीव्ही फुटेज मध्ये काटछाट करणे, सदर प्रकरणी शासनाने संबंधितांवर केलेली वा करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| ११४ | ३१५ | **श्री. ज्ञानेश्वर म्हात्रे**, श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड **वि.प.स.** | **कित्ता** |

आयसीटी योजना सन २००८ पासून सुरू झाली असणे, सदर योजनेमध्ये तीन टप्पे करण्यात येणे, प्रत्येक टप्प्यात समाविष्ट केलेल्या शाळांची संख्या पुढीलप्रमाणे असून पहिला टप्पा ५०० शाळा, दूसरा टप्पा २५०० शाळा सन २०११ साली आणि तिसरा टप्पा ५००० शाळा सन २०१३-१४ मध्ये सुरू असणे, सदर योजनेसाठी निविदा प्रक्रियेव्दारे तीन ऑपरेटरची नियुक्ती विभागनिहाय करण्यात आली असणे, प्रति शाळा पाच वर्षासाठी १२.५८ लक्ष एवढी तरतूद करण्यात येणे, शासनाने योजना सुरू करतानाच पाच वर्षांचीच तरतूद केली असणे व आयसीटी संगणक निर्देशकांचे मानधन बंद झाले असणे आणि योजना बंद झाल्यामुळे संगणक निर्देशक यांच्या सेवा आपोआपच समाप्त झाल्या असणे, त्यांचा करार खाजगी ऑपरेटरशी असल्यामुळे अन्य प्रश्न निर्माण होणे, शाळेवर

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | असलेले संगणक, त्यासाठी बांधलेली खोली, उपलब्ध साधनसामुग्री आजतागायत तशीच पडून असणे, शाळेत लॅब आहे मात्र शिकवण्यासाठी आयसीटी शिक्षक नसणे, संगणक शिक्षक नसल्याने विद्यार्थ्यांनाही संगणक शिक्षण मिळत नसल्याने राज्यातील लाखो विद्यार्थी संगणक शिक्षणाशिवाय वंचित असणे, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, राज्यातील आयसीटी योजनेत सेवा दिलेल्या संगणक शिक्षकांना शासकीय सेवेत मानधनावर सामावून घेण्यासाठी परिपूर्ण धोरण निश्चित करणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ११५ | ३७४ | **श्री. अभिजित वंजारी**,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.**<br>राज्यातील उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत मोठ्याप्रमाणात प्राध्यापक व इतर सहायक कर्मचाऱ्यांची पदे रिक्त असल्यामुळे त्याचा परिणाम प्रत्यक्षात गुणवत्तापूर्ण शिक्षणावर होत असणे, जगात QS World Univeristy Ranking मध्ये जगातील उच्च शिक्षणाचा २१०० संस्थांमध्ये भारताच्या फक्त ४५ संस्थांचा समावेश असून त्यातही मुंबईतील IIT १५० व्या स्थानावर असणे,केंद्र शासनाच्या अखत्यारित असलेली ४५ केंद्र विद्यापीठे, २३ IT यामध्ये ५० टक्क्यांपर्यंत प्राध्यापकांची पदे रिक्त | **कित्ता** | |

असणे, जवळपास हिच परिस्थिती शासनाच्या अखत्यारित असलेल्या उच्च रिक्त पदांच्या जागेवर कंत्राटी पद्धतीने किंवा तासिका तत्वावर विषयाची भरती होताना दिसणे, यासाठी राज्यातील दर्जेदार शिक्षण सुनिश्चित करण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभागात राज्याच्या सर्व विद्यापीठांमध्ये व अनुदानित संलग्नित महाविद्यालयामध्ये प्राध्यापकांची भरती करणे हा एकमेव उपाय असणे, शैक्षणिक संस्थांमध्ये संशोधन व विकासकामासाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देणे शासनाचे कर्तव्य असतानादेखील याकडे शासनाची उदासिनता असणे, सन २०१४ पासून आपल्या देशात विद्यापीठ अनुदान आयोगातर्फे संशोधन व विकासकार्यासाठी उपलब्ध करण्यात येणारा निधी पुर्णतः बंद झाल्यामुळे विद्यापीठस्तरावर संशोधनाचे कार्य गत ९ वर्षांपासून थांबलेले असणे, इतर राज्याच्या तुलनेत आपला राजस्व राष्ट्रीय अनुदान आयोगाच्या धर्तीवर उच्चशिक्षण विभागात विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर वैधानिक स्वरूपाची सोय करणे गरजेचे असून सोबतच उच्च शिक्षण विभागामध्ये प्राध्यापकांची भरती करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

११६ ११६ **श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप**, प्रा. राम शिंदे, श्री. प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, श्री. रमेशदादा पाटील **वि.प.स.** **कित्ता**

धनगर समाजाला शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून शासनाच्या विचाराधीन असलेल्या न्याय मागणीवर अद्यापही निर्णय घेण्यात आलेला नसणे, या मागणीच्या पाठपुराव्यासाठी

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | राज्यातील धनगर समाजाकडून होत असलेले तीव्र आंदोलने, महाराष्ट्र विधीमंडळाच्या अधिवेशानांमध्ये अनेकवेळा धनगर समाजास आरक्षण देण्याबाबतच्या मागणीसंदर्भात झालेल्या चर्चा, मात्र प्रत्येकवेळी शासनाकडून सदर संशोधन अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्याची सभागृहात देण्यात आलेली आश्वासने, धनगर समाजाला शासनाची दिसून आलेली अनास्था, अद्यापही याबाबतचा निर्णय प्रलंबित असणे, परिणामी धनगर समाजात पसरलेली नैराश्याची भावना, राज्यभरातील धनगर समाजाने आक्रमक भूमिका घेतलल्याने कायदा व सुव्यवस्थेचा निर्माण झालेला प्रश्न, शासनाने याबाबत त्वरीत निर्णय घेण्याची आवश्यकता व यावर शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ११७ | २२ | **डॉ. वजाहत मिर्झा**,श्री. धीरज लिंगाडे,श्री. अभिजित वंजारी,श्री. सुधाकर अडबाले,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.**<br>यवतमाळ जिल्ह्यातील सन २०२३-२४ वर्षातील खरीप पिकांचे माहे ऑगस्ट-सप्टेंबर महिन्यातील अतिवृष्टीमुळे व पूरामुळे प्रचंड नुकसान झालेले असणे, यात २ लाख १७ हजार २४१.५७ हेक्टर एवढे क्षेत्र बाधित झालेले असणे, या बाधित शेतकऱ्यांची संख्या जवळपास २ लाख ६३ हजार ६०९ इतकी असणे, बाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी १८५ कोटी १० लाख रुपयांची निधी वितरित करण्यात शासनाकडून मंजुरी देण्यात | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | आलेली असणे, शेत जमिनीच्या नुकसानग्रस्त १०७५७.७३ हेक्टर बाधित क्षेत्रातील १९ कोटी ७६ लाख ६३ हजार रुपये इतका निधी वितरित करण्यास मंजूरी देण्यात आलेली असणे, परंतु बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम अद्याप पर्यंत मिळालेली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये निदर्शनास आलेली असणे, शासनाने मदत जाहीर केलेली असून देखील शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पिक विम्याची रक्कम जमा न झाल्याने शेतकरी नैराश्यग्रस्त झालेला असणे, शासनाने तातडीने पीक विम्याची रक्कम बाधित शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा करावी अशी सातत्याने होत असलेली मागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाचे प्रतिक्रिया. | |
| ११८ | ४५६ | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.** | **कित्ता** |
| | | राज्यातील मुबलक प्रमाणात युरिया मिळण्याकरिता केंद्र सरकारने प्रधानमंत्री भारतीय जनउर्वरक परीयोजना चालू केलेली असणे, सदरहू योजनेंतर्गत शेतकऱ्यांना युरिया २८० प्रती गोणी मिळत असणे, तथापि, भरवसफाटा (ता.निफाड, जि.नाशिक) येथे दि.२५ जुलै, २०२३ रोजी नाशिक ग्रामिण स्थानिक गुन्हेशाखेच्या पथकाने उक्त योजनेअंतर्गत प्राप्त झालेला २०लाख रुपयांचा युरियाखताचा साठा कृषी निविष्ठा विक्रेत्यांकडून औद्योगिक वापराकरिता असलेल्या सफेदरंगाच्या गोणीमध्ये भरुन भिवंडी येथे काळ्याबाजारात विक्री करण्याकरिता नेताना एका ट्रकचालकास ताब्यात घेणे, उक्त ट्रक चालकाने दिलेल्या जबाबानुसार नांदगाव शिवारातील शेतगट नं.५४ येथे युरियाखताच्या भरलेल्या व | |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | रिकाम्या गोणी, शिलाईमशिन व साहित्य आढळून आले असणे, तसेच सदरहू साठा भिवंडी येथील श्री.राठोड यांच्या गोडावून वर नेत असल्याचे नमूद केले असणे, ते भिवंडी येथे शेतीच्या वापरासाठी असलेला युरिया खताचा साठा औद्योगिक वापरासाठीच्या गोणीमध्ये भरून त्याचा साठा करून राज्यातील अनेक जिल्ह्यातील कंपन्यांना पुरवित असून तारापूर औद्योगिक क्षेत्रातही बॉम्बे रेयॉन कंपनीत खत साठवून ठेवीत असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे उक्त प्रकरणी ट्रकचालकावर गुन्हा दाखल करण्यात आला परंतु श्री.राठोड यांचेवर राजकीय तसेच कृषीविभागातील अधिकारी/कर्मचारी यांचे वरदहस्त असल्यामुळे गुन्हा दाखल करण्यास केलेला विलंब, त्यामुळे सदरहू प्रकरणाची चौकशी करून श्री.राठोड यांचेवर जीवनावश्यक कायद्यान्वये कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| ११९ | १२ | **श्री. विलास पोतनीस**,श्री. सुनिल शिंदे,ॲड. अनिल परब,श्री. सचिन अहिर **वि.प.स.**<br><br>महाडच्या (जि. रायगड) औद्योगिक क्षेत्रातील ‘ब्ल्यू जेट हेल्थ केअर लिमिटेड’ या औषधनिर्मिती कारखान्यात लागलेल्या भीषण आगीत ११ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू आणि ०५ कामगार जखमी झाले असल्याची घटना दिनांक ३ नोव्हेंबर, २०२३ रोजीच्या सुमारास घडली असणे, सदरहू | **कित्ता** | |

ठिकाणी दोन वर्ष बंदावस्थेत असलेल्या 'अंजनेय बायोटेक' प्रकल्पाच्या जागी नव्याने 'ब्ल्यू जेट हेल्थ केअर लिमिटेड' हा कारखाना उभारणीचे काम सुरू असतानाच एका रिॲक्टरमध्ये स्फोट झाला असणे, त्यातील रसायन सर्वत्र पसरल्याने अजून काही रिॲक्टर फुटून मोठ्या प्रमाणावर पसरलेल्या आगीत कारखान्याचा मोठा भाग जळून जाणे, महाडच्या औद्योगिक वसाहतीतील (एमआयडीसी) कारखान्यात झालेल्या सदरहू भीषण स्फोटाने औद्योगिक क्षेत्रातील असुरक्षितता दिसून येणे, स्फोटानंतर कित्येक तास आग कायम असणे, कंपनीचा सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून झालेला निष्काळजीपणा, कंपनीचे विस्तारिकरण सुरु असताना होत असलेले उत्पादन, नियमाप्रमाणे तयार उत्पादन आणि कच्चा माल वेगवेगळ्या ठिकाणी ठेवणे आवश्यक असतानाही कंपनीने त्याकडे केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे औद्योगिक कामगारात पसरलेली असुरक्षिततेची भावना, यास्तव शासनाने उक्त प्रकरणी तातडीने चौकशी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कंपनी व्यवस्थापनेवर कठोर कारवाई करण्याची तसेच मृत्यू पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना व जखमींना तातडीने आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| १२० | ३२ | **श्री. अमोल मिटकरी**,श्री. विक्रम काळे,श्री. अनिकेत तटकरे,श्री. सतिश चव्हाण,श्रीमती उमा खापरे,श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे,श्री. रमेशदादा पाटील,श्री. निलय नाईक,श्री. जयंत पाटील **वि.प.स.** | **कित्ता** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | बांधकाम करणाऱ्या गरीब मजुरांना दोन वेळेचे भोजन देण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेली मध्यान्ह भोजन योजना बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून संबंधित ठेकेदारांना दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२३ रोजीपासून काम थांबविण्याचे दिलेले आदेश, इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांला उपकराच्या माध्यमातून हजारो कोटींचा निधी मिळत असणे, हा निधी मंजुराच्या कल्याणासाठी खर्च करण्यात येत असणे, त्याचाच एक भाग म्हणून कामगारांना दोन वेळेचे सकस भोजन देणारी योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, या योजनेसंदर्भात मोठया प्रमाणात गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आल्यामुळे ही योजना थांबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असणे, बांधकाम मजुरांकरिता ही योजना लाभदायी असल्यामुळे या योजनेत सुधारणा करून ही योजना पूर्ववत सुरु ठेवण्याबाबत बांधकाम मजुरांकडून होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. | | |
| १२१ | १२७ | **श्री. सतेज** ऊर्फ **बंटी पाटील**,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. अभिजित वंजारी,श्री. राजेश राठोड,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,डॉ. प्रज्ञा सातव,डॉ. वजाहत मिर्झा,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** | **कित्ता** | |

राज्यातील संघटित कामगारांना महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या योजना व उपक्रम यांचा भरीव लाभ मिळत असणे, मात्र अद्यापही महाराष्ट्र कामगार कल्याण निधी कायदा १९५३ नुसार कापड दुकाने, हॉटेल्स, औषधी दुकाने, लहान दवाखाने, पतसंस्था, सोसायटया, मॉल्स, वाहतूक संस्था अशा विविध ठिकाणी ५ पेक्षा जास्त कामगार कार्यरत असूनही कामगार कल्याण अधिनियम १९५३ ची योग्य अंमलबजावणी होत नसल्याने या क्षेत्रात काम करणारे कामगार, कामगार कुटुंबीय व त्यांची पाल्ये शासनच्या योजना व उपक्रमापासून वंचित व उपेक्षित असणे, त्यामुळे शासनाने सदरील अधिनियमाची संपूर्ण राज्यामध्ये कडक अंमलबजावणी करून राज्यातील असंघटित कामगारांना त्यांचे लाभ मिळवून देणेबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी अशी आग्रही मागणी होत असतानाही शासनाकडून कार्यवाही होत असलेला विलंब, परिणामी राज्यातील असंघटित कामगार क्षेत्रात पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| **१२२** | **२२८** | **श्री. जयंत पाटील, वि.प.स.** | **कित्ता** |

रिलायन्स कंपनीचा नागोठणे येथे असलेल्या इथेन गॅस पाईपलाईन प्रकल्पाकरिता रायगड जिल्ह्यातील पेण व खालापूर तालुक्यातील २४८ हुन अधिक शेतकऱ्यांच्या शेत जमिनीतून गॅस पाईपलाईन गेल्याने शेतजमिनीचे व पिकांचे अतोनात नुकसान होत असणे, सन २०१७ मध्ये रिलायन्स कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतजमिनीतून गॅस पाईपलाईन टाकण्यास

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | जमीन संपादित करीत असताना शेतजमिनी व पिकांच्या नुकसान भरपाईच्या मोबदल्यात वाटाघाटी करून कंपनी व्यवस्थापनाने बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासंबंधिचे हमीपत्र देवूनही मोबदल्याची रक्कम देण्यास टाळाटाळ करणे, रिलायन्स कंपनीने वाटाघाटी करताना लेखी हमीपत्रात सक्षम प्राधिकारी स्तरावर निश्चित केलेल्या दराव्यतिरिक्त कंपनीच्या स्तरावरून वाढीव दराने जमीन मालकांना ज्या दराने रक्कम वाटप करण्यात येईल त्याच दराने इतर शेतकऱ्यांनासुध्दा मोबदल्याची रक्कम देण्यात येईल असे लेखी हमीपत्राद्वारे लिहून देण्यात येणे, प्रकल्पबाधितांना नुकसान भरपाईचा मोबदला देण्याबाबत उपविभागीय अधिकारी, पेण यांनी सदर कंपनीस पत्राद्वारे वारंवार कळवूनही कंपनी प्रशासनाने याबाबत कोणतीही दखल घेतली नसणे, रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यातील देहेन ते नागोठणे येथील इथेन गॅस प्रकल्पातील बाधीत शेतकऱ्यांच्या संपादित शेतजमिनीचा मोबदला व पिकांचे झालेल्या नुकसानीच्या भरपाईचा मोबदला तातडीने शेतकऱ्यांना मिळण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. | | |
| १२३ | ३३८ | **श्री. सुनिल शिंदे**, श्री. विलास पोतनीस **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | देशभरातील सोने-चांदीचे केंद्र असलेला मुंबईतील हिरे व्यवसाय लालफितीच्या कारभारामुळे व मंजुरीस होत असलेल्या विलंबामुळे | | |

मुंबईतील सुमारे १६ हजार कोटी रुपयांचा व्यवसाय सुरतला जाणार असल्याची बाब दिनांक २ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमरास निदर्शनास येणे, देशाची आर्थिक राजधानी असल्याने व त्याचवेळी समुद्राला लागून असल्याने विविध प्रकारच्या व्यवसायाचे प्रमुख निर्यात केंद्र अनेक वर्षापासून मुंबईत असून त्यामध्ये हिरे व्यवसायाचाही समावेश असणे, त्यातूनच जेम्स व ज्वेलरी एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलने (जीजेईपीसी) वांद्रे-कुर्ला संकुलात 'भारत डायमण्ड बोर्स' सुरू केला असणे, या ठिकाणी सुमारे २,५०० व्यावसायिक हिऱ्यांच्या दागिन्यांचे काम करणे, परंतु आता 'जीजेईपीसी'ने गुजरातमध्ये 'सुरत डायमण्ड बोर्स' उभा केल्याने मुंबईतील व्यवसाय तिथे जाणार असणे, त्यामुळे येथे काम करणारे कामगार बेरोजगार होणार असणे, सुरतचे व्यावसायिक दागिने घेऊन मुंबईत आल्यानंतर त्यांना मुंबईतील स्थानिक दलालांना पैसे द्यावे लागणे, तदनंतर निर्यातीसाठी सीमा शुल्क विभागाची व केंद्रीय वाणिज्य मंत्रालयासंबंधी मंजुरी घेणे व अखेरीस रिझर्व्ह बँकेकडून निर्यात प्रमाणपत्र मिळवणे, यात अनेकदा विलंब लागणे, त्यामुळे हिरे व्यावसायिकांमध्ये आणि कामगारांमध्ये शासनाविरुद्ध पसरलेला असंतोष व नाराजीची भावना, यास्तव मुंबईतील हिरे व्यवसाय टिकविण्यासाठी तसेच त्याला उभारी मिळण्यासाठी शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १२४ | ३९१ | **श्री. आमश्या पाडवी**, **वि.प.स.**<br>अक्कलकुवा हा गुजरात सीमेवर वसलेला महाराष्ट्रातील शेवटचा अतिदुर्गम आदिवासी बहुल तालुका असणे, भौगोलिक दृष्टिकोनातून पाहिले तर सदर भाग हा डोंगराळ व जंगल असल्याने कमी निघा राखून उत्पन्न देणाऱ्या फळांची लागवड करण्याकडे शेतकरी व नागरिकांचा जास्त कल असणे, कच्चा आंबा म्हणजेच कैरी पासून निर्माण होणारे आमचूरची विक्री हा अक्कलकुवा व परिसरात शेतकऱ्यांसाठी प्रमुख जोड धंदा असणे, असे असून देखील आमचूर पासून पुढे प्रक्रिया करून उत्पादीत होणारे पावडर व मसाले इ. बाबत कोणताही मोठा उद्योग या परिसरात अस्तित्वात नसणे, अशीच अवस्था अक्कलकुवा व परिसरात मोठ्या प्रमाणात उपलब्ध होणाऱ्या महू फुलांच्या बाबतीत असणे, महू फुलापासून प्रामुख्याने मद्य, औषधी व कोस्मेटिक उत्पादनात त्याचे महत्व असून देखील त्यावर प्रक्रिया करण्यासाठी कोणताही उद्योग या ठिकाणी अस्तित्वात नसल्याने अपेक्षित दर उपलब्ध होत नसणे, परिणामी स्थानिक नागरीक व शेतक-यांमध्ये पसरलेला असंतोष, अक्कलकुवा व परिसरात तातडीने मसाला व महू क्लस्टर उभारणी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाीच कार्यवाही व प्रतिक्रिया. | **कित्ता** | |
| १२५ | ६२ | **श्री. विक्रम काळे**,श्री. सतिश चव्हाण,श्री. प्रसाद लाड,श्री. एकनाथराव खडसे,श्री. अंबादास दानवे **वि.प.स.** | **कित्ता** | |

शासनाकडून माता व बालमृत्यू रोखण्यासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च केले जात असणे, परंतु अद्यापही बालमृत्यू व मातामृत्यू रोखण्यात शासनाला आलेले अपयश, शहरापेक्षा ग्रामीण भागात बालमृत्यूचे प्रमाण अधिक असून मागील ४ महिन्यात ३,१९७ बालके व २८० मातांचा मृत्यू झालेला असून यापूर्वीसूद्धा राज्यात माहे मार्च, २०२३ पासून आतापर्यंत ६,६४६ बालमृत्यूंची नोंद झाली असणे, राज्यात दरदिवशी ४० नवजात बालकांचा मृत्यू होत असल्याचे आकडेवारी समोर आली असून यातील दोन तृतीयंश म्हणजेच तब्बल २५ हून अधिक बालके १ महिन्यांहून कमी वयाची असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ च्या सुमारास निदर्शनास येणे, सदरील नवजात बालकांपैकी ६ जणांना श्वसनाचा त्रास होत असताना देखील संबंधित रुग्णालयात कृत्रिम श्वसन यंत्रणा आणि तिच्या वापरासाठी प्रशिक्षित वरिष्ठ कर्मचारी उपलब्ध नसल्याचे आढळून येणे, तसेच राज्यातील ग्रामीण भागातील वाढती प्रसूती व अर्भकांची संख्या जास्त असणे, परंतु रुग्णालयातील प्रसूती वाढूनही प्रशासन आरोग्य कर्मचाऱ्यांच्या संख्येसह पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यात अपयशी ठरणे, राज्यातील ग्रामीण भागातील प्रसूतीगृहांची संख्या वाढवून सदर ठिकाणी सुसज्य आरोग्य सुविधा पुरविण्याकरिता त्याचप्रमाणे मोठ्या प्रमाणात नवजात बालकांचे होत असलेले मृत्यू रोखण्याची आवशकता, सार्वजनिक संस्थांनी केलेल्या सर्वेक्षणामध्ये आरोग्य सुविधांची उपलब्धता नसल्याचे दिसून येणे, सर्वाधिक मृत्यू नंदूरबार, अमरावती, बीड, नाशिक, अहमदनगर या जिल्ह्यात झालेली असून मागील वर्षापासून

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | या जिल्ह्यांमध्ये तीव्र कुपोषित मुलांच्या संख्येमध्ये वाढ होत असून त्यासाठी आरोग्य व महिला व बालकल्याण विभागासह एकत्रित उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता असणे, आदिवासी भागांमध्ये अनेक ठिकाणी प्राथमिक आरोग्य सुविधा नसल्याचे तसेच माता व मुलांवर उपचारासाठी रुग्णालये नसणे, तसेच असलेल्या रुग्णालयात डॉक्टर,आरोग्य अधिकारी, परिचारिका, दायी इत्यादी पदे रिक्त असल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, या सर्व ठिकाणी पूर्ण वेळ बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ व आहारतज्ज्ञांची त्वरित नियुक्ती करण्याबाबत तेथील आदिवासी गरीब बांधवांची होत असलेली मागणी, उक्त प्रकरणी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | | |
| १२६ | ३०१ | **श्रीमती उमा खापरे**, श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. निलय नाईक, प्रा. राम शिंदे **वि.प.स.**<br>नागपूरमध्ये नागरिकांच्या आरोग्य सेवेसाठी असलेले ग्रामीण रुग्णालय, महापालिकेचे रुग्णालय, डागा मेडिकल आणि मेयो रुग्णालयामध्ये रुग्णांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये निदर्शनास येणे, नागपूर शहर व ग्रामीण भागातील शासकीय रुग्णालयाची परिस्थिती बिकट असून औषधांचा तुटवडा असतानाही अधिकारी मात्र | **कित्ता** | |

तुटवडा नसल्याचे भासवीत असणे, मेयो रुग्णालयामध्ये तर धनुर्वात प्रतिबंधासाठी दिल्या जाणाऱ्या १० ते १४ रुपयांच्या टिटॅनस टॉक्साईड (टीटी) इंजेक्शनचा देखील तुटवडा असणे, तसेच इंजेक्शन देण्यापूर्वी त्वचेच्या पृष्ठभागावर लावले जाणारे स्पिरिटही मोजक्याच प्रमाणात असणे, याशिवाय मेयो रुग्णालय तसेच सर्वच शासकीय रुग्णालयात जीवनरक्षक औषधे नसल्याने वरिष्ठ डॉक्टर उपस्थित राहत नसल्याने अपघातातील जखमींना कित्येक तास उपचार मिळत नसणे, ६० टक्क्यांवर औषधाचा खर्च रुग्णांच्या नातेवाईकांनाच करावा लागतो एक्स-रे, सिटीस्कॅन, एमआरआय, सोनोग्राफीसाठी तासनतास प्रतिक्षा करावी लागत असणे, यामुळे निदान करण्यात विलंब होऊन उपचारासाठी उशीर होत असणे, नॉनप्रॅक्टिकल अलाउन्स (एनपीए) घेऊनही काही डॉक्टर खाजगी प्रॅक्टिस करत असल्याने जे (एनपीए) घेत नाही त्यांच्या येण्या-जाण्याच्या वेळेला बंधन नसणे, परिणामी तातडीच्या ऑपरेशनला देखील आठवड्याचा अवधी लागत असणे, सफाई कर्मचाऱ्यांच्या अपुऱ्या संख्येमुळे स्वच्छताही नसणे, पंचतारांकित वातानुकूलित खाजगी रुग्णालयामधील खर्च सामान्याच्या आवाक्याबाहेर गेला असल्याने अशा रुग्णालयात रुग्णाला दाखल करणे म्हणजे आर्थिक गैरसोयीचे होत असणे, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १२७ | ३५८ | **श्री. विलास पोतनीस**, श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.**<br>मुंबईसह राज्यामध्ये रक्ताचा तीव्र स्वरूपाचा तुटवडा निर्माण झाली असल्याची गंभीर बाब दि. २४ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, गरजू रुग्णांना रक्ताच्या उपलब्धतेसाठी सर्वत्र धावाधाव करावी लागत असताना राज्य रक्त संक्रमण परिषदेने रक्ताच्या उपलब्धतेसंदर्भात कोणतीही ठोस भूमिका घेतलेली नसणे, रक्तासाठी धावाधाव करणाऱ्या रुग्णांच्या नातेवाइकांनी मदतीसाठी कुठे जायचे, कोणाकडे संपर्क साधायचा, असा प्रश्न भेडसावत असणे, सहकार्य न करणाऱ्या खासगी रक्तपेढ्यांवर राज्य रक्त संक्रमण परिषद सातत्याने केवळ नोटीस बजावण्याचे काम करणे, या यंत्रणेच्या प्रमुखांसाठी स्वतंत्र पद अद्यापही निर्माण झालेले नसणे, राज्य रक्त संक्रमण परिषदेसह इ-रक्तकोष संकेतस्थळावर रोजची माहिती अपडेट करण्यात अयशस्वी झालेल्या रक्तपेढ्या, सद्यस्थितीत रक्ताचा तीव्र तुटवडा असतानाही उपाययोजना राबवण्यात राज्य रक्त संक्रमण परिषदेने भरीव प्रयत्न केलेले नसणे, त्यामुळे आगामी काळात परिस्थिती अधिक बिकट होऊन गोरगरीब रुग्णांचा जीव धोक्यात येण्याची निर्माण झालेली दाट शक्यता, तसेच सार्वजनिक आणि खासगी रुग्णालयांमध्ये रक्ताच्या कमतरतेमुळे शस्त्रक्रिया लांबणीवर पडण्याची शक्यता असणे, त्यामुळे सर्वसामान्य जनतेत शासनाप्रति निर्माण झालेली असंतोषाची आणि नाराजीची | **कित्ता** | |

भावना, यास्तव मुंबईसह राज्यामध्ये रक्ताचा भासत असलेला तीव्र तुटवडा तातडीने दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही, उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| १२८ | ६२१ | **श्री. अंबादास दानवे, वि.प.स.** | **कित्ता** |
| | | भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्त्यांवर होणाऱ्या वाहतुक कोंडी मुळे रस्तारुंदीकरणाचा प्रस्ताव सादर करून त्यासाठी ठाणे व कल्याण भागातील ०७ ते ०८ हेक्टर खाजगी जमिनीचे भुसंपादन करून त्यांना शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निधी देण्याबाबतचा शासनाने निर्णय घेवूनही बाधित शेतकऱ्यांना मोबदला देण्यात आलेला नसणे, रस्त्याच्या रुंदीकरणासाठी जमीन संपादित करताना यापूर्वी मोबदला दिला आहे किंवा कसे याबाबत गठित केलेल्या समितीने शासनास दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी अहवाल सादर करण्यात आलेला असणे, समितीने सादर केलेल्या अहवालानुसार मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२ मे, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या बैठकीमध्ये खाजगी जमिनचे प्रस्ताव सादर करून शासनाच्या प्रचलित धोरणानुसार निधीची मागणी करण्याचे निर्देश देण्यात आलेले असणे, भिवंडी-कल्याण-शिळफाटा रस्ता रुंदीकरणातील बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला देण्याच्या बाबतीतचा निर्णय घेवून एक वर्षाहून अधिक कालावधी होवूनही शेतकऱ्यांना मोबदला न मिळाल्याने सहा पदरी रस्ता रुंदीकरणाला शेतकऱ्यांकडून विरोध करण्यात येत असणे, रस्ता रुंदीकरणातील बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचा मोबदला मिळण्याबाबत त्वरित कार्यवाही | |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | करून शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिकिया. | | |
| १२९ | ८ | **श्री. सुनिल शिंदे**,श्री. विलास पोतनीस,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप **वि.प.स.**<br>माहे सप्टेंबर, २०२३ मध्ये केंद्र शासनाने कांदा निर्यातीवर अचानकपणे ४० टक्के शुल्क आकारणीचा घेतलेला निर्णय, त्यामुळे शेतकरी, व्यापारी आणि कांदा निर्यातदार यांना मोठ्या प्रमाणावर बसलेला फटका, शुल्क वाढीमुळे जेएनपीटी बंदरात निर्यातीसाठी असलेला ८०० टन कांदा सडल्याने फेकून द्यावा लागणे, शेतकऱ्यांनी अहमदनगर, नाशिक आणि पुणे जिल्ह्यात रस्त्यावर येऊन केलेले आंदोलन, त्यावेळी कांदा व्यापाऱ्यांनी कांदा खरेदी विक्री करण्याबाबत पुकारलेला संप, केंद्र शासनाने गव्हाचे कमी केलेले आयात शुल्क, टोमॅटोला आयात करण्यासाठी दिलेले अनुदान, तथापी कांद्याला अनुदान देण्याऐवजी लादलेले ४० टक्के शुल्क, शेतकऱ्यांच्या मालाचे भाव पाडायचे असे शासनाचे असलेले धोरण, शासनाने अनुदान देण्याची होत असलेली मागणी, त्याकडे शासनाने जाणिवपुर्वक केलेले दुर्लक्ष, त्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी, व्यापारी व कांदा निर्यातदार यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| १३० | ११३ | **श्री. अशोक** ऊर्फ **भाई जगताप**, श्रीमती उमा खापरे, श्री. प्रविण दरेकर, श्री. प्रसाद लाड, श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. रमेशदादा पाटील, ॲड. निरंजन डावखरे, श्री. निलय नाईक **वि.प.स.**<br><br>राज्यशासनाच्या पटसंख्येच्या सक्तीमुळे राज्यातील ० ते २० पटसंख्येच्या सुमारे २००० शाळांवर बंद होणाऱ्या मार्गावर असल्याची बाब माहे ऑक्टोबर-२०२३ च्यासुमारास निदर्शनास येणे, या शाळा बंद होणार असल्याने अंदाजे २ लाख ९९ हजार ७०० विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारात येणे, या खांन्देशातील जळगाव, धुळे व नंदूरबार या तिन्ही जिल्ह्याच्या मिळून ३८८ शाळा असणे, या शाळा बंद करण्याची शासनाची कारवाई सुरु झाल्याने भविष्यात ग्रामीण शाळातील शाळांमध्ये शिकणारे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित रहाणार असणे, शिवाय १८ हजार शिक्षक अतिरिक्त ठरुन त्यांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असणे, त्यामुळे या शाळा बंद करू नयेत अशी मागणी होत असतानाही त्याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व राज्यशासनाची प्रतिक्रीया. | **कित्ता** |
| १३१ | १४६ | **श्री. धीरज लिंगाडे**, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. अभिजित वंजारी, श्री. राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. जयंत आसगावकर, श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** | **कित्ता** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| | | राज्यातील शासकीय व जिल्हा परिषदेच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना विद्यार्थ्यांना शिक्षण शिकवण्यापेक्षा अशैक्षणिक कामे अधिक प्रमाणात सांगण्यात येत असल्याचे सातत्याने निदर्शनास येत असणे, तसेच यामुळे शिक्षकांच्या अशैक्षणिक कामांमुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवरती मोठ्या प्रमाणात परिणाम होत असणे, त्यामुळे शिक्षकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन राज्यातील शासकीय व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना देण्यात येणारी अशैक्षणिक कामे कमी करण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया. | | |
| १३२ | ४७८ | **श्री. प्रसाद लाड, वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | राज्यातील बृहनमुंबई, वर्ग–अ व महानगरपालिका शासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, इतर व्यवस्थापनांच्या शाळांची भौतिक स्थिती वाईट असणे, त्यात मूलभूत सोईसुविधांचा अभाव असून, शाळेच्या मुख्याध्यापक तसेच शिक्षकांच्या कार्यालयाची स्थिती खराब असणे, शाळेतील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी अध्ययन व अध्यापन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे असणे, त्याचप्रकारे मुलांना शाळेविषयी व राष्ट्रीय एकात्मतेची भावना | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वृद्धिगत होणे महत्त्वाचे असणे, सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, पर्यावरण संवर्धनाची जाणीव, व्यवसाय प्रशिक्षणाची तोंड ओळख, अंतर्भूत कला-क्रीडा गुणांचा विकास विद्यार्थांमध्ये करण्याची मुख्य जबाबदारी शिक्षकावरच असणे, यासाठी शिक्षकांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने शाळेत मूलभूत सोई सुविधांची त्याच बरोबर आधुनिक तंत्रज्ञानाची सुविधा देणे गरजेचे असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| **१३३** | **१७** | **श्री. विलास पोतनीस**,श्री. सुनिल शिंदे,श्री. अंबादास दानवे,अॅड. अनिल परब **वि.प.स.**<br><br>राज्यातील अन्न व औषध प्रशासनाकडून औषध निरीक्षकांची करण्यात आलेली बोगस भरती, सदरहू भरती प्रक्रियेद्वारे नियुक्त केलेल्या ८१ पदांपैकी तब्बल २१ औषध निरीक्षकांनी कमी शैक्षणिक अर्हता आणि दाखल केलेली बोगस कागदपत्रे, उमेदवारांनी सादर केलेल्या कागदपत्रांची दोन वर्षात पडताळणी करणे आवश्यक असताना देखील कागदपत्रांच्या पडताळणीत विभागाकडून करण्यात आलेली अक्षम्य दिरंगाई, लेखी परिक्षेत गुणवत्ता नसलेल्या उमेदवारांना तोंडी परिक्षेत दिलेले झुकते माप, उमेदवारांनी उत्पादन आणि चाचणी क्षेत्रातील अनुभवाचे प्रमाणपत्र सादर न करता सादर केलेले संशोधन क्षेत्रातील प्रमाणपत्र, तीन वर्षांच्या अनुभवाची आवश्यकता असतानाही विविध कामाची सादर केलेली प्रमाणपत्रे, मराठी भाषा कौशल्य बंधनकारक असतानाही त्याऐवजी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरणे, काही | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | निरीक्षकांनी सरकारी सेवा देत असतानाही खाजगी कंपन्यांची सादर केलेली प्रमाणपत्रे, राज्यात औषध निरीक्षकांची २५० पदे मंजूर असतानादेखील सद्यस्थितीत तब्बल १७० पदे रिक्त असणे, त्यामुळे उपलब्ध मनुष्य बळावर येणारा कामाचा अतिरिक्त ताण, त्यामुळे भेसळखोरांविरुद्ध धडक मोहिमा राबविण्यात येत असलेल्या अनंत अडचणी, परिणामी अन्न व औषधांच्या निकृष्ट दर्जामुळे राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला धोका, त्यामुळे शासनाविरुद्ध जनतेत पसरलेली असंतोषाची आणि संतापाची भावना, यास्तव सदर भरती प्रक्रियेची सखोल चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध शासनाने तातडीने करावयाची कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया. | | |
| १३४ | ६ | **श्री. सुनिल शिंदे**, श्री. विलास पोतनीस **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | राज्यभरात म्हाडाची तीन हजार कोटींहून अधिक किमतीची १२,२३० घरे विक्रीविना पडून असल्याची बाब दि. २१ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, म्हाडाच्या मुंबई, कोकण आणि पुण्यातील घरांना अधिक मागणी असणे, मात्र गेल्या काही वर्षांपासून कोकण, पुणे, नागपूर, नाशिक, अमरावती आणि छत्रपती संभाजी नगर येथील काही घरे विकली जात नसणे, काही घरे दहा वर्षांपासून पडून असणे, वारंवार सोडत काढून वा 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' योजनेत त्यांचा समावेश | | |

करूनही घरे विकली गेली नसणे, घरे विकली जात नसल्याने त्यांच्या मालमत्ता करासह अन्य कर, देखभाल शुल्क आदी सर्व खर्चाचा भार म्हाडाला उचलावा लागणे, परिणामी म्हाडाचे होत असलेले आर्थिक नुकसान, सदरहू घरांच्या विक्रीसाठी धोरण आखण्याची होत असलेली नितांत आवश्यकता, परंतु शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यास्तव म्हाडाची विक्रीविना पडून असलेल्या कोट्यावधी रुपये किमतीच्या घरांच्या विक्रीसाठी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया.

| | | | |
|---|---|---|---|
| **१३५** | **३६२** | **श्री. सुनिल शिंदे**,श्री. विलास पोतनीस,श्री. कपिल पाटील **वि.प.स.** | **कित्ता** |

म्हाडातर्फे गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी काही जाचक अटी आणि शर्ती घालण्यात आल्याने अनेक गिरणी कामगारांवर अपात्रतेची कारवाई होण्याची निर्माण झालेली भीती, एकेकाळी मुंबईमधील सूत गिरण्यात महाराष्ट्रामधील गावखेड्यातीलच अनेक तरूणांना रोजगार उपलब्ध होणे, मात्र कामगारांच्या विविध मागण्यासाठी गिरणी कामगारांनी संपाची दिलेली हाक, मुंबईतील आठ गिरण्या दिनांक १८ ऑक्टोबर १९८१ रोजी, तर उर्वरित ५३ गिरण्या दिनांक १८ जानेवारी १९८२ पासून बंद होणे, एकूणच गिरणी कामगारांची वाताहात,झाल्याने गिरणी कामगारांचे पुनर्वसन करण्यासाठी गिरण्यांच्या जमिनींवर गिरणी कामगारांसाठी घरे बांधून देण्याची करण्यात आलेली मागणी, त्यासाठी गिरणी कामगारांकडून सन २०१० आणि सन २०१७ मध्ये मागविण्यात आलेल्या अर्जास सुमारे एक लाख ७० हजार गिरणी कामगारांनी दिलेला प्रतिसाद, म्हाडाच्या मुंबई

## **विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | मंडळाने घराच्या पात्रतेसाठी सन १९८२ मध्ये कामावर हजर असल्याचा पुरावा सादर करण्याची घातलेली जाचक अट, माहे ऑक्टोबर, १९८१ पासून बहुसंख्य गिरण्या बंदच झाल्याने म्हाडाच्या अटीनुसार १९८२ मध्ये कामावर उपस्थित असल्याचा पुरावा उपलब्ध करणे गिरणी कामगारांना शक्य नसणे, परिणामी त्यांना देण्यात आलेल्या अपात्रतेच्या नोटीसा त्यामुळे गिरणी कामगारांत पसरलेली नाराजीची भावना, यास्तव राज्य सरकारने जाचक अटी शिथिल करून सर्व गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. | | |
| **१३६** | **३६३** | **श्री. सुनिल शिंदे**,श्री. विलास पोतनीस **वि.प.स.**<br>बॉम्बे डाईंग व श्रीनिवास मिलमधील गिरणी कामगारांसाठी म्हाडाच्या सन २०२० मध्ये जाहीर केलेल्या सोडतीतील पात्र ११४ गिरणी कामगार व त्यांच्या वारसांना दि. २१ ऑक्टोबर, २०२३ रोजी सहाव्या टप्प्याअंतर्गत देण्यात आलेल्या घरांच्या चाव्या, तसेच वरळी परिसरातील भारत टेस्कटाईल्स, सेंच्युरी, प्रकाश कॉटन मिल्स मधील कामगार व त्यांच्या वारसांना देखील देण्यात आलेली घरे, परंतु सदरहू मिल्समधील कामगारांना झालेला घरांच्या स्वप्नपूर्तीचा आनंद अल्पावधीतच मावळणे, या गिरण्यांमधील कामगारांना देण्यात आलेल्या घरांचा दर्जा अत्यंत सुमार असणे, या इमारतींना बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात येत | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | असलेला अत्यंत अपुरा पाणीपुरवठा, सदरहू इमारतीतील उद्वाहने देखील दर्जाहीन असल्याने रहिवाश्यांच्या विशेषतः वृद्ध नागरिकांचे होत असलेले हाल, सदरहू इमारतीतील अनेक कामे अद्यापही प्रलंबित असणे, या इमारतींना अनियमितपणे होत असलेला विद्युत पुरवठा, अशा अनेक समस्यांनी त्रस्त झालेले गिरणी कामगार आणि त्यांचे कुटुंबीय, या इमारतीतिल विविध समस्यांचा निपटारा करण्याकडे म्हाडाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे या ठिकाणी वास्तव्यास आलेले गिरणी कामगार आणि त्यांच्या वारसांत शासनाप्रति पसरलेली तीव्र नाराजीची भावना, यास्तव वरळी येथील बॉम्बे डाईंग, श्रीनिवास, भारत टेस्कटाईल्स, सेंच्युरी, प्रकाश कॉटन या गिराण्यांमधील कामगारांना व वारसांना देण्यात आलेल्या घरांच्या इमारतीतील गैरसोयी तातडीने दूर करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया. | |
| १३७ | ३९५ | **श्री. अमोल मिटकरी**, श्री. विक्रम काळे, श्री. अनिकेत तटकरे, श्री. सतिश चव्हाण, श्री. अरुण लाड **वि.प.स.**<br><br>शासनाने गृहनिर्माण विभागामार्फत म्हाडाच्या कोकण, पुणे, नागपूर व अमरावती मंडळाच्या वसाहतीतील रहिवाशांसाठी सेवाशुल्क भरण्यासाठी ई-बिलिंग सेवाचे उद्घाटन केल्याचे जाहीर करून म्हाडा उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या चार म्हाडा मंडळात ऑनलाईन बिलिंगचे केल्याचे दिनांक ३० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, रहिवाशांना ई-बिलिंग प्रणालीचा वापर करण्यासाठी म्हाडाचे संकेतस्थळ देखील निर्माण करण्यात येणे, त्यानुसार म्हाडा मुंबई | **कित्ता** |

## विवरण क्रमांक २१—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | व छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) मंडळातील रहिवाशांसाठी ई-बिलिंग प्रणाली सुरू करण्यात आलेली असणे, तथापि, कोकण म्हाडा मंडळाच्या वसाहतीतील रहिवाशांसाठी सदर ई-बिलिंग सेवा अद्यापही सुरू करण्यात आली नसल्याचे दिनांक ६ डिसेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, त्यामुळे शुल्क भरण्यासाठी महिन्यातील ठराविक तीन-चार दिवस त्या त्या वसाहतीत शुल्क रक्कम घेण्यास कर्मचारी नेमले असेल तरी महिन्याच्या शेवटच्या आठवड्यातील तो कालावधी अडचणींचा ठरत असल्याने कोंकण म्हाडा रहिवाशांना वांद्रे येथील गृहनिर्माण मंडळ कार्यालयात जावे लागण्याची येत असलेली वेळ, परिणामी म्हाडा कोंकण वसाहतीतील रहिवाशांना विनाकारण होत असलेला त्रास व परिणामी त्यांच्यामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, त्यामुळे कोंकण म्हाडा वसाहतीचे ई-बिंलिग सेवेचे रखडलेले काम तातडीने सुरु करण्याची आवश्यकता, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| १३८ | ५५० | **श्री. शशिकांत शिंदे**, **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे लीजवर अनिवासी कारणास्तव साधारणतः ३५ वर्षांपूर्वी वाटप केलेल्या जमिनीवर बनावट ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करून शासनाच्या जागेवर एस.आर.ए. योजना राबवणे, | | |

याबाबत शासन अनभिज्ञ असणे, प्रकरण गंभीर असूनही अधिकाऱ्यांची प्रकरणाप्रती उदासिनता असणे अशाच एका प्रकरणी कार्यकारी अभियंता, उत्तर मुंबई (सार्वजनिक बांधकाम) यांनी बनावट ना-हरकत प्रमाणपत्राद्वारे एस. आर. ए. योजना राबविणे व या प्रकरणी राज्य माहिती आयुक्तांनी गंभीर शेरे नोंदविणे. याबाबत शासकीय पातळीवर काही कार्यवाही झाली असल्यास ती सभागृहास सादर करावी. अशी प्रकरणे उजेडात येण्याकरिता शासनस्तरावर काय कार्यवाही होणार आहे ? जे अधिकारी या प्रकरणात गुंतलेले आहेत, त्यांच्यावर शासन काय कार्यवाही करणार आहे ? अशा प्रकरणांची संबंधित विभागांच्या उच्चाधिकाऱ्यांकडून चौकशी होणार आहे का ? या बाबतची कालमर्यादा शासन निश्चित करणार का ? याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.

**१३९** **१०५** **श्री. अभिजित वंजारी**,श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील,श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप,श्री. राजेश राठोड,डॉ. वजाहत मिर्झा,डॉ. प्रज्ञा सातव,श्री. जयंत आसगावकर,श्री. धीरज लिंगाडे,श्री. सुधाकर अडबाले **वि.प.स.** **कित्ता**

राज्यामध्ये इतर मागासवर्ग ओबीसीच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षात घेता त्यांच्या उत्थानासाठी असलेल्या योजना पुरेशा नसणे, तसेच सारथी, बार्टी व टार्टी यांच्या तुलनेत महाज्योतीमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांकरिता पुरेसा निधी उपलब्ध नसणे, इतर संस्थांच्या तुलनेत महाज्योतिमार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्ये ओबीसी प्रवर्गातील ३७५ पेक्षा अधिक जातींचा समावेश असल्यामुळे या महाज्योतीला

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | शासनाकडून मिळणारी आर्थिक तरतुद पुरेशी नसणे, त्यामुळे राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून मागील वर्षी सारथी या संस्थेकरिता १७२ कोटी रू. निधीची तरतूद करण्यात येणे, या तुलनेत महाज्योतीच्या प्रवर्गात किती तरी पटीने जास्त विद्यार्थी असताना सुद्धा आजपर्यंत १००० कोटी रू. पेक्षा जास्त निधीची तरतूद करण्यात आलेली नसणे, सारथी, बार्टी, टार्टी व अण्णासाहेब पाटील मागासवर्गीय आर्थिक विकास महामंडळाच्या धर्तीवर महाज्योतीमार्फत चालविल्या जाणाऱ्या सर्व योजनांना बळकटी आणण्याकरिता तथा ओबीसी प्रवर्गातील राज्यातील विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता अधिकाधिक विद्यार्थ्यांना संबंधित योजनांचा लाभ मिळण्याकरिता महाज्योतीला भरीव निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | | |
| १४० | २५ | **श्री. अमोल मिटकरी**,श्री. सतिश चव्हाण,श्री. रमेशदादा पाटील,श्री. प्रविण दरेकर,श्री. प्रसाद लाड,श्री. चंद्रशेखर बावनकुळे,ॲड. निरंजन डावखरे,श्रीमती उमा खापरे,श्री. निलय नाईक,प्रा. राम शिंदे **वि.प.स.**<br>नागपूर येथे दिनांक २८/०९/२०२३ रोजी वा त्यासुमारास ढगफुटीसारख्या पाऊस होणे, यामुळे नागपूर शहरात नागरीकांच्या घरांचे व मालमत्तेचे | **कित्ता** | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | मोठ्याप्रमाणात झालेले नुकसान तसेच पुरामुळे ५ व्यक्तींचा मृत्यू झालेला असणे, तसेच दिनांक २९ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास पश्चिम विदर्भ, खान्देश व मराठवाड्यातील काही भागात अतिवृष्टी व ढगफुटीसदृश पावसामुळे बुलढाणा, जळगांव, नाशिकसह मराठवाड्यातील अनेक भागात शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात झालेले नुकसान, बुलढाणा जिल्ह्यातील लोणवडी, खडदगाव, पिंपरखुटाधाणे व माळेगांवगोंद या गावात मुसळधार पाऊस झाल्यामुळे काठावरील जमिनी खरडून गेल्या असून १२५ घरांची पडझड तसेच पुराच्या पाण्यात ७६ जनावरे वाहून गेल्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान, नागपूर येथे झालेल्या ढगफुटीसदृश पावसाने संपूर्ण नागपूर शहर पाण्याखाली जाऊन शहरनियोजनाच्या दृष्टीकोनातून नागपूर पूर्णपणे अपयशी ठरल्याचे पूर परिस्थितीवरुन निष्पन्न होणे, प्रशासनाकडून पुरग्रस्त नाग नदी स्मार्ट सिटी उपक्रमांतर्गत पूर्णपणे स्वच्छ करण्यात आलेली नसून नाग नदी प्रदूषणमुक्त करण्यासाठी २११७ कोटी रुपये खर्च करण्यात आल्याचा दावाही फोल ठरलेला असणे, शेतकऱ्यांना तसेच आपातग्रस्त नागरीकांना झालेल्या नुकसान भरपाई त्वरित देण्याबाबत, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना. | |
| १४१ | ४० | **श्री. अंबादास दानवे**, श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री. सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री. अभिजित वंजारी, श्री. राजेश राठोड, डॉ. वजाहत मिर्झा, डॉ. प्रज्ञा सातव, श्री. जयंत आसगावकर, श्री. धीरज लिंगाडे, श्री. सुधाकर अडबाले, श्री. अमोल मिटकरी, श्री. रामदास आंबटकर, | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | श्री. चंद्रशेखर बावनकुळे, श्री. रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री. महादेव जानकर, श्री. विलास पोतनीस, श्री. सुनिल शिंदे **वि.प.स.** | | |
| | | राज्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे अंदाजे एक लाख हेक्टरच्या क्षेत्रावरील शेतीमालाचे नुकसान झालेले असणे, तसेच नाशिक, बुलडाणा, अहमदनगर भागात गारपिटीमुळे द्राक्ष, कलिंगड, केळी इत्यादी फळपिकांसह टोमॅटो व भाजीपाला पिकांची मोठी हानी झालेली असणे, बुलडाण्यात ३२ हजार हेक्टर तर नाशिकला ३० हजार हेक्टरवरील शेतमालाची हानी झालेली असणे, अहमदनगर भागातील १५ हजार हेक्टर तर नंदुरबार, धुळे, जळगाव, पालघर भागात देखील पिकांची हानी झालेली असणे, नाशिक भागात द्राक्ष बागांचे नुकसान झालेले असणे, बुलडाण्यामध्ये कलिंगड तर धुळे, नंदुरबार, नाशिक, अहमदनगर, पुणे या भागात टोमॅटोसह भाजीपाला पिकांचे नुकसान झालेले असणे, जळगाव भागात केळींच्या बागांमध्ये पाने फाटल्यामुळे नुकसान झालेले असणे, याशिवाय नंदुरबार, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली या जिल्ह्यांमधील काही गावांमध्ये जोरदार वृष्टी झालेली असून मोठ्याप्रमाणात शेतकऱ्यांचे नुकसान झालेले असणे, तथापि, अद्यापही महसूल विभागाकडून पंचनामे करण्यास विलंब करण्यात येत असणे, त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | | उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. | |
| १४२ | १९२ | **श्री. अमोल मिटकरी**,श्री. विक्रम काळे,श्री. अनिकेत तटकरे,श्री. सतिश चव्हाण **वि.प.स.**<br>जि.अकोला ता.मुर्तीजापूर ग्रामपंचायत जांभा बु. हे गांव काटेपुर्णा बॅरेज प्रकल्पाचे बुडीत क्षेत्रात आल्यामुळे प्रकल्प अधिकारी काटेपुर्णा बॅरेज प्रकल्प यांनी सन २००९ साली जांभा बु. गावात येऊन सर्व गावकऱ्यांना जांभा बु. गावाचे पुर्ण पुनर्वसन करण्याचे आश्वासन देणे, गावकऱ्यांनी संपूर्ण गावाचे पुनर्वन होत असल्याच्या आशेवर आपली जमीन या प्रकल्पासाठी देणे, सन२०१२मध्ये कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, खामगांव यांनी जांभा बु. गावाचे १००%पुनर्वसन करण्यात येत असून या गावात मजबूत स्वरूपाचे काम करण्यात येऊ नये तसेच गावाचा विकाससूद्धा करण्यात येऊ नये असे सर्व विभागांना सूचित करणे, विकास करण्यासाठी या गावाला निधी देण्यात येऊ नये, असे आदेश देणे, अद्यापही या गावचे संपूर्ण पूनर्वसन करण्यांत न येणे, गावातील विकासकामांना निधी देण्याचे बंद केल्याने गावाच्या विकासाकडे झालेले दुर्लक्ष, स्वच्छतेची कामे होत नसल्यामुळे तेथील नागरीकांची आरोग्य धोक्यात आलेले असणे, तेथील गावकऱ्यांनी विविध आंदोलने करून त्याबाबतची निवेदने वेळोवेळी शासनास देऊनसूद्धा त्याकडे शासनाचे | **कित्ता** |

**विवरण क्रमांक २१**—(पुढे सूरू)

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| | | दुर्लक्ष, यासंदर्भात सर्व संबंधित अधिकाऱ्यांची व स्थानिक गावकरी यांचे प्रतिनिधी यांच्यासोबत तातडीने बैठक घेऊन या गावाचे पुनर्वसन त्वरित करण्यात यावे, विनंती पत्राद्वारे तेथील लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री यांच्याकडे पत्राद्वारे ०३/११/२०२३ रोजी विनंती करणे, याबाबत शासनाने त्वरित निर्णय घेऊन जांभाबु. गावाचे त्वरित पुनर्वसन करण्याचीमागणी, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना. | | |
| १४३ | २७४ | **प्रा. राम शिंदे**,श्री. प्रविण दरेकर,श्रीमती उमा खापरे,श्री. रमेश पाटील, **वि.प.स.** | **कित्ता** | |
| | | "राज्यातील उप जिल्हाधिकारी संवर्गाची जेष्ठतायादी मागील १७ वर्षांपासून प्रसिद्ध न करण्यात आल्याने अनेक उप जिल्हाधिकारी संवर्गातील अधिकारी व त्यांना मिळणाऱ्यार लाभांपासून वंचित असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले असणे,सदर यादी एप्रिल, २३ पर्यत जाहीर करून या संवर्गासाठी मिळणारे लाभ देण्यात येतील असे आश्वासन मा. महसूल मंत्री महोदयांनी अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ च्या विधानपरिषदेच्या सभागृहात देणे, सदर आश्वासनाची शासनाने अद्याप पूर्तता न केल्याने उप जिल्हाधिकारी संवर्गातील अनेक अधिकारी वंचित असतानाच बरेच अधिकारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याने त्यांनाही मिळणारे | | |

लाभ देण्याची गरज असणे,त्यामुळे सदर यादी तात्काळ जाहीर करून रिक्त असलेल्या सर्व ठिकाणी नेमणूक पदोन्नतीने पदे भरणे,तसेच अतिरिक्त जिल्हाधिकारी ही पदे न भरल्यामुळे अनेक जात पडताळण्या समितीतील बरेच पदे रिक्त असल्याने समित्यांचे कामकाज ठप्प असणे, यावर शासनाने करावयाची कारवाई व उपाययोजना.”

# विवरण क्रमांक २२

## महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०२ अन्वये अशासकीय ठराव

(१) आलेल्या सूचनांची संख्या - ८१

(२) स्वीकृत झालेल्या सूचनांची संख्या - ६५

(३) चर्चा झालेल्या सूचनांची संख्या - --

| अ.क्र. (१) | सदस्यांचे नाव व विषय (२) | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख (३) | शेरा (४) |
|---|---|---|---|
| | **(मंगळवार, दिनांक ०५ डिसेंबर, २०२३ रोजीच्या बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार खालील ठराव दाखविण्यात आले आहेत)** | | |
| १. | **श्री.सुरेश धस, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक ६६** | | |
| | "विश्ववंदनीय छत्रपती शिवाजी महाराजांचा" व स्वराज्य रक्षक "छत्रपती संभाजी महाराजांच्या" गौरवपूर्ण, वैभवशाली, आदर्शवादी, स्वातंत्र्याचं प्रतिक असलेला, महाराष्ट्राची मान जगात स्वाभिमानान उंचवणारा दृष्टीमान इतिहास हा शालेय शिक्षणात अत्यंत संक्षिप्त स्वरुपात आहे. हा संपूर्ण इतिहास राज्यात इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतच्या अभ्यासक्रमात टप्प्याटप्प्याने समाविष्ट करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." | **शुक्रवार, ८ डिसेंबर, २०२३** | ठरावावर चर्चा झाली नाही. |

**विवरण क्रमांक २२**—(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| २. | **श्री.अभिजीत वंजारी, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २९** | | |
| | "विदर्भात वीज निर्मितीचे अनेक प्रकल्प आहेत, राज्यातील वीज निर्मितीपैकी निम्मा वीज निर्मितीचा वाटा विदर्भाचाच असून त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर भारनियमन होते, भारनियमनामुळे विद्यार्थ्यांचे होणारे शैक्षणिक नुकसान, व्यापारी जगात होणारे आर्थिक नुकसान, विदर्भातील वीज इतरत्र जात असतानासुध्दा विदर्भातील वीज ग्राहकांकडून वीज हानीच्या नावाने पैसा वसूल करण्यात येतो, वीजेअभावी शेती सिंचनापासून वंचित राहणे यामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे होणारे प्रचंड नुकसान, विजेअभावी विदर्भात उद्योग न येणे, परिणामी बेरोजगारांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत आहे, विदर्भामध्ये मोठ्या प्रमाणात प्रदूषण होऊन देखील तेथील विकास होत नाही, विदर्भात उत्पादीत उद्योगांना सवलतीच्या दरात वीज पुरवठा करण्याची नितांत गरज लक्षात घेता विदर्भातील भारनियमन रद्द करण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." | **शुक्रवार, ८ डिसेंबर, २०२३** | ठरावावर चर्चा झाली नाही. |
| ३. | **श्री.जयंत आसगांवकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक २५** | | |
| | "राज्यातील विनाअनुदान तत्वावरील मान्यताप्राप्त माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयीसुविधा उपलब्ध होऊ शकत नाही, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विनाअनुदान तत्वावरील राज्यातील सर्व माध्यमिक शाळांमध्ये विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरती तसेच विविध आवश्यक | **शुक्रवार, ८ डिसेंबर, २०२३** | ठरावावर चर्चा झाली नाही. |

**विवरण क्रमांक २२**—(पुढे सुरू)

| (१) | (२) | (३) | (४) |
|---|---|---|---|
| | सोयीसुविधा उपलब्ध होण्यासाठी सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे." | | |

# विवरण क्रमांक २३

## सन २०२३ चे तृतीय (हिवाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०६ अन्वये शासकीय ठराव

| अ.क्र. | मंत्री व विषय | ज्या तारखेस सूचना सभागृहात घेतली ती तारीख | शेरा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | निरंक | | |

# विवरण क्रमांक २४

## तारांकित व अतारांकित प्रश्नांच्या सूचनांवरील कार्यवाही

| प्रश्नांचा प्रकार | आलेल्या सूचना | जादा सूचना | कार्यवाहीत घेतलेल्या सूचना | अस्वीकृत सूचना | मागे घेतलेल्या सूचना | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | अतारांकित म्हणून स्वीकृत | सम्मिलीत सूचना | स्वीकृत केलेले | तोंडी उत्तरीत झालेले | सदस्य अनुपस्थितीमुळे अतारांकित | व्यपगत | सभागृहात उत्तरीत झालेल्या प्रश्नांची एकूण टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| तारांकित प्रश्न | १८१९ | १७९ | १६४० | १५१ | - | - | ४३८ | ४६१ | ४५२ | ४७ | - | १३८ | १०.४०% |
| अतारांकित प्रश्न | ४ | - | ४ | १ | - | - | - | - | ३* | - | - | - | - |

* मुळ अतारांकित म्हणून प्राप्त झालेल्या स्वीकृत सूचना

# विवरण क्रमांक २५

## अल्पसूचना प्रश्नांवरील कार्यवाही

| आलेल्या सूचना | अस्वीकृत सूचना | मागे घेतलेल्या सूचना | सदस्य/ विभागाकडे खुलाशासाठी पाठविलेले प्रश्न | सम्मिलीत केलेल्या सूचना/अतारांकित स्वीकृत | स्वीकृत सूचना | उत्तरीत झालेल्या सूचना | व्यपगत झालेल्या सूचना | सदस्यांकडून विचारण्यात न आलेल्या सूचना | उत्तर दिलेल्या सूचनांची टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |

**निरंक**

# विवरण क्रमांक २६

## तारांकित प्रश्नांची विभागनिहाय सांख्यिकीय माहिती.

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | जादा प्रश्न | मागे घेतलेले | अस्वीकृत | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तराचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | उच्च व तंत्र शिक्षण | ५७ | ८ | - | ९ | - | १३ | १० | १३ | १ | - | १२ | ४ | ७.६९ % |
| २ | शालेय शिक्षण | १६२ | ६ | - | १४ | - | ६३ | ३४ | २२ | ३ | - | १९ | २३ | १३.६४ % |
| ३ | युवक कल्याण | १ | - | - | १ | - | - | - | - | - | - | - | - | - |
| ४ | क्रीडा | १८ | १ | - | - | - | ६ | ६ | ४ | - | - | ४ | १ | - |
| ५ | महिला व बालविकास | ३८ | ४ | - | १ | - | १३ | १० | ६ | - | - | ६ | ४ | - |
| ६ | पशुसंवर्धन | ११ | १ | - | - | - | १ | ५ | ४ | - | - | ४ | - | - |
| ७ | दुग्धविकास | ५ | - | - | १ | - | १ | १ | २ | - | - | २ | - | - |
| ८ | मत्स्यविकास | ८ | १ | - | १ | - | २ | १ | ३ | १ | - | २ | - | ३३.३३ % |
| ९ | सामान्य प्रशासन | ३१ | ५ | - | १ | - | ११ | ४ | ६ | १ | - | ५ | ४ | १६.६७ % |
| १० | नगर विकास | २२५ | ३० | - | १७ | - | ४३ | ४३ | ६४ | ७ | - | ५७ | २८ | १०.९४ % |
| ११ | गृहनिर्माण | ५१ | ७ | - | २ | - | १२ | १४ | ११ | १ | - | १० | ५ | ९.०९ % |
| १२ | राज्य उत्पादन शुल्क | २ | - | - | - | - | - | - | २ | - | - | २ | - | - |
| १३ | परिवहन | ५९ | ५ | - | ३ | - | २३ | ७ | २० | १ | - | १९ | १ | ५.०० % |
| १४ | बंदरे | ५ | २ | - | - | - | - | १ | १ | - | - | १ | १ | - |

## विवरण क्रमांक २६—(पुढे सुरू)

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | जादा प्रश्न | मागे घेतलेले | अस्वीकृत | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तराचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | गृह | १२९ | ९ | - | ११ | - | २९ | २३ | ४३ | ४ | - | ३९ | १४ | ९.३० % |
| १६ | मराठी भाषा | ११ | ३ | - | - | - | ३ | ३ | १ | - | - | १ | १ | - |
| १७ | विधी व न्याय | ८ | - | - | - | - | ३ | ३ | २ | - | - | २ | - | - |
| १८ | इतर कोणत्याही मंत्र्यांना विवक्षितपणे नेमून न दिलेले विषय | १ | १ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | - |
| १९ | उद्योग | २० | १ | - | १ | - | ४ | ५ | ७ | ३ | - | ४ | २ | ४२.८६ % |
| २० | ऊर्जा | ३० | २ | - | २ | - | ४ | ६ | १५ | - | - | १५ | १ | - |
| २१ | कामगार | ४७ | १ | - | २ | - | २४ | ७ | १२ | - | - | १२ | १ | - |
| २२ | खनिकर्म | २ | - | - | - | - | - | - | - | - | - | - | २ | - |
| २३ | पर्यटन | ५ | - | - | - | - | - | ५ | - | - | - | - | - | - |
| २४ | सांस्कृतिक कार्य | ९ | - | - | १ | - | २ | ५ | १ | १ | - | - | - | १००.०० % |
| २५ | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण | ३० | ४ | - | - | - | १० | ५ | १० | १ | - | ९ | १ | १०.०० % |
| २६ | पाणीपुरवठा व स्वच्छता | २० | - | - | - | - | ३ | ६ | ६ | २ | - | ४ | ५ | ३३.३३ % |

# विवरण क्रमांक २६—(पुढे सुरू)

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | जादा प्रश्न | मागे घेतलेले | अस्वीकृत | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तराचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २७ | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण | १३९ | ७ | - | ६ | - | ५४ | ४३ | २३ | १ | - | २२ | ६ | ४.३५ % |
| २८ | पर्यावरण व वातावरणीय बदल | १९ | २ | - | १ | - | ५ | - | ८ | - | - | ८ | ३ | - |
| २९ | जलसंपदा | ३९ | - | - | ५ | - | ३ | १७ | १२ | १ | - | ११ | २ | ८.३३ % |
| ३० | वैद्यकीय शिक्षण | ५९ | - | - | ५ | - | १८ | २१ | १० | ४ | - | ६ | ५ | ४०.०० % |
| ३१ | अन्न व औषध प्रशासन | १७ | ६ | - | - | - | ३ | २ | ६ | - | - | ६ | - | - |
| ३२ | महसूल | ६२ | १९ | - | १० | - | ८ | १३ | १२ | - | - | १२ | - | - |
| ३३ | वने | ३४ | ७ | - | ४ | - | ४ | १० | ९ | - | - | ९ | - | - |
| ३४ | मदत व पुनर्वसन | ३७ | ५ | - | २ | - | १२ | ९ | ९ | ३ | - | ६ | - | ३३.३३ % |
| ३५ | आपत्ती व्यवस्थापन | १ | - | - | - | - | १ | - | - | - | - | - | - | - |
| ३६ | नियोजन | ११ | १ | - | २ | - | १ | ४ | ३ | १ | - | २ | - | ३३.३३ % |
| ३७ | रोजगार हमी | ९ | १ | - | - | - | १ | २ | ५ | - | - | ५ | - | - |
| ३८ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता | १४ | १ | - | ३ | - | १ | ८ | १ | १ | - | - | - | १००.०० % |

# विवरण क्रमांक २६—(पुढे सुरू)

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | जादा प्रश्न | मागे घेतलेले | अस्वीकृत | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तराचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३९ | दिव्यांग कल्याण | ८ | - | - | ३ | - | १ | - | ३ | - | - | ३ | १ | - |
| ४० | कृषी | ६९ | ११ | - | ११ | - | १६ | १५ | १६ | २ | - | १४ | - | १२.५० % |
| ४१ | फलोत्पादन | ४ | १ | - | १ | - | - | २ | - | - | - | - | - | - |
| ४२ | ग्रामविकास | ५९ | ३ | - | ५ | - | ७ | २६ | १२ | २ | - | १० | ६ | १६.६७ % |
| ४३ | आदिवासी विकास | ५२ | १४ | - | ११ | - | ४ | ११ | १२ | - | - | १२ | - | - |
| ४४ | इतर मागास बहुजन कल्याण | ३४ | - | - | - | - | १० | १३ | ७ | - | - | ७ | ४ | - |
| ४५ | वित्त | १८ | १ | - | ७ | - | ५ | २ | १ | - | - | १ | २ | - |
| ४६ | अल्पसंख्यांक विकास | ६ | - | - | २ | - | १ | २ | - | - | - | - | १ | - |
| ४७ | मृद व जलसंधारण | ७ | - | - | - | - | १ | २ | ४ | १ | - | ३ | - | २५.०० % |
| ४८ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) | ४६ | ४ | - | २ | - | ११ | १२ | १२ | - | - | १२ | ५ | - |
| ४९ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) | ९ | - | - | - | - | ३ | ३ | ३ | - | - | ३ | - | - |

# विवरण क्रमांक २६—(पुढे सुरू)

| अ.क्र. | विभाग | आलेल्या प्रश्नांची संख्या | जादा प्रश्न | मागे घेतलेले | अस्वीकृत | सदस्य/ विभाग निर्देशित केलेले | सम्मिलीत | अतारांकित स्वीकृत | तारांकित स्वीकृत | तोंडी उत्तरीत प्रश्न | सदस्य अनुपस्थिती मुळे झालेले अतारांकित | वेळे अभावी अतारांकित | व्यपगत | तोंडी उत्तराचा शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५० | सहकार | ३० | ४ | - | - | - | ५ | ७ | १४ | ३ | - | ११ | - | २१.४३ % |
| ५१ | पणन | १२ | - | - | ३ | - | २ | ५ | २ | - | - | २ | - | - |
| ५२ | सामाजिक न्याय | ३९ | १ | - | १ | - | १४ | ५ | १३ | २ | - | ११ | ५ | १५.३८ % |
| | **एकूण** | **१८१९** | **१७९** | **–** | **१५१** | **–** | **४६१** | **४३८** | **४५२** | **४७** | **–** | **४०५** | **१३८** | **१०.४० %** |

# विवरण क्रमांक २७

## अतारांकित प्रश्नांची विभागनिहाय आकडेवारी दर्शविणारे विवरणपत्र

| अ.क्र. | विभागाचे नाव | गत सत्रात प्रलंबित राहिलेल्यांपैकी लेखी उत्तर प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नांची संख्या |
|---|---|---|
| १ | अन्न व औषध प्रशासन विभाग | ३ |
| २ | अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग | १ |
| ३ | आदिवासी विकास विभाग | २ |
| ४ | इतर मागास बहुजन कल्याण विभाग | १ |
| ५ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग | १४ |
| ६ | उद्योग विभाग | २ |
| ७ | ऊर्जा विभाग | १० |
| ८ | कृषी विभाग | ८ |
| ९ | कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग | २ |
| १० | गृह विभाग | २१ |
| ११ | गृहनिर्माण विभाग | ८ |
| १२ | ग्रामविकास विभाग | १२ |
| १३ | जलसंपदा विभाग | ८ |
| १४ | नगर विकास विभाग | २७ |
| १५ | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग | ३ |
| १६ | पशुसंवर्धन विभाग | १ |
| १७ | पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग | १ |
| १८ | फलोत्पादन विभाग | १ |

| अ.क्र. | विभागाचे नाव | गत सत्रात प्रलंबित राहिलेल्यांपैकी लेखी उत्तर प्राप्त झालेल्या अतारांकित प्रश्नांची संख्या |
|---|---|---|
| १९ | बंदरे विभाग | १ |
| २० | मत्स्यविकास विभाग | ३ |
| २१ | मदत व पुनर्वसन विभाग | ४ |
| २२ | महसूल विभाग | १९ |
| २३ | महिला व बालविकास विभाग | १ |
| २४ | रोजगार हमी विभाग | २ |
| २५ | वने विभाग | ४ |
| २६ | वित्त विभाग | ३ |
| २७ | विधि व न्याय विभाग | १ |
| २८ | वैद्यकीय शिक्षण विभाग | १ |
| २९ | शालेय शिक्षण विभाग | २१ |
| ३० | सांस्कृतिक कार्य विभाग | २ |
| ३१ | सामाजिक न्याय विभाग | २ |
| ३२ | सामान्य प्रशासन विभाग | ४ |
| ३३ | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग | २ |
| ३४ | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) विभाग | ५ |
| | **एकूण** | **२००** |

# विवरण क्रमांक २८

तारांकित प्रश्नांबाबतचा तपशील

| अनुक्रमांक | तपशील | संख्या |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| १ | सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरीता दाखविण्यात आलेल्या दिवसांची संख्या | ९ |
| २ | सभागृहासमोर प्रश्नोत्तरे चर्चेकरीता न ठेवलेल्या दिवसांची संख्या | १ |
| ३ | प्रश्नांच्या सूचना दिलेल्या सदस्यांची संख्या | ४८ |
| ४ | (अ) तोंडी उत्तरे दिली गेलेल्या प्रश्नांची संख्या | ४७ |
| | (ब) तोंडी उत्तरे दिली गेलेल्या अल्प सूचना प्रश्नांची संख्या | ० |
| ५ | एका सदस्याकडून जास्तीत जास्त आलेल्या प्रश्नांची संख्या **श्री.प्रसाद लाड, वि.प.स.** | ११९ |
| ६ | एका सदस्यांचे जास्तीत जास्त स्वीकृत झालेल्या प्रश्नाची संख्या **श्री.अंबादास दानवे, वि.प.स.** | २५ |
| ७ | एकाच दिवशी जास्तीत जास्त उत्तरे दिलेल्या प्रश्नांची संख्या | ८ |
